
किंमत ₹१०
मार्च-२०१२

# लोकराज्य



## यशवंत-कीर्तिवंत

# प्रियतम यशवंता

कोटि मुखानी आशिर्वच दे, महाराष्ट्र माता
औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा, प्रियतम यशवंता
तुमच्या लेखी नगरी नगरी देवराष्ट्र होई
घराघरांतुन उभ्या ठाकल्या वरदा विठाबाई
'स्वति' वांछितो जनपुरुषोत्तम, उंचावून शतां...

सह्याद्रीच्या शिखरी उठती स्वायंभव नाद
सातपुड्याच्या कड्यात घुमती त्याचे पडसाद
'अजातशत्रु' आज लाभला अम्हा राष्ट्रनेता...

शिवस्मृतीची शाल अर्पिती लोक लोकमान्या
टिळकपणाचा तिलक लाविती तुम्हा नागकन्या
प्रतिपचंद्रापरी वाढू द्या अशीच जयगाथा...

लोकशाहीचे तुम्ही पेशवे, सेवेचे स्वामी
तुमच्यामागे राहो जनता नित्य पुरोगामी
समर्थ होवो महाराष्ट्र हा, भारत-भू-त्राता...

– ग. दि. माडगूळकर

वर्ष ६३वे | अंक १२ | मार्च २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- कार्यकारी संपादक — डॉ. संभाजी खराट
- उपसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे, विलास बोडके
- सहाय्य — दिनेश सुर्वे, प्रशांत जाधव
- मुखपृष्ठ — सौ. चंद्रकला कदम
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई

■ संपादकीय पत्ता ■

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
रूम नं. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार, वितरण व तक्रार निवारणासाठी संपर्क
०२२-२२०२१५३०, २२०२३००६, २२०२३९५७.
e-mail : lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग

| | | |
|---|---|---|
| संस्काराची शिदोरी | संपादकीय | ५ |
| लोकोत्तर लोकनेता | मा. मुख्यमंत्री | ६ |
| युगपुरुषाला प्रणाम | मा. उपमुख्यमंत्री | ८ |
| जीवनपट | | १० |
| महाराष्ट्राचा महानेता | सुरेश द्वादशीवार | १२ |
| बेरजेच्या राजकारणाचा रसिक राजा | हेमंत देसाई | १८ |
| कीर्तिवंत यशवंत | वसंत वासुदेव देशपांडे | २२ |
| रचनात्मक कार्याचा दीपस्तंभ | ॲड. रामनाथ वाघ | २५ |
| सुप्रशासनाचे आद्य शिल्पकार | डॉ. राजन तुंगारे | २८ |
| यशवंतराव आणि विदर्भ | प्रा. नवनीत देशमुख | ३० |
| स्मरणशक्तीला सलाम | विनायकदादा पाटील | ३२ |
| सह्याद्रीची सावली | राम खांडेकर | ३४ |
| तुझे आशीर्वाद दिवे लावून गेले... | ना.धों महानोर | ३८ |
| माणूसवेडा नेता | डॉ. सुदाम जाधव | ४० |
| चित्ररूप दर्शन | | ४२-४९ |
| सभ्यता आणि नम्रता | शरद पवार | ५० |
| माणसे जोडणारा 'माणूस' | केशवराव धोंडगे | ५३ |
| विकेंद्रित सत्तेचा प्रणेता | सुशीलकुमार शिंदे | ५४ |
| आम्ही पाहिलेले यशवंतराव | अरुण खोरे | ५५ |
| निवडून आल्यावर तुम्ही सर्वांचे... | उल्हास पवार | ५६ |
| पालक आणि काका | श्रीनिवास पाटील | ५७ |
| संवेदनशील आणि सुसंस्कृत | शरद काळे | ५९ |
| माणसे घडविणारा माणूस | रामभाऊ जोशी | ६० |
| सीईओ आणि ड्रायव्हर | एस. राजगोपाल | ६१ |
| नात्याच्या पल्याड | अशोकराव चव्हाण | ६२ |
| सामाजिक न्यायाचा कैवारी | लक्ष्मण माने | ६४ |
| सुसंस्कृत नेता | यशवंतराव गडाख | ६६ |
| महाराष्ट्रधर्माचे प्रणेते | न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी | ६९ |
| नेहरू परंपरा के प्रहरी नेता | डॉ. राममनोहर त्रिपाठी | ७२ |
| काबिल आदमी | ग.दि. माडगूळकर | ७४ |
| कृष्णाकाठचा प्रवास | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ७७ |
| सुसंस्कारित मराठी नेता | गोविंद तळवलकर | ७९ |
| प्रगतीमागील प्रतिभा | (महत्त्वाचे निर्णय) | ८१ |

**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ साहाय्यक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# संस्कारांची शिदोरी



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष १२ मार्च, २०१२ पासून सुरू होत आहे. यानिमित्ताने त्यांच्या स्मृतीचे स्मरण करावे आणि त्यांच्या कृतिशील विचारांपासून प्रेरणा घेऊन भविष्यातील यशाकडे वाटचाल करावी यापरता आनंद कोणता!

जन्मशताब्दी वर्षानिमित्त शासनाने अनेक उपक्रम हाती घेतले असून, 'लोकराज्य'चा विशेषांक हा त्याचा एक भाग आहे. मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे या अंकाचे प्रेरणास्थान असून त्यांनी आम्हाला दिलेले प्रोत्साहन शब्दातीत आहे.

मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या कर्तृत्वाविषयी आजवर खूप काही लिहून आले आहे तरीही त्याचे नव्याने परिशीलन करताना, त्यांची भाषणे वाचताना, त्यांच्या आठवणींची उजळणी करताना प्रत्येकवेळी नवा आनंद मिळत राहतो. दूरदर्शी माणसाचे कर्तृत्व हे काळाच्या पुढे कसे असते याचा प्रत्यय त्यांच्या कार्याचा एकेक पदर उलगडताना येऊ लागतो...

यशवंतरावांचे कर्तृत्व चौफेर स्वरूपाचे होते. यशस्वी आणि द्रष्टा नेता, समाजसुधारक, विचारवंत, उत्तम वक्ता, लेखक, कलारसिक, उत्तम प्रशासक, उत्कृष्ट संसदपटू अशा अनेक पैलूंनी मढलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि देवराष्ट्रे येथील शेतकरी कुटुंबातील यशवंतरावांची भारताच्या उपपंतप्रधान पदापर्यंतची झेप पाहता **'मराठा गडी यशाचा धनी'** ही उक्ती त्यांच्या बाबतीत सार्थ ठरते. दिल्लीच्या राजकारणात महादजी शिंदे यांच्यानंतर मानाचे स्थान पटकावणाऱ्या यशवंतरावांच्या कर्तबगारीने मराठी माणसाचा ऊर अभिमानाने भरून येतो.

महाराष्ट्राची आजची प्रगती आणि त्याचबरोबर महाराष्ट्राचे भावविश्व हे यशवंतरावांच्या विचारांआधारे प्रगल्भ झाले आहे हे विसरता येत नाही. शिक्षण-सहकार-विज्ञान-तंत्रज्ञान-कला-साहित्य-अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, विचारांची छाप आजही पडलेली दिसते. पुण्यातील यशवंतराव चव्हाण प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिकचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, मुंबईचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांसारख्या संस्था म्हणजे यशवंतरावांच्या विचारांचा प्रसार करणारे दीपस्तंभ असून, भावी पिढ्यांना त्यांपासून चिरकाल प्रेरणा मिळत राहणार आहे.

सुसंस्कृत नेतृत्वाचा आदर्श वस्तुपाठ ठरलेल्या यशवंतरावांनी आपल्या संस्कारांची जी शिदोरी महाराष्ट्राला दिली आहे ती पुढील प्रवासात दीर्घकाळ आपल्याला संजीवनी देत राहणार आहे, महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला दिशा दाखवत राहणार आहे.

हा अंक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही कसोशीचे प्रयत्न केले आहेत पण आणखीही खूप काही करता आले असते ही खंत उरली आहेच. अंकातील लेख, मुलाखती आणि अन्य साहित्य रसिकांना आनंद देऊन जाईल आणि दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहील, अशी खात्री आहे.

सुप्रसिद्ध चित्रकर्ती श्रीमती चंद्रकला कदम यांनी अंकासाठी यशवंतरावांचे मुखपृष्ठ आणि अन्य तैलचित्रे परिश्रमपूर्वक तयार करून दिली आहेत. यशवंतराव आणि वेणूताईंचे एक खास तैलचित्रही आम्ही तयार करून घेतले असून, ते या अंकात समाविष्ट केले आहे. आम्ही दिलेली ही अनोखी भेट वाचकांना भावेल असा विश्वास आहे.

या अंकासाठी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तसेच अन्य संस्थांनी, व्यक्तींनी अनेक दुर्मीळ छायाचित्रे आणि संदर्भ उपलब्ध करून दिले. मान्यवरांनी वेळात वेळ काढून मुलाखतीसाठी/लेखांसाठी वेळ दिला. या साऱ्यांचे आम्ही आभारी आहोत.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dgiprpa@gmail.com



# लोकोत्तर लोकनेता

**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांचा सार्थ गौरव केला जातो, ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकोत्तर लोकनेता होते. समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहारचतुर, कुशल प्रशासक, अफाट लोकसंग्राहक, साहित्यिक, उत्तम वक्ता, कलारसिक, तत्त्वचिंतक, कुटुंबवत्सल अशा विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. त्यांच्या काही पैलुंचा मुख्यमंत्री *पृथ्वीराज चव्हाण* यांनी घेतलेला वेध...**


“

लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही, असे लोकशाहीचे वर्णन करता येते. परंतु, ही औपचारिक स्वरुपाची व्याख्या आहे. कारण या व्याख्येवरुन लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाही. माझ्यापुरते मी असे म्हणेन की, प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयाने चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टीकोन न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जेथे विचारविनिमय करतात, अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही म्हणतो. लोकशाहीचा अर्थ, केवळ एक शासनाचा प्रकार, असा होत असेल तर अशा लोकशाहीसंबंधी मला बिलकुल आकर्षण वाटणार नाही.

**– यशवंतराव चव्हाण.**

ज्येष्ठ नेते स्व. यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख झाला की महाराष्ट्राचे शिल्पकार, पहिले मुख्यमंत्री, साहित्य-संगीत रसिक, विचारवंत अशी नाना प्रकारची विशेषणे त्यांना लावली जातात. ती सगळी खरीही आहेत, मात्र पुरेशी नाहीत. कारण एखाद्या विशेषणाने यशवंतरावांचे संपूर्ण व्यक्तिमत्व समजावून सांगता येणार नाही, एवढे त्यांचे व्यक्तित्व व्यामिश्र आणि विविधांगी पैलू असलेले होते. लोकनेता कसा असावा, याचे त्यांच्यासारखे दुसरे उदाहरण क्वचितच आढळेल. लोकशाही हा आपल्या देशाच्या शासनप्रणालीचा प्राण आहे. लोकशाहीत लोक किंवा जनता ही सार्वभौम असते. लोकशाहीत प्रत्येक कृती ही लोककेंद्रित आणि लोककल्याणाची असावी लागते. यासाठी अर्थातच विचारविनिमय आणि सहमती असणेही खूप महत्त्वाचे असते. लोकशाहीचे हे महत्त्व नेमकेपणाने स्व. यशवंतरावांनी लोकशाहीबद्दलच्या या लेखाच्या सुरुवातीला दिलेल्या अवतरणात दिले आहे.





आज मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्यांदाच कराडला येऊन, यशवंतरावसाहेबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावर ही किती मोठी जबाबदारी आहे याची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. कराडकरांच्या शुभेच्छा व आशीर्वाद घेऊनच मी कामाला आरंभ केला आहे.

पृथ्वीराज चव्हाण

२५.११.२०१०.

### लोकशाहीचा मूलभूत विचार

राज्यशास्त्र आणि प्रशासन या दोन्ही विषयांचा स्व. यशवंतराव यांचा गाढा व्यासंग होता. ते स्वत:ला राज्यशास्त्राचे विद्यार्थी समजायचे. वेगवेगळ्या शासन प्रणालींचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. राज्यशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र असल्याने ते परिवर्तनीय आहे, असे त्यांचे मत होते. आपण जेव्हा एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करू लागतो, तेव्हा आपण बदलत्या जगात रहात आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे, हे सत्य आपल्याला लक्षात घ्यावे लागते, असा त्यांचा विचार यामागे होता. लोकशाहीवर, विशेषत: भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही प्रणालीवर त्यांची नितांत श्रद्धा आणि निष्ठा होती.

प्रशासनाबद्दल त्यांनी अगदी मूलभूत विचार केला होता. शासन आणि प्रशासन या दोन निराळ्या गोष्टी आहेत व त्यांची काही बलस्थाने आहेत. प्रशासन म्हणजे राज्यकारभार. मात्र ती शासनाची एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. या दोन्ही बाजूंचा सुरेख समन्वय आणि संगम झाला तर त्याचे पर्यवसान साहजिकच लोकांच्या समाधानात होईल, असे त्यांचे साधे आणि सोपे सूत्र होते. मात्र लोकांचे समाधान हा एक वेगळाच प्रकार आहे, याचीही त्यांना कल्पना होती. यामुळे राजकीय लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. तशी जोड ज्यावेळी मिळेल, तेव्हाच तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरुप प्राप्त होईल, अशी त्यांची भूमिका होती.

राजकीय हक्कांच्या बाबतीत सर्वांना समान संधी



मिळणे हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्कांबरोबरच, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल, अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे, अशी मांडणी ते करतात. केवळ मताचा अधिकार म्हणजे लोकशाही, इतकाच लोकशाहीचा मर्यादित अर्थ असेल, तर समाजाच्या दृष्टीने यापेक्षा अधिक हानीकारक अशी दुसरी गोष्ट असू शकणार नाही, असे ते मानत. आजच्या राजकीय-सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले तर यशवंतरावांचे विचार किती महत्वाचे आणि मूलभूत आहेत, याची कल्पना येईल. मंत्र्यांना नाही म्हणण्याचे आणि प्रशासकांना होय म्हणण्याचे शिक्षण मिळाले, तर लोकशाहीतील बरेसचे प्रश्न सुटतील, असेही ते गमतीने म्हणतात.

जेव्हा सर्वार्थाने समर्थ लोकशाही उभी राहाते, तेव्हा प्रत्येक व्यक्तीला खऱ्या स्वातंत्र्याचा लाभ होतो आणि तेव्हाच लोकशाहीचे खरे स्वरुप आपणाला पहायला मिळते. हे जेव्हा घडते, तेव्हाच समाज सामर्थ्यवान बनतो. अशा समाजात केवळ व्यक्तीच स्वतंत्र होते असे नाही, तर सर्व समाजच बौद्धिकदृष्ट्या व अन्य प्रकारे स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समर्थ बनतो, असे त्यांचे प्रतिपादन होते. मला वाटते, आजच्या काळात शासक आणि प्रशासक हे दोघेही जनता, प्रसारमाध्यमे यांच्या टीकेचे लक्ष्य होत असताना यशवंतरावांचा हा विचार पुन्हा एकदा नव्याने रुजविण्याची वेळ आली आहे.

### साहित्य रसिकाग्रणी

शब्दांच्या सामर्थ्यावर आणि सौंदर्यावर नितांत विश्वास ठेवणारे यशवंतराव हे राजकारण आणि साहित्य यांचा समन्वय साधणारे अतिशय दुर्मीळ नेते होते. 'राजकारण आणि साहित्य' दोघांचेही माध्यम शब्द आहे. राजकारणी हे साहित्यिकांचे शब्दबंधू असतात. असे ते म्हणत. यशवंतरावांनी अनेक वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर लेख लिहिले. अनेक दिवाळी अंकातील त्यांचे लेख दिवाळीचे एक प्रमुख आकर्षण असे. 'कृष्णाकाठ' आणि 'ऋणानुबंध' ही त्यांची आत्मचरित्रात्मक पुस्तके आजही रसिकांचे आकर्षण आहेत. विचारवंत राजकीय नेता, असामान्य साहित्यिक आणि शब्दांचा भोक्ता असे यशवंतरावांचे व्यक्तिमत्व होते.

साहित्यव्यवहार आणि साहित्य संमेलन ही त्यांच्या मर्मबंधातील ठेव होती. अतिशय व्यस्त अशा दिनक्रमातूनही ते संधी मिळेल तेव्हा साहित्यिक उपक्रम, नाटके, संगिताच्या मैफली यांना हजेरी लावायचे. मात्र त्यांनी अशा ठिकाणी जाताना किंवा तिथे वावरताना आपल्या साहित्यगुणांचा टेंभा कधीही मिरवला नाही. एक रसिक म्हणूनच ते अशा कार्यक्रमांचा आनंद लुटायचे. मराठी भाषा, तिच्यातील साहित्य, साहित्यिक यांच्याबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारचा अकृत्रिम जिव्हाळा होता.

कोणत्याही भाषेच्या माध्यमातून जे विचार प्रकट होत असतात, त्या विचारप्रवाहांवरच तिची प्रगती अवलंबून असते.त्या विचारप्रवाहात प्राण आणि गती असेल तर असे प्रवाह जनतेच्या मनापर्यंत पोचतात. म्हणूनच लोकजीवनातून खरेखुरे, रसरशीत साहित्य निर्माण होते, अशी मांडणी यशवंतराव करतात. आपला हा मुद्दा स्पष्ट करताना ते संतसाहित्य, लोकगीते यांचे अतिशय चपखल उदाहरणही देतात. केवळ मनोरंजन किंवा दोन घटका करमणुक हा साहित्याचा उद्देश असूच शकत नाही, असे ते मानत. ज्या साहित्यामुळे अमंगलाचा नाश होतो आणि मंगलाची स्थापना होते, असे साहित्य उदात्त गुणांची प्रेरणा देऊ शकते. अशा प्रकारे साहित्य जनतेच्या उदात्त भावनांना प्रेरणा देऊन प्रगतीच्या दिशेने समाजाला गतिमान करते असे प्रतिपादन त्यांनी एका साहित्य संमेलनात केले होते.

### विज्ञानवादी विचारवंत

यशवंतराव केवळ बोलके विचारवंत नव्हते, त्यांच्या व्यक्तिमत्वात एक कृतीशील विज्ञानवादी समाविष्ट होता. भारताची शास्त्रशुद्ध पुनर्रचना करण्यासाठी विज्ञानवादी तरुण निर्माण झाले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती.

विज्ञानप्रसाराबाबत त्यांची स्वत:ची अशी ठाम विचारसरणी होती. समाजाला विज्ञाननिष्ठ बनविण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरुपच तर्कसंगत, बुद्धिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमूल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करु शकतो. जुन्या कल्पना काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या जलद वाटचाल होईल, तितक्या लवकर आपला देश प्रगतशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल, अशी आग्रहपूर्वक मांडणी ते करीत असत. आज एवढ्या वर्षांनंतरही आपल्या समाजाची रुढीप्रियता आणि त्यातून येणारी अगतिकता पाहिली की यशवंतरावांच्या विचारांचे महत्त्व पटते.

विज्ञानाची मूल्ये प्रयत्नपूर्वक शिक्षणातून रुजविली पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असायचा. यासाठी समाजातील बुद्धीवंतांनी समाजाशी समरस होऊन ही विज्ञानवादी चळवळ चालविली पाहिजे. आधुनिकतेची मूल्ये, विज्ञानवादी प्रेरणा नव्या तरुणांना दिल्या पाहिजेत, असे ते म्हणत. असे झाले तर त्यांची स्वप्ने ही आपण लहानपणी पाहिलेल्या स्वप्नांपेक्षा भव्य आणि वेगळ्या क्षितिजाकडे झेपावणारी असतील. प्रादेशिकतावाद, भाषावाद, जातीयवाद यांच्या आवर्तात आपण सापडलो तर आपला देश प्रतिगामी राष्ट्र होईल, अशी साधार भीती त्यांना वाटत असे. म्हणूनच जेथे जेथे संधी मिळेल तेथे ते विज्ञाननिष्ठेचे आवाहन विशेषत: युवकांना करीत असत. त्यांचे हे विचार आजही तितकेच लागू आहेत.

### द्रष्टे राजकीय नेतृत्व

यशवंतरावांचा राजकीय पिंड स्वांतत्र्याच्या आंदोलनावर पोसलेला होता.भारतीय राजकारणातील गांधीयुगाला, सत्याग्रह-सविनय कायदेभंग-प्रतिकार या मोहिमेला वेग आणि परिपक्वता आलेल्या काळात यशवंतरावांचा राजकीय प्रवास सुरू झाला. देशात तेव्हा देशभक्तीचा अंगार फुललेला होता. पंडित जवाहरलाल नेहरुही स्वयंतेजाने तळपत होते. महात्मा गांधींचा संदेश सत्याग्रहाचा होता, तर पंडितजींचा क्रांतीचा होता. त्याला रशियन राज्यक्रांतीचा संदर्भ होता. रशियन क्रांतीने उभ्या जगाला हादरवून टाकले होते. पंडितजींचे संस्कारक्षम मन या क्रांतीने भारून गेले होते. यशवंतरावांचा राजकीय पिंडही याच क्रांतीच्या तत्त्वज्ञानावर पोसला होता, असे म्हणायला हरकत नाही. म्हणूनच त्यांच्या राजकीय भूमिकेवर एकाचवेळी दोन तात्त्विक विचारपद्धतींचा ठसा उमटलेला स्पष्टपणे दिसतो.

### द्वैभाषिकाचा प्रयोग आणि यशवंतराव

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्वाचा कळसाध्याय होता. संयुक्त महाराष्ट्राची जोरदार चळवळ महाराष्ट्रात सुरू होती, त्याचदरम्यान राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल जाहीर झाला. या अहवालात 'समतोल द्वैभाषिक' राज्याची कल्पना मांडण्यात आली होती. या संकल्पनेला यशवंतरावांनी कठोरपणे



विरोध केला. परंतु, पक्षाची भूमिका म्हणून आणि शिस्तपालन म्हणून द्वैभाषिक राबविण्याची जबाबदारी त्यांनी शेवटी स्वीकारली आणि १ नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांनी द्वैभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. काँग्रेस पक्षाशी असलेल्या निष्ठेमुळेच आणि बंधनकारक शिस्तीमुळेच त्यांनी हा निर्णय स्वीकारला होता. यशवंतरावांचे नेतृत्व आणि व्यक्तिमत्व राष्ट्रीय दर्जाचे होते, हेच यामुळे सिद्ध होते.

त्रिराज्य योजना, केंद्रशासित मुंबई, विशाल द्वैभाषिक असे अनेक पर्याय पुढे आले तेव्हा त्यांनी लोकभावना आणि सर्वमान्य लोकशाहीनिष्ठ मागणी म्हणून मनापासून संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबाच दिला. मात्र पक्षनेतृत्वाकडून आदेश मिळाल्यावर एकभाषी राज्याबाबतचे आपले अनुकूल मत त्यांनी निर्भिडपणे आणि सुस्पष्टपणे मांडले आणि मगच द्वैभाषिक राबविण्यास संमती दिली. याबाबत त्यांनी अत्यंत प्रांजलपणे आपले मत नोंदवून ठेवले आहे. यशंवतराव आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ होते. ते म्हणतात, मनात एकभाषिक ठेवुन मी द्वैभाषिक चालविले नाही. या प्रयोगाला पूर्ण वाव द्यावयाचा, तो यशस्वी होत असेल, तर त्याला संपूर्ण संधी द्यावयाची, अशा निर्धाराने एक-दीड वर्ष मी अगदी एकनिश्चयाने (single-minded) द्वैभाषिक राबविले. त्यात सदिच्छा कायम राखण्यास संधी मिळेल, राष्ट्रीयदृष्ट्या हा एक प्रयोग होत आहे, त्याला आपल्याकडून संपूर्ण सहकार्य द्यावयाचे, अशी माझी याबाबतीत धारणा होती.

**संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार**

संयुक्त महाराष्ट्राच्या देदिप्यमान चळवळीबाबत नव्याने काही लिहिण्याची गरज नाही. कराड मतदारसंघातून १९५७ साली निवडून आल्यावर यशवंतरावांवर द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी आली. वर म्हटल्याप्रमाणे त्यांनी ती पक्षशिस्त म्हणून स्वीकारलीही. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणुन सुमारे दीड वर्ष काम केल्यावर एकदा पंडितजी मुंबईच्या दौऱ्यावर आले असता या प्रयोगाबाबत या दोघांचीही चर्चा झाली होती. त्यावेळी शासकीयदृष्ट्या द्वैभाषिक मुंबई राज्य चांगले चाललेले असले तरी लोकभावना मात्र त्याला अजिबात अनुकूल नाही आणि राजकीयदृष्ट्या हा प्रयोग योग्य ठरणार नाही, हे आपले मत त्यांनी निर्भिडपणे पंडितजींसमोर मांडले होते.

यानंतर पंडितजी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला हळूहळू अनुकूल झाले. याआधी १९५७ साली प्रतापगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरण समारंभावेळी पंडितजींनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा आणि लोकभावनेचा अनुभव घेतला होताच. अखेर १ मे १९६० रोजी तो मंगल दिवस उजाडला आणि पंडितजींसह यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊनच महाराष्ट्रात परतले.

पंतप्रधान पंडित नेहरू यांच्याहस्ते १ मे १९६० रोजी पहाटे संयुक्त महाराष्ट्राच्या नवीन राज्याचे उद्घाटन झाले. पहिल्या दिवशी महाराष्ट्राला उद्देशून यशवंतरावांनी जे भाषण केले ते नव्या राज्याबद्दल त्यांची संकल्पना स्पष्ट करणारे होते. ते म्हणाले, गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती, ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील, अशी आशा करण्यास मुळीच हरकत नाही. त्यायोगे लोकांना आता आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षाने लक्ष देता येईल व विकास कार्याच्या बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणे तोंड देऊ शकतील. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील, ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो.

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर यशवंतरावांनी आपले लक्ष पूर्णपणे राज्याच्या विकासावर केंद्रित केले. विशेषत: शेती, उद्योग, बेरोजगारी आणि अर्थव्यवस्था या महत्त्वाच्या विषयांकडे त्यांनी जाणूनबुजून लक्ष दिले. यासाठी पहिल्या दिवसापासून अतिशय जागरुकतेने त्यांनी उद्योग खात्याची जबाबदारी स्वत:कडेच ठेवली. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ म्हणजेच एमआयडीसीची स्थापना करून त्यांनी महाराष्ट्रातील कारखानदारीला आणि उद्योग व्यवसायांना शासकीय अभय मिळवून दिले. बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामीण भागात लहान उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात सुरू झाले पाहिजेत असा प्रयत्न त्यांनी केला. शेती हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा उद्योग आहे. शेती आणि पाणी यांचाही अभेद्य संबंध आहे. या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करून यशवंतरावांनी इरिगेशन कमिशन नेमले. कर्जाचे ओझे, शेतमालाच्या किंमतीचे संकट आणि अधूनमधून पडणारा दुष्काळ या संकटांच्या विळख्यात सापडलेला शेतकरी स्वत:च्या पायावर कसा उभा राहील यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शेती महामंडळाची स्थापना, कमाल जमीन धारणेचा कायदा आदी शेती क्षेत्रातील पुरोगामी पावले त्यांनी उचलली.

शिक्षण प्रसारावरही त्यांनी लक्ष दिले. शहरे आणि गावे यांच्यात नवा संवाद सुरू झाला पाहिजे असे ते मानायचे. आचारविचारांची देवाण-घेवाण वाढली तर एकजिनसी समाजजीवन निर्माण करण्याच्या दिशेने प्रगती होईल असे त्यांचे मत होते. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करुन त्यांनी साहित्य-संस्कृती व्यवहाराला शासकीय अधिष्ठान प्राप्त करुन दिले. नव्या महाराष्ट्राला त्यांनी अत्यंत आवडीने जगन्नाथाचा रथ अशी सार्थ उपमा दिली होती. सर्वांचे हात लागल्याशिवाय हा रथ हालणारही नाही व चालणारही नाही. महाराष्ट्राच्या भवितव्याची लांबचलांब सफर आपणा सर्वांना पुरी करायची आहे. कारण त्यातच जनतेचे कल्याण आहे, असे ते म्हणत. त्यांचे हे शब्द महाराष्ट्राला सदैव मार्गदर्शक ठरतील.

सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रेसारख्या अत्यंत छोट्या खेडेगावात जन्माला येऊन राष्ट्रीय पातळीवर स्वत:चे स्थान निर्माण केलेले यशवंतरावजी चव्हाण हे एका अर्थाने कोडेच आहे. कॅलिडिओस्कोपमधून प्रत्येक वेळी जसे वेगवेगळे चित्र दिसते, तसेच यशवंतरावांच्या बाबतीत आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचा शोध घेणे हे फार कठीण काम आहे. वेगवेगळी सत्तापदे उपभोगलेला एक राजकीय नेता, कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासक, साहित्य संगीताचा रसिकाग्रणी, मोठा मित्र परिवार असलेला दिलखुलास लोकसंग्राहक अशी त्यांची विविध रुपे आहेत. यात उजवे-डावे करणे फार कठीण आहे. यशवंतराव हे सर्वार्थाने मोठे होते, एवढे मात्र खरे. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरुन महाराष्ट्राची कालक्रमणा सुरू आहे. गेल्या अर्धशतकात महाराष्ट्राने वेगवेगळ्या क्षेत्रात जी नेत्रदीपक प्रगती केली आणि राष्ट्राच्या पटावर आपले स्वत:चे जे स्थान निर्माण केले त्याचे श्रेय नि:संशयपणे यशवंतरावांच्या दूरदृष्टीला जाते हे नक्की.

**शब्दांकन : सतीश लळीत**
**संपर्क : ९४२२४१३८००**



# युगपुरुषाला प्रणाम

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेबांविषयी आपल्या सर्वांच्या मनात अपार श्रद्धा, प्रेम आणि आदर आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखविलेली दूरदृष्टी आणि घेतलेले अचूक निर्णय यातूनच आजचा प्रगतीशील महाराष्ट्र घडला आहे. राष्ट्रीय पातळीवरही चव्हाण साहेबांनी आपलं कर्तृत्व वेळोवेळी सिद्ध केलं. केंद्रीय मंत्री म्हणून त्यांनी केलेलं कार्य आणि देशवासीयांच्या मनात स्वत:विषयी निर्माण केलेला विश्वास या बळावरच देशाचं उपपंतप्रधानपदही त्यांच्याकडे चालून आलं. चव्हाण साहेबांच्या रूपानं देशाला सक्षम उपपंतप्रधान लाभला तसंच मराठी माणूस उपपंतप्रधान झालेला पाहण्याचं भाग्य आपल्याला अनुभवता आलं.

यशवंतराव चव्हाण साहेबांनी जातीभेदविरहित, सुसंस्कृत आणि संपन्न महाराष्ट्राचं स्वप्न पाहिलं होतं. आपलं राज्य केवळ देशातीलच नव्हे, तर जगातील सर्वांत प्रगतीशील राज्य बनले पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. ४० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय राज्याच्या प्रगतीला गती आणि सर्वसामान्य माणसाला बळ देणारा होता. राज्यातील जनतेचं कल्याण हेच एकमेव ध्येय उराशी बाळगून त्यांनी अविरत कार्य केलं.

भविष्यातील महाराष्ट्र कसा असावा याबाबत चव्हाण साहेबांची मते अत्यंत स्पष्ट होती. राज्याच्या कृषी, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक विकासाला त्यांनी योग्य दिशा दिली. समाजकारण आणि राजकारणात चव्हाण साहेबांचं कार्य आपल्याला ठळकपणे दिसत असलं तरी साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती अशा अन्य क्षेत्रांतही त्यांचं मोठं योगदान आहे. आपल्या सर्वांच्या मनात असलेलं त्यांचं स्थान लक्षात घेऊन १३ मार्च २०१२ ते १२ मार्च २०१३ हे त्यांचं जन्मशताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी आणि लोकसहभागातून साजरं करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानिमित्तानं चव्हाण साहेबांचं कार्य आणि विचार सर्वांसमोर विशेषत: तरुण पिढीसमोर यावेत आणि चिरंतन राहावेत, असा आपला प्रयत्न आहे. त्यासाठी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात त्यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करण्यात येत आहे.

देशासाठी काहीही आणि कोणताही त्याग करण्याची चव्हाण साहेबांची अगदी लहानपणापासून तयारी होती. याचा प्रत्यय १९६२च्या चीन आक्रमणाच्या वेळी आला. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी मोठ्या विश्वासाने त्यांना दिल्लीला बोलावून घेतले आणि त्यावेळची अत्यंत महत्त्वाची संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. चव्हाण साहेबांनीही ते आव्हान समर्थपणे पेलले. आपल्या नेतृत्वानं भारतीय अधिकाऱ्यांमध्ये विश्वास निर्माण केला. लष्कराचं मनोधैर्य वाढवलं. पंडित नेहरूंच्या बोलवण्यावरून चव्हाण साहेब ज्यावेळी दिल्लीला गेले त्यावेळी 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला' अशा शब्दांत जाणकारांनी त्यांचा गौरव केला होता. यशवंतरावांचा तो गौरव म्हणजे महाराष्ट्राच्या प्रत्येक सुपुत्राचा गौरव होता, असं मला वाटतं.

**अजित पवार, उपमुख्यमंत्री**

चव्हाण साहेबांनी देशातील संरक्षणक्षेत्राच्या आधुनिकीकरणाचा पाया घातला आणि शस्त्रसज्जतेच्या दिशेने वेगवान सुरुवात करून दिली. त्यांच्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम १९७१च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात आपल्याला पाहायला मिळाले. केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, विरोधी पक्षनेते तसंच केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करताना चव्हाण साहेबांनी आपले कर्तृत्व वेळोवेळी सिद्ध केले आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवला. देशाचे उपपंतप्रधान हे अत्यंत महत्त्वाचं पद केवळ कर्तृत्वाच्या जोरावर त्यांना मिळालं आणि त्यांनीही त्या पदाचा सन्मान वाढवला.

चव्हाण साहेबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू सांगता येतील. ते थोर विचारवंत होते. साहित्यिक होते. मुत्सद्दी नेते होते. विरोधकांचा मान राखणारे संयमी राजकारणी होते. त्यांच्या राजकारणाला वैचारिक अधिष्ठान होते. जनतेच्या सुखदु:खाशी समरस झालेले, जनमताची नाडी अचूक ओळखणारे ते लोकनेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सर्वांना भावणारा सुसंस्कृतपणा होता. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे राजकीय क्षेत्राला त्यांनी वेगळी उंची प्राप्त करून दिली. त्या बळावर राज्यातीलच नव्हे, तर देशातील जनतेचा विश्वास त्यांनी संपादन केला होता.

राज्यात पायाभूत प्रकल्प आणि भौतिक सुविधांची निर्मिती करीत असताना इथल्या समाजकारण आणि राजकारणाला सुयोग्य दिशा देण्याचं महत्त्वाचं काम चव्हाण साहेबांनी केलं. सर्वांना बरोबर घेऊन बेरजेचे राजकारण करण्यावर त्यांनी भर दिला. सर्वसमावेशक, समतोल आणि जातीभेदविरहित राजकारणातूनच महाराष्ट्राचं भलं होऊ शकतं, हे त्यांनी जाणलं होतं. तसे संस्कार त्यांनी इथल्या राजकीय क्षेत्रावर केले. त्याचे परिणाम आज आपल्याला दिसत आहेत.

महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये आणि नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नता असली तरी वैयक्तिक कटुता किंवा वैर कधीच दिसलं नाही. विरोधी पक्षातील नेत्यांशी वैयक्तिक मैत्री असणं आणि राज्याच्या विकासासाठी या सर्वांनी एकत्र येणं, असं सकारात्मक वातावरण केवळ महाराष्ट्रातच दिसू शकतं. ही सारी चव्हाण साहेबांच्या संस्कारांची आणि विचारांची देणगी आहे.

समाजकारण आणि राजकारणात कार्यरत असलेल्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी चव्हाण साहेबांचं जीवनकार्य आणि विचार मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहेत. त्यांनाच आदर्श मानून आज आमची वाटचाल सुरू आहे. चव्हाण साहेबांनी दिलेला राजकारणाचा हाच वारसा पुढे नेण्याचं काम आम्ही सर्वच जण आपापल्या परीनं करीत आहोत.

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही आपल्यासाठी सर्वाधिक अभिमानाची गोष्ट आहे. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हा आपला गौरवशाली इतिहास आहे. या आंदोलनात सहभागी झालेल्या कोट्यवधी जनतेचा त्याग आणि १०५ हुतात्म्यांचे बलिदान यामुळेच संयुक्त महाराष्ट्र आकाराला येऊ शकला. संयुक्त महाराष्ट्रासाठी जनजागृती करण्यात आंदोलन समितीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचवेळी महाराष्ट्राच्या निर्मितीचा निर्णय घेण्यासाठी केंद्राचं मन वळविण्यात चव्हाण साहेबांची भूमिका प्रमुख होती. त्या संपूर्ण आंदोलन काळात त्यांची भूमिका अत्यंत दूरदर्शीपणाची होती. राष्ट्रीय एकता कायम



राहावी तसंच महाराष्ट्रानं मुख्य राजकीय प्रवाहापासून दूर जाऊ नये, असा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, त्याच वेळी, महाराष्ट्रातील जनतेची संयुक्त महाराष्ट्राची आग्रही मागणी केंद्र शासनाकडे ठामपणे मांडण्याचं काम चव्हाण साहेबांनीच केलं. केंद्र शासनाने हा अनुकूल निर्णय घ्यावा यासाठी पंडित नेहरूंचे मन वळविण्यात ते यशस्वी ठरले आणि त्यांच्या प्रयत्नांमुळेच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊ शकली. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणण्याचं भाग्य त्यामुळेच त्यांना लाभलं, हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचं ध्येय पूर्ण केल्यानंतर प्रगतीशील महाराष्ट्र घडविण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केलं. मुंबई, कोकण, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशा भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या राज्याला एका सूत्रात बांधण्याचं काम करीत असतानाच राज्यातल्या जनतेत भावनात्मक एकजूट निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्रातल्या ७० टक्के जनतेचं जीवन शेतीवर अवलंबून आहे हे लक्षात घेऊन त्यांनी कृषी औद्योगिक समाजसेवेची कल्पना मांडली आणि कृषी उद्योगांना प्रोत्साहन दिलं. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सहकार चळवळ ग्रामीण भागात रुजवण्यावर त्यांनी भर दिला. गावागावांमध्ये सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. सहकारी बँका, सहकारी साखर कारखानदारी सुरू करण्यासाठी त्यांनी मदत केली. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकासाची गंगा नेली. औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणून उद्योगांसाठी राज्यात पोषक वातावरण निर्माण केले. ग्रामीण भागातच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल यासाठी प्रयत्न केले, यामुळे साहजिकच ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली.

लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणूस हा केंद्रबिंदू मानत असलो तरी प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत आणि प्रशासकीय व्यवस्थेत त्याचा सहभाग नगण्य असतो हे लक्षात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय पंचायत राजव्यवस्था स्थापन करण्याचा महत्त्वाचा निर्णय चव्हाण साहेबांनी घेतला. यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण तर झालेच शिवाय ग्रामीण भागातील नेतृत्वाला संधी मिळाली. स्थानिक पातळीवरील प्रश्नांची जाण असलेले लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज संस्थांवर निवडून येऊ लागल्याने स्थानिक प्रश्न स्थानिक पातळीवरच मांडले आणि सोडविले जाऊ लागले. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी याचा फार मोठा उपयोग झाला.

जिल्हा परिषदेत विकसित झालेलं नेतृत्वच पुढे जाऊन विधान मंडळ आणि संसदेत काम करू लागलं. याचा फायदा राज्याच्या विकासप्रक्रियेला गती मिळण्यात झाला. स्थानिक पातळीवर काम केलेलं अनुभवी नेतृत्व विधिमंडळ आणि संसदेत निवडून येऊ लागल्यानं जनतेच्या प्रश्नांची त्यांना



अचूक जाण होती. त्यामुळे अधिकाऱ्यांवर विसंबून राहण्याची गरज उरली नाही. परिणामी, निर्णयप्रक्रिया अधिक लोकाभिमुख, अचूक आणि जलद झाली. चव्हाण साहेबांनी दाखविलेल्या दूरदृष्टीमुळेच हे शक्य होऊ शकलं.

चव्हाण साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत सर्वसामान्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर नवा कुळकायदा लागू केला. शेतजमिनींच्या कमाल धारणेवर मर्यादा आणण्याचा कायदा करून त्यांनी जमीन सुधारणेच्या दिशेने क्रांतिकारी पाऊल उचललं. या निर्णयांचा गरीब शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला. राज्याची पंचवार्षिक योजना सुरू केली. कोयना आणि उजनी या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची उभारणी केवळ त्यांच्यामुळेच होऊ शकली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठांची निर्मिती केली. कृषी विद्यापीठांची स्थापना केली. मराठी साहित्य संस्कृती महामंडळ आणि विश्वकोश मंडळाची स्थापना केली. मराठी ही राजभाषा करण्याचे तत्त्व स्वीकारले. १९६१मध्ये पुण्यातील पानशेत आणि खडकवासला धरण फुटून झालेल्या जलप्रकोपाच्यावेळी पुणेकरांच्या मदतीसाठी ते तातडीने धावून आले होते. त्या संकटकाळात मदतकार्याचं आव्हान कठीण होतं. ते पेलताना त्यांच्या नेतृत्वाचे आणि कुशल प्रशासकाचे अनेक पैलू लोकांना अनुभवायला मिळाले.

चव्हाण साहेबांचं व्यक्तिमत्त्वं उत्तुंग आणि कर्तृत्व महान आहे. त्यांच्या संपूर्ण यशात आणि जडणघडणीत आई विठाबाई आणि पत्नी वेणूताई या दोघींचा वाटा सर्वाधिक असल्याचं जाणवतं. वेणूताईंनी प्रत्येक सुखदुःखाच्या प्रसंगात त्यांना खंबीर साथ दिली. संरक्षणमंत्री म्हणून केंद्रात जाण्यासारखे अनेक महत्त्वाचे निर्णय केवळ वेणूताईंच्या आग्रहामुळेच ते घेऊ शकले. वेणूताईंशिवाय चव्हाणसाहेब हा विचार करणंच अशक्य आहे. चव्हाण साहेबांच्या जीवनावरील वेणूताईंच्या प्रभावामुळेच ताईंच्या निधनाच्या धक्क्यातून सावरणं त्यांना अशक्य झालं.

चव्हाण साहेबांच्या संपूर्ण जीवनकार्यावर नजर टाकली तर ते युगपुरुष असल्याची खात्री पटते. त्यांनी महाराष्ट्राला अनेक गौरवाचे आणि अभिमानाचे क्षण प्राप्त करून दिले. त्यांच्यासारखा महापुरुष या भूमीत जन्माला आला हे आपलं भाग्य आहे. महाराष्ट्राला जगातील सर्वांत प्रगत राज्य बनविणं हे चव्हाण साहेबांचं स्वप्न होतं, ते स्वप्न पूर्ण करणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य असून, तीच यशवंतरावांना खरी आदरांजली ठरणार आहे.



# जीवनपट...

- **१९१३ –** १२ मार्च. जन्म सातारा जिल्ह्यातील (सध्या सांगली जिल्हा) देवराष्ट्रे या गावी.
- **१९१८ – १९** वडील बळवंतराव चव्हाण यांचे प्लेगच्या साथीत निधन. देवराष्ट्रे येथील प्राथमिक शाळेत चौथीपर्यंत शिक्षण व नंतर कऱ्हाड येथे शिक्षणासाठी दाखल.
- **१९२७ –** कराडच्या केंद्र शाळेतून व्हर्नाक्यूलर फायनल परीक्षा पास. कराड येथील टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश.
- **१९२९ –** भगतसिंगांनी असेंब्लीत बॉम्ब फेकला त्या घटनेने राजकीय जीवनाकडे आकृष्ट आणि भगतसिंगांच्या फाशीनंतर स्वातंत्र्यलढ्याला आयुष्य वाहून टाकण्याचा निर्धार.
- **१९३०–३१ –** असहकाराच्या (कायदेभंग) चळवळीत सहभाग १८ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा.
- **१९३३ –** मे. तुरुंगातून सुटका
- **१९३१ –** साली पुणे येथील (नूतन मराठी विद्यालयातर्फे) वक्तृत्व स्पर्धेत 'ग्रामसुधारणा' या विषयावर पहिल्या क्रमांकाचे रुपये १५० (दीडशे)चे पारितोषिक.
- **१९३४ –** मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश. (प्राचार्य डॉ. बाळकृष्ण व प्रोफेसर ना.सी. फडके यांचा सहवास व मार्गदर्शन)
- **१९३५ –** महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य
- **१९३८ –** इतिहास व राजकारण हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी.ए. ही पदवी परीक्षा उत्तीर्ण. पुणे येथील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश.
- **१९३६ ते३८–** एम.एन. रॉय यांच्या विचाराचा प्रभाव (रॉयवादी विचारसरणीच्या छायेत)
- **१९४० –** सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष.
- **१९४१ –** ऑगस्ट, एल.एल.बी. परीक्षेत सुयश व वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ.
- **१९४१ –** सातारा कऱ्हाड येथे भरलेल्या (दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनातील) परिसंवादाचे अध्यक्ष. विषय 'बहुजन समाज आणि साहित्य'.
- **१९४२–** जून २, कराड येथे वेणूताईंशी विवाहबद्ध (फलटण येथील मोरे कुटुंबातील कन्या)
- **१९४२ –** ऑगस्ट ९, चळवळीस प्रारंभ, विशाल सातारा जिल्हा नेतृत्व, म. गांधींच्या 'चले जाव' घोषणेत सामील आणि भूमिगत, 'भारत छोडो चळवळीत' अटक.
- **१९४२–४३ –** सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत प्रवेश, संचालन, मार्गदर्शन.
- **१९४३ –** साली सर्वांत थोरले बंधू ज्ञानोबा यांचे निधन.
- **१९४४ –** 'राजकीय क्रांती' या विषयावर कविता (तुरुंगवास)
- **१९४५ –** तुरुंगातून सुटका
- **१९४६ –** मुंबई इलाखा कायदे मंडळाच्या निवडणुकीत द. सातारा मतदारसंघातून निवड
- **१९४६ –** एप्रिल १४, गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड.
- **१९४७ –** डिसेंबर १५, मध्ये मधले बंधू गणपतराव यांचे निधन.
- **१९४८ –** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस.
- **१९५१ –** मधले बंधू गणपतराव यांच्या पत्नीचे निधन.
- **१९५२ –** कऱ्हाड मतदारसंघातून विधानसभेवर निवड व नागरी पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती.
- **१९५३ –** सप्टेंबर २८, श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. नानासाहेब कुंटे यांच्या समवेत नागपूर करारावर पश्चिम महाराष्ट्राच्या वतीने स्वाक्षरी.
- **१९५४ –** मुंबई राज्य पंचायत संघाची स्थापना.
- **१९५५ –** ऑक्टोबर १०, राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल प्रसिद्ध. विदर्भाचे वेगळे राज्य व उर्वरित मराठी प्रदेश व गुजराती प्रदेश यांचे संयुक्त राज्य सुचविणारी शिफारस.
- **१९५५ –** डिसेंबर १, फलटण येथे सातारा (सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या) सभेत ''उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत,'' असे ठासून प्रतिपादन करणारा ठराव मंजूर. महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ, आणि ''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याच्या प्रयत्नांत यापुढे श्री. शंकरराव देव यांचे नेतृत्व स्वीकारावयास मी तयार नाही,'' अशी श्री. चव्हाण यांची घोषणा.
- **१९५६ –** ऑक्टोबर, लोकसभेने विदर्भासाठी विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याच्या बाजूने आपला कौल दिला.
- **१९५६ –** नोव्हेंबर १, विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना व द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड (वय ४३)
- **१९५७ –** एप्रिल, मुंबई विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कऱ्हाड येथे अटीतटीचा सामना होऊन विजय व पुनश्च मुख्यमंत्री (वय४४)
- **१९५७ –** नोव्हेंबर ३०, प्रतापगडावर शिवस्मारकाचे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उद्घाटन.
- **१९५८ –** फेब्रुवारी, विसाव्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन.
- **१९५८ –** नोव्हेंबर, बेळगाव–कारवार सीमा प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करून घेण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने चळवळ सुरू.
- **१९५८ –** डिसेंबर, सीमाप्रश्नाची दाद मागण्यासाठी भारताच्या राजधानीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने सत्याग्रह.
- **१९५९ –** मार्च, शस्त्रक्रिया व बेचाळीस दिवसांची विश्रांती.
- **१९५९ –** ऑगस्ट, द्विभाषिक राज्याचा कारभार यशस्वी होत असला तरी राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण झालेली नाही, म्हणून मुख्यमंत्री या नात्याने ते मी यापुढे चालवू शकणार नाही, असा निर्णय घेऊन तो काँग्रेस श्रेष्ठींना कळविला.
- **१९५९ –** सप्टेंबर, द्विभाषिक मुंबई राज्याची पुनर्रचनेसंबंधी विचार करण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीने ९ सदस्यीय समिती नेमली.
- **१९५९ –** डिसेंबर २९, अलिगड मुस्लीम विद्यापीठ, अलिगड – ऑनररी डिग्री ऑफ एल.एल.डी. पदवी.
- **१९६० –** जानेवारी, द्विभाषिक राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह मराठी प्रदेशाचे व गुजरात प्रदेशाचे अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय नऊ सदस्यीय समितीने घेतला.



- १९६० – फेब्रुवारी १३ (सावरगाव – डुकरे) येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन.
- १९६० – मार्च बारामती येथील लोकसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने निवडून देऊन महाराष्ट्र राज्याची निर्मिती लोकशाही पद्धतीने व शांततेने करण्याच्या प्रयत्नावर जनतेने विश्वास व्यक्त केला.
- १९६० – एप्रिल, लोकसभेने द्विभाषिक राज्याची निर्मिती करून मुंबईसह महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्याच्या योजनेवर शिक्कामोर्तब केले.
- १९६०– मे १, महाराष्ट्र राज्याची उत्साही वातावरणात स्थापना व नवीन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथविधी (वय ४६)
- १९६० – जून, पुणे पं. गोविंदभाई पंत यांच्या उपस्थितीत म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. जत्ती यांनी सीमेचा प्रश्न वादविषय असल्याचे मान्य केले. श्री. चव्हाण व श्री. जत्ती यांचे सीमाप्रश्नांचा विचार करण्यासाठी व आपापल्या सरकारांनी रिपोर्ट सादर करण्यासाठी प्रत्येकी दोन प्रतिनिधी मिळून चार सदस्यांची नेमणूक करण्यात येईल, अशी घोषणा करणारे संयुक्त पत्रक.
- १९६०– ऑक्टोबर २१, पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीतर्फे जाहीर सत्कार.
- १९६० – नोव्हेंबर १०, नागपूर करार अंमलबजावणीचा भाग म्हणून महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात दरवर्षी भरविण्यास सुरुवात.
- १९६० – डिसेंबर मुंबई येथे शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण.
- १९६१ – जानेवारी, काँग्रेस महासमितीमधून निवडणूक पद्धतीने प्रथमच झालेल्या निवडीत वर्किंग कमिटीवर निवड.
- १९६१ – दिल्ली येथे भरलेल्या ४३व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष.
- १९६१ – मार्च ३०, विदर्भातील जनतेच्या वतीने नागपूर येथे ४७व्या वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ.
- १९६२ – मे १, पंचायत राज्य योजनेचा प्रारंभ.
- १९६२ – सातारा येथे भरलेल्या अ.भा.म. साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक.
- १९६२ – फेब्रुवारी, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका, काँग्रेसने २६५पैकी २१४ जागा जिंकून प्रचंड विजय मिळविला.
- १९६२ – ऑक्टोबर, 'केसरी'च्या दिवाळी अंकात 'नियतीचा हात' हा पहिला लेख प्रसिद्ध.
- १९६२ – नोव्हेंबर २२, भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रग्रहण.
- १९६३ – नाशिक जिल्ह्यामधून लोकसभेवर बिनविरोध निवड.
- १९६३ – अमेरिकेच्या संरक्षण खात्याचे सचिव मॅक्नोरा यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेस भेट.
- १९६३ – ऑगस्ट, रशियाचा दौरा.
- १९६४ – दिल्लीतील महाराष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती.
- १९६५ – जानेवारी, नांदेड येथे भरलेल्या ४७व्या अ.भा.म. नाट्य परिषद अधिवेशनाचे उद्‌घाटक.
- १९६५ – ऑगस्ट १८, आई विठामाता यांचे निधन–मुंबई.
- १९६६ – जानेवारी, ताश्कंद येथे शास्त्रीजी – आयुबखान चर्चेस उपस्थित (कोसिजीन यांच्या प्रयत्नानुसार)
- १९६६ – नोव्हेंबर १४, केंद्रीय गृहमंत्रीपदी नियुक्ती.
- १९६६ – गृहमंत्रीपदाची सूत्रे घेतल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांतच नव्याने १० राज्यपालांची नियुक्ती.
- १९६९ – फेब्रुवारी २३, कानपूर विश्व विद्यालयातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉ' सन्मानपूर्वक बहाल.
- १९७० – जून २६, केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती.
- १९७० – फेब्रुवारी १०, औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' ही पदवी.
- १९७१ – विकसनशील राष्ट्र परिषदेमध्ये आर्थिक विकासासंबंधी चर्चा.
- १९७२ – सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड, काँग्रेसने महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४३ जागा जिंकल्या
- १९७४ – डिसेंबर १, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी.
- १९७४ – ऑक्टोबर, केंद्रीय परराष्ट्रमंत्री म्हणून नियुक्ती.
- १९७५ – गियाना, क्युबा, लेबेनॉन, इजिप्त, पेरू, अमेरिका, अफगाणिस्तान, इराक, कुवेत व फ्रान्स इत्यादी राष्ट्रांना भेटी.
- १९७५ – डिसेंबर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद.
- १९७६ – जानेवारी १७, परभणी, मराठवाडा कृषी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी.
- १९७६ – तुर्कस्थान, अल्जेरिया या देशांना भेटी.
- १९७६ – ऑक्टोबर ८, सदिच्छा राजदूत म्हणून अमेरिकेतील होस्टन येथील टेक्सास शहरातर्फे मानपत्र.
- १९७७–७८ लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड (मान्यताप्राप्त अशा विरोधी पक्षाचे लोकसभेतील स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पहिले विरोधी पक्षनेते)
- १९७९ – जुलै, चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री.
- १९८० – सातारा, मतदारसंघातून लोकसभेवर निवड (रेड्डी काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव विजयी उमेदवार)
- १९८२ – इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश.
- १९८२ – आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष.
- १९८३ – जून १, पत्नी सौ. वेणूताई यांचे निधन.
- १९८३ – ऑक्टोबर ७, आपले इच्छापत्र (वुईल) लिहिले.
- १९८४ – जानेवारी ९, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक प. चॅ. ट्रस्टची स्थापना व नोंदणी.
- १९८४ – फेब्रुवारी ७, 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र : खंड पहिला प्रकाशित.
- १९८४ – मार्च २४, पुणे विद्यापीठाची सन्माननीय डी.लिट. पदवी बहाल.
- १९८४ – जून १, सौ. वेणूताईंची प्रथम पुण्यतिथी, त्या दिवशी यशवंतरावांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत सौ. वेणूताई स्मारकाचे भूमिपूजन केले.
- १९८४ – ऑक्टोबर ७, 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथास केसरी मराठा संस्थतर्फे 'साहित्यसमाट न.चि. केळकर पारितोषिक'.
- १९८४ – नोव्हेंबर २५, सायंकाळी ७.४५ वाजता दिल्ली येथे निधन.
- १९८४ – नोव्हेंबर २७, दुपारी ३.४० वाजता कऱ्हाड येथे कृष्णा–कोयनेच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार.



# महाराष्ट्राचा महानेता

सुरेश द्वादशीवार

यशवंतरावांच्या हाती महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे १९६० मध्ये आली तेव्हा महाराष्ट्र एकसंध नव्हता. द्विभाषिक मुंबईत राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर १९५६ मध्ये त्यांची निवड झाली तेव्हा त्यांना आपले नेतृत्व बहाल करणारा काँग्रेस पक्षही एकसंध नव्हता. भाषावार प्रांतरचनेचे सूत्र स्वीकारल्यानंतर निर्माण झालेले द्विभाषिक मुंबई राज्य मुळातच अनैसर्गिक होते व कोणत्याही कृत्रिम उभारणीत राहावी तेवढी अस्वस्थता त्यात होती. संयुक्त महाराष्ट्राची पहिली मागणी बेळगावच्या मराठी साहित्य संमेलनात गं. त्र्यं. माडखोलकरांनी अध्यक्षपदावरून केली तेव्हापासून तिची तीव्रता वाढत जाऊन प्रथम शंकरराव देवांची सौम्य संयुक्त महाराष्ट्र परिषद व पुढे डांगे-अत्रे-एसेम यांची उग्र संयुक्त महाराष्ट्र समिती यांच्या लढाऊ आंदोलनात तिचे पर्यवसान झाले होते. मुंबईत माणसे मरत होती आणि राज्याचे सरकार जनाधार हरवल्यासारखे बंदुकांच्या बळावर तरंगताना दिसत होते. तिकडे गुजरातेत इंदूलाल याज्ञिकांच्या नेतृत्वातील महागुजरात राज्य परिषदेने काँग्रेसला मुळापासून हलविल्याचे व उखडल्याचे चित्र दिसत होते. विदर्भाच्या नेत्यांना द्विभाषिक जेवढे नकोसे तेवढाच संयुक्त महाराष्ट्रही नकोसा होता. स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नावर तिकडचे आमदार आपापले राजीनामे हातात घेऊन कन्नमवारांच्या मागे उभे होते. आंदोलन, अशांतता, अस्वस्थता आणि आपण कृत्रिमरीत्या एका राज्याच्या जोखडात अडकलो असल्याची सार्वत्रिक भावना. झालेच तर काँग्रेस पक्षात भाऊसाहेब हिरे या बलाढ्य व लोकप्रिय मराठा नेत्याच्या विरोधात मोरारजी देसाईंच्या अप्रिय पाठिंब्याच्या जोरावर नेतृत्व व मुख्यमंत्रीपद मिळविल्यामुळे महाराष्ट्रातील मराठ्यांचा संघटित वर्ग संशयाने पाहणारा... यशवंतरावांच्या हाती आलेला महाराष्ट्र असा होता आणि त्यात एकसंध व नैसर्गिक राज्यव्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या नेतृत्वापुढचे आव्हान होते.

हे आव्हान पेलायला लागणारी व्यक्तिगत पातळीवरची त्यांची तयारी मात्र पूर्ण होती. घरातले सत्यशोधकी संस्कार, ब्राह्मणेतर चळवळीतील त्यांच्या बंधूंचा, गणपतरावांचा, प्रत्यक्ष सहभाग आणि जवळकरादिकांचा टोकाचा ब्राह्मणद्वेष या गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. त्यातल्या ग्राह्य-अग्राह्य बाबींविषयीचा त्यांचा निर्णय कधीच झाला होता. सत्यशोधन मान्य, ब्राह्मणेतरांचे येऊ घातलेले सत्ताकारण मान्य; पण, जवळकरादिकांनी चालविलेला टिळकांसारख्या राष्ट्रनेत्याचा द्वेष आणि उपमर्द अमान्य या भूमिकेवर ते फार पूर्वी आले होते. टिळकांचे राष्ट्रीय नेतृत्व व त्याग यावरची त्यांची निष्ठा त्यांच्या फुल्यांच्या पुरोगामीत्वावरील श्रद्धेएवढीच अढळ होती. महाराष्ट्रात एकेकाळी चाललेला 'आधी राजकीय की सामाजिक' हा वाद गांधीजींच्या उदयानंतर संपला होता. गांधीजींनी त्या दोन्ही प्रवाहांना एकत्र आणून स्वातंत्र्य लढ्याच्या अग्रभागी उभे केल्याने यशवंतरावांसारख्या अभ्यासू कार्यकर्त्यांच्या मनातले त्याविषयीचे द्वंद्व संपले होते. 'मी स्वतःला गांधीजींचा अनुयायी समजतो. त्यांच्या विचारांचा पूर्ण स्वीकार मला करता आला नाही ही माझी खंत आहे.' हे त्यांचे विधान त्यांच्या या सर्वसमावेशक चिंतनशीलतेएवढेच त्यांच्या घडणीची साक्ष ठरावे असे आहे.

स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग आणि त्या काळात घडलेल्या तुरुंगवासात समाजवादी नेत्यांशी आलेला अभ्यासपूर्ण संबंध यातून समाजवादाविषयीची आस्था व उपयुक्तता त्यांना पटत गेली. समाजाच्या खऱ्या मजबुतीसाठी दुबळ्या वर्गांच्या बाजूने उभे राहण्याची व केंद्राच्या डावीकडे असण्याची त्यांची मानसिकता त्यातून तयार झाली. पुढे मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कृतिशील व काहिशा आक्रमक डाव्या मानवतावादाने त्यांना आपल्या जुन्या समाजवादी निष्ठा तपासून पाहायला भाग पाडले. रॉय यांचा जागतिक साम्यवादी चळवळीतील सहभाग, जगातल्या कम्युनिस्ट नेत्यांशी त्यांचा असलेला संबंध आणि त्यांच्या अध्ययनातील शिस्त यातून समाजवाद्यांचे पुस्तकी बंदिस्तपण त्यांच्या लक्षात आले असणार. शिवाय शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या राज्यांची भाषा बोलणारे समाजवादी प्रत्यक्षात शेतकऱ्यांपासून व कामगारांपासूनही दूर आहेत हे ढळढळीत सत्य त्यांना दिसतच असणार. मात्र, त्याहून मोठी बाब शेतकऱ्यांचे व कामगारांचे खरे वर्ग स्वतःला शेतकरी कामगार पक्ष म्हणविणाऱ्या शेकापएवढेच समाजवाद्यांपासून आणि साम्यवाद्यांपासूनच नव्हे, तर रॉयवाद्यांपासून दूर राहत आले आणि त्या खऱ्या गरिबांना या डाव्या मंडळीहून गांधी जवळचा वाटतो हे जगाला दिसणारे वास्तव त्यांनाही समजलेच असणार.... यशवंतरावांची वैचारिक घडण समाजवाद-रॉयवाद व पुढे गांधीजींचा सर्वसमावेशक मनुष्यधर्म अशी झाली आहे. (खुद्द मानवेंद्रनाथ रॉय यांनाही त्यांचे गांधीजींविषयीचे आकलन बऱ्याच अंशी चुकल्याचे फार उशिरा लक्षात आले. गांधी जेव्हा धर्म म्हणतात तेव्हा त्यांना नीती म्हणायचे असते, कोणत्याही एका संघटित धर्माच्या शिकवणीचा आग्रह ते धरीत नाहीत ही बाब त्यांना अखेरच्या काळात नोंदवावी लागली. नीती हा साऱ्या मनुष्यमाऊला कवेत घेणारा धर्म आहे ही रॉयांच्या लक्षात आलेली गांधीजींची भूमिका अनेकांच्या अजूनही लक्षात येत नाही हेही येथे नोंदविण्याजोगे) गांधीजींच्या पश्चात यशवंतरावांचा प्रवास नेहरूप्रणीत (अनेकांच्या मते) काहीसा सर्वसमावेशक तर (काहींच्या मते) दिशाहीन समाजवादाच्या वाटेने सुरू झाला व त्याच वाटेवरून ते पुढे चालत राहिले.

सर्व बाजूंनी होत असलेल्या या वैचारिक संस्कारांसोबत प्रवास करतानाच यशवंतरावांनी आणखीही एक खबरदारी कमालीच्या डोळसपणे बाळगली होती. १९६७ च्या निवडणुकांनी भारतीय (व मराठी) लोकशाहीचे येऊ घातलेले चित्र सगळ्या डोळस कार्यकर्त्यांसमोर उघड केले होते. प्रौढ सार्वत्रिक मतदानावर उभी होणारी येती लोकशाही समाजातील मूठभर उच्च मध्यमवर्गीयांना राजकारणातून बाद करणार, हे त्या निवडणुकीने साऱ्यांच्या लक्षात आणून दिले होते. राजकारण व त्याची चर्चा यांची शिष्टवर्तुळातील बंदिस्तता संपणार आणि ते सारे बहुजनांच्या स्वाधीन होणार याच्या खुणा तेव्हाच उघड झाल्या. (१९५२ च्या लोकसभेत वकील आणि कायदेपंडितांचा भरणा होता तर १९५७ मध्ये निवडली गेलेली लोकसभा ग्रामीण नेत्यांच्या बहुसंख्येची होती. हा बदल केवळ



राजकीय नव्हता. तो एक महत्त्वाचे सत्ताविषयक स्थित्यंतर घडविणाराही होता.) त्यामुळे यापुढची सत्ता आपली आहे आणि आपणच खरे सत्ताधारी होणार आहोत याची जाणीव यशवंतरावांसारख्या अभ्यासू व डोळस कार्यकर्त्याला नक्कीच झाली असणार. मात्र, सत्ताधारी व्हायला आणि सत्तेची सूत्रे पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांएवढीच किंबहुना त्याहून चांगली हाताळायची तर एका व्यक्तिगत तयारीची गरजही त्यांना जाणवली असणार... बहुजन समाजातून येणाऱ्या अनेक नेत्यांनी जी संधी गमावली ती यशवंतरावांनी साधली व तिचे त्यांनी सोने केले, हे त्या काळातील व नंतरच्याही त्यांच्या वाटचालीने कोणाच्याही लक्षात आणून द्यावे. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, जातीव्यवस्था या साऱ्यांच्या तपशीलवार अध्ययनाएवढाच साहित्य, संस्कृती, इतिहास आणि राजकीय विचारसरणी यांचा त्यांनी केलेला अभ्यास त्यांच्या या तयारीची साक्ष पटविणारा आहे. नेतृत्व करणाऱ्याला साऱ्याहून चांगले लिहिता व बोलता यायला हवे, त्याच्या बोलाचा परिणाम साऱ्यांवर व्हायला हवा म्हणून मराठीएवढीच इंग्रजी भाषेची (व पुढे हिंदीची) त्यांनी केलेली उपासना आजच्या होतकरूच नव्हे, तर प्रस्थापित पुढाऱ्यांनीही लक्षात घ्यावी अशी आहे. तेवढ्यावर न थांबता जगाचे राजकारण व आंतरराष्ट्रीय घडामोडींची तपशीलवार जाण तर त्यांनी ठेवलीच; शिवाय युद्धशास्त्र व लष्करी हालचालींचे तपशीलही आपल्या अध्ययनशील स्वभावाने त्यांनी आत्मसात केले... त्यांना कुसुमाग्रज कळत होते आणि सुरेश भटही मुखोद्गत होता. संतांची अवतरणे देतानाच आपल्या भाषणात ते इंग्रजी ग्रंथांचे दाखले देत. सॉक्रेटिस किंवा ॲरिस्टॉटल, मिल् किंवा बेन्थाम, टॉलस्टॉय किंवा लास्की यांची साधी ओळखही न ठेवणाऱ्या आजच्या पुढाऱ्यांना यशवंतरावांची त्यांच्याशी असलेली सलगी भोवळ आणण्याएवढी भीती घालणारी होती... साहित्य संमेलनातील त्यांची उद्घाटनाची भाषणे प्रत्यक्ष अध्यक्षांच्या भाषणाहून अधिक चांगली होत. हा प्रस्तुत लेखकाला आलेला अनुभव अनेकांच्या पदरी आहे... सत्ता येताना दिसत असली तरी तिला सामोरे जायला स्वतःला सर्वशक्तिनिशी सज्ज करणे ज्या थोड्या कार्यकर्त्यांना तेव्हा जमले त्यात यशवंतराव पुढे होते. ज्यांनी एवढ्या तयारीनिशी ते केले नाही ते त्यांचे समकालीन त्यांच्या जातीविशेषांचे, मर्यादित प्रदेशांचे किंवा जातीद्वेषावर उभ्या होणाऱ्या तात्कालिक लाटांचेच प्रतिनिधी, प्रवक्ते वा पुढारी बनले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बहुजन समाजातून येऊन यशवंतरावांएवढी उंची गाठणारे त्याचमुळे तेव्हा फारसे कोणी दिसले नाही. पद मिळवणारे, सत्तेत टिकणारे, प्रसंगी लोकप्रियता मिळवणारे अनेक जण मोठे झाले हे खरे असले तरी यशवंतरावांनी गाठलेले महानपण त्यांच्यापासून दूरच राहिले.

द्विभाषिक राज्याचे अनैसर्गिक व अल्पजीवी असणे यशवंतरावांना ठाऊक होते. काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून त्यांना तसे स्पष्टपणे म्हणता येत नसले तरी जे साऱ्या सामान्यांना कळते ते त्यांना कळत नव्हते असे म्हणणे हा त्यांच्यावरचा जेवढा अन्याय तेवढेच तसे समजणाऱ्याचे ते अज्ञान म्हणावे लागेल. 'महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे' असे एक वाक्य त्या काळी चव्हाणांचे म्हणून फार वाजविले व गाजविले गेले. मात्र, नेहरू या नावाचा उच्चार राष्ट्रीय नेतृत्वाचे प्रतीक म्हणून त्यांनी केला. नेहरूंचे मोठेपण हे त्यांच्या लेखी देशाचे व काँग्रेस या राष्ट्रीय पक्षाचे मोठेपण होते हे समजून घ्यायलाही फारशा मोठ्या मनाची वा बुद्धीची आज गरज नाही. ज्यांना पक्ष सांभाळायचा असतो, नेतृत्व राजी राखायचे असते आणि एक ना एक दिवस राजकारणाची अपरिहार्यता आपल्या वरिष्ठांच्या गळी उतरून देण्याची वाट पाहायची असते. त्यांच्या मौनाला दुबळेपण मानणे हाच खरेतर उथळपणा आहे. शेजाऱ्यांना दिसणारी गृहछिद्रे घर चालविणाऱ्या कर्त्या माणसालाही ठाऊकच असतात. पण, आपल्या तशा उणिवांवर पांघरूण घालणे हे त्याचे कर्तव्य असते. त्याच्या त्या प्रयत्नांवर दुबळेपणाचा शिक्का उमटवणे हेच मग असमंजसपण ठरते. अशा दुबळेपणाचा शिक्का आमच्या अनेक विचारवंतांनी, टीकाकार माध्यमांनी आणि उथळ विरोधकांनी गांधी-नेहरूंवर टीका करतानाही उमटविला आहे. ती राष्ट्रीय माणसे अशा उथळ चिखलफेकीतून सुटली नसतील आणि तिची झळ यशवंतरावांनाही लागली असेल तर ती करणाऱ्यांना घरच्या कर्त्या माणसाची कोंडी समजली नाही वा समजूनही त्यांनी ती दुर्लक्षित करण्याचे राजकारण केले असेच म्हटले पाहिजे.

१९५६ ते १९६० या चार वर्षांत द्विभाषिक राज्याचे अनैसर्गिक असणे व त्याच्या अनिष्ट राजकीय परिणामांचे स्वरूप नेहरूंसकट सगळ्या पक्षश्रेष्ठींना पटविणे यशवंतरावांना जमल्याचेही महाराष्ट्राने नंतरच्या काळात पाहिले. त्यांच्यावर 'सूर्याजी पिसाळ' किंवा 'महाराष्ट्रद्रोही' अशी शेलकी व निंद्य विशेषणे उधळणाऱ्यांची तात्कालिक लोकप्रियता व राजकारणात अल्पकाळ टिकण्याची क्षमताही त्याने पाहिली. चार वर्षे मुंबईसह पुण्यातील विद्वानांचे, प्रचारकांचे आणि स्वतःला यशवंतरावांहून जास्तीचे महाराष्ट्रभक्त म्हणविणाऱ्यांचे शिव्याशाप सहन करीत त्यांनी राज्य राखले आणि १९६० च्या १ मे या दिवशी ते मोडून संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलशही त्यांनीच मुंबईत आणला. तो आणत असताना एसेमसारख्या सभ्य विरोधकाला त्यांनी सोबत घेतले आणि नव्या महाराष्ट्राची मुहूर्तमेढ रोवायला तोवर त्याला विरोध करणाऱ्या नेहरूंनाच त्यांनी महाराष्ट्राच्या राजधानीत आणले... म्हटले तर हा एका श्रेष्ठ महाकाव्याचा विषय आहे. पण, मराठी प्रतिभेने मराठी पराक्रमाला फारसा न्याय कधी न दिल्याने तेव्हा तो एका साध्या बातमीचाच विषय तेवढा बनला.

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातला सुसंस्कृतपण व संवेदनशीलता सांगणारा एक प्रसंग येथे नमूद करण्याजोगा आहे. त्यांच्या कुटुंबात मूल जन्माला आले नाही. त्यांची ती दुबळी बाजू हेरून अत्र्यांनी त्यांच्यावर एकदा कमालीचा क्रूर हल्ला चढविला. त्यांच्या मौनाची आणि नेहरूनिष्ठेची टवाळी करण्याच्या नादात यशवंतरावांच्या शारीरिक अभावावरच त्यांनी नको तसे बोट ठेवले... त्या हल्ल्याला उत्तर देताना यशवंतराव म्हणाले, 'आचार्य हे महाराष्ट्राचे थोर लेखक आहेत. त्यांचे साहित्य वाचतच मी लहानाचा मोठा झालो. त्यांच्या आताच्या टीकेने मी संतापलो नाही. माझे दुःख वेणूताईंविषयीचे आहे. त्या गरोदर असताना आम्ही दोघेही स्वातंत्र्याच्या लढ्यात होतो. एका सोजीराने पोटावर लाथ घातल्याने वेणूताई अत्यवस्थ झाल्या आणि जन्माला येणारे मूल जन्म घेऊ शकले नाही. ते दुःख आम्ही मुकाटपणे गिळले. अत्र्यांनी केलेल्या टीकेमुळे वेणूताईंना ज्या वेदना झाल्या त्यामुळे मी कळवळलो आहे'....पुढे अत्र्यांनी यशवंतरावांची क्षमा मागितली. पण, घडू नये तसा प्रमाद प्रल्हादरावांच्या हातून घडून गेला होता... असाच एक प्रसंग प्रतापगडावर शिवरायांच्या पुतळ्याच्या अनावरणाला नेहरू आले तेव्हाचा. गडाच्या वाटेवर एका बाजूला काँग्रेसचे कार्यकर्ते नेहरूंच्या स्वागताचे फलक घेऊन तर दुसऱ्या बाजूला संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते त्यांच्या निषेधाच्या घोषणा करीत



उभे होते. घोषणांचा गजर वाढला तेव्हा यशवंतरावांनी आपली बाजू सोडली आणि सहजपणे फिरत पुढे जावे तसे ते समितीच्या नेत्यांजवळ पोहोचले आणि काहीएक न बोलता त्यांनी अत्र्यांच्या बुशकोटाचे खुले राहिलेले वरचे बटन लावून दिले. सारा जमाव अवाक् झाला असताना यशवंतराव जसे गेले तसेच परत आपल्या जागी आले होते.

स्वभावातील ही ऋजुता, सहसा न आढळणारे सत्ताधाऱ्यांचे विनम्रपण, मोठा ज्ञानाधिकार, प्रश्न समजावून घेण्याची क्षमता, विरोधकांना नकळत नामोहरम करण्याचे कसब, मिठास वक्तृत्व आणि वागण्याबोलण्यातले सहजसाधे आपलेपण या बळावर कराडच्या यशवंतरावांनी प्रथम महाराष्ट्र व मराठवाडा मग मुंबई आणि पुढे विदर्भही आपलासा करून घेतला. त्यांच्या एका वक्तव्यावर संतापलेले कोल्हापूरही असेच 'ते आले, त्यांनी पाहिले आणि ते जिंकले' अशाच थाटात त्यांनी जिंकून घेतले... पण, माणसे जिंकणे आणि जोडणे हे नेतृत्वाचे कसब असले तरी मुख्यमंत्री म्हणून यशस्वी व्हायचे तर त्याला प्रशासकीय तरबेजपणाची गरज असते. यशवंतरावांनी तो गुणही अल्पावधीत आपल्या अंगी बाणला होता. त्यांचे अधिकाऱ्यांशी स्नेहाचे संबंध असले तरी प्रत्येकाच्या मनात त्यांचा धाकही जबर होता. कठोर व लोकोपयोगी निर्णय घेताना त्यांनी प्रशासनाला, तुमच्याहून सरकार मोठे आहे हे त्यांना समजेल तसे समजावले होते. त्यांच्यावर प्रशंसेने लिहिणाऱ्या अनेक बड्या अधिकाऱ्यांची त्यांच्याविषयीची पुस्तके, लेख आणि इतर लिखाण या साऱ्याची साक्ष द्यायला आपल्यासोबत आज आहेत.

प्रथम अकोला व नंतर नागपूर करार करून त्यांनी विदर्भाच्या नेत्यांना वेगळ्या विदर्भाची मागणी मागे ठेवायला राजी केले. ती त्यांची गरज असली तरी त्या गरजेचे उपलब्धीत रूपांतर करण्याची किमया तेव्हा त्यांनी करून दाखविली. १९५७ च्या विधानसभेची निवडणूक त्यांच्या नेतृत्वात पार पडली. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने आणि गुजरातेत महागुजरात परिषदेने काँग्रेसचा मोठा पराभव तीत केला. खुद्द यशवंतराव त्यांच्या कऱ्हाड मतदारसंघातून अवघ्या ५०० मतांनी विजयी होऊ शकले होते. त्यावेळी एकटा विदर्भच काँग्रेसच्या बाजूने उभा राहिला. तो प्रदेश वेगळा झाला असता तर महाराष्ट्र आणि गुजरात हे दोन्ही प्रदेश काँग्रेसच्या हातून जाणार होते. त्यासाठी नेहरूंना मध्ये आणून यशवंतरावांनी कन्नमवारांचा पाठिंबा मिळविला. विदर्भाला झुकते माप देण्याचे मान्य केले. कन्नमवारांना उपमुख्यमंत्रीपद देऊन विदर्भाची मागणी सोडायला लावली. विदर्भाच्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचे भाग्य बाजूला ठेवून कन्नमवारही नेहरू आणि यशवंतरावांच्या बाजूने एका निष्ठावान पक्ष कार्यकर्त्यासारखे त्याला तयार झाले. पुढचे आव्हान एकत्र आलेल्या मराठी प्रदेशाला एकात्म बनविण्याचे होते. यशवंतराव, कन्नमवार आणि पुढे यशवंतरावांचे विश्वासू सहकारी वसंतराव नाईक यांच्या हाती राज्याची धुरा असताना ही एकात्मता फारशी वाढताना दिसली नसली तरी तिला तडा देणारा एकही निर्णय त्यांच्याकडून कधी झाला नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या ऐन मुहूर्तावरच ग.त्र्यं. माडखोलकर यांनी 'हे मराठी राज्य की मराठा राज्य?' असा जळजळीत पण परखड प्रश्न यशवंतरावांना आपल्या संपादकीयातून विचारला. माडखोलकर संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या विचारांचा कलही डाव्या राष्ट्रीयत्वाकडे झुकणारा होता. शिवाय यशवंतरावांएवढेच अनेक राजकीय नेत्यांशी त्यांचे जवळिकीचे संबंध होते. त्यांना नागपूरच्या सभेत उत्तर देताना यशवंतरावांनी त्यांच्या लेखणीचा गौरव करीत 'हे मराठी राज्यच असेल' अशी ग्वाही त्यांच्यासकट साऱ्या महाराष्ट्राला दिली... दुर्दैवाने लोकशाहीतले राजकारण आकड्यावर उभे होते. त्यामुळे आपला शब्द यशवंतरावांना नेहमीच खरा करता आला नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात एकवेळ अशी होती की त्याच्या विधानसभेतील २८८ आमदारांपैकी २२२ जणांची जात एक तर त्यातल्या ८८ जणांचे आडनावही एकच होते. नंतरच्या काळात महाराष्ट्रातील अनेक मराठेतर जातींनी इतर पक्षांच्या झेंड्याखाली जाणे पत्करले याची कारणे या वास्तवात आणि यशवंतराव ते पवार या नेत्यांच्या परंपरेने सर्वसमावेशक राजकारणाकडे कालांतराने केलेल्या दुर्लक्षात शोधावी लागतात. तरीही यशवंतरावांच्या काळात एका जातीचा राजकारणावरील वरचष्मा पुढल्या काळातल्याएवढा बटबटीतपणे कधी पुढे आला नाही... या बाबीला एका चमत्कारिक वास्तवाची असणारी पार्श्वभूमी एवढ्या वर्षांनंतरही आज लक्षात घ्यावी अशी आहे. १९३७ च्या निवडणुकांच्या काळात, यापुढे बहुजनांचीच सत्ता येणार असे म्हणत मराठा समाजाचे अनेक मान्यवर नेते काँग्रेसमध्ये आले. मात्र, त्या निवडणुकीनंतर बाळासाहेब खेर यांना तेव्हाच्या मुंबई राज्याचे पंतप्रधानपद वल्लभभाईंनी देऊ केले. त्यावेळी 'काँग्रेस ब्राह्मणांची झाली' म्हणून हे नेते काँग्रेसबाहेर पडले. पुढे १९५६ मध्ये यशवंतराव नव्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा 'काँग्रेस बहुजनांची झाली' असे म्हणत ते सारे पुन्हा काँग्रेसमध्ये परत आले. राजकीय पक्षांचे जातीकरण आपल्यात फार पूर्वी सुरू झाले असणे आणि नंतरच्या काळात त्याने खऱ्या लोकशाहीवर मात करणे यांचा इतिहास एवढा जुना व एका नेत्याला आवर घालता येण्याजोगा कसा नव्हता ते यातून अभ्यासकांच्या लक्षात यावे.

यशवंतरावांनी आपल्या परीने या इतिहासावर काही काळ मात केल्याचे दिसले. असा यशस्वी नेता एका राज्यात कायमचा राहणे शक्य नव्हते. १९६२ च्या २० नोव्हेंबरला यशवंतराव देशाचे संरक्षण मंत्री झाले. त्यावेळी स्पष्ट झालेली गोष्ट ही की जेव्हा 'प्रश्न' उपस्थित होतो वा संकटाचे सावट येते तेव्हा त्याच्या निवारणासाठी देशाला यशवंतराव लागतात. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री' या कवितेचा खरा अर्थ हा आहे. चीनशी झालेल्या युद्धात भारताचा पराभव झाला होता. माओने केलेल्या विश्वासघाताने नेहरू खचले होते. सेनादलाचे मनोबल घसरणीला लागले होते आणि देशही त्या धक्क्यातून सावरला नव्हता. त्या स्थितीत संरक्षणमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर अवघ्या तासाभराच्या आत यशवंतरावांनी तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांची बैठक घेऊन आपली नवी जबाबदारी पुरेशा गंभीरपणे पत्करली होती. त्यांच्या प्रयत्नांना आलेले यश पुढे १९६५ च्या युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळविलेल्या पहिल्या विजयात देशाने पाहिले. ७१ च्या युद्धात भारताने पाकिस्तानचा निर्णायक पराभव करून त्याचे दोन तुकडे केले तेव्हा तर त्या यशावर प्रशस्तीची मोठी कमान उभी राहिल्याचेच देशाला दिसले. संरक्षण मंत्री या नात्याने त्यांनी केलेले काम केवळ औपचारिक मार्गदर्शनाचे नव्हते. राम प्रधानांनी संपादित केलेली त्या काळातील यशवंतरावांची डायरी नुसती चाळली तरी शस्त्रबळाच्या वाढीपासून सेनेच्या प्रत्यक्ष हालचालींपर्यंत त्यांनी घेतलेले निर्णायकी मार्गदर्शन डोळ्यांत भरते. ६५ च्या युद्धात त्यांनी सारे दिवस व रात्रीही सेनेच्या प्रमुखांशी,



आघाडीवरील पथकांच्या नेत्यांशी, तोफखाना व हवाईदलाच्या प्रत्यक्ष सैनिकांशी व अधिकाऱ्यांशी सततचा संपर्क कसा राखला होता व त्यातून त्यांना केवढे मोलाचे मार्गदर्शन केले होते याची जाणीव होते. पश्चिम सीमेवर युद्ध सुरू असताना पूर्वेला तेव्हाच्या पाकिस्तानात आघाडी न उघडण्याचा व सारी भारतीय सैन्यशक्ती पश्चिमेकडे एकवटण्याचा निर्णय सेनाप्रमुखांचा नव्हता, यशवंतरावांचा होता.

पाकिस्तान आणि चीन यांच्या भारतविरोधी कारवायांनी संघटित स्वरूप घेतले तेव्हा देशाने यशवंतरावांची नियुक्ती परराष्ट्र खात्याच्या मंत्रिपदावर केली. या काळात रशिया, अमेरिका व जपान इ. देशांना भेटी देऊन द. आशियात उद्‍भवू शकणाऱ्या संकटांविषयी त्यांनी त्या देशांच्या परराष्ट्र विभागांचे केलेले जागरण असेच महत्त्वाचे आहे. पाकिस्तानच्या मागे इतर अरब व मुस्लीम राष्ट्रांनी संघटित होऊ नये याची दक्षता पं. नेहरूंनी मौ. आझादांच्या मदतीने आरंभापासून घेतली. ते धोरण यशवंतरावांनी त्यांच्या परराष्ट्र मंत्रीपदाच्या काळात नेटकेपणाने यशस्वी केले आणि अमेरिका व रशिया यांचा चीनवरील भारतानुकूल दबाव वाढत राहील याची खबरदारीही घेतली. आर्थिक संकटाच्या व मंदीच्या काळात त्यांच्याकडे देशाचे अर्थमंत्रीपद दिले गेले तेव्हाच त्या संकटांना सामोरे जावे लागण्याच्या भीतीने ग्रासलेल्या देशाला मोठा दिलासा मिळाल्याचे दिसले. यशवंतरावांनी जी अंदाजपत्रके सादर केली ती आर्थिक तूट कमी करणारी, संतुलित स्वरूपाची व विकासाला गती देणारी होती. त्यातून करदात्यांना मदत झाली आणि जीवनावश्यक वस्तूंच्या भावांवरही नियंत्रण राहिले. १९६५ मध्ये संघाच्या नेत्यांनी साधूंना समोर करून गोवध बंदीसाठी दिल्लीत एक भव्य पण कमालीचा आक्रमक मोर्चा काढला. त्याने सारी दिल्लीच अस्तव्यस्त व अस्वस्थ केली. जाळपोळ, लुटालूट असे सारे घडले. तेव्हाचे गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांनी त्याची जबाबदारी पत्करून राजीनामा दिला. परिणामी, ते जोखमीचे पद यशवंतरावांकडे आले. नक्षलवाद ही देशापुढची सर्वांत मोठी व गंभीर समस्या आहे, असे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आज बजावतात. या प्रश्नाविषयी देशाला सावध करण्याचे व नक्षलवाद्यांची लांडगेतोड बंगालमध्येच करण्याचे काम प्रथम यशवंतरावांनीच यशस्वीरीत्या केले. त्या कामगिरीत त्यांना जे यश मिळाले ते नंतरच्या एकाही गृहमंत्र्याला आजतागायत मिळविता आले नाही हेही येथे नमूद करण्याजोगे... धार्मिक दंगली व जातीय तणाव यांना त्यांच्या कारकिर्दीत आळा बसलेला दिसला आणि राजकीय कारणांखातर होणारी हमरीतुमरीही मर्यादित राहिली.

यशवंतरावांची दिल्ली कारकीर्द आरंभीच्या १० वर्षांत त्यांची लोकप्रियता व देशातील मान्यता वाढविणारी ठरली. या काळात महाराष्ट्राच्या राजकारणावरही त्यांची पकड घट्ट राहिली. राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर कोणीही असले तरी सत्तेची खरी सूत्रे त्यांच्याच हातात असलेली साऱ्यांनी पाहिली. दादासाहेब कन्नमवारांकडे आपले मुख्यमंत्रीपद सोपविणे हा त्यांचा नाइलाज होता. कन्नमवारांनी ते पद विदर्भातील आमदारांच्या पाठिंब्यावर व काँग्रेसमधील तळागाळाच्या कार्यकर्त्यांशी जोडलेल्या व्यक्तिगत संबंधांवर मिळविले होते. शिवाय उपमुख्यमंत्रीपदावरून मुख्यमंत्रीपदावर जाणे हा तेव्हाच्या राजकारणाचा नैसर्गिक क्रमही होताच. त्यामुळे यशवंतरावांना आवडणारे वा नावडणारे असले तरी कन्नमवारांसारख्या स्वतंत्र बुद्धीच्या व स्वातंत्र्यलढ्यात तावूनसूलाखून निघालेल्या नेत्याशी जुळवून घेणे त्यांना भागही होते. १९६३ मध्ये कन्नमवारांचा अकस्मात मृत्यू झाला तेव्हा यशवंतरावांनी महाराष्ट्राची धुरा वसंतराव नाईकांकडे सोपविली. नाईक विदर्भातून आलेले बंजारा समाजाचे सुविद्य व सुसंस्कृत नेते होते. राष्ट्रीय चळवळीचा वा सामाजिक कार्याचा अनुभव त्यांच्या गाठीशी नव्हता. झालेच तर लोकनेता ही प्रतिमा त्यांना लाभली नव्हती. विदर्भातून आलेल्या कन्नमवारांनंतर राज्याचे मुख्यमंत्रीपद मराठवाड्याकडे जाईल अशी अटकळ अनेकांनी बांधली होती. साताऱ्याचे बाळासाहेब देसाई आपण मुख्यमंत्री असल्याच्या थाटात कधीचेच वावरत होते. मराठा समाजातील इतरांनाही ते पद आपल्या जवळ आल्याचे तेव्हा वाटले होते. त्या साऱ्यांना बाजूला सारून यशवंतरावांनी नाईकांना मुख्यमंत्रीपद दिले तेव्हा दोन गोष्टी स्पष्ट झाल्या. आपल्या मागेही महाराष्ट्र आपल्याच ताब्यात राहील अशी व्यवस्था त्यांना करायची होती ही एक आणि आपल्या सर्वंकष अधिकाराला आव्हान देऊ शकेल असा माणूस त्यांना राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर बसवायचा नव्हता ही दुसरी. वसंतराव नाईक हे कुशल प्रशासक व मनमिळाऊ कार्यकर्ते होते. मात्र, नेतृत्व मिळविणे, स्वतःचे सामर्थ्य वाढविणे किंवा त्यासाठी कोणाशी स्पर्धा करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. स्वाभाविकपणेच यशवंतराव दिल्लीत बसूनही वसंतरावांमार्फत महाराष्ट्र आपल्या हाती राखू शकले. वसंतरावांना मिळालेली ही बढती प. महाराष्ट्रातील मराठा नेत्यांवर ओरखडे उमटविणारी होती. जातीतल्या माणसावर 'साहेबां'चा विश्वास नाही, अशी भाषा मग हळू आवाजात चर्चेला आली आणि अनेकांना ती फारशी खोटीही वाटली नाही.

याच काळात दिल्लीच्या राजकारणातही बदल होत गेले. इंदिरा गांधींना नमविण्याच्या जुन्या काँग्रेस श्रेष्ठींच्या प्रयत्नातून सिंडिकेट नावाची इंदिरा विरोधी आघाडी उभी राहिली. त्या आघाडीने संजीव रेड्डींना राष्ट्रपतीपदाची उमेदवारी दिली. तिला आरंभी इंदिरा गांधींनी पाठिंबा दिला व यशवंतरावही रेड्डींचे समर्थक बनले. पुढे सिंडिकेटला शह द्यायला इंदिरा गांधींनी व्ही.व्ही. गिरी यांची उमेदवारी पुढे रेटून 'विवेकाचा कौल देईल' तसे मतदान करण्याचे खुले आवाहनच पक्षाला केले. यशवंतरावांची कोंडी व्हायला येथून

### शांतता हेच सामर्थ्य

**आपले राज्य हे उद्योगधंद्यांच्या बाबतीत भारतात सर्वांच्या आघाडीवर आहे. यामुळे राज्यांतील उद्योगधंद्यांचा केवळ राज्याच्याच नव्हे, तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्यांचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थितीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहण्यासाठी व त्यात वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळित चालला पाहिजे. मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. थोडक्यात म्हणजे औद्योगिक आघाडीवर शांतता नांदली पाहिजे.**

**(मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर व्यक्त केलेल्या मनोगतातून, मुंबई, दि. १ मे १९६०)**



सुरुवात झाली. पक्षनिष्ठा म्हणत ज्यांच्यासोबत राहिलो ती माणसे मनाने, विचाराने, प्रकृतीने किंवा राजकीय भूमिकांखातरही आपली नाहीत आणि ज्या इंदिरा गांधींविरुद्ध आपण त्यांच्यात अडकलो त्या दीर्घकाळ राजकारणाचे नेतृत्व करणार आहेत, त्यांची लोकप्रियता वाढताना दिसत आहे आणि दिखावू म्हणून का होईना त्या जास्तीची पुरोगामी धोरणे आक्रमकपणे स्वीकारणार आहेत हे त्यांना दिसत होते. पण, तोवर त्यांचा गट निश्चित झाला होता. रेड्डी पडले, गिरी विजयी झाले. सिंडिकेट खचली आणि इंदिरा गांधी समर्थ बनल्या. त्यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, संस्थानिकांचे तनखे थांबविले, यशवंतरावांनी या पुरोगामी पावलांचे स्वागत करीत इंदिरा गांधींची बाजू नव्याने उचलून धरली. ७१ ची निवडणूक आणि नंतरचा बांगला विजय यांनी इंदिरा गांधींचे रूपांतर देशाच्या एका लढाऊ देवतेत केले. हा प्रकार ७४ पर्यंत टिकला. तेव्हा जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनाने प्रथम गुजरात मग बिहार व पुढे सारा देश कवेत घ्यायला सुरुवात केली. ५ जून १९७५ या दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरवून त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविता येणार नाही असा निकाल दिला. त्यावर मात करायची तर घटना बाजूला सारणे एवढेच काँग्रेसला जमणारे होते. २५ जूनला सरकारने देशात अंतर्गत आणीबाणी लागू करून नागरिकांचे मूलभूत अधिकार गोठविले आणि लोकशाहीसह सारे विरोधक तुरुंगात डांबले... हा यशवंतरावांच्या परीक्षेचा क्षण होता.

स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही आणि नीतिधर्म ही सगळी मूल्ये एका बाजूला आणि हुकूमशाही, सत्ता, नागरी अधिकारांचे दमन, घटनेची मोडतोड आणि इंदिरा गांधींचा एकाधिकार ही अनिष्टता दुसऱ्या बाजूला होती. त्यातली एक बाजू त्यांना निवडायची होती. देशाने आपली बाजू निश्चित केली होती व ती ७७ च्या निवडणूक निकालांनी पुढे उघडही केली. विचारवंतांचा, मूल्यांच्या उपासकांचा, लोकशाही आणि नागरी स्वातंत्र्यावर निष्ठा असणाऱ्यांचा वर्ग देशाच्या बाजूने गेला होता. काँग्रेस, कम्युनिस्ट आणि काही किरकोळ पक्ष सत्तेच्या खुर्च्यांजवळ राहण्याच्या आशेने आणीबाणीच्या बाजूला राहिले होते. जयप्रकाशांच्या सोबत जाणाऱ्यांत मोरारजीभाई, जगजीवनराम आणि चंद्रशेखरांपासून धारियांपर्यंतचे काँग्रेसचे नेते होते. जनसंघ, समाजवादी, भाक्रांद आणि स्वतंत्र हे पक्षही त्यांच्यासोबत होते. या साऱ्यांनी आपली बाजू केवळ मूल्य निष्ठांसाठी निवडली होती असे नाही, त्यातल्या अनेकांच्या मनात इंदिरा गांधींविषयीचा राग आणि असूया होती. आणीबाणीने घालविलेल्या इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेचा लाभ आपण मिळवू शकू, अशी काहींना आशा होती तर काही राजकीय बेकार राजकीय माहात्म्य टिकवून घेण्यासाठीही त्यात आले होते. तथापि, त्या बाजूला जयप्रकाशांसारखी त्यागी आणि तेजस्वी माणसांची एक मोठी फळी होती... यशवंतराव मूल्यनिष्ठेचा आग्रह धरणारे नेते असल्याने ते कोणती बाजू घेतात याकडे साऱ्यांचे डोळे लागले होते. ते जयप्रकाशांच्या बाजूने गेले असते तर आणीबाणीनंतर स्थापन झालेल्या जनता सरकारात त्यांच्याकडे एखादे महत्त्वाचे पद आले असते. शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती त्यागाची आणि मूल्यांची नवी झळाळी उभी राहिली असती. इंदिरा गांधींसोबत राहण्याने त्यांचे मंत्रीपद टिकले असते; पण, बाकी सारी मूल्यविषयक वजाबाकी त्यांच्या वाट्याला आली असती... यशवंतरावांनी इंदिरा गांधींची बाजू घेतली. तेथे त्यांचा मूल्यांशी असलेला संबंध संपला आणि सत्तेला चिकटून राहणारा (आणि सत्तेच्या आधारानेच परिवर्तन घडवून आणता येते अशी सराईत पोपटपंची करणारा) नेता अशी प्रतिमा त्यांना कायमची चिकटली. यात त्यांनी मिळविले कमी, गमावले फार... नंतरच्या काळात ते सत्तेत राहिले, मोठी पदे त्यांच्या वाट्याला आली, ते देशाचे उपपंतप्रधानही झाले... पण, ते पूर्वीचे यशवंतराव राहिले नव्हते. अनुयायांच्या मनात, निष्ठावानांच्या दृष्टीत आणि जनतेच्या डोळ्यांत त्यांची प्रतिमा लहान आणि काहीशी दयनीय झाली होती.

यशवंतरावांना त्यांनी मोजलेल्या या किंमतीचे मोल कळत होते. पण, ज्या पक्षात हयात घालविली त्याच्यासोबत निष्ठेने राहण्याचे व्रत त्यांनी मुकाटपणे पार पाडले. तडजोडवादी, पडखाऊ, लाचार असली सगळी विशेषणे त्यांनी या काळात अंगावर घेतली. हा माणूस आपल्याला सोडून जाणार नाही याची खात्री पटल्यानंतर इंदिरा गांधींनी आणि दिल्लीतील इतर पुढाऱ्यांनीही त्यांना गृहीत खात्यात जमा केले. आपले निर्णय त्यांना सांगायचे आणि त्यांची त्या निर्णयांना संमती असणारच असे समजायचे असाच प्रकार पुढे चालू राहिला. या काळात महाराष्ट्राचे राजकारणही त्यांच्या हातून सुटत गेले व ते तसे सुटत राहील अशाच कारवाया दिल्लीकरांनीही चालू ठेवल्या. वसंतराव नाईकांच्या मुख्यमंत्रीपदाच्या दोन कारकीर्द पूर्ण झाल्यानंतर शंकरराव चव्हाण त्या पदावर आले. त्यांच्या नावाला यशवंतरावांनी फार पूर्वी संमती दिली होती व तसे इंदिरा गांधींना त्यांनी सांगितलेही होते. मात्र, दरवेळी 'आम्ही तयार आहोत पण अगोदर यशवंतरावांची संमती मिळवा,' असे शंकररावांना पंतप्रधानांच्या निवासस्थानी सांगितले गेले. परिणामी, यशवंतराव आपल्या विरोधात आहेत असा ग्रह शंकररावांसकट मराठवाड्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनात तयार झाला. याविषयीची आपली खंत स्वतः यशवंतरावांनीच त्यांच्या डायरीत लिहून ठेवली आहे... वसंतदादांचे नेतृत्व स्वयंभू होते. मात्र, त्यांनाही यशवंतरावांच्या पाठिंब्याहून इंदिरा गांधींचे पाठबळ महत्त्वाचे वाटत होते... पुढे शरद पवारांनी वसंतदादांना सत्तेवरून पायउतार व्हायला लावले आणि जनता पक्षाच्या मदतीने महाराष्ट्राच्या राजकारणाची सूत्रे हाती घेतली तेव्हा 'आपण हे साहेबांच्या सल्ल्यानुसारच करीत असल्याचे' चित्र स्वतः काहीएक न बोलता त्यांनीही उभे केले. यशवंतरावांची अडचण ही की पवारांच्या त्या काँग्रेस सोडण्याच्या काळात काँग्रेस पक्षाचे हंगामी राष्ट्रीय अध्यक्षपदच त्यांच्याकडे होते. (स्वर्ण सिंगांनी अध्यक्षपद सोडल्यामुळे त्यांच्याकडे त्या पदाची तात्पुरती जबाबदारी तेव्हा सोपविण्यात आली होती) स्वाभाविकच तुम्ही पक्षाध्यक्षपदावर असताना तुम्हीच वाढवून मोठा केलेला कार्यकर्ता पक्षाबाहेर पडतो कसा, असा संशयचिन्हांकित प्रश्न त्यांना विचारला गेला. त्यांच्याजवळ त्याचे खरे उत्तर होते; पण, त्यावर दिल्लीवाल्यांचा विश्वास बसणार नव्हता आणि ज्यांनी त्यांना न विचारता पक्षामध्ये बंडाचे निशाण उभारले त्यांना कायमचे तोडून दूर करणे त्यांच्या स्वभावात बसणारे नव्हते. परिणामी, महाराष्ट्र हातात नाही आणि दिल्लीत विश्वास नाही अशा अधांतरी अवस्थेत त्या थोर नेत्याचे राजकारण जाऊन पोहोचले. विचारवंत, पत्रकार आणि तत्त्वनिष्ठ म्हणविणाऱ्यांनी आणीबाणीच्या काळातच त्यांना आपल्या विचारातून वजा केले होते. सारेच विरोधात वा संशयाने पाहणारे आणि विश्वासाने जोडलेली आणि मोठी केलेली माणसे आपली न राहिलेली अशी एकाकी आणि दयनीय स्थिती त्यांच्या वाट्याला आली होती.



चरणसिंगांच्या मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान होते. पण, ते पद इंदिरा गांधींनी एक खेळी म्हणून त्यांना घ्यायला लावले होते. चरणसिंग सरकारवर विश्वास दर्शविण्याची वेळ आली तेव्हा इंदिरा गांधींनी त्याला दिलेला पाठिंबा काढून घेतला. त्यात चरणसिंगांच्या औटघटकेच्या पंतप्रधानपदासारखे यशवंतरावांचे उपपंतप्रधानपदही गेले... १९८० च्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वातील काँग्रेसला स्वबळावर सत्ता मिळविता आली. परिणामी, यशवंतरावांचा त्यांना असलेला उरलासुरला उपयोगही संपला. पुढचा काळ यशवंतरावांनी नुसती वाट पाहण्यात काढला. पंतप्रधानांचे बोलावणे आले तर जायचे, विचारलेला सल्ला द्यायचा आणि परत आपल्या एकांतात गढायचे. या काळात त्यांच्या लाडक्या पुतण्याचे मोटार अपघातात निधन झाल्याने ते व्यथित झाले. ज्या वेणूताईंसोबत सारी हयात घालविली त्यांच्या मृत्यूने त्यांचा जवळजवळ निम्मा शेवटच केला. तरीही यशवंतराव आपल्या वैयक्तिक जबाबदाऱ्या विसरले नव्हते. आल्या प्रसंगाला हसत सामोरे जात होते. अपुरे राहिलेले आत्मचरित्र लिहून पूर्ण करीत होते. पुण्यात एसेमच्या ८० व्या वाढदिवसाला हजर राहायचे ठरवीत होते. तशात त्यांना इस्पितळात भरती व्हावे लागले. इस्पितळात अखेरचे दिवस मोजत असताना त्यांना राजीव गांधी भेटायला येत. मात्र, महाराष्ट्रातल्या एकाही पुढाऱ्याला या काळात त्यांना जाऊन भेटावे वा पाहावे असे वाटले नाही. तशाच एकाकी अवस्थेत त्यांचा मृत्यू झाला... एका महान मराठी माणसाचा असा शेवट ग्रीक शोकांतिकेतील भव्यदिव्य नायकाच्या अखेरीसारखा आहे.

या माणसाने महाराष्ट्राची पायाभरणी केली. त्याच्या वाटचालीची दिशा निश्चित केली. त्याच्या एकात्मतेला खतपाणी घातले. हजारो माणसे जोडली, लाखोंनी चाहते मिळवले, सारा मराठी मुलूख मनाने जिंकला आणि तरीही त्याच्या अखेरच्या काळात त्याच्याजवळ कोणी नव्हते... दूरचे दूर होते आणि जवळचेही जवळ राहिले नव्हते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद चार वेळा राबविलेल्या, केंद्रात चार महत्त्वाची मंत्रीपदे भूषविलेल्या आणि अखेर उपपंतप्रधानासारख्या मोठ्या पदावर राहिलेल्या या माणसाने दिल्लीत स्वतःचे घर बांधले नाही की मुंबईत फ्लॅट घेतला नाही. डझनांनी साखर कारखाने उभारणाऱ्या या नेत्याच्या नावावर महाराष्ट्रात एकही एकर जमीन नाही. मृत्यूनंतर त्यांच्या दिल्लीतील बंगल्यातून त्यांचे व्यक्तिगत सामान हलवायला अधिकारी गेले तेव्हा त्यांच्या कपाटात सापडलेल्या स्टेट बँकेच्या पासबुकात, साऱ्या हयातीत त्यांनी मागे ठेवलेली ३६ हजार रुपयांची शिल्लकच तेवढी राहिली असल्याचे त्यांना आढळले.

यशवंतरावांच्या अशा शोकांतिकेची मीमांसा आपण कशी करणार? त्यांची अतिरिक्त पक्षनिष्ठा वा नेतृत्वनिष्ठा त्यांच्या पडझडीला कारण ठरली म्हणणार की हाताशी धरून वाढविलेल्या माणसांनी केलेला विश्वासघात तिचे कारण ठरवणार? या सावध माणसावर ऐनवेळी बेसावध राहिल्याचा शिक्का उमटवणार की तत्त्वनिष्ठा बाजूला सारून तडजोडी स्वीकारण्याचे व दिल्लीकरांच्या कोणत्याही कृतीला साथ देण्याचे राजकारण सांभाळले म्हणून त्याला दोष देणार? कुंपणावर बसणारे नेते म्हणून याच काळात कुचेष्टा झाली व प्रत्येकच अपमानानंतर स्वगृही परतणारा व सुखावणारा पुढारी म्हणून त्यांची गणना गावगन्ना राजकारण्यांत करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. अशा यशापयशाचे खरे धनी कोण? यशवंतराव स्वतः की त्यांनी आपली म्हणून जवळ केलेली पण त्यांची न झालेली माणसे? त्यांची ही अवस्था कोणी केली? दिल्लीने की मुंबईने?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरे आपल्यातील प्रत्येकाला आपापल्या परीने देता येतील आणि ती सारखी असणार नाहीत. राजकारण हे खऱ्या अर्थाने सत्ताकारणच असते आणि ते कमालीचे निष्ठूरच नव्हे, तर क्रूरही असते. त्यातला कोणीही, मग तो नेता असो वा अनुयायी दुसऱ्यासाठी राजकारण करीत नाही. नेत्याच्या राजकीय खेळीत जेव्हा एखादा अनुयायी बसतो तेव्हा त्याचे नशीब उघडल्यासारखे दिसते. जेव्हा बसणार नाही तेव्हा त्या नशिबाची झापड बंद झाल्याचेही आपण पाहतो. हीच गोष्ट त्यातल्या अनुयायांचीही आहे. नेता जो-वर किफायतशीर असतो तोवर त्याची पालखी सारे आनंदाने खांद्यावर घेतात. जेव्हा त्याचे फायदेशीर असणे संपते तेव्हा त्यांना ती पालखी जड वाटू लागते... यात नेत्यांना दोषी धरायचे की अनुयायांना अपराधी ठरवायचे?

दिल्लीकरांनी यशवंतरावांच्या क्षमतेचा वापर आपल्या राजकारणासाठी करून घेतला आणि यशवंतरावांनीही त्यांना तो करू दिला. त्यांच्या अनुयायांनी त्यांचे मोठेपण स्वतःच्या वाढीसाठी जेवढे वापरता येईल तेवढे वापरले आणि यशवंतरावांनीही ते त्यांना वापरू दिले. दिल्लीकरांना त्यांनी नकार दिला नाही आणि अनुयायांनाही थांबा असे ते म्हणाले नाहीत. आपले यश शांतपणे पचविणाऱ्या या माणसाने नंतरचे अपयशही मुकाट्यानेच पचविले असे म्हणून मग थांबावे लागते. यशवंतरावांचा विश्वासघात झाला असे अनेकांनी आजवर लिहिले. त्यांनी केलेल्या तडजोडींवरही अनेकांनी ठपका ठेवला. तत्त्वनिष्ठेला बगल देत राजकारण केल्याचे काही मान्यवर विचारवंतांनी त्यांच्याविषयी लिहून ठेवले... मला अशा न्यायनिवाड्यात रस नाही. राजकारण हे तसेही विश्वासाचे क्षेत्र नाही. अतिरिक्त विश्वास हा तर त्यात अपराध ठरावा असाच प्रकार आहे. राजकारण हे तडजोडीचेही क्षेत्र आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल राज्यशास्त्रज्ञच तेवढे होऊ शकतात. राजकीय नेतृत्व करणे हे त्यांचे काम नव्हे... लढ्यातले नेतृत्व त्यागावर तर शांततेतले भोगावर उभे असते. या भोगांवर शहाणे पांघरूण घालू शकणारे यशस्वी नेते आपण पाहतो आणि शांत होतो. ज्यांना ते नीटसे घालता येत नाही त्यांच्या नावाने बोटे मोडून आपण मोकळेही होत असतो. शिवाय संत मोजण्याच्या फूटपट्ट्यांनी राजकारणी माणसे मोजायची नसतात हे वास्तवही अशावेळी लक्षात घ्यायचे असते.

ज्याला स्पर्धक नाही आणि ज्याच्याशी कोणाला स्पर्धा करता येणार नाही अशी उंची ज्याला राजकारणात गाठता आली त्या गांधीलाच तत्त्वनिष्ठा आणि तडजोड या दोन्ही गोष्टी एकावेळी जपता आल्या. पण, सारेच राजकारणी गांधी कसे असतील? नियतीचा एक संकेतही अशावेळी लक्षात घ्यायचा. शिखरावर नेहमीच फार थोडी जागा असते. तिथवर एकट्यालाच पोहोचता येते आणि तसे पोहोचत असताना तो क्रमाने एकाकीही होत जातो. यशवंतरावांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या स्मृतींना नमस्कार करताना एक गोष्ट मात्र साऱ्यांनीच कृतज्ञतेने लक्षात घ्यायची आहे. महाराष्ट्राच्या उभारणीची पायाभरणी करणारा आणि आपल्या असामान्य बुद्धीकर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राला त्याची नवी ओळख करून देणारा लोकमान्यांच्या नंतरचा हा महानेता होता हे महाराष्ट्राला कधीही विसरता येणार नाही.

**संपर्क :९८२२४७१६४६**



# बेरजेच्या राजकारणाचा रसिक राजा

हल्लीचे राजकारण गढूळ झाले आहे, असे म्हटले जाते. राजकीय नेत्यांना गुंडमुंड, व्यापारी, उद्योगपती, दलाल, फिक्सर्स, काळाबाजारवाले यांचा वेढा पडलेला असतो. लेखक, चित्रकार, अभिनेते, अभिजात गायक, विचारवंत, बुद्धिजीवी वर्ग यांच्यापासून नेते फटकूनच राहतात. यापैकी कुणा एकाचे निधन झाले तर धवल वस्त्रे परिधान करून नि सुतकी चेहरा करून पाच-पंधरा मिनिटे समाचाराला जायचे आणि पोकळी निर्माण झाल्याची ठरीव प्रतिक्रिया द्यायची की संपले, असा मामला असतो. वाचन, कला, साहित्य, नाटक याच्याशी दुरूनही संबंध नसणारे अनेक जण आहेत. वैचारिक व कलाजीवनाचा एक संस्कार घेऊन जगावे, असे त्यांना मुळीच वाटत नाही. त्याऐवजी दिवसभर कुणाकुणाच्या संगतीत राहावे आणि सायंकाळी बाबा-बुवांच्या दर्शनाला जाऊन पापक्षालन करून घ्यावे, असे एकूण धोरण आणि वर्तन दिसते. याउलट यशवंतराव चव्हाण म्हणजे साहित्य, संगीत व कला यांचा संगम होता. ते फिल्म फेस्टिव्हलला जाऊन रात्री काम संपल्यानंतर विदेशी चित्रपट बघत. इंग्रजी-मराठी वृत्तपत्रांची ग्रंथसमीक्षणे वाचून मुंबई ते दिल्लीतून महिन्याला १५-२० पुस्तके खरेदी करीत असत. विदेश दौऱ्यात वेळात वेळ काढून पुस्तके घेत असत. मोटार व विमान प्रवासात ते पुस्तके वाचत बसत. दिवसात २५-५० पाने वाचल्याविना झोपत नसत. या पुस्तकांची निगा राखण्याचे काम श्रीमती वेणुताई चव्हाण ममत्वाने करीत असत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गोवर्धन पारिख, गोविंद तळवलकर प्रभृतींशी ग्रंथविषयक चर्चा करीत असत. शरद पवारांनीही आपल्या या राजकीय गुरूच्या पुस्तकप्रेमाच्या आठवणी सांगितल्या आहेत.

पु.ल. देशपांडेंशी त्यांची घनिष्ठ मैत्री होती आणि पु.लं.चे वक्तृत्व ऐकताना यशवंतराव पोट धरून हसत असल्याचे क्षण आजही आठवतात. गदिमांशी त्यांचे स्नेहानुबंध होते आणि गीतरामायण आणीबाणीतील त्यांना पाठ होते. मला आठवते, कराड साहित्य संमेलन तेजस्विनी दुर्गा भागवत यांनी गाजवले. पण, त्याच संमेलनात ना.धों. महानोरांनी आपल्या गावरान मातीचा गंध असलेल्या कविता ऐकवल्या आणि त्यानंतर यशवंतरावांचे ना.धों.शी मैत्र जुळले. कराड संमेलनास मी स्वत: हजर राहिलेलो आहे.

न्यूयॉर्क टाइम्सच्या यादीत यशवंतरावांनी मनोहर माळगावकर व त्यांच्या 'प्रिन्सेस' या कादंबरीबद्दल वाचले. तेव्हा कुतूहल वाटून ती त्यांनी खरेदी करून वाचली व नंतर तिच्याबद्दल माळगावकरांशी प्रदीर्घ चर्चाही केली.

पु.ल., गदिमा, पु.भा. भावे, वसंत कानेटकर, वसंत सबनीस अशांबरोबर गप्पांच्या मैफली जमवण्यात त्यांना रस होता. रणजीत देसाईंच्या 'स्वामी'ला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला, तेव्हा यशवंतराव केंद्रीय गृहमंत्री होते. त्यावेळी श्री. देसाई यशवंतरावांच्या निवासस्थानी 'स्वामी'ची प्रत

## हेमंत देसाई

घेऊन भेटायला गेले. तेव्हा यशवंतराव हसून स्वागत करीत त्यांना म्हणाले, ''माझ्याकडे 'स्वामी'ची प्रत आहे; आणि ती मी वाचली आहे. 'स्वामी'ला पुरस्कार मिळाला, याचा मला अत्यानंद आहे. तुमच्या यशाचं मला कौतुक आहे. पण, रणजीत तुम्ही हुरळून जाऊ नका. तुम्ही यापेक्षाही मोठं कार्य करा.'' मग, यशवंतरावांनी मोगरीचा हार देसाईंच्या गळ्यात घालून त्यांचे अभिनंदन केले. पुढे देसाईंनी 'श्रीमान योगी' लिहिली, तेव्हा मुंबईत येऊन यशवंतरावांनी त्यांच्या हातात सोन्याचे कडे घातले.

पु.लं.च्या अध्यक्षतेखाली इचलकरंजीच्या साहित्य संमेलनास यशवंतराव साहित्य रसिक म्हणून उपस्थित राहिले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष रणजीत देसाई होते. उद्घाटन सोहळ्यानंतर यशवंतरावांनी बा.भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, कवी अनिल यांच्याबरोबर कविता व गप्पांची मैफल रंगवली. यशवंतरावांनी आपले मंत्रीपद अशा मित्रांमध्ये कधी आणले नाही. त्यानंतर थोड्या वेळाने पु.ल. तेथे आले आणि त्यांनी 'जोहार मायबाप' हा अभंग ऐकला, तो ऐकून यशवंतरावांना परमानंद झाला होता.

विद्याधर गोखले लिखित 'पंडितराव जगन्नाथ' या नाटकाच्या दिल्लीत झालेल्या प्रयोगास पंतप्रधान पं. नेहरू आणि यशवंतराव उपस्थित होते. ते पंडितजींना अधूनमधून मराठी संवादांचा अर्थ सांगत होते. पहिला अंक झाल्यावर कलावंतांशी परिचय करून देण्यासाठी यशवंतराव पंडितजींना घेऊन रंगमंचाच्या ठिकाणीही आले होते.

'दुरितांचे तिमिर जावो' नाटकाच्या एका प्रयोगात पाय फ्रॅक्चर असूनही काम करणाऱ्या चित्तरंजन कोल्हटकरांना वैद्यकीय मदत मिळेल याकडे लक्ष देणारे यशवंतराव माणुसकी जपणारे होते.

गांधीवादी विचारवंत श्रीपाद जोशी उत्तरायुष्यात हिंदुत्ववादी झाले. माझ्या आठवणीप्रमाणे 'तरूण भारत'मध्ये ते निश्चितपणे लेखन करीत असत. त्यांना अफगाणिस्तानातील घडामोडींवर ग्रंथ 'अफगाण डायरी' लिहायचा होता. त्यासाठी त्यांना तेथे जाण्याची परवानगी हवी होती. यशवंतराव तेव्हा सत्तेत नव्हते. पण, त्यांनी श्रीपाद रावांची शिफारस केली, त्यांना लगेच पासपोर्ट-व्हिसा मिळाला.

यशवंतराव शास्त्रीय संगीताचे भोक्ते होते. बालगंधर्व, अब्दुल करीम खाँ, हिराबाई बडोदेकर, कुमार गंधर्व, फिरोज दस्तूर, भीमसेन जोशी यांच्या गायनावर ते लुब्ध असत. अनेक नेते गप्पांची मैफल सुरू असताना मध्येच उठून जातात. याप्रकारे गायकाचा अपमान करणे यशवंतरावांना मान्य नव्हते. पं. भीमसेन जोशींजवळ त्यांनी आपली ही भावना प्रकट केली होती.

एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी भीमसेनजींची नागपूरमध्ये मैफल ठेवली. मंत्रिमंडळातील सहकारी तसेच आमदार, खासदार त्यास हजर होते. लोडतक्क्यावर बसलेली ही मंडळी गाण्याऐवजी एकमेकांशी गप्पा मारण्यात गर्क होती, तर कुणी डाराडूर झोपले होते; तेव्हा मध्यंतरानंतर व्यासपीठावर जाऊन यशवंतरावांनी, 'गुजगोष्टी करायच्या असतील, त्यांनी घरी जावे,' असा दम मारला.

वेणूताईंच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त कराडमध्ये यशवंतरावांनी भीमसेनजींचा संतवाणीचा कार्यक्रमही ठेवला होता. दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी कुमार, हिराबाई, ज्योत्स्नाबाई प्रभुतींच्या मैफली होत असत.

यशवंतरावांची दुसरी बाजू म्हणजे उद्योगधंद्यांची. राज्याचा कृषी औद्योगिक विकास व्हावा हा त्यांचा



आग्रह. आज शेतकऱ्यांच्या जमिनी हडप कशा करता येतील याकडे संबंधितांचे लक्ष असते. काही जण शेतीऐवजी फक्त उद्योगावरच भर देत आहेत. काहींचे भलतेच 'उद्योग'! यशवंतराव व त्यांचे स्नेही आणि केंद्रात मंत्रिपद भूषविलेल्या अण्णासाहेब शिंदेंनी शेतकऱ्यांना आज कधीच भूमिहीन होऊ दिले नसते. त्यांच्या आत्महत्या रोखल्या असत्या. यशवंतरावांनी शेती व शेती आधारित उद्योगांचे धोरण निश्चित केले होते. शेती व उद्योगधंद्यामध्ये तयार होणाऱ्या मालास बाजारपेठ तयार असेल, हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळे शेती विरुद्ध उद्योग असे द्वैत उभे न करता शेती आणि उद्योग यांच्या आधारावर विकास हे त्यांचे सूत्र आहे. यशवंतराव आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. त्यांच्या कारकिर्दीत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत अशा त्रिस्तरीय व्यवस्थेचा प्रारंभ झाला. त्यांनी कोल्हापुरी बंधाऱ्यांचा प्रचार केला होता. कोयना व उजनी प्रकल्प उभारण्यास गती दिली. राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या राजवटीत राज्यात १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. यशवंतरावांचा व शंतनुराव किर्लोस्करांचा जुना ऋणानुबंध, 'छोडो भारत' आंदोलनात यशवंतराव व किर्लोस्करवाडीचा संबंध वाढला. कारण, तिथले अनेक तरुण आंदोलनात होते.'यशवंतराव भूमिगत असताना बऱ्याचदा किर्लोस्करवाडीला येऊन राहत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर यशवंतराव प्रथम द्वैभाषिकाचे व मग १९६० साली महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. राज्यात ठिकठिकाणी एमआयडीसीची स्थापना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. पुण्याच्या औद्योगिक विकासात यशवंतरावांप्रमाणेच शंतनुरावांचाही हातभार लागला. १९६६ साली गाडगीळ समितीने तेव्हा औद्योगिक वाढ होऊ नये, ती रोखावी अशा शिफारशी केल्या. त्या अंमलात आल्या असत्या तर पुण्याची वाढ खुंटली असती. असले शंतनुराव मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष होते. त्यांनी त्यास विरोध दर्शवला. त्यावेळी यशवंतराव दिल्लीत असले तरी त्यांनाही पुण्याच्या विकासाची काळजी होती. नंतर हे आत्मघातकी धोरण मागे घेतले गेले. एकदा शंतनुरावांनी लहान विमाने बनविण्याची एक योजना त्यांच्या विचारार्थ ठेवली. ही विमाने आकाराने छोटी, पण आधुनिक होती. शेती व प्रवास यासाठी उपयुक्त होती. प्रगत देशांत त्यांचा वापर होत असे. ही विमाने भारताच्या विकासासाठी गरजेची आहेत हे यशवंतरावांना पटले. हा प्रकल्प प्रत्यक्षात यावा म्हणून त्यांनी प्रयत्नही केला. परंतु, याकाळी नागरी हवाई वाहतूक व विमान निर्मिती क्षेत्र सरकारी क्षेत्रातच असल्याने त्यांचा नाइलाज झाला. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या किर्लोस्करवाडीत झालेल्या जन्मशताब्दी कार्यक्रमात ते म्हणाले होते, कारखाना उभारण्यासाठी प्रथम वीज, रस्ता, पाणी, टेलिफोन व्यवस्था यांची आवश्यकता असते. हे सारे नसताना लक्ष्मणरावांनी, जिद्दीने माळरानावर कारखाना काढला व यशस्वी करून दाखविला. म्हणजे पायाभूत सुविधांचे विकासातील महत्त्व त्यांनी तेव्हाच जाणले होते.

बी.जी. शिर्के सिपोरेक्स तंत्रज्ञानाच्या शोधात स्वीडनला गेले, तेव्हा यशवंतरावांनी आणि नियोजन आयोगाचे सदस्य सदाशिवराव बर्वे यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. सिपोरेक्स कंपनी काढण्यासाठी परवाना मिळविण्यासाठी शिर्केंना दिल्लीत सरकारी कार्यालयात सतरा धडका माराव्या लागल्या. तेव्हा संरक्षणमंत्री असलेल्या यशवंतरावांना त्यांच्या यातना कळत होत्या. इथल्या समुद्रात कुठली फाइल कुठे जाईल त्याचा थांग लागत नाही, असे उद्गार त्यांनी काढले. पण परवान्यासाठी गेले, त्यांनी मदतही केली. केंद्र व राज्य सरकारच्या अधिकारी व मंत्र्यांना शिर्के पत्र लिहून सूचना करीत. यशवंतराव त्यांचे स्वागत करीत. 'यापुढे कारभारात सुधारणा करता येतात,' असे ते म्हणत.

यशवंतरावांचा द्वैभाषिकाचा कारभारही विकासवादी होता. मराठवाडा विद्यापीठ त्यांनी स्थापलेच. ते या विद्यापीठाचे मित्र होते. त्यांनीच औरंगाबाद विभागासाठी एक विकासमंडळ स्थापले व त्या काळात मराठवाडा काँग्रेसच प्रदेशाध्यक्ष असलेल्या बाबासाहेब सावनेकरांना अध्यक्षपदी नेमले. १० वर्षांत होणार नाहीत एवढी कामे यशवंतरावांनी एका वर्षात केली. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी बहरली ती मुख्यत: वसंतदादा पाटील यांच्यामुळे. पण, त्यांच्या कर्तृत्वाला शासकीय पातळीवरून यशवंतरावांनीच सहकार्य केले; कारण, दादा सरकारात आले ते खूप उशिराने. सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मुदत सहा वा दहा वर्षे असावी यासाठी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी विधेयक आणले. तेव्हा त्यामुळे नव्याने निर्माण झालेली साखर कारखानदारी अडचणीत येईल असे वसंतदादांप्रमाणेच अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनाही वाटत होते. या प्रश्नावर सामोपचाराने मार्ग काढण्यासाठी यशवंतरावांनी प्रयत्न केला. त्यांनी १९५६ व ६० नंतरही महाराष्ट्रात काँग्रेसची पाळेमुळे रुजवली. आज राज्यातून काँग्रेसला कोणी हलवू शकत नाही, त्याप्रमाणे यशवंतरावांनी करून ठेवलेले काम आहे. एकतर ब्राह्मणेतर चळवळीतील बरेच नेते काँग्रेसमध्ये सामील झाल्यामुळे पक्ष बहुजनांचा झाला. यशवंतरावांनी सर्वसामान्य स्थितीतील मराठ्यांना पुढे आणले म्हणजे जमीनदार व सरंजामदारांपेक्षा गोरगरीब मराठ्यांना वाव दिला. शेतकरी कामगार पक्ष व समाजवादी पक्षाच्या मंडळींना काँग्रेसमध्ये आणून राजकारणाची बेरीज केली. यशवंतरावांनी १९५७ मध्ये ग्रामपंचयातींचा कायदा केला आणि १९६२ साली पंचायत समित्या व जिल्हा परिषदा निर्माण केल्या. त्यामुळे गावागावात काँग्रेसचे कार्यकर्ते निर्माण झाले. तेव्हाचा मध्यमवर्ग यास 'सत्तेचे राजकारण' म्हणून हिणवत असला, तरी स्थानिक सत्ताकेंद्राच्या मदतीने पक्ष विस्तारत असतो.

यशवंतरावांनी फक्त सहकारी साखर कारखानेच नव्हेत, तर खरेदी-विक्री, दूध संघ, प्रक्रिया संघ, ग्राहकांचे संघ तसेच प्राथमिक सोसायट्या व सहकारी बँकांची स्थापना व्हावी यासाठी प्रयत्न केले. या चळवळीत विठ्ठलराव विखे-पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, वसंतदादा पाटील असे सर्वच जण होते. यामुळे सरकारेतर नवीन सत्ताकेंद्रे वाढत गेली. त्यातून आर्थिक पाठबळ मिळत गेले. लोकशाही प्रक्रिया पसरत जाण्यास परत मदत झाली. मराठ्यांबरोबरच बिगरमराठा जातींनाही सत्तेत वाव मिळत गेला. यशवंतरावांनी फक्त पुण्यामुंबईतच विकास केंद्रीभूत होऊ नये म्हणून ठाणे, पनवेल, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, सांगली इथेही कारखानदारी वाढावी असे धोरण ठेवले. सत्ताकारणात व अर्थकारणातही विविध घटकांना-भागांना सहभागी करून घेतले. त्यातून हे राज्य बहुजनांचे आहे, आपले आहे अशी जाणीव पसरत गेली. लोककला कलावंत, कुस्तीपटू, कबड्डीपटू, खोखोपटू, शास्त्रोक्त गायक, नाटक-सिनेमावाले, पत्रकार, साहित्यिक, बुद्धिमंत अशा सर्वांबद्दल यशवंतरावांनी आपुलकी मानली. 'मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे, माझे तुम्हाला ऐकावेच लागेल, ऊठ म्हटले की उठा, बस म्हटले की बसा,' अशी मग्रुरी यशवंतरावांमध्ये नव्हती. आपला मुद्दा पटवून देण्याचा प्रयत्न करायचा, समोरच्याचे म्हणणे ऐकून घ्यायचे, नोकरशहांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य



द्यायचे, गुलामाप्रमाणे कोणालाच वागवायचे नाही, स्वत:ला राजा समजायचे नाही, ही यशवंतरावांची लोकशाहीवादी वृत्ती व शैली होती.

मंगल कलश कोणी आणला यावर बरीच टीकाटिपणी झाली आहे. पण, यशवंतराव चव्हाण हे सुरुवातीला संयुक्त महाराष्ट्रवादीच होते. मराठी माणसाचे राज्य निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणीचे ते सदस्यही होते. १९४८ मध्ये परिषदेचे शिवाजी पार्कवर संमेलन भरले होते, तेव्हा यशवंतरावांनी मांडीवर थाप मारून संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार केला होता. १९५५ साली राज्य पुनर्रचना मंडळाने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस विरोध दर्शवला. त्याऐवजी गुजरात व महाराष्ट्राचे संयुक्त राज्य (मुंबई-विदर्भ वगळून) निर्माण करण्याची शिफारस केली. केंद्राने ती मान्य केली. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत मुंबईचे वेगळे राज्य करण्याच्या शिफारशीवर 'हा स्वदेशी वसाहतवाद' असल्याची टीका यशवंतरावांनी केली होती.

परंतु, त्यानंतर काही दिवसांतच त्यांनी 'नेहरू की संयुक्त महाराष्ट्र असा पर्याय ठेवल्यास माझी पहिली निष्ठा नेहरूंच्या बाजूने असेल,' असे मत व्यक्त केले. त्यावेळी देशात नेहरूंच्या नेतृत्वाचा मोठाच प्रभाव होता आणि त्यांच्या भूमिकेशी फारकत घेणे यशवंतरावांच्या प्रकृतीत बसणारे नव्हते. फारकत घेतली असती तर कदाचित नवा राजकीय मार्ग निवडावा लागला असता. काँग्रेसविरोधी भूमिका घेऊन राजकारण करावे लागले असते. यशवंतराव हे पूर्णत: काँग्रेसवादी झाले होते. शिवाय त्यांचा स्वभाव संघर्षवादी नव्हता.

मुंबईत हॉटेल कामगारांची एकजूट बांधण्याचे काम जॉर्ज फर्नांडिस यांनी हाती घेतले, तेव्हा हॉटेल कामगार हिंसाचार करीत असल्याचा आरोप मालकांनी केला. त्यावेळी यशवंतरावांच्या सरकारने त्याचा जाहीर इन्कार केला, तसेच 'हॉटेल कामगारांवर अन्याय करू नका,' असा दमही मालकांना दिला.

गरिबांबद्दल कणव असलेल्या यशवंतरावांची एकदा शिरुरला (घोडनदी) सभा होती. त्यावेळी त्यांनी १९४२ च्या आंदोलनातील ते भूमिगत असतानाची गोष्ट उपस्थित श्रोत्यांना सांगितली. तेव्हा ते गुपचूपरीत्या गावात पोहोचले होते. तिथल्या एका शिंप्याने त्यांना ओळखले नसतानाही काही दिवस आपल्या घरात आश्रय दिला.'या शिंप्याचा आता मला थांगपत्ता नाही,' असे ते म्हणताच, 'मी जिवंत हाये' असे ओरडून एक माणूस पुढे आला. तोच तो शिंपी. पण, एव्हाना तो आंधळा बनला होता. त्याचे शिंपीकामही थांबले होते. जगण्याची भ्रांत होती. मुलालाही नोकरी नव्हती. यशवंतरावांनी त्याच्या मुलास जिल्हा परिषदेत लावले आणि म्हाताऱ्याला काही आर्थिक मदतही केली.

यशवंतरावांवर विठ्ठल रामजी शिंदेंचा मोठा प्रभाव होता. त्यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे काम थोर. हरिजनांच्या मुलांच्या शिक्षणाचा उपक्रम त्यांनी हाती घेतला होता. त्याचे उद्घाटन करण्यासाठी त्यांनी विठ्ठल रामजींना आमंत्रित केले. तेव्हा यशवंतराव मॅट्रिकला होते. पण, आमंत्रण देण्यासाठी ते कराडहून पुण्यात गेले होते. विठ्ठल रामजी कराडात यशवंतरावांच्या घरी राहिले. अस्पृश्यांच्या मुलांना शिकवणे व स्वावलंबी बनविण्याचे महत्त्व विठ्ठल रामजींनी आपल्या भाषणात सांगितले.

अनेक वर्षांनी यशवंतराव राज्याचे मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी ताबडतोब महार वतनाचा कायदा रद्द केला. हरिजनांनी बौद्ध धर्मात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या सवलती कायद्यावर बोट ठेवून बंद करण्यात आल्या होत्या, त्या यशवंतरावांनी पुन्हा चालू केल्या. कायदा हा माणसासाठी असतो, माणसे कायद्यासाठी नसतात याचे भान आणून देणारा हा निर्णय होता. विठ्ठल रामजींच्या संस्कारांमुळेच असे पुरोगामी निर्णय यशवंतराव घेऊ शकले.

यशवंतरावांची ब्राह्मणेतर चळवळीच्या राजकारणाविषयी (विशेषत: ज्यांनी काँग्रेसचा त्याग करून शेतकरी कामगार पक्ष स्थापला) विशेष अनुकूल मत नव्हते. केशवराव जेधेंना काँग्रेस पक्षच विसरला व मग त्यांनी शेतकरी कामगार पक्ष स्थापला. त्यांना राजकीय परिवर्तन हवे होते. परंतु, शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण असे किती यशस्वी होईल? काँग्रेसबाहेर पडणे कितपत व्यवहार्य होईल? असा शहाणपणाचा विचार यशवंतरावांनी केला. शिवाय जेधे बाहेर पडल्यानंतरच महाराष्ट्र काँग्रेसमध्ये यशवंतराव चव्हाण हे नाव पुढे आले.

एकेकाळी (१९२७) यशवंतराव ब्राह्मणेतर चळवळीकडे आकर्षित झाले होते व त्यांनी भास्करराव जाधवांचा प्रचारही केला होता. ते ब्राह्मणेतर वृत्तपत्रे वाचत असत. पण, लवकरच 'त्यांचे विचारविश्व संकुचित व दूषित असल्याचे' यशवंतरावांना जाणवले. ब्राह्मणेतर चळवळीच्या संकुचित दृष्टिकोनातून बाहेर पडून काही केले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. 'निव्वळ ब्राह्मणांना विरोध करून बहुजन समाजाचे हित कसे होईल? कोणत्याही एका जातीचा द्वेष करू नये. जे समाज मागे पडले आहेत, त्यांना जागृत करणे, त्यांच्यात नवीन धारणा निर्माण करणे हाच एक उत्तम मार्ग आहे,' असे ते म्हणू लागले.

यशवंतराव हायस्कूलचे विद्यार्थी होते. या शाळेत असताना यशवंतरावांनी टिळक साहित्य वाचले. जातिपातींच्या मर्यादांपलीकडे जाऊन राष्ट्रीय प्रश्नांना भिडावे, हा टिळकांचा दृष्टिकोन त्यांना पटला.


पुढे 'महात्मा गांधी व महाराष्ट्र' या ग्रंथात लिहिलेल्या लेखात यशवंतरावांनी लिहिले की, गांधींच्या रूपाने जेव्हा एक नवे, नव्या घाटाचे नेतृत्व उभे राहिले, तेव्हा टिळकवादी मंडळी गोंधळून जाणे स्वाभाविक होते. गोखले पंथीयांपेक्षा टिळकवादी जनतेच्या अधिक जवळ होते; पण, त्यांच्या चळवळीतील रीतभात शहरी होती. त्यात शब्दांना भाषेत व भाषणांना प्राधान्य होते. लोकमान्यांच्या हयातीत त्यांनी जे तेजस्वी स्वरूप राजकारणास दिले, त्याचा साक्षात्कार टिळक पंथीयांच्या कार्यात येत नव्हता.

यशवंतरावांचे राजकीय आकलन चांगले होते. चळवळीत तुरुंगात असताना विनायकराव भुस्कुटे यांच्याकडून त्यांनी मार्क्सवादाचे धडे घेतले. त्यांच्या पुरोगामी धोरणांतून हा प्रभाव प्रतिबिंबित झाला. मात्र, भटाब्राह्मणांना शिव्या दिल्या की पुरोगामित्व पवित्र झाले असे त्यांनी मानले नाही. म्हणूनच ब्राह्मणेतर नेत्यांपेक्षा यशवंतराव वेगळे ठरतात. गांधीहत्येत ज्यांची घरे जळाली, त्यांची यशवंतरावांनी दिलेली कर्जे माफ करून टाकली. यातून ब्राह्मणांना दिलासा मिळाला व तो वर्ग इतर समाजापासून दूर चालला होता, ती प्रक्रिया थांबली.

यशवंतराव एकदा म्हणाले होते की, महाराष्ट्रापेक्षा लोक मोठे. राज्याच्या अस्मितेपेक्षा देश अधिक मोठा, असे त्यांना अभिप्रेत होते. याचा अर्थ महाराष्ट्र लहान, असे त्यांना म्हणायचे नव्हते.

आज काही आक्रमक नेत्यांना देशांपेक्षा राज्य मोठे वाटू लागले आहे. त्यांची भाषिक अस्मिता इतरांच्या जिवावर उठली आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विविध भागांतील (विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र) भावनात्मक ऐक्यावर भर दिला होता. आज ते असते तर मराठी व बिगरमराठी यांच्यातील अंतर त्यांनी दूर करण्यावर भर दिला





महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शपथविधीनंतर सचिवालयात स्वाक्षरी करून पदभार स्वीकारला.

रेखाचित्र : एम.आर. आचरेकर

असता.

शरद पवार व त्यांना पाठिंबा देणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांनी जनता पक्षाबरोबर सहकार्य करून संयुक्त मंत्रिमंडळ स्थापण्याचा निर्णय घेतला, तेव्हा यशवंतराव चव्हाण काँग्रेसमध्ये होते. त्यावेळी यशवंतराव व शरदराव हे गुरुशिष्य दोन टोकाला होते. आणीबाणीनंतर यशवंतरावांनी इंदिरा गांधींच्या धोरणाविरुद्ध भूमिका घेतली होती. पण, १९७८ साली चिक्कमंगळूर निवडणुकीत इंदिरा गांधी विजयी झाल्यावर काँग्रेसमधील विलीनीकरणवाद्यांनी ऐक्याचा नारा दिला. त्यावेळीही राष्ट्रीय प्रवाहाबरोबर राहावे असे यशवंतरावांना वाटत होते. काँग्रेस हा इंदिरा गांधींशी कसलीही तडजोड न करणारा पक्ष राहावा, असा आग्रह यशवंतरावांनी धरावा व ते मान्य होत नसल्यास स्वतंत्र पक्ष काढावा, असे आवाहन त्यांना करण्यात आले होते.

अनेक घडामोडी घडल्या. काँग्रेस फुटली. एकत्र झाली. यशवंतरावांचे 'स्वगृही' परतणेही गाजले. स्वत:चा प्रादेशिक पक्ष स्थापण्याचे धाडस शरद पवारांनी केले. हे धाडस यशवंतरावांमध्ये नव्हते. हे साहस केल्यामुळे पवार पंतप्रधान होऊ शकले नाहीत की पंतप्रधान पदासाठी त्यांनी प्रयत्न केल्यामुळे वेगळा पक्ष काढावा लागण्याची वेळ त्यांच्यावर येऊ शकली, हा चर्चेचा विषय होऊ शकतो.

यशवंतराव उपपंतप्रधान झाले, तर पवार संरक्षणमंत्री. काँग्रेसच्या परिघात राहून यशवंतराव महाराष्ट्रात व केंद्रीय मंत्रिमंडळात वावरले. प्रत्येक खात्यावर त्यांनी आपली छाप सोडली. ते भाबडे तत्त्वनिष्ठ नव्हते. ते विचारपूर्वक व्यवहाराचे राजकारण करीत राहिले.

काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी त्यांनी प्रसंगी दोन हात केले. नेहरूंबद्दल त्यांना आदर होता तर इंदिरा गांधींशी त्यांचे समीकरण जुळलेच नाही. सत्तेपासून लांब गेल्यानंतर कार्यकर्त्यांची गर्दी ओसरली. आजचे भ्रष्ट व व्यापारी राजकारण पाहता यशवंतरावांचे अस्सल ग्रामीण बाजाचे पण आधुनिक, सभ्य व सुसंस्कृत आणि विचारांवर चालणारे राजकारण आठवत राहते. आजच्या राजकारण्यांना त्यांची खरी आठवण राहिली असती, तर राजकारणास विधायक वळण लागले असते.

यशवंतरावांनी असंख्य कार्यकर्त्यांना मोठे केले; पण, ते पंतप्रधान होऊ शकले असते तर देशाचे भले झाले असते, ही खंत मात्र जरूर वाटत राहते.

**संपर्क :९८२०४७९६८८**



# कीर्तिवंत यशवंत

यशवंतराव चव्हाण यांच्या कराड शहरातच माझा जन्म झाला आणि एसएससीपर्यंतचे माझे शिक्षण यशवंतराव कराडच्या ज्या टिळक हायस्कूलमध्ये शिकले त्याच शाळेत झाले. माझ्या वडिलांचे वास्तव्य १९२०पासून शिक्षकांच्या नोकरीनिमित्त कराड येथे होते. पुण्या-मुंबईच्या काही दैनिकांचे कराड येथील वार्ताहर म्हणूनही ते १९४०नंतर काम करीत होते. त्यामुळे त्यांचा यशवंतरावांशी परिचय होता. देशपांडे गुरुजी या नावाने ते ओळखले जात. वडील वार्ताहर असल्याने शालेय जीवनातच यशवंतरावांच्या राजकीय प्रवासाबद्दल, काँग्रेसशी असलेल्या त्यांच्या बांधिलकीबद्दल मला माहिती मिळत गेली. १९५४मध्ये पदवीधर झाल्यानंतर मी मुंबईत येऊन पत्रकारितेत प्रवेश केला. आचार्य अत्रे यांनी स्थापन केलेल्या 'मराठा' दैनिकात आणि त्यानंतर १९६०पासून मुंबई आकाशवाणीच्या वृत्त विभागात वार्ताहर म्हणून काम करीत असताना मंत्री, मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण यांची कारकीर्द मला पाहता आली. महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी, नोकरशाही, उद्योजक, व्यापारी, साहित्यिक, कलाकार, कार्यकर्ते यांसारख्या विविध समाजघटकाला आपुलकी निर्माण करण्याची हातोटी त्यांनी आत्मसात केली होती. केंद्रीय मंत्री, उपपंतप्रधान, आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष, खासदार या नात्याने दिल्लीतच, नोव्हेंबर १९६२नंतर त्यांचा मुक्काम झाला, तरी महाराष्ट्राच्या राजकारणावरील आणि सार्वजनिक जीवनावरील त्यांची पकड कायम राहिली. १९४६च्या विधानसभा निवडणुकीत दक्षिण सातारा जिल्ह्यातून यशवंतराव चव्हाण, व्यकंटराव पवार, पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबुराव गोखले आणि के.डी. पाटील हे चारही काँग्रेस उमेदवार मुंबई विधानसभेवर निवडून आले. त्यावेळी एक सदस्य मतदारसंघ नव्हते. के.डी. पाटील वगळता हे तिघे कराडचे होते. निवडणुकीची मतमोजणी सातारा येथे झाली होती. निवडणूक निकालाचे वृत्त कराड शहरात ठिकठिकाणी फलक लावून प्रसृत करण्याच्या कामात माझा खारीचा वाटा होता. आम्ही राहत असलेल्या सोमवार पेठेत काँग्रेस उमेदवारांच्या या विजयाचा एक फलक मी लिहून लावला होता.

१९४६च्या निवडणुकीनंतर यशवंतरावांची बाळासाहेब खेर मंत्रिमंडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नियुक्ती झाली. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या झाल्यानंतर दक्षिण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाळपोळ होऊन ब्राह्मणांचे नुकसान झाले. तथापि, कराड शहरात जाळपोळीचा एकही प्रकार घडला नाही. याचे श्रेय कराडमध्ये यशवंतरावांनी आणि अन्य काँग्रेस पुढाऱ्यांनी जे सौहार्दाचे वातावरण निर्माण केले त्याला जाते. यशवंतरावांप्रमाणे पांडुअण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर, बाबुराव गोखले या काँग्रेस पुढाऱ्यांनी कराडमध्ये विचारसरणी रुजविली असल्याने कराड शहर दंग्याधोप्यापासून

**वसंत वासुदेव देशपांडे**

अलिप्त राहिले. विद्यार्थी दशेत कराडमध्ये यशवंतरावांची भाषणे ऐकण्याची संधी मला मिळाली. जुन्या मोटार स्टँड मैदानावर तेव्हा कराडमधील जाहीर सभा होत. स्वातंत्र्योत्तर काळातील अशाच एका सभेत बोलताना ज्या मार्गांनी स्वातंत्र्य मिळविले त्याच मार्गांनी विकास घडवून आणण्याचा काँग्रेसचा संकल्प असल्याचे सांगून विधायक कार्याचे महत्त्व त्यांनी विशद केले होते. संघर्ष टाळून समन्वयाचा मार्ग चोखाळण्याची त्यांची भावी आयुष्यातील यशाची गुरुकिल्लीच त्यांनी जनतेपुढे त्यावेळी उघड केली.

१९५२च्या निवडणुकीनंतर मोरारजी देसाई मंत्रिमंडळात यशवंतराव कॅबिनेट मंत्री झाले. १९५२मध्ये राज्यात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नधान्याची तीव्र टंचाई होती. आयात आणि लेव्ही अन्नधान्यावर अवलंबून धान्य पुरवठा करण्याची अत्यंत अवघड जबाबदारी पुरवठा मंत्री या नात्याने यशवंतरावांनी पार पाडली. दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देण्यासाठी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तेव्हा राज्याचा दौरा केला होता. केंद्राकडून राज्याला अन्नधान्याचा पुरेसा कोटा मिळविण्यासाठी आपणाला किती खटाटोप करावा लागत आहे ते यशवंतरावांनी त्यावेळी पत्नी वेणूताई यांना पाठविलेली जी पत्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यावरून समजते.

मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात मंत्री असतानाच त्यांच्या कर्तृत्वामुळे मुख्यमंत्री आणि सत्तेतील त्यानंतरही उच्च पदे ते निश्चितपणे गाठतील असे जाणवू लागले होते. २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेल्या नागपूर करारावर त्यांची सही आहे. महाराष्ट्रातील अग्रगण्य नेत्यांत त्यांची गणना तेव्हाच होऊ लागली होती. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळी त्यांचा भूमिका काँग्रेस श्रेष्ठींशी संघर्ष न करता मागणी मान्य करून घ्यावी अशी होती. त्यामुळे त्यांना संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांची टीका सहन करावी लागली. त्यात आचार्य अत्रे यांचा तोफखाना जोरदार होता. समन्वयवादी भूमिकेमुळे १ नोव्हेंबर १९५६ रोजी विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद त्यांच्याकडे आले. वेगळ्या मराठी भाषिक राज्यामुळे जे लाभ मिळतील ते विशाल द्विभाषिक मुंबई राज्यात देऊन मराठी जनता संतुष्ट नसून वेगळ्या राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी मराठी भाषिक आग्रही आहेत हे त्यांना समजून आले. याच सुमारास म्हणजे नोव्हेंबर १९५७मध्ये प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम ठरला. पंडित नेहरूंच्या हस्ते अनावरण होणार असल्याने त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने जाहीर केले. ''अनावरणाचा हा कार्यक्रम आम्ही होऊ देणार नाही. समिती कार्यकर्त्यांच्या प्रेतावरून पंडित नेहरूंना अनावरणासाठी जावे लागेल,'' असे वक्तव्य आचार्य अत्रे यांनी केले. मराठा दैनिकातून तसा प्रचारही सुरू झाला. त्यामुळे वातावरण प्रक्षुब्ध होऊ लागले. काँग्रेसजनांचा आणि सरकारचा हा कार्यक्रम पार पाडण्याचा निर्धार होता. समितीच्या नेत्यांनी प्रचार करून संयुक्त महाराष्ट्रवादी स्त्री-पुरुष कार्यकर्ते व नागरिक सातारा-वाई मार्गे तसेच पोलादपूर मार्गे प्रतापगडावर आणण्याची जय्यत तयारी केली. काँग्रेसजनांचा जमाव आणि समिती कार्यकर्त्यांचा जमाव समोरासमोर भिडल्यास शांतता



भंग होऊन पोलिसी बळाचा वापर करण्याचा प्रसंग टाळण्याकडे यशवंतरावांनी लक्ष केंद्रित केले. त्यांनी अनावरण सोहळ्याच्या आदल्या दिवशी समिती नेत्यांना पाचारण करून समितीच्या कार्यकर्त्यांनी शांततापूर्ण निदर्शने केल्यास त्याला सरकारची हरकत असणार नाही, असे स्पष्ट केले. मोर्चासाठी आलेल्या समितीच्या लोकांनी पंडित नेहरूंच्या मोटारीचा ताफा ज्या रस्त्याने जाणार आहे त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहून शांततेत निदर्शने करावीत, मोटारीपुढे आडवे पडण्याचा प्रयत्न कोणी करू नये, असे यशवंतरावांनी सुचविले. यशवंतरावांचा हा प्रस्ताव एस. एम. जोशी, दत्ता देशमुख आदी समिती नेत्यांनी मान्य केला. त्यानुसार वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहून समितीच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. प्रतापगडावर जाताना पंडित नेहरूंना मोठ्या संख्येने उभे असलेले हे निदर्शक दिसले. त्यांनी यशवंतरावांकडे हे लोक कशासाठी येथे जमा झाले आहेत याची वाटेतच चौकशी केली. तेव्हा यशवंतरावांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे वेगळे राज्य व्हावे या मागणीसाठी हा जनसमुदाय आला असल्याचे पंडितजींना सांगितले. त्या आधी मराठी भाषिकांचे अलग राज्याचे आंदोलन म्हणजे हिंसाचार, दगडफेक अशी काँग्रेस श्रेष्ठींची समजूत होती. परंतु, प्रतापगडच्या पायथ्याशी जमलेला हा शांततापूर्ण निदर्शकांचा जमाव पाहून पंडित नेहरूंनाही मराठी भाषिकांच्या मागणीची तीव्रता जाणवली असावी. प्रतापगड निदर्शनापासून पंडित नेहरूंच्या विचारात बदल होत गेले आणि महाराष्ट्र राज्य निर्मितीस अनुकूल वातावरण निर्माण झाले.

मोरारजी देसाई मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना गोळीबाराच्या अनेक घटना झाल्या. परंतु, यशवंतरावांनी गोळीबार आणि पोलिसी बळाचा निदर्शकांविरुद्ध वापर यासारखे प्रसंग कसे टाळता येतील ते पाहिले. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरही मुंबईत फ्लोरा फाऊंटन येथे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील हुतात्म्यांसंदर्भात समन्वयाची भूमिका घेतली, त्यामुळे मराठी भाषिकातील काँग्रेस आणि राज्य सरकारबद्दलचा राग निवळला. १९६२च्या विधानसभा निवडणुकीत याचा प्रत्यय काँग्रेसला मिळालेल्या प्रचंड बहुमताद्वारे आला. निवडणुकीनंतर यशवंतराव पुन्हा मुख्यमंत्री झाले. समितीला १९६२च्या निवडणुकीत हार पत्करावी लागली तरी समितीचे आचार्य अत्रे मुंबईतील दादर, मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. आता आचार्य अत्रे यांचा यशवंतरावांवरील राग बराचसा कमी झाला होता एवढेच नव्हे, तर संरक्षण मंत्री म्हणून अधिकारसूत्रे स्वीकारण्यासाठी दिल्लीला जाण्यापूर्वी यशवंतरावांना विधानसभेने १९ नोव्हेंबर १९६२ रोजी शुभेच्छा दिल्या तेव्हा आचार्य अत्रे यांनी यशवंतरावांच्या कामगिरीबाबत स्तुतिसुमने उधळली. ''यशवंतराव आपले आहेत. परममित्र आहेत. त्यांच्यात काही अलौकिक गुण आहेत. त्यांचा स्वभाव, त्यांचे बोलणे-चालणे-वागणे हे सारेच असे आहे की, त्यांचे शत्रुत्व करू इच्छिणाऱ्या माणसालासुद्धा फार काळ शत्रुत्व करणे शक्य होत नाही असे मी माझ्या अनुभवावरच सांगू शकतो.'' अशा प्रांजळ भाषेत आचार्य अत्रे यांनी यशवंतरावांची प्रशंसा केली. यशवंतरावांनीही त्याआधी चिनी आक्रमण निषेधाच्या ठरावावरील आचार्य अत्रे यांची उपसूचना स्वीकारून मनाचे औदार्य दाखविले. अत्रे यांच्या उपसूचनेसह ठराव मंजूर झाला. विरोधी बाजूची उपसूचना सरकार सहसा स्वीकारत नाही; परंतु, चिनी आक्रमणाचा निषेध आणि भारतीय सैन्यदलावरील विश्वास याबाबत संपूर्ण सभागृहाची एकच भावना आहे हा संदेश बाहेर जावा म्हणून आचार्य अत्रे यांची उपसूचना आपण स्वीकारत असल्याचे यशवंतरावांनी स्पष्ट केले.

यशवंतराव मुख्यमंत्री असताना आकाशवाणीचा प्रतिनिधी या नात्याने मी इतर पत्रकारांसह त्यांना भेटत असे. त्यामुळे एक पत्रकार म्हणून ते मला ओळखत होते. परंतु, मी कराडचा असून, देशपांडे गुरुजींचा मुलगा आहे हे त्यांना माहीत नव्हते. मीसुद्धा त्यांना हे सांगितले नव्हते. परंतु, एका भेटीत आजूबाजूला तीन-चार पत्रकार असताना मी ही ओळख करून दिली. क्षणार्धात यशवंतरावांच्या बोलण्यात फरक पडला. आधीची अहोची भाषा जाऊन घनिष्ठ मित्राच्या मुलाशी जसे बोलावे तशा भाषेत त्यांचा माझ्याशी संवाद सुरू झाला.

यशवंतराव मंत्री आणि मुख्यमंत्री असताना मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाची स्थापना झालेली नव्हती. तथापि, मंत्रालयातील तेव्हाच्या सचिवालयातील वार्ताहर आणि मुख्यमंत्री यांचा वार्षिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम होत असे. तेव्हा पत्रकारही मुख्यमंत्र्यांसमवेत स्नेहभोजन आयोजित करीत.

यशवंतराव मुख्यमंत्री असताना वेगळे मुख्यमंत्री कार्यालय किंवा मुख्यमंत्र्यांसाठी वेगळा जनसंपर्क अधिकारी अशी व्यवस्था नव्हती. कन्नमवार



मुंबईतील पत्रकारांशी रंगलेल्या गप्पा- एक क्षण



मुख्यमंत्री झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांसाठी जनसंपर्क अधिकारी ही प्रथा सुरू झाली. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाला तेव्हा प्रसिद्धी विभाग असे संबोधत होते आणि प्रसिद्धी विभागाच्या प्रमुखास संचालक असे पदनाम होते. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद ही व्यवस्था तेव्हा नव्हती. तथापि, आवश्यकतेनुसार यशवंतराव पत्रकार परिषद बोलावित.

मुंबईच्या सार्वजनिक जीवनात मुख्यमंत्री असताना यशवंतरावांचा जो सहभाग होता तो त्यांच्या दिल्लीतील वास्तव्यानंतरही कायम राहिला. मुख्यमंत्री असताना त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या 'मार्मिक' साप्ताहिकाचे प्रकाशन केले होते. शिवसेनेची स्थापना तेव्हा झालेली नव्हती. प्रबोधनकार ठाकरे यांचे चिरंजीव आणि व्यंगचित्रकार अशी त्यावेळी बाळासाहेबांची ओळख होती. मराठीतील पहिले व्यंगचित्र साप्ताहिक म्हणून मार्मिकला त्यांनी आपल्या भाषणात मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. शिवाजी पार्क, दादर येथील बालमोहन विद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला होता.

चिनी आक्रमणानंतर पंतप्रधान पंडित नेहरूंनी संरक्षण मंत्रिपदाची जबाबदारी यशवंतरावांवर सोपविली. संरक्षण खाते यशस्वीपणे सांभाळल्यानंतर केंद्रात अर्थ, विदेश व्यवहार आणि गृह या खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. मुंबई व महाराष्ट्र राज्याचे मंत्री आणि मुख्यमंत्री असताना यशवंतरावांचे मुंबईतील पत्रकारांशी जे संबंध निर्माण झाले त्यातील औपचारिकपणा नंतर हळूहळू कमी होत गेला, त्यामुळे दिल्लीहून मुंबईत आल्यानंतर अनेकदा ते वेळ काढून मुंबईतील पत्रकारांना अनौपचारिक बातचीत करण्यासाठी मरिन ड्राईव्हवरील त्यांच्या निवासस्थानी बोलावीत. त्यावेळी टी.व्ही. वृत्तवाहिन्या नव्हत्या. त्यांना भेटणाऱ्या पत्रकारांची संख्या १०-१५पर्यंत मर्यादित होती. राष्ट्रीय राजकारणातील बारकावे या चर्चेतून आम्हा मुंबईकर पत्रकारांना समजत. वृत्तपत्रीय प्रसिद्धीसाठी ही चर्चा नसल्याने मोकळेपणाने संभाषण होत असे. तथापि, ते मुरब्बी मुत्सद्दी आणि राजकारणी असल्याने एखादा खट्याळ पत्रकार या चर्चेतून बातमी देण्याची शक्यता विचारात घेऊन यशवंतरावांचा संवाद होत असे. जी माहिती प्रसिद्ध झाल्याने गोपनीयतेचा भंग होऊ शकेल अशी कोणतीही माहिती उघड होणार नाही याची दक्षता यशवंतराव घेत. त्यामुळे या अनौपचारिक चर्चेनंतर प्रसिद्ध झालेल्या बातमीसंबंधात इन्कार करण्याचा किंवा खुलासा करण्याचा प्रसंग सरकारी यंत्रणांवर आला नाही.

ब्रिटिश सरकारच्या राजवटीत त्यांनी तुरुंगवास भोगला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते दीर्घकाळ सत्तारूढ पक्षात होते. तथापि, केंद्रात १९७७च्या निवडणुकीनंतर जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर लोकसभेत विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे आले. काँग्रेस पक्षाच्या विभाजनानंतर देवराज अर्स आणि ब्रह्मानंद रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षात त्यांनी काम केले. १९८०च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात ए.आर. अंतुले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (आय)चे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. १९८०च्या नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या वेळी विरोधी पक्षानी शेतकरी दिंडी आयोजित केली होती. तेव्हा यशवंतराव चव्हाण या शेतकरी दिंडीत सहभागी झाले होते. दिंडी नागपूरच्या मार्गावर असताना यशवंतरावांसह दिंडीतील अनेकांना पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर यशवंतरावांना बसमधून अन्यत्र नेऊन सोडण्यात आले. स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्षांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर झालेल्या आंदोलनात सहभागी होऊन स्वातंत्र्यपूर्व काळातील जिद्द आपल्यात कायम असल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या जीवनातील हा एक आगळा अनुभव होता.

यशवंतरावांनी माणसांची अचूक पारख करून त्यांच्या गुणांचा लाभ समाजाला आणि प्रशासनाला दिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची महाराष्ट्र साहित्य संस्कृती आणि विश्वकोश मंडळाचे प्रमुख म्हणून नियुक्ती, गं.बां. ऊर्फ भाऊसाहेब तेवाळकर यांची महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती ही दोन उदाहरणे यासंबंधात अगदी बोलकी आहेत. विधान परिषदेवर साहित्यिक, पत्रकार, सामजिक कार्यकर्ते यांचा राज्यपाल नियुक्त सभासदात अंतर्भाव करण्याचा पायंडा त्यांनी पाडला. ग.दि. माडगूळकर यांच्या विधान परिषदेवरील नियुक्तीने या चांगल्या प्रथेचा आरंभ झाला. विधान परिषदेवरील अशा नियुक्तीत पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून त्यांनी त्या व्यक्तीचे कार्य आणि अनुभव याला प्राधान्य दिले. कुटुंबनियोजन क्षेत्रात शकुंतला परांजपे यांचे कार्य अजोड असल्याने त्यांची विधान परिषदेवर नियुक्ती व्हावी म्हणून राज्यपालांना त्यांनी शिफारस केली. राज्यपालनियुक्त सदस्य सर्वसाधारणत: सत्तारूढ पक्षाचे सदस्य म्हणून सभागृहात काम करतात. शकुंतला परांजपे यांनी मात्र सभागृहात प्रजासमाजवादी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले. परंतु, यशवंतरावांनी त्याबद्दल तक्रार केली नाही. ज्येष्ठ सनदी अधिकारी स.गो. बर्वे यांनी १९६१मधील पानशेत पूर आपत्तीच्या वेळी पुणे शहरात मदतीची व पुनर्वसनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. १९६२च्या निवडणुकीत त्यांना पुणे शहरात विधानसभेसाठी यशवंतरावांनी उमेदवारी दिली. निवडणुकीतील विजयानंतर त्यांच्याकडे अर्थखात्यासारख्या महत्त्वाच्या खात्याचे मंत्रिपदही यशवंतरावांनी सोपविले. बर्वे आणि यार्दी या सचिव जोडीने विशाल द्विभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाच्या वेळी वित्तीय विभाजनाची अवघड कामगिरी पूर्ण केली होती. अर्थखाते बर्वे यांच्याकडे सोपविताना यशवंतरावांनी ही बाब विचारात घेतली. सेना दलातील ज्येष्ठ निवृत्त अधिकारी एसपी थोरात यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्षपदी त्यांनी केलेली नियुक्ती सर्वांनाच पसंत पडली. शिवसेना-भाजप युती शासनाच्या राजवटीत दरसाल महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचा निर्णय झाला. तथापि, यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर लगेचच कवी यशवंत यांना 'महाराष्ट्र कवी' हा पुरस्कार देऊन राज्य सरकारची गुणग्राहकता दाखविली. कवी यशवंत हे त्याआधी बडोदा संस्थानचे राजकवी होते. तथापि, संस्थानांच्या विलिनीकरणानंतर त्यांचे हे राजकवीपदही संपुष्टात आले होते.

यशवंतरावांच्या कर्तृत्वाची ओळख 'बेरजेचे राजकारण' या दोन शब्दांतून व्हावी एवढी ही संकल्पना जनमानसात रुजली आहे. यशवंतरावांनी मुख्यमंत्री असताना आपण कराड शहराचे म्हणून इतर गावांची उपेक्षा करून सर्व योजना कराडकडे असा प्रकार केला नाही. आठव्या वित्तआयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी देशातील अन्य राज्यांकडे दुर्लक्ष आणि मुंबई - महाराष्ट्रासाठी अनुदानाचा महापूर असे केले नाही. यासंबंधात त्यांचा नि:स्पृहपणा अतुलनीय म्हणता येईल.

**संपर्क : ८८८८८४९००५**

++



# रचनात्मक कार्याचा दीपस्तंभ

एखाद्या राष्ट्रात आपण जन्मास येणे भाग्याचे समजले जाते. कर्त्याबरोबरच आपल्या कामगिरीने त्या देशाचे नाव उज्ज्वल करणे ही बाबही गौरवास्पदच असते. माणूस स्वत:भोवती कोष करून कसा जगला याला महत्त्व नसते तर दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी तो किती झिजला यावर त्या व्यक्तीचे मोठेपण अवलंबून असते. अशाच प्रकारे केवळ आपल्या सौख्याचा, स्वार्थाचा विचार न करता अविरतपणे समाजसेवेचे व्रत स्वीकारून राष्ट्रसेवेचे कार्य यशवंतराव चव्हाण साहेबांनी केले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी, पुरोगामी विचारवंत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, लोकसभेचे विरोधी पक्षनेते, कर्तबगार संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, विदेशमंत्री तसेच भारताचे उपपंतप्रधान अशा विविध जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी आपले कर्तृत्व व कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली. अशा लोकनेत्याची जन्मशताब्दी १३ मार्च २०१२ पासून सुरू होत आहे. त्यांना माझे विनम्र अभिवादन.

चव्हाण साहेबांशी माझा संबंध अगदी लवकर म्हणजे मी विद्यार्थीदशेत असतानाच आला. त्यांच्या बहुआयामी व्यक्तित्वामुळे मी अतिशय भारावलो. डिसेंबर १९५२ मध्ये साहेबांची व माझी पहिली भेट खासदार बोगावत यांच्या घरी झाली. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्यात व महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळच्या मुंबई इलाख्याचे स्थानिक स्वराज्य व जंगलमंत्री या नात्याने त्यांनी अहमदनगर जिल्ह्यास भेट दिली होती. येथे आल्यानंतर त्यांनी कलेक्टर कचेरीमध्ये अधिकाऱ्यांशी दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी काँग्रेस कमिटीच्या ऑफिसमध्ये येऊन काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. त्याच दिवशी दुपारी खासदार बोगावत यांच्याकडे जेवणासाठी ते आले. त्यावेळी जेवण वाढण्याची जबाबदारी माझ्यावर होती. येथेच त्यांचा व माझा परिचय झाला. जेवण झाल्यावर साहेब जिल्ह्यातील कर्जत, श्रीगोंदे भागात दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्याकरिता गेले. संध्याकाळी आठच्या सुमारास गांधी मैदानामध्ये त्यांची जाहीर सभा झाली. त्यावेळी त्यांचे तेथे अत्यंत विद्वत्तापूर्ण व दुष्काळी परिस्थितीचे विवेचन करणारे भाषण झाले. या सभेला खूप गर्दी असतानाही सभा शांततापूर्ण वातावरणात पार पडली.

पुढे १९५५-५६ मध्ये फाजल अली कमिशनचा भाषावर प्रांतरचनेचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर संयुक्त महाराष्ट्र समिती निर्माण झाली. सभा, मोर्चे, निदर्शने, घोषणा आदींनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला. साथी एस. एम. जोशी, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील आदी अनेक नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेतृत्व केले. काँग्रेस पक्षात शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे, मामासाहेब देवगिरीकर, यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी किल्ला लढविला. १ नोव्हेंबर १९५६ रोजी महाराष्ट्र व गुजरात अशी द्विभाषिक राज्याची निर्मिती होऊन यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाले. १९५७ साली विधानसभेच्या निवडणुका झाल्या.

## ॲड. रामनाथ वाघ

पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचा मोठा पराभव झाला. विदर्भ व गुजरातच्या साहाय्याने काँग्रेस पक्षाची मेजॉरिटी झाली. या काळात १९५७ ते १९६० पर्यंत चव्हाण साहेबांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. महाराष्ट्रात कृषी, औद्योगिक व सहकार क्षेत्रात क्रांती केली. देशामध्ये महाराष्ट्र अग्रक्रमाने आणला. पुढे १९६० मध्ये चव्हाण साहेबांनी सर्व विराधंकाना तोंड देत इंदिरा गांधी यांच्या सहकार्याने पंडित नेहरूंकडून संयुक्त महाराष्ट्र हा मंगल कलश आणला. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार संबोधले जाते.

१९६२ च्या निवडणुकामध्ये काँग्रेस पक्षाने चव्हाण साहेबांच्या नेतृत्वाखाली देदीप्यमान यश मिळविले. याचकाळात काँगेस संघटनेत कार्य करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांचे प्रबोधन करावे या उद्देशाने शिबिरांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रात काँग्रेस कार्यकर्त्यांचे तीन दिवसांचे शिबीर महाबळेश्वर येथे झाले. त्याला मी हजर होतो. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी फॅक्टरी येथे १९६४ साली पुन्हा काँग्रेस पक्षाचे तीन दिवसांचे शिबीर झाले. त्यावेळी काँगेस संघटनेमध्ये अत्यंत शिस्तीचे, कडक वातावरण होते. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष विनायकराव पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन होत असे. त्यावेळी काँग्रेस संघटनेचे पदाधिकारीच झेंड्याजवळ उभे राहत व बाकीचे सर्व मंत्रिगण व कार्यकर्ते समोरच्या रांगेमध्ये उभे राहत असत. शिबिराचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर व्यासपीठावर अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेक्रेटरी अशी पदाधिकारी मंडळीच बसण्याच्या पायंडा होता. मुख्यमंत्री व सर्व मंत्रिगण व्यासपीठाच्या समोर सभागृहात बसत असत.

१९६९ मध्ये राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे निधन झाले. म्हणून राष्ट्रपती पदाच्या निवडीसाठी सेंट्रल काँग्रेस पक्षाची बंगलोर येथे बैठक झाली. त्यावेळी डॉ. संजीव रेड्डी यांना चार मते पडली तर जगजीवन राव यांना तीनच मते पडली. त्यामुळे यशवंतराव व श्रीमती इंदिरा गांधी यांच्यात तात्त्विक मतभेद झाले. पुढे संजीव रेड्डी यांनी व उपराष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढविली. इंदिरा गांधींच्या पाठिंब्यामुळे डॉ. गिरी हे राष्ट्रपती म्हणून निवडून आले. काँग्रेस कमिटीने १९७० साली काँग्रेस कार्यकर्त्यांचे केडर तयार करण्यासाठी चंदिगड येथे देशातील १०० कार्यकर्त्यांचे शिबीर घेतले होते. त्यासाठी महाराष्ट्रातून माझी निवड झाली होती. त्यावेळी चंदिगडला जाताना व येताना चव्हाण साहेबांना दिल्ली येथे भेटलो. त्यावेळी त्यांनी चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन केले.

१९७१ च्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी अण्णासाहेब शिंदे हे नगर दक्षिणमधून लोकसभेसाठी उभे होते. त्यांच्या निवडणूक प्रचारासाठी गांधी मैदानामध्ये चव्हाण साहेबांची प्रचारसभा झाली. त्या सभेमध्ये काही टारगट पोरांनी सभेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला; पण, चव्हाण साहेबांनी अंत्यत शांतपणे सभेला सुमारे पाऊण तास मार्गदर्शन केले. त्यानंतर रात्री जेवणासाठी आमदार काकासाहेब म्हस्के यांच्याकडे जावयाचे होते. तो दिवस महाशिवरात्रीचा होता. सुरुवातीला साहेब महाशिवरात्र वगैरे उपवास करीत नाहीत अशी माहिती मिळाल्यामुळे नॉनव्हेजचा बेत तयार होता. पण, घरी आल्यावर साहेबांनी शिवरात्रीचा पक्का उपवास केला आहे, असे कळल्यामुळे मग उपवासाच्या फराळाची तयारी करावी लागली. साहेबांनी घरी शांतपणे वेळ दिला. घरातील सर्वांची विचारपूस करून मोकळेपणाने बोलले.



घरातील सर्व बायका-मुलांसह फोटोसेशनही झाले. फराळानंतर साहेबांनी निरोप घेतला.

जानेवारी १९७२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आली. त्यावेळी तिकीट मिळविण्यासाठी मी, गोविंदराव आदिक व यशवंतराव गडाख हे तिघे उमेदवार आमचे नेते मारूतराव घुले यांच्यासमवेत दिल्लीला आठ दिवस ठिय्या मांडून होतो. २५ तारखेला उमेदवारीचा निकाल जाहीर होऊन आम्हा तिघांनाही काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली. दुसऱ्या दिवशी आम्ही चव्हाण साहेबांच्या बंगल्यावर भेटण्यासाठी गेलो. साहेब त्या दिवशी निवांत होते. आमचे त्यांनी हसतमुखाने स्वागत केले. त्याचवेळी नाशिक येथील नेते पंडित धर्मा पाटील व शांताराम बापू वावरे हे दोघे जण साहेबांना भेटण्यासाठी आले. त्या दोघांनाही काँग्रेस पक्षाने तिकीट नाकारले होते. त्यामुळे साहेब सहजपणे उद्‌गारले, ''नगर जिंकले व नाशिक हरले.'' पुढे राहुरी विधानसभा मतदारसंघातून माझ्या निवडणुकीचा निकाल ११ मार्च रोजी लागला. दुसऱ्या दिवशी (१२ मार्चला) साहेबांचा वाढदिवस होता, म्हणून मी साहेबांना वाढदिवसासाठी मुंबई येथे फोन केला. त्यावेळी साहेबांनी माझे फोनवरून सांत्वन केले व म्हणाले की, ''रामनाथ तुझा निवडणुकीमध्ये पराभव झाला असला तरी निराश होऊ नको, तुला संधी मिळेल.'' त्यानंतर दोनच महिन्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्या. ग्रामीण भागात मतदार यादीत माझे नाव नव्हते. ते नाव मला मतदार यादीत घालून घ्यावे लागले व वांबोरी गटातून जिल्हा परिषद निवडणूक लढवून मी विजयी झालो. माझ्यापेक्षा अनेक ज्येष्ठ सभासद ज्यांना ०९-१० वर्षे पंचायतराजचा अनुभव होता; व मला पूर्वीचा कोणताही अनुभव नसताना १२ ऑगस्ट १९७२ रोजी जिल्हा परिषदेचा मी अध्यक्षही झालो. साहेबांचे बोलणे अशा रीतीने खरे ठरले.

माझ्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाची सुरुवात झाली. लोकांकडून सत्कारासाठी बोलावले जाऊ लागले. मात्र, त्यावेळी जिल्ह्यामध्ये दुष्काळाचे मोठे संकट होते. म्हणून आम्हाला जिल्ह्यामध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत सभा घेणे भाग पडले. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी त्यावेळचे केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण साहेब, मुख्यमंत्री वसंतराव नाईक, केंद्रीय कृषी राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांचे जिल्ह्यामध्ये वेळोवेळी दौरे झाले. त्यांनी आम जनतेला धीर देण्याबरोबरच सर्वोतोपरी मदत केली. मी नवीन असूनही या नेत्यांनी माझे धैर्य वाढविले व अशा संकटाच्या काळातही माझी कारकीर्द यशस्वी ठरली. याच काळात १९७४ साली आमच्या नगर येथील न्यू लॉ कॉलेज इमारतीचे उद्घाटन साहेबांनी केले. १९७६ साली कराड येथे मराठी साहित्य संमेलन श्रीमती दुर्गाताई भागवत यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यावेळी साहेब संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. त्या साहित्य संमेलनाला मी यशवंतराव गडाख व भास्करराव



म्हस्के तीन दिवस हजर होतो. तीनही दिवस सर्व वेळ साहेब प्रेक्षकांमध्ये पुढील रांगेत आसनस्थ झाले होते.

जिल्हा परिषदेच्या कामानिमित्त मी मुंबई व दिल्ली येथे जात असे. त्यावेळी साहेबांची भेट होत असे. जिल्हा परिषदेच्या कारभारासंबंधी ते नेहमी मार्गदर्शन करीत. १९७५ साली देशामध्ये आणिबाणी जाहीर झाली, त्यावेळी साहेबांची अतिशय अवघड परिस्थिती झालेली पाहिली. १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये उत्तर भारतात काँग्रेस पक्ष पराभूत झाला; पण, चव्हाण साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले. त्यावेळी दिल्लीत जनता पक्षाचे सरकार आले व चव्हाण साहेब लोकसभेचे विरोधी पक्षनेते झाले. १९७८ साली महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. वसंतराव दादांनी रेड्डी काँग्रेसच्या वतीने निवडणूक लढविली व इंदिरा काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक लढविली. कुणालाच बहुमत मिळाले नाही त्यामुळे वसंतदादांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होऊन इंदिरा काँग्रेसचे विदर्भातील नेते नाशिकराव तिरपुडे हे उपमुख्यमंत्री झाले. मात्र, ते सरकार सुरळीत चालेना. पुढे नाशिकराव तिरपुडे हे त्यांच्या पद्धतीने राज्य कारभार करू लागल्यामुळे शरद पवारांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमधील ३८ आमदांचा गट वेगळा निघाला. त्यांनी जनता पक्षाच्या आमदाराबरोबर पुरोगामी लोकशाही दल स्थापन केले. त्यानंतर शरदराव पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यासंबंधी चर्चा चालू असताना त्यांचा रामटेक बंगल्यावर साहेबांचा फोन आला, फोन ज्याने घेतला त्याने सांगितले की, अशा प्रकारे पुलोदचे सरकार स्थापने योग्य नाही, असे चव्हाण साहेबांचे मत आहे म्हणजेच त्यांची नापसंती होती. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली जी फुटून निघालेली काँग्रेस होती तिला महाराष्ट्रात समांतर काँग्रेस संबोधले जाऊ लागले. दोन वर्षांच्या काळानंतर साहेबांनी एक ओळीचा अविश्वासाचा ठराव लोकसभेत मांडला व सरकारला राजीनामा द्यावा लागला.

यशवंतराव चव्हाण साहेबांना राष्ट्रपतींनी पंतप्रधानपदासाठीही पाचारण केले होते. मात्र, साहेबांना बहुमताची खात्री नसल्याने त्यांनी विनम्रपणे सरकार स्थापनेसाठी नकार दिला. तेव्हा चरणसिंग पंतप्रधान झाले व चव्हाणसाहेब उपपंतप्रधान झाले. इंदिरा गांधींनी चरणसिंग यांना दिलेला पाठिंबा नंतर काढून घेतला. १९७८ साली साहेब नगरला आले असताना त्यांच्या समवेत येरवडा कारागृहात असलेले स्वातंत्र्य सैनिक श्री. दत्ता माचवे हे आजारी आहेत हे त्यांना समजले. त्यावेळी सातभाई गल्लीत वरच्या मजल्यावर असलेल्या एका खोलीत साहेब जिना चढून गेले.



जुन्या मित्राची भेट घेऊन त्याची विचारपूस केली व औषधोपचारासाठी एक हजार रुपये तेथेच त्यांनी दिले. नगर येथील बापूसाहेब भापकर हे डाव्या पक्षाचे कार्यकर्ते, परंतु साहेबांना त्यांच्याबद्दल व्यक्तिगत प्रेम होते. बापूसाहेब आजारी आहेत असे कळल्यानंतर साहेब त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेले. अर्धा-पाऊण तास त्यांची विचारपूस केली. १९७४ साली सिल्लोड येथील श्री. माणिकराव पालोदकर यांच्या सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन साहेबांच्या हस्ते झाले. त्या कार्यक्रमास आबासाहेब निंबाळकर, मारूतराव घुले, शंकरराव काळे आम्ही सर्व जण उपस्थित होतो. कार्यक्रम संपल्यानंतर इन्स्पेक्शन बंगल्यामध्ये त्यावेळेचे नवोदित कवी ना.धों. महानोर उपस्थित होते. त्यांनी दोन कविता म्हणून दाखविल्या. त्या साहेबांना इतक्या भावल्या की सुमारे अर्धा-पाऊण तास त्यांनी कवितांचा आस्वाद घेतला. ना.धों. महानोरांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छाही दिल्या.

१९७९ च्या डिसेंबरमध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. साहेब नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना रात्री नगरला मुक्कामाला थांबले होते. पहाटेच साहेबांचे स्वातंत्र्य संग्रामातील जीवलग मित्र व लढवय्ये नेते खासदार किसन वीर यांचे दुःखद निधन झाल्याची वार्ता आली. साहेबांना कळल्यानंतर त्यांचे डोळे अक्षरशः पानावले. त्यांनी पुढचा दौरा रद्द करून अंत्यविधीसाठी वाईला जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याबरोबर अण्णासाहेब शिंदे, ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी व मी असे सर्व जण अंत्यविधीला उपस्थितीत राहिलो. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून समांतर काँग्रेसचे सर्व उमेदवार पराभूत झाले. फक्त यशवंतराव चव्हाण साहेब हे एकमेव उमेदवार निवडून आले. महाराष्ट्रात समांतर काँग्रेसचा पराभव झाल्याने साहेब हवालदिल झाले. लोकमत एका बाजूला व आपण दुसऱ्या बाजूला ही गोष्ट त्यांना विचारप्रवृत्त करून गेली. शेवटी साहेबांनी अतिशय जड अंतःकरणाने इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. ९ मे १९८१ रोजी सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आम्ही काही प्रमुख कार्यकर्ते साहेबांना भेटण्यासाठी सातारा येथे गेलो होतो. त्यावेळी सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष लक्ष्मणराव पाटील यांच्या घरी भोजनाच्या वेळी चर्चा झाली. साहेबांनी स्वतःची प्रतिष्ठा बाजूला ठेवून लोकमताची कदर करण्यासाठी व साहेबांवर प्रेम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या रक्षणासाठी इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचे मोकळेपणाने समजून सांगितले.

साहेबांचे आपल्या कुटुंबीयावर, आपले पुतणे, त्यांची नातवंडे यांच्यावर अपार प्रेम होते. त्यांनी आपल्या सर्व पुतण्यांचा योग्य रीतीने सांभाळ तर केलाच पण त्यांचे सर्व शिक्षण, त्यांचा सर्व प्रपंच नीटनेटका केला. साहेबांचे पुतणे अशोक गणपतराव चव्हाण यांची सुकन्या चि.सौ.कां. स्मिता हिचा विवाह माझे धाकटे बंधू डॉ. जगन्नाथ वाघ यांचे बेळगाव येथील मेव्हणे (पत्नी डॉ. सरोजिनी हिचे भाऊ) चि. सागर यांच्याबरोबर निश्चित झाला. साखरपुडा सरदारगृह मुंबई येथे होऊन शुभविवाह बेळगाव येथे २४ मे १९८१ रोजी पार पडला. त्यावेळी चव्हाण साहेब, वेणुताई, सर्व पाहुणे मंडळी २३ तारखेलाच बेळगाव येथे आली होती. त्यांचे स्वागत आदरातिथ्य व राहण्याची सर्व व्यवस्था श्री. दळवी यांनी माझ्यावर सोपवली होती. त्यामुळे सतत दोन दिवस मी, साहेब व ताईसाहेब यांच्याबरोबर होतो. लग्नाचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडावेत यासाठी साहेबांचे प्रत्येक गोष्टीवरती लक्ष होते. योग्य त्या सूचनाही ते देत होते.

आबासाहेब निंबाळकर यांची कन्या चि. सौ. कां. रत्ना हिच्या लग्नाला हजर राहण्यासाठी २२ जून १९८१ रोजी साहेब नगरला आले होते. लग्न समारंभानंतर पुणे येथे जाताना माझ्या रायगड बंगल्यावर साहेब एक तास थांबले. जमलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या समवेत मोकळेपणाने गप्पा मारल्या. घरातील सर्वांची विचारपूस केली व मुलांसमवेत फोटो काढले. त्यांचा पुतण्या चि. डॉ. विक्रम यांचे खंडाळा शिरवळ परिसरात अपघाती निधन झाले. त्यामुळे दुसरे दिवशी अण्णासाहेब शिंदे व मी दिल्ली येथे साहेबांना भेटावयास गेलो. साहेबांना हा आघात सहन झाला नाही, त्यांच्या डोळ्यांतून सारखे पाणी येत होते. पुढे दुर्दैवाने १ जून १९८३ रोजी वेणुताईंचे दिल्लीत निधन झाले, अंत्यविधी मुंबई येथे झाला. दुसरे दिवशी आबासाहेब निंबाळकर, मारूतराव घुले व मी साहेबांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या बंगल्यावर गेलो. साहेबांचे सांत्वन करणे अतिशय अवघड झाले होते. साहेब अक्षरशः ओक्साबोक्सी रडत होते. फार वेळाने ते कसेबसे शांत झाले. पुढे १३ ऑक्टोबर १९८४ रोजी मी यशवंतराव गडाख व श्री. प्रभाकर रूपवते तिघे जण लोकसभेच्या निवडणुकाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी दिल्ली येथे साहेबांना भेटण्यासाठी गेलो. दुपारचा एक वाजला होता, घरात सामसुम होती. आमची चर्चा संपल्यानंतर आम्ही निरोप घेऊ लागलो. साहेबांनी शिपायाला हाक मारली व आम्हाला कॉफी देण्याबद्दल सांगितले. आम्ही नको नको म्हणत असतानाही साहेब आम्हाला म्हणाले, ''अरे, तुम्ही आमची किती काळजी घेता. निदान तुम्ही कॉफी तरी घ्या.'' आम्ही थांबलो, कॉफी घेऊन साहेबांचा निरोप घेतला. पुढे २३, २४ नोव्हेंबरला साहेब हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत ही बातमी कळली. त्या अवधीत दिल्ली येथे जाणे शक्य नव्हते. २५ ला रात्री साहेबांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे पार्थिव मुंबई येथे सह्याद्री बंगल्यावर अंत्यदर्शनासाठी ठेवले होते. अंत्यदर्शन घेण्यासाठी मी नगरहून मुंबईला गेलो.

१९५२ पासून माझा व साहेबांचा परिचय झाला व तो वाढतही राहिला. पुढे कौटुंबिक नातेही जुळून आले. आम्ही दोघांनी सात-आठ एकत्र प्रवासाचे क्षणही अनुभवले. साहेब अंत्यत मोकळेपणाने बोलत. आपल्या व्यथा, खंत ते बोलून दाखवत. राजकारणामध्ये, साखर कारखानदारीमध्ये व सहकारामध्ये सुरू झालेला भ्रष्टाचार याबद्दलही साहेब अंत्यत तीव्रपणे बोलत. साहेबांनी १९४६ ते १९८४ या अडोतीस वर्षांच्या काळामध्ये आपला राजकीय, सामाजिक प्रवास कसा केला आहे याची जाण आजचे किती कार्यकर्ते समजावून घेताहेत. त्यांची आजच्या कार्यकर्त्यांची विचारधारा काय आहे याच्यावर भाष्य करणे अत्यंत खेदजनक आहे. याचा आजच्या कार्यकर्त्यांनी जरूर अभ्यास केला पाहिजे. त्यांचे संपूर्ण जीवन आजच्या सर्व भारतवासीयांना, राजकीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना दीपस्तंभ ठरावे असेच आहे. खरेतर, आजपर्यंत भारतातल्या अनेक मान्यवरांना 'भारतरत्न' हा किताब प्रदान करण्यात आला आहे. अनेकांना मरणोत्तर भारतरत्न हा किताब देण्यात आला आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्रात, देशात आणि परदेशात केलेली कामगिरी भव्यदिव्य आहे. वास्तविक, भारत सरकारने यापूर्वीच त्यांना भारतरत्न हा किताब द्यायला हवा होता. अर्थात, त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी भारतरत्न हा किताबही अपुरा ठरावा असे त्यांचे कार्य युगप्रवर्तक आहे. निदान त्यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये हा किताब भारत सरकारने देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करावा अशी अपेक्षा व्यक्त करणे चूक ठरणार नाही.

**संपर्क : ९४०४३१९८५०**



# सुप्रशासनाचे आद्य शिल्पकार

डॉ. राजन तुंगारे

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला फक्त कायदा व सुव्यवस्था या स्वरूपाच्या प्रशासनाची गरज नसून, विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे. हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या व्यक्तींमध्ये यशवंतराव अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच त्यांची महाराष्ट्र राज्यामध्ये यशस्वी अंमलबजावणी करून, प्रशासनाची एक वेगळीच छाप दाखवून, त्याचा आदर्श वस्तुपाठ यशवंतरावांनी देशपातळीवर देखील दाखवून दिला होता. 'सामान्य माणूस' हा त्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक नीतीचा केंद्रबिंदू होता आणि म्हणूनच त्यांनी महाराष्ट्र राज्याचा लौकिक एक प्रागतिक राज्य असा देशपातळीवर निर्माण केला.

महाराष्ट्र राज्यामधील तरुण पिढी ज्यांच्या वैचारिक शिदोरीवर वाढली, अशा पिढीचा एक प्रतिनिधी म्हणून मला यशवंतराव जसे दिसले, जसे भावले ते या लेखाद्वारे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. अर्थात, ही वैचारिक शिदोरी कोणती? हा विचारही या ठिकाणी महत्त्वाचा आहे. प्रखर राष्ट्रभावना, लोकशाहीवर प्रचंड निष्ठा, धर्मनिरपेक्षता, माणसा-माणसातील सद्भावना, जाती-पातीचा विचार न करता समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये गुणांची पूजा या मूल्यांवर यशवंतराव ठाम होते व हीच मूल्ये युवकांमध्ये रुजावीत यासाठी ते प्रयत्नशील होते. महाराष्ट्रातील समाज एकसंघ ठेवण्यामध्ये यशवंतरावजींचे हे योगदान कधीही विसरता येणार नाही. काही महत्त्वाच्या सार्वजनिक प्रसंगी यशवंतरावजींना पाहण्याचा विद्यार्थीदशेत मला योग आला.

चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावजींना दिल्लीला बोलावून घेतले. 'हिमालयाच्या मदतीसाठी सह्याद्रीने धाव घेतली' या ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे या नेतृत्वाबद्दल सतत आकर्षण होते. परंतु, या ऐतिहासिक गोष्टीमुळे, देशपातळीवरील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व ही त्यांची ओळख महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात निर्माण झाली होती. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच १९७० व १९८०च्या दशकात यशवंतरावजींच्या सभांना तरुणांची गर्दी होत असे. परंतु, यशवंतराव अशा सभांमधून अतिशय सहजपणे श्रोत्यांशी संवाद साधत, त्यांच्या वैचारिक भूमिकेवर प्रभाव पाडत, शेवटपर्यंत भाषणावर आपली पकड ठेवत. अत्यंत साधी परंतु नीटनेटकी वेषभूषा-विशेषत: त्या काळात पंडितजी जसे जाकीट घालत त्याच पद्धतीचे जाकीट व रुबाबदार चालणे हे जसे वैशिष्ट्यपूर्ण होते तसेच श्रोत्यांशी संवाद साधण्याची हातोटी ही १९७०च्या तरुण पिढीला आकर्षित करणारी गोष्ट होती.

१९७६मधील प्रसंग मला आठवतो. छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने स्थापन झालेल्या व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या 'शाहू इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'च्या म्हणजे आताच्या 'सायबर'च्या उद्घाटनासाठी यशवंतराव कोल्हापुरात आले होते. त्या उद्घाटनप्रसंगी श्रोत्यांमध्ये मी हजर होतो.

व्यासपीठावरील व्यक्तींमध्ये माझ्या आठवणीप्रमाणे श्री. वसंतदादा पाटील, कवी ग.दि. माडगुळकर इत्यादी मंडळी होती. यशवंतराव उद्घाटनप्रसंगी काय बोलतात याची आम्हा विद्यार्थ्यांना उत्सुकता होती. उद्घाटनाचा औपचारिक कार्यक्रम आटपून, यशवंतराव बोलण्यासाठी उभे राहिले. आपण पदव्युत्तर व्यवस्थापन व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या उद्घाटनासाठी आलो आहोत याची पूर्ण जाणीव त्यांना होती. त्यांचे भाषण लिखित स्वरूपात असले तरी देखील ते फक्त त्याचा आधार घेऊन बोलत होते. परंतु, श्रोत्यांशी असलेला संवाद त्यांनी खंडित होऊ दिला नाही. त्यांनी विकसनशील देशांना व्यवस्थापनाची का गरज आहे हे भाषणाचे सूत्र ठेवून बोलण्यास सुरुवात केली व बघता बघता एखाद्या सराईत व्याख्यात्याप्रमाणे पाश्चात्त्य देशांची उदाहरणे देऊन, व्यवस्थापन शिक्षण ग्रामीण महाराष्ट्रात का आवश्यक आहे हे सांगण्यास सुरुवात केली. विकासाभिमुख प्रशासनाकरिता फक्त उत्तम आर्थिक नीतीचा अवलंब करून चालत नाही, तर त्यासाठी त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता उत्तम व्यवस्थापकांची गरज असते व असे व्यवस्थापक ही संस्था घडवेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थी दशेमध्ये यशवंतरावांचे भाषण माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले व त्याचा परिणाम म्हणून मी व्यवस्थापनाशी निगडित शिक्षण व प्रशिक्षण या क्षेत्रामध्ये माझ्या करियरची निवड केली. मला खात्री आहे की, माझ्यासारख्या अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी त्या काळात व्यवस्थापन शिक्षणाला प्राधान्य देऊन करियर म्हणून त्याची निवड केली. त्याचे श्रेय निश्चितपणे यशवंतरावजींच्या या भाषणाला द्यावे लागेल.

त्यांच्या भाषणातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे आर्थिक विकासासाठी विकसनशील देशांनी उत्तम व्यवस्थापनाची कास धरण्याची आवश्यकता. पुढच्या कालखंडामध्ये व्यवस्थापन विषयक अध्यापनाची निवड केल्यानंतर १९८६ साली भरलेल्या, जागतिक अर्थशास्त्र परिषदेमध्ये नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य कुमार सेन, तत्कालीन पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार डॉ. सुखोमय चक्रवर्ती यांची भाषणे ऐकण्याचा योग मला आला व आर्थिक व्यवस्थापन हा घटक किती महत्त्वाचा असतो हे लक्षात आले. परंतु, यशवंतरावांचे द्रष्टेपण हे आहे की, १९८०च्या दशकात महाराष्ट्राच्या खेडोपाडी व्यवस्थापन शिक्षण पोहोचले पाहिजे हा कानमंत्र त्यांनी १९७६मध्ये दिला. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष असा होता की, ते फक्त विचार देऊनच थांबले नाहीत तर मध्यमवर्गातील पदवीधर, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांना त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये संधी मिळवून दिलीच पण त्याचबरोबर सामान्य वर्गातील तरुणांनाही सातत्याने प्रोत्साहन देऊन आधुनिक परिवर्तनाच्या प्रवाहामध्ये आणून सोडले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेती, उद्योग, सहकार व शिक्षण आदी क्षेत्रातील नेतृत्व हे समाजाच्या अशाच सामान्य थरांतून निर्माण झाले असून, याच लोकांनी विकासाची भव्य-दिव्य मंदिरे उभी केली आहेत. सामान्य माणसांमधील टॅलेंट ओळखून, ते विकसित करून समाजाच्या विविध क्षेत्रात सकारात्मक पद्धतीने त्याचा वापर करून घेणारे यशवंतराव, आधुनिक काळात ज्याला आपण




टॅलेंट मॅनेजमेंट म्हणतो, त्याचा वापर अत्यंत सहजपणे करत असत हे लक्षात घेतले पाहिजे.

यशवंतराव आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक धोरणाचा पाया त्यांनी १९६०च्या दशकात घातला व त्यामध्ये कृषी व औद्योगिक वाढ परस्परांना पूरक व पोषक ठरेल हे सूत्र त्यांनी ठेवले होते. डॉ. धनंजयराव गाडगीळांसारख्या अर्थतज्ज्ञांना बरोबर घेऊन, सहकारी तत्त्वावर महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया घातला. त्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्रातील समतोल किती महत्त्वाचा असतो हे त्यांनी ओळखले होते. त्याची आठवण १९८६मध्ये भरलेल्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेच्या निमित्ताने झाली. कारण, कृषी व औद्योगिक क्षेत्रातील समतोल हाच विषय परिषदेसाठी निवडण्यात आला होता. यशवंतरावांनी जी गोष्ट १९६०च्या दशकात ओळखली होती व ज्यासाठी कृषी, औद्योगिक विकासाचे प्रारूप महाराष्ट्रासाठी निवडले होते, त्याची जाणीव १९८६मध्ये जागतिक पातळीवरील अर्थशास्त्रांना झाली. यातच यशवंतरावांची दूरदृष्टी लक्षात येते.

अर्थात, या दूरदृष्टी पाठीमागे फक्त स्वप्नरंजन नव्हते, तर सखोल वाचन व चिंतन यातून निर्माण झालेली वैचारिक बैठक होती हे लक्षात घेतले पाहिजे. माध्यमिक शाळेतील शिक्षणापासून त्यांना वाचनाचा छंद लागला. मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अगोदरच त्यांनी पाश्चात्य देशातील श्रेष्ठ ग्रंथकारांचे ग्रंथ वाचून काढले. राज्यकारभार चालवण्यासाठी जशी समाजहिताची प्रेरणा, समाज कल्याणाचा ध्यास महत्त्वाचा आहे, तशीच सखोल वाचन व चिंतनातून निर्माण झालेली वैचारिक बैठक महत्त्वाची आहे, हे लक्षात घेऊन यशवंतरावजींनी १९३० नंतरच्या कालावधीत स्वातंत्र्यासाठी वेळोवेळी घडलेल्या कारावासात प्रदीर्घ वाचन केले होते. कारागृहात असताना त्यांनी जे चौफेर वाचन केले त्या ग्रंथांची यादी उपलब्ध आहे. तात्त्विक राजकारण, सार्वभौमत्वाचे तत्त्वज्ञान, विविध राष्ट्रांचे इतिहास, विविध ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे–आत्मचरित्रे, कामगार चळवळ, कार्ल मार्क्सचे ग्रंथ, प्रखर राष्ट्रवाद, रशियन क्रांती, मानवतावाद याविषयीचे ग्रंथ यांचा समावेश होतो. परंतु, याखेरीज भारताचा दारिद्र्याचा प्रश्न, अन्नविषयक धोरण, आरोग्य व शेतीचा प्रश्न याविषयीचे सखोल वाचन देखील यशवंतरावांनी केले होते.

जागतिक मंदीचा तो काळ होता. त्यासंदर्भात त्यांनी दि ग्रेट डिप्रेशन या एल. रॉबिन्सच्या ग्रंथातील विचारांचा अभ्यास केला. त्याचबरोबर इरिगेशन इन इंडिया, ॲग्रिकल्चर स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया अशा ग्रंथांचा व अहवालांचा देखील अभ्यास केला. इकॉनॉमिक प्रॉब्लेम्स ऑफ मॉडर्न इंडिया या ग्रंथाचं संपादन त्या काळात डॉ. राधाकमल मुखर्जी यांनी केलं होतं. यशवंतरावांनी या विषयाचंही वाचन केलं.

ही बाब तरुण पिढीच्या दृष्टीने महत्त्वाची होती. एखादा प्रश्न समजावून घेताना त्याविषयीची सखोल



माहिती वाचनातून मिळवावी लागते हा संदेश फार महत्त्वाचा आहे. देशापुढील अनेक आर्थिक प्रश्नांविषयी सोडवणुकीची भूमिका घेताना, यशवंतरावजींना ही वैचारिक बैठक उपयुक्त ठरत होती. यामुळेच यशवंतरावांचा अर्थविषयक मूलभूत दृष्टिकोन हा सर्वांगीण होता. आर्थिक विकासामध्ये सामाजिक प्रेरणा असतात व त्यामध्ये राजकीय प्रश्नही अंतर्भूत असतात. त्यामुळेच आर्थिक विकास म्हणजे केवळ आर्थिक विकासाच्या तंत्रज्ञानाचा अभ्यास नव्हे, तर अधिक व्यापक भूमिकेतून त्याचा विचार झाला पाहिजे, असा यशवंतरावांचा आग्रह असे.

विकासाभिमुख प्रशासनाची महाराष्ट्राला गरज असून, त्यासाठी आर्थिक व्यवस्थापन जाणणारे मनुष्यबळ आवश्यक आहे हे यशवंतरावांनी जाणले होते. म्हणूनच स.गो. बर्वेसारख्या अर्थतज्ज्ञांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन, प्रगतीशील महाराष्ट्राचा आर्थिक पाया घातला.

स.गो. बर्वे हे अर्थतज्ज्ञ म्हणून परिचित आहेत. तत्कालीन कच्छ ते कराची हे कार्यक्षेत्र असणाऱ्या मुंबई विद्यापीठाचे ऑनर्समध्ये आलेले ते एक विद्यार्थी. त्या काळात फक्त चारच विद्यार्थी ऑनर्समध्ये आले होते. त्यामध्ये श्री. स.गो. बर्वे हे एक. माझे वडीलही त्या चार विद्यार्थ्यांपैकी एक असल्यामुळे, स.गो. बर्वे यांच्याबद्दल मला माहिती होती. यशवंतरावजींनी त्यांना प्रथम अर्थमंत्री व नंतर उद्योगमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समाविष्ट करून, महाराष्ट्राच्या आर्थिक–औद्योगिक व्यवस्थापनाची घडी घातली व अशा तज्ज्ञ व्यक्तींना निर्णयाचे पुरेसे स्वातंत्र्य दिले. आर्थिक निर्णयामध्ये, त्यातील जाणकारांना पुरेसे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. ही बाब यशवंतरावजींनी आपल्या कृतींमधून दाखवून दिली. पुढे भारताचे अर्थमंत्री झाल्यानंतर देखील यशवंतरावांनी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना जे स्थान दिले त्यामुळे निर्णय प्रक्रियेत अधिक व्यावसायिकता आली व विकासाभिमुख प्रशासनाच्या दृष्टीने ही गोष्ट निश्चितपणे महत्त्वाची ठरली.

यशवंतरावजींनी महाराष्ट्राच्या कृषी–औद्योगिक धोरणाचा फक्त पायाच घातला नाही, तर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या संस्थांचे जाळे निर्माण केले. गुणग्राहकवृत्तीने प्रत्येक क्षेत्रातील 'उत्तम' माणसे हेरली. गुणी माणसांचे, कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण केले. त्यामुळेच महाराष्ट्र राज्याची ओळख एक प्रगतीशील राज्य म्हणून निर्माण झाली आहे. आधुनिक व्यवस्थापनामधील 'योग्य कामासाठी योग्य व्यक्तींची निवड' हे सूत्र यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थापनाकरिता वापरले. आधुनिक काळात Good Governance हा परवलीचा शब्द झाला आहे. परंतु, भविष्यकाळाचा वेध घेणाऱ्या यशवंतरावांनी त्याचा पाया महाराष्ट्रात एकोणीशे साठ ते सत्तरच्या दशकातच घालून ठेवला होता. हे कृततापूर्वक लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात घेतलेल्या पुरोगामी निर्णयांचा स्वीकार कालांतराने देशपातळीवर करण्यात आला व महाराष्ट्राच्या विकासाचे प्रारूप (Model) देशपातळीवर अप्रत्यक्षपणे स्वीकारले गेले. यामध्ये यशवंतरावांचा द्रष्टेपणा लक्षात येतो.

**संपर्क : ९८६७४१९४७७**



# यशवंतराव आणि विदर्भ

प्रा. नवनीत देशमुख

सह्याद्रीची उंची आणि सखोलता जशी आहे तशीच माणसे सह्याद्रीने आपल्या कुशीत जन्माला घातली. छत्रपती शिवरायांनी ह्याच सह्याद्रीच्या कुशीत जन्म घेऊन स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि अटकेपार झेंडा रोवला. त्यानंतरही त्याच उंचीची आणि खोलीची माणसे सह्याद्रीने जन्माला घातली. त्यापैकी एक नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण.

यशवंतरावांचं शालेय शिक्षण सुरू असताना देशात स्वातंत्र्य चळवळींची धग पेटू लागली होती. सह्याद्रीचा छावा मग चूप कसा बसणार? देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपण काहीतरी केलेच पाहिजे. मित्रमंडळीही सगळी याच विचारांची. लोकांमधे जागृती निर्माण करायची. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात पत्रकं वाटायची. जमेल तसं रात्री-अपरात्री चळवळीतल्या कार्यकर्त्यांना मदत करायची. इकडे यशवंतरावांचं दहावीचं वर्ष. मन मात्र क्रांतिकारकाचं तयार होत होतं. शिक्षणाशिवाय आपल्याला तरणोपाय नाही हे समजत असूनही देशभक्ती, देशप्रेम स्वस्थ बसू देत नव्हतं. कायदेभंगासंबंधी लिहिलेली पत्रके, गांधीजींच्या अटकेबद्दल निषेध करणारी पत्रके आणि झेंडावंदनाच्या कार्यक्रमाचे आरोप ठेवून ब्रिटिशांनी यशवंतरावांना कैदेत डांबलं. या वेळी यशवंतरावांचं वय होतं फक्त १६ वर्षे.

आज सोळा वर्षांच्या मुलाला स्वातंत्र्य म्हणजे काय सांगता येणार नाही. देशभक्ती म्हणजे काय सांगता येणार नाही. १६ वर्षांच्या यशवंतरावांना १८ महिन्यांची कैद. ही साधी गोष्ट नव्हे. हे १८ महिने कैदेत राहून त्यांनी क्षण अन् क्षण स्वत:च्या बौद्धिक आणि मानसिक संपन्नतेसाठी खर्च केला. वाढत्या वयाबारोबर बौद्धिक प्रश्नही गुंतागुंतीचे होत जातात. त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी त्यांनी कैदेत असताना अफाट वाचन केलं. कालिदास, शेक्सपियर, गांधी, मार्क्स, लेनीन यांची मिळतील तेवढी पुस्तके अधाशासारखी वाचून काढली. कालिदासाच्या 'शाकुंतल'चं सामूहिक वाचन कैदेत व्हायचं. बरट्रंड रसेलचं 'रोडब्स टू फ्रिडम', रशियन राज्यक्रांतीचं 'टेन डेज, दॅट शुक द वर्ल्ड' हे जॉन रिडचं पुस्तक या पुस्तकांनी यशवंतरावांना अत्यंत प्रभावीत केलं. १८ महिन्यांच्या कैदेतून बाहेर पडल्यावर एक संपन्न बुद्धिवंत, समाजकारणी यशवंतराव लोकांना दिसले.

वाचनाचे संस्कार फार मोठे संस्कार असतात. विचारा - आचारात प्रगल्भता आणणारे असतात. कराडसारख्या गावातून निघालेले यशवंतराव थेट दिल्लीत पोहोचतात, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विश्वासातले बनतात. यशवंतरावांची ही वाटचाल थक्क करणारी आहे.

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. भारताचे संरक्षणमंत्री, उपपंतप्रधान म्हणूनही राहिले. स्वत: ग्रामीण क्षेत्रामधून आले असल्यामुळे ग्रामीण भागातल्या अडीअडचणी, शेतकऱ्यांच्या समस्या त्यांना माहीत होत्या.त्यांच्या हाती जेव्हा सत्ता आली तेव्हा पहिल्यांदा त्यांचे लक्ष ग्रामीण भागाकडे गेले. विशेषत: जो महाराष्ट्राचा अविकसित भाग आहे, त्याच्यासाठी अधिक भाग भांडवल त्यांनी योजले होते. विदर्भ आणि मराठवाडा हा अविकसित भाग त्यांनी कधी दुर्लक्षित केला नाही. 'मी पाहिलेले यशवंतराव' या ग्रंथात पृ.२९५ वर भु.आ. कुलकर्णी लिहितात..

"१९६०-६१ साली महाराष्ट्र राज्याची पहिली पंचवार्षिक योजना तयार केली. तीत महाराष्ट्रातील मागास विभागाबाबत साहेबांची जी मते होती ती स्पष्ट झाली आहेत. तुलनेने अविकसित अशा विदर्भ व मराठवाडा या विभागांसाठी जादा भांडवली तरतुदी करून त्यांच्या विकासातील अनुशेष दूर करण्याचे तत्त्व प्रथमच या पंचवार्षिक योजनेच्या दस्तऐवजात मांडले गेले आहे. साहेब दिल्लीस गेल्यावर या धोरणाचा पाठपुरावा नीटसा झाला नाही व उलट त्या धोरणाशी किंवा त्यांच्या मुळाशी असलेल्या नागपूर कराराशी बांधिलकी नसल्यासारखाच कारभार होत राहिला. साहेबांचे मुख्यमंत्रीपद नव्या महाराष्ट्राला १९६२ नंतर आणखी १० वर्षे लाभले असते तर विकासात असमतोल कधीही आला नसता."

याचा अर्थ विदर्भाच्या आणि मराठवाड्याच्या लोकप्रतिनिधींनी विकासाच्या प्रक्रियेमधे लक्ष घातले नाही. यशवंतरावांनी समाजसेवेसाठी राजकारण केले. त्यांची सचोटी, प्रामाणिकपणा, आस्था, एकनिष्ठता या गुणांमुळे राजकारणात त्यांना पदे मिळत गेली. विदर्भातील ग्रामीण भागातील अनेक नेत्यांच्या मागे ते उभे राहिले. विदर्भातील असंख्य नेत्यांनाही त्यांनी उजेडात आणले, त्यापैकी मा.सो. कन्नमवार, आबासाहेब खेडकर, मधुसूदन वैराळे, प्रा. राम मेघे, खा. बापूरावजी देशमुख, पी.के. देशमुख (अमरावती) यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. प्रा. राम मेघे यशवंतरावांबद्दल लिहितात..

"प्रबोधन आणि परिवर्तनाचा विचार करताना यशवंतरावांनी राज्याच्या अविकसित आणि उपेक्षित भागांना नेहमीच झुकते माप दिले. विदर्भातील जल, वन आणि खनिज संपत्तीचा उपयोग करून विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न त्यांनी केला."

विदर्भातील पारस वीज केंद्राची स्थापना, विदर्भातील औद्योगिक वसाहती यशवंतरावांच्या पुढाकारानेच निर्माण झाल्या आहेत. विदर्भातील ज्या नेत्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले त्यांनी बहुमोल कामगिरी विदर्भात केली आहे. वर्ध्याचे खा. बापूरावजी देशमुख आणि यशवंतरावांचे स्नेहबंध अत्यंत भावनिक होते. देशमुख यांनी तर काढलेल्या शिक्षण संस्थेला यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था हेच नाव दिलं. योगायोग असा की सह्याद्रीचे हे दोन छावे एक शिवाजी भोसले आणि दुसरे यशवंतराव चव्हाण! विदर्भामध्ये शिक्षण क्षेत्रात अवतरले आहे. अमरावतीची शिवाजी शिक्षण संस्था आणि वर्ध्याची यशवंतराव ग्रामीण शिक्षण संस्था. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शाळा-कॉलेजेस जिल्ह्यात बहुतांशी सर्व गावांतून आहेत.

विदर्भात स्वतंत्र कृषी विद्यापीठासाठी आंदोलन सुरू होते. अमरावतीत तरुण शेतकऱ्यांची मुलं पोलिसांच्या गोळ्यांना मृत्युमुखी पडली होती. या संदर्भात खा. टी.जी. देशमुख यांनी यशवंतरावांशी केलेला संवाद फार अर्थपूर्ण आणि यशवंतरावांची विदर्भाच्या संदर्भातील औदार्याची भूमिका स्पष्ट करणारा आहे.

"विदर्भाचे राज्यच आम्ही मागत होतो ते उगीच नाही. आज दहा खासदार.... आम्ही एकत्र येऊन कृषी विद्यापीठ विदर्भात झाले पाहिजे, असे निवेदन देणार आहोत. आम्हाला ठाऊक आहे तुम्ही काहीएक शब्द बोलणार नाही!

"टी.जी. रागात असले म्हणजे तुमच्या वाणीला बहर येतो. पण, इतरांना बोलण्याची संधी द्याल की



नाही?'' यशवंतराव.

''तुम्ही हेच म्हणणार ना की, काँग्रेसची शिस्त पाळली पाहिजे अन् महाराष्ट्राची महान परंपरा जपली पाहिजे,'' टी.जी. म्हणाले.

''टी.जी. जरा दम खा. माझं उत्तर तुम्ही देऊ नका. विदर्भात कृषी विद्यापीठ झाले पाहिजे असे निवेदन तुम्ही काढणार आहात ना, मग त्याच्या शेवटी लिहा, यशवंतराव चव्हाणांचा आम्हाला पाठिंबा आहे.''

निवेदनाच्या शेवटी टी.जीं.नी ओळ टाकली. आमच्या या मागणीस अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांचा आशीर्वाद आहे. विदर्भ विकासासाठी यशवंतरावांचा हातभार लागला आहे. आणखी काही काळ त्यांच्या जवळ महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद असतं तर कदाचित विदर्भाचा चेहरामोहरा बदलला असता. पण, दिल्लीचं बोलावणं असल्यामुळे मुख्यमंत्रीपद सोडून त्यांना दिल्लीला जावं लागलं.

एक साहित्यिक, लोकसंग्राहक धीरगंभीर वृत्ती असलेले यशवंतराव आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. ज्यांना ज्यांना राजकारणात पडायचं आहे, ज्यांना ज्यांना नेतृत्व करायचं आहे अशा लोकांनी तर यशवंतरावाचं 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र वाचलंच पाहिजे. एक आदर्श संस्कार संपन्न पिढी जर घडवायची आहे तर प्रत्येक विद्यार्थ्याने 'कृष्णाकाठ' एकदा वाचलंच पाहिजे.

**संपर्क : ८६००६७६५५६**



## सर्वांची जबाबदारी

तीन वर्षांपूर्वी सर्व मराठी प्रदेश एकत्र आल्यानंतर आपण परस्परांच्या कितीतरी जवळ आलो आहोत. मुंबईचा माणूस आता नागपूर-नांदेडचा विचार करू शकतो, तर अमरावती-अकोल्याच्या माणसाला सांगली-कोल्हापूर हे आपल्यापैकीच आहे असे वाटू लागले आहे. वाहतुकीची साधने वेगाची झाली की अंतर कमी होते हे जसे सत्य आहे, त्याचप्रमाणे ममत्वाच्या भावनेने अंतर कमी होते हा अनुभव गेल्या तीन वर्षांपासून आपल्याला अधिकाधिक येत आहे. बराच काळ दूर राहिल्यामुळे सुरुवातीला थोडेसे संशयाचे वातावरण, थोडीशी दूरपणाची भावना राहणे हे मानवी स्वभावाला धरूनच आहे. पण, समजूतदारपणाने व जाणीवपूर्वक हा संशयाचा आडपडदा दूर सारला पाहिजे. महाराष्ट्र आज एकसंध होत आहे त्याचे फार मोठे श्रेय विदर्भ व मराठवाड्यातील नेते व विचारवंत यांनी या दिशेने केलेल्या प्रयत्नास आहे यात मुळीच शंका नाही. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर एकीकरणाचे हे कार्य संपले अशी चूक कोणी करू नये.एक महत्त्वाचा टप्पा आपण गाठला; पण, आपल्याला अजूनही पुढे वाटचाल करावयाची आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांना एकरूप करण्याची जबाबदारी केवळ शासनाने पार पाडावयाची आहे अशी अपेक्षा सर्वस्वी चुकीची ठरेल. साहित्य संस्था, शिक्षण संस्था, सांस्कृतिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था यांना शासनापेक्षाही हे कार्य अधिक भरीवपणे करता येईल असे माझे मत आहे.

(विविधतेतील एकता-आकाशवाणीवरील भाषणातून)



# स्मरणशक्तीला सलाम

**यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रचंड सभेतील एक श्रोता, ते त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारणारा एक निकटवर्ती असा प्रवास करणारे नाशिकचे वनाधिपती विनायकराव पाटील. विनायकराव पाटील म्हणजे चव्हाण साहेबांचे मन मोकळं करण्याची एक हक्काची व्यक्ती. जे जे मनात येईल अगदी वैयक्तिक आयुष्यातील मनाच्या कप्प्यात दडवून ठेवावे असे अनुभव असो वा साहित्य, कला, समाजकारण, राजकारणापासून ते व्यक्तींच्या स्वभावांमुळे येणारे कटू अनुभव या सगळ्यांचा त्यांत समावेश असे. केवळ मन मोकळं करण्यासाठीही साहेबांनी अनेकदा विनायकरावांना पत्र लिहिली आहेत. याची साक्ष खाजगी पत्रे देतात. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने एक श्रोता ते निकटवर्ती या प्रवासादरम्यानचे काही अगदी दुर्मीळ पण खाजगी खास अनुभव 'लोकराज्य'च्या वाचकांसाठी.**

विनायकदादा पाटील

यशवंतराव चव्हाण साहेबांची भाषणे ते मुख्यमंत्री झाल्यापासून मी ऐकत आलो आहे. साहेब हे शब्दांचे जादूगार होते. त्यांची भाषणे मी आवाजांच्या चढ-उतारासह व लकबींसह तल्लीनतेने ऐकत असे. ज्या-ज्यावेळी मित्रमंडळी जमत त्या-त्यावेळी मी त्यांच्या हावभावांची नक्कल करून दाखवी. यामुळे कार्यकर्ते मित्रही खूश अन् मलाही प्रसिद्धी मिळे. मनात अनेक वेळा येत असे या शब्दसम्राटाबरोबर आपली व्यक्तिगत ओळख झाली तर काय मजा येईल. हा शब्दांचा जादूगार खाजगी मैफलीत कसा बोलत असेल, असे औत्सुक्य व त्या मैफलीत आपल्याला प्रवेश मिळावा अशी इच्छा मी अनेक वर्षे बाळगून होतो. हळूहळू जाणे वाढू लागले. बरोबर अनेक लोक असत, त्यामुळे साचेबद्ध बोलणे होई. मनातील ही सुप्त इच्छा मात्र शांत बसू देत नव्हती.

चांगली गोष्ट घडण्यासाठी नेहमी वेळ लागतो; पण, ती अतिशय थेट असते यावर माझा विश्वास होता. त्यामुळे माझी ही इच्छा पूर्ण होणार याची खात्री होती. अन् एक दिवस ही संधी आयतीच चालून आली. दिल्लीतील माझी कामे आटोपून परत निघण्यापूर्वी साहेबांना भेटण्यासाठी गेलो. दोन मिनिटे भेटण्यासाठी वेळ मिळाला होता. मी बैठकीच्या खोलीत उभा राहिलो. बोलायची संधी मिळाली होती पण काय बोलावे हे सुचेना. बसा विनायकराव या त्यांच्या वाक्याने बसलो. नेहमीप्रमाणे जिल्ह्यात कोणाचे काय सुरू आहे याबाबत विचारणा होईल अन् पाचव्या मिनिटात आपली रवानगी होईल असा विचार मनात सुरू होताच; पण, त्याचवेळी साहेब काय प्रश्न विचारताहेत याची वाट पाहत होतो. साहेबांनी थेट विचारले, ''हं काय, त्या अमुक माणसाची तुम्ही चांगली नक्कल करता हे ऐकलंय मी?'' या प्रश्नाने माझी मात्र भंबेरी उडाली. कारण, मी त्यावेळच्या एका महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याच्या भाषणातील चुका व त्यात माझी भर टाकून नक्कल करीत असे. माझे हे प्रयोग स्थळकाळाचे बंधन झुगारून मुक्तपणे चालले होते. माझ्या या प्रयोगांबाबत शरद पवारांनी त्यांना माहिती दिली हे कळायला वेळ लागला नाही; कारण, सर्वांत जास्त या प्रयोगांचे ते साक्षीदार होते. आता जरा जपून बोलण्याचा सल्ला मिळणार याची वाट पाहत असतानाच साहेबांनी, ''बघू या तुमचे प्रयोग!'' म्हणून अनपेक्षित धक्का दिला. प्रथम या धक्क्यातून सावरलो अन् घाम पुसला. सगळा उत्साह परत आणला.. उभा राहिलो. प्रयोगास सुरुवात केली. पहिल्या दोन-तीन वाक्यांतच साहेब खळाळून हसले. टोपी बाजूला काढून लक्षपूर्वक ऐकू लागले अन् अगदी मुक्तपणाने हसत होते. हसता-हसता त्यांच्या डोळ्यांत अक्षरशः पाणी आले. वीस-पंचवीस मिनिटे कशी गेली ते कळलेच नाही. अशा प्रकारे माझी इच्छा पूर्ण झाली होती. पहिल्याच बैठकीत औपचारिकतेची बंधने गळून पडली होती. मी खूप आनंदी होतोच शिवाय दिल्लीत आलात की भेटत जा हे आमंत्रण होतेच. मीही जेव्हा संधी मिळेल तेव्हा भेटत होतो. मनमोकळेपणाने संवाद साधत होतो. अगदी शेरोशायरी, गझलांची देवाण-घेवाण, प्रवासातील अनुभव, व्यक्तिचित्रे व किस्से एकमेकांना सांगत होतो. त्यांची विलक्षण स्मरणशक्ती, शब्दांचे वेड व संभाषणचातुर्य प्रत्येक भेटीत जाणवत होते.

यशवंतराव चव्हाण साहेब हे अतिशय रसिक मनोवृत्तीचे होते. नवीन चांगले पुस्तक असो वा चांगला चित्रपट ते आवर्जून पाहत असत. देशाचे संरक्षणमंत्री असणारा माणूस चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणे हे अतिशय दुर्मीळ. सुरक्षा आणि लोक यांमुळे अनेकदा इच्छा असूनही ते शक्य नसते. पण, एकदा मी आणि चव्हाण साहेब माधवराव आपटे यांच्याकडे गेलो होतो, तेव्हा माधवरावांनी रिगल चित्रपटगृहात सुरू असलेल्या एका इंग्रजी चित्रपटाचा उल्लेख केला आणि तो साहेबांनी आवर्जून पाहावा असेही सुचविले. मुळातच रसिक असलेले साहेब ही संधी कशी दवडणार. त्या दिवशी ते जरा निवांतही होते. त्यांनी कुणालाही न सांगता आमच्या दोघांसाठी तिकीट मागविले तीन ते सहाच्या खेळाचे. मला पावणेतीनला सांगितले, विनायकराव आपण एका खास मोहिमेवर जातो आहोत. सुरक्षा अधिकारी वा अन्य कुणालाही न सांगता चित्रपट सुरू झाल्यानंतर अंधारात आम्ही चित्रपटगृहात जाऊन बसलो. आपल्याला कुणीही ओळखू नये यासाठी साहेब टोपी काढून बसले होते. आम्ही दोघांनी त्या चित्रपटाचा आनंद घेतला. चित्रपट संपल्यावर लोकांच्या लक्षात आले की साहेब आहेत, मग लोकांची गर्दी झाली. पण, चांगल्या कलाकृतीचा आस्वाद घेतलाच पाहिजे मग त्यासाठी ते आवर्जून वेळ राखून ठेवायचे. हा साहेबांचा मूळ स्वभाव होता.

ते कलावंतांना आणि साहित्यिकांना नेहमी प्रोत्साहन देत. मला १ जानेवारी १९७७ चा तो दिवस आजही आठवतो. साहेब संरक्षणमंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठी तरुणांनी सैन्यात जावे, असे आवाहन केले होते. त्यासाठी आम्ही गावोगावी जाऊन मेळावे घेतले होते अन् तरुणांना आवाहन केले होते. त्यानुसार नांदुर्डी गावचा कुंभार्डे नावाचा तरुण सैन्यात दाखल झाला होता. चीन युद्धात तो कामी



आला. त्याच्या स्मरणार्थ त्या गावाच्या लोकांनी वाचनालय सुरू केले. हा अतिशय छोटा कार्यक्रम होता तरीही साहेब या वाचनालयाच्या उद्‌घाटनासाठी आले होते. त्यांच्या जेवणाचा कार्यक्रम आमच्या घरी होता. जेवण आणि कार्यक्रम यांमध्ये बराच वेळ होता. तेव्हा ना.धों. महानोरही तेथे उपस्थित होते. मधल्या वेळात काय करायचे हा विचार माझ्या मनात सुरू होता. साहेबांनी आराम करावा असे मी सुचविणार होतो तेवढ्यात साहेबांनी महानोरांना ''नामदेवराव, तुमच्या कविता ऐकवा!'' अशी फर्माइश केली. मग, आमच्या हॉलचे रूपांतर काव्य संमेलनात झाले. त्यांच्या कवितांना साहेब अतिशय उत्स्फूर्तपणे दाद देत होते. साहेब कलावंतांचा नेहमी सन्मान करीत असत. हे करणे केवळ साहेबांनाच शक्य होते; कारण, त्यांच्या वागण्यात कृत्रिमता नव्हती. सर्व कसे साधे सरळ होते. त्यांना माणसे मनापासून आवडत व ही माणसे करीत असलेल्या कामावर त्यांची नितांत श्रद्धा होती.

ते चांगल्या साहित्यकृतींना केवळ दादच देत नसत, तर त्या लेखनामागे काय कारण असेल याची कारणमीमांसा करीत. उपराकार लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या पुस्तकात एक वाक्य आहे, 'ही सगळी अवस्था पाहिल्यानंतर वाटतं की जाऊन पार्लमेंटवर बॉम्ब टाकावा.' तेव्हा साहेब म्हणाले, माझ्या गावच्या एका मुलाला मी ज्या पार्लमेंटचा सदस्य आहे त्या पार्लमेंटवर समाजव्यवस्थेमुळे बॉम्ब टाकावासा वाटतो तेव्हा या मुलांच्या भावना समजावून घेतल्या पाहिजेत. अन् त्यानुसार समाजव्यवस्थेत बदल केले पाहिजे असे मला वाटते. ते गप्पा मारताना अनेकदा असे पुस्तकांचे दाखले देत आणि त्यासाठी काय करायला हवे याचीही चर्चा करीत असत. त्यांच्या खूप कविता तोंडपाठ होत्या. एकदा आमच्या गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. बालपण आणि शालेय जीवनातील आठवणी सांगत असताना साहेबांनी झुक झुक झुक झुक आगीनगाडी, धुरांच्या रेषा हवेत सोडी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जावू या.. हे गाणं गाता गाता साहेब एकदम मामा माझा तालेवार, रेशीम घेईल हजारवार.. या ओळीवर येऊन थांबले. मी विचारले काय झाले ते म्हणाले, ''विनायकराव, हे गाणं माझं गाणं आहे.'' या गाण्याचं व्यक्तिगत आयुष्यात खूप महत्त्व आहे. लहानपणी बिकट आर्थिक परिस्थितीमुळे मामाच्या गावाला राहावे लागले होते. मग, मामांनी केलेली मदत आणि बालपणीच्या आठवणींना साहेबांनी उजाळा दिला होता.

साहेबांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख आहे याची प्रचिती मला एका प्रसंगाने आली. ते मुंबईला आले आहेत असे समजल्याने मी भेटण्यास गेलो. ते बाहेर पडण्याच्या विचारात होते. मी नमस्कार करून बाजूला उभा राहिलो. त्यांनी चला म्हटल्यावर गाडीत बसलो. नंतर समजले की पुणे जिल्ह्यात तळेगाव येथे कार्यक्रमास निघाले होते. हक्काचे तीन तास गप्पांसाठी मिळाले. प्रवासात अमीर खुसरो यांची कविता तर काही शेर सांगितले. तळेगावला पोहोचल्यावर सभा सुरू झाली. भाषणात एक संदर्भ देताना त्यांनी अमीर खुसरोंच्या काव्यपंक्ती जशाच्या तशा म्हणून दाखविल्या. एकदा सहज ऐकल्यानंतर या काव्यपंक्ती लक्षात ठेवणाऱ्या त्यांच्या स्मरणशक्तीला मी मनातल्या मनात सलाम केला.

साहेबांचे व माझे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. मी त्यांच्या नातवासारखा असल्याने त्यांना काहीही विचारण्याचे मला स्वातंत्र्य होते. जे प्रश्न पत्रकार विचारू शकत नाहीत ते प्रश्न मी त्यांना विचारण्याचे ठरविले. त्यानुसार मी बत्तीस प्रश्न विचारायचे ठरविले. बत्तीस प्रश्न विचारण्यामागे मूळ प्रेरणा होती सिंहासन बत्तीशीची. साहेबांनीही त्याला परवानगी दिली होती. वेगवेगळ्या निमित्ताने हे प्रश्न विचारण्याचे ठरविले. असेच एकदा आम्ही त्यांच्या दिल्लीतील घरी गप्पा मारत बसलो होतो. तेवढ्यात त्यांचे स्वीय सहायक डोंगरे यांनी साहेबांना सांगितले, ''कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. देवराज यांचे निधन झाले.'' तेव्हा साहेब पटकन उत्तरले, ''अरेरे, वाईट झाले.' अन् मूळ विषयाकडे वळले. तेव्हा मी त्यांना मृत्यूविषयी त्यांना काय वाटते असे विचारले. त्यांनी ते जीवनाचे वास्तव आहे, असे सांगितले. मृत्यूशी माझी पहिल्यांदा ओळख माझ्या वडिलांच्या मृत्यूने झाली. तेव्हा त्याची दाहकता जाणवत होती; पण, वाढत्या वयाबरोबर याबाबतचा दृष्टिकोन त्रयस्थ होत गेला. पण, काही मृत्यू जिवाला चटका लावणारे असतात. माझा सहकारी किसन वीर याचा मृत्यू असाच मला चटका लावणारा होता. तेव्हा खूप काही गमावल्याची जाणीव झाली अन् मी ओक्साबोक्शी रडलो. ही अगदी वैयक्तिक बाबही साहेबांनी मला सांगितली होती. असेच एकदा मी त्यांना वेणुताई आणि साहेबांच्या नातेसंबंधाविषयी छेडले. तेव्हा एक made for each other अशी स्लोगन असलेली जाहिरात होती. मी त्यांना तुम्ही made for each other वाटतात असे म्हटले तेव्हा साहेबांनी त्याला दुजोरा दिला आणि एक अनुभवही सांगितला. मी गृहमंत्री असताना संसदेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होता. तेव्हाच बातमी आली की कऱ्हाडमध्ये जातीय दंगल उसळली होती. तो तास संपवून घरी आलो अन् वेणूताईंना विचारले, बातमी ऐकली का? त्यावर त्या उत्तरल्या, 'हो बातमी ऐकली आणि तुमची बॅग भरून तयार आहे.' अशा प्रकारे आम्हाला एकमेकांना काय हवे आहे याची चांगली जाणीव आहे. अनेकदा काहीही न बोलता मनातले भाव आम्ही ओळखतो. विनायकराव तुमच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही खरोखरच made for each other आहोत.

या प्रश्नांना साहेबांकडून मिळणारा प्रतिसाद माझा उत्साह वाढविणारा होता. तेव्हा अशाच एका गप्पांमध्ये मी त्यांना भाषेविषयी विचारले. तुमचे काही सातारी आघात सोडले तर भाषा पुणेरी आहे पण बाकी सर्वांची भाषा टिपीकल सातारी आहे याचे कारण काय, असं विचारलं; यावर त्यांनी केवळ एकाच शब्दात उत्तर दिले. ते म्हणाले, 'मातृभाषा.'

साहेब एकदम स्पष्टवक्ते पण मनमिळावू होते. ते समोरच्या माणसाचा अहंकार न दुखवता एखादी गोष्ट अतिशय समर्पक शब्दांत समजावून सांगत. बोलताना व ऐकताना त्यांचा चेहरा अतिशय बोलका असे. आपण उच्चारलेल्या प्रत्येक वाक्यागणिक त्यांच्या चेहऱ्यावर सहमत असल्याच्या, नसल्याच्या रागाच्या, आनंदाच्या, मिश्कीलपणाच्या प्रतिक्रिया व्यक्त होत असत. असेच एकदा मी माझ्या भाषणात ब्रह्मपुत्रा नदी असा उल्लेख केला त्या भाषणानंतर मला माझा तो उल्लेख कसा चुकला आहे हे त्यांनी समजावून सांगितले. ब्रह्मपुत्रा ऐवजी ब्रह्मपुत्र असा उल्लेख असून, तो नदी नद आहे हे सांगितले. त्यांनी माझी ही चूक सुधारलीच; पण, मला अगदी सविस्तर माहिती दिली. साहेब असे नेहमीच मला मार्गदर्शन करीत त्यामुळे माझ्यातील उत्तम वक्ता घडत गेला. साहेबांची माया आणि मार्गदर्शन नेहमीच मला लाभले हे मी माझे भाग्यच मानतो.

**विनायकदादा पाटील :९८२२०५९५४०**

**शब्दांकन : मनीषा पिंगळे ९४२३२२८८६२**



# सह्याद्रीची सावली

साधारणत: प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या, पदासीन वा नवीनच पदग्रहण करीत असलेल्या व्यक्तींचा सत्कार, वाढदिवस किंवा त्यांच्या कार्याचे कौतुक करणाऱ्या समारंभात एखाद-दोन वक्त्यांच्या तोंडून काही ठरावीक प्रकारची वाक्ये हमखास ऐकण्यास मिळतात जसे... ची ओळख करून देणे म्हणजे सूर्याला टिमकी दाखविण्यासारखे आहे. प्रत्येक पुरुषाच्या यशामागे एक स्त्री असते, वा ...च्या कीर्तीत त्याच्या पत्नीचा मोठा वाटा आहे. बऱ्याच वेळा ही अतिशयोक्ती असल्याची जाणीव श्रोत्यांना पण असते. पण, काही जणांच्या बाबतीत हे सत्य मान्य करावे लागते. दक्षिण भारतात, विशेषत: महाराष्ट्रात अशी उदाहरणे बरीच पाहण्यास मिळतात. महाराष्ट्र संतांची, शूरांची, देशभक्तांची भूमी आहे तशीच ती पतीसाठी त्याग, कष्ट करणाऱ्या स्त्रियांची पण आहे. स्व. श्री. यशवंतराव चव्हाणांच्या यशस्वी जीवनाची वाटचाल पाहताना प्रामुख्याने आठवण होते ती त्यांच्या पत्नी स्व. सौ. वेणूताईंची. ही जोडी जणूकाही 'एक दुजे के लिए' अशीच होती. मंत्र्यांना संसारात गुरफटून न ठेवता जास्तीत जास्त वेळ त्यांना त्यांच्या जबाबदारीच्या, यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे हेच त्यांच्या पत्नीचे कर्तव्य असते. या कसोटीत वेणूताई यशस्वी झाल्या होत्या; कारण, क्लब, मंडळे, समारंभ वगैरे क्षेत्रापासून दूर राहून त्यांनी स्वत:ला अक्षरश: अर्पण केले ते यशवंतरावांना, त्यांच्या संसाराला, तेही फारसे शिक्षण नसताना.

वेणूताईंसाठी स्थळ शोधण्याची मोहीम सुरू झाली तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, मी विवाह करीन तर तो देशभक्ताशीच. सुदैवाने यशवंतराव चव्हाणांचे स्थळ चालून आले. शिक्षण कमी असले तरी चव्हाण कुटुंबाला हवी तशीच कुटुंबवत्सल वेणूताईंसारखी सून हवी होती. यशवंतरावांसारखा सुशिक्षित, गुणवान देशभक्त पती मिळाल्यामुळे वेणूताईंना जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. पण, असा संसार हा 'सुळावरची पोळी' असते, याची जाणीव अंगाची हळद निघण्यापूर्वीच आली. स्वातंत्र्य संग्रामाने जोर पकडला होता. यशवंतरावांचा तर यात सक्रिय सहभाग होता. त्यांच्याविरुद्ध वॉरंट असल्यामुळे त्यांना भूमिगत राहून काम करावे लागे. यशवंतरावांचा ठाव-ठिकाणा जाणून घेण्यासाठी पोलीस सतत वेणूताईंचा अमानुष छळ करू लागले. आपणास यात यश मिळेल याची त्यांना खात्री होती.

**राम खांडेकर**

वेणूताईंना हा अनुभव नवीन असला, तारुण्य असले तरी देशभक्ताचा संसार करण्याची जिद्द होती. त्यांनी सर्व हसत सहन केले. तोंडातून ब्र काढला नाही. सर्वांना हे जेव्हा कळले तेव्हा सर्व जण थक्कच झाले. बहुतेक स्वातंत्र्य सैनिक अधूनमधून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कुटुंबांच्या संपर्कात होते. यशवंतराव जर पकडले गेले असते तर इतिहास बदलण्याची शक्यता तर होतीच; पण, यशवंतरावांच्या भवितव्यापुढे प्रश्नचिन्ह असते. कारण, स्वातंत्र्य संग्रामात सातारा



जिल्हा फार पुढे होता. ब्रिटिशांना सर्वांत जास्त डोकेदुखी येथील होती. कारण, इथे पर्यायी सरकारची स्थापना होऊन ब्रिटिशांना आव्हान देण्यात आले होते. वेणूताई काहीच बोलत नाही, बोलण्याची शक्यता पण नाही, हे ऐकून यशवंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांची मोठी चिंता दूर होऊन नवीन उत्साह त्यांच्यात संचारला. पण, सर्वांनाच वेणूताईंच्या प्रकृतीची काळजी वाटू लागली. ते साहजिकच होते. वेणूताईंच्या त्यागावरच यशवंतरावांची यशोगाथा सुरू झाली, असे म्हणणे सयुक्तिक होईल. पण, याची किंमत वेणूताईंना आयुष्यभर मोजावी लागली. त्यांची प्रकृती म्हणावी तशी चांगली कधीच राहिली नाही.

स्वातंत्र्याची चाहूल लागली होती. बहुतेक स्वातंत्र्यसैनिक घरी परतू लागले होते. यशवंतरावही परत आले. वेणूताईंना पाहताच अत्यानंद होण्याऐवजी यशवंतरावांचा चेहरा चिंताग्रस्त झाला. नुकतेच लग्न करून आणलेली हीच नववधू का, अशी शंका येण्यासारखा त्यांचा चेहरा झाला होता. भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद सर्वांना होता; पण, यशवंतरावांसाठी पुढील काही काळ कौटुंबिकदृष्ट्या फारसा चांगला गेला नाही. वेणूताईंसाठी अग्निपरीक्षेचा काळ होता, त्यांच्या या परीक्षेतील यशावरच यशवंतरावांची भावी यशस्वी कारकीर्द अवलंबून होती. वेणूताईंना मिरजेच्या दवाखान्यात ठेवण्यात आले. कुटुंबाचे आजारपण-मृत्यू यामुळे कुटुंबात चिंता, शोकाचे वातावरण राहिले. यशवंतरावांवर सरकारी कामाची जबाबदारी पडल्यामुळे त्यांना मुंबईत सतत राहावे लागत होते. तरी ते टेलिफोन, पत्र व मित्राद्वारे वेणूताईंच्या संपर्कात राहिले. खर्चाची जुळणी, यशवंतरावांच्या कानावर न जाता कशी करावयाची हा यक्षप्रश्न समोर असे. मात्र, यशवंतरावांना कमीत कमी चिंता करावी लागावी, असे वेणूताईंना वाटे.

ईश्वरी इच्छा किंवा विधीलिखित कोणालाच कळले नाही. आपण नेहमी म्हणतो, जे होते ते चांगले होते ते चांगल्या करताच. सौ. वेणूताईंच्या बाबतीत याचा अनुभव आला. त्यांचे एक अपत्य गेले पण भविष्यात त्यांना अनेक मुलांची आई व्हावे लागले. कारण, वडील दिरांच्या निधनामुळे त्यांच्या मुलांची काळजी घेण्याची जबाबदारी यशवंतराव-वेणूताईंवर आली. प्रत्यक्ष आई करणार नाही इतक्या मायेने, जिव्हाळ्याने, काळजीने त्यांनी त्यांना वाढविले. त्यांचे शिक्षण केले, लग्न करून संसार थाटून दिले. यामुळे वेणूताईंना चव्हाण कुटुंबातच



नाही, तर सर्व नातेवाइकांत आदराचे, मानाचे स्थान मिळाले.

१९५६ साली यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळची महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती पक्षाच्या दृष्टीने चिंतनीय होती. शिवाय दोन राज्यांचा कारभार होता. अक्षरश: दिवसाचे २४ तास कमी पडत होते. पत्राची उत्तरे डिक्टेट करण्यासाठी वेळ नसल्यामुळे मलबार हिल ते सचिवालयापर्यंतच्या मोटार प्रवासाचा उपयोग करावा लागे, तेही सतत सात - आठ दिवस प्रयत्न केल्यानंतर.. त्यामुळे दिरांच्या मुलांचीच नाही, तर सर्व चव्हाण कुटुंबांची जबाबदारी आपोआप वेणूताईंवर आली. जसा 'आई' व 'अहो आई'मध्ये (आई व सासू) फरक असतो तसा जन्मदाती आई व आईची जबाबदारी पार पडणारी आई यांच्या वागणुकीत फरक पडला तर नवल नाही. आणि असे घडू नये याची काळजी व चिंता वेणूताईंना होती. माणसाचा स्वभाव असा की ९९ गोष्टी चांगल्या करा, पण एक गोष्ट चूक झाली, तर वेणूताईंच्या भावा - बहिणींची जबाबदारी त्यांना घ्यावी लागली. आणि दोन कुटुंबांतील माणसे (काही) एकत्र राहण्यास आल्यानंतर, तेही सासर माहेरची, काय महाभारत घडू शकते.. याची कल्पनाच केलेली बरी. वेणूताईंना अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागे. तरीपण या चिंतेतही वेणूताईंच्या चेहऱ्यावरचे हास्य कमी झाले नाही की तेज गेले नाही. दिवसभराचे संपवून यशवंतराव रात्री कुटुंबासोबत काही वेळ का होईना एकत्र येत त्यावेळी सुखी संसार पाहून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत असे.

यासोबतच वेणूताईंना एका परीक्षेस सामोरे जावे लागले आणि ती होती सासूबाईंची काळजी घेण्याचे. वार्धक्यामुळे त्या खूपच थकल्या होत्या. यशवंतरावांचे तर त्या कुलदैवत. वेणूताई दिवसभराच्या कामातही त्यांच्याकडे पूर्ण लक्ष देत होत्या, त्यांचे किती लक्ष असे याबाबत एक विनोदी गोष्ट त्या सांगत. डॉक्टर, आईची प्रकृती पाहण्यासाठी दिवसभरातून दोनदा येत. जाताना त्यांना सासूबाई म्हणत, ''बाबारे, तुला कोणी चहा विचारला नसेल. असे म्हणून त्या उशाखालील चार आणे त्यांना देत. डॉक्टरही हसत ते घेत व जवळ ठेवत. कोणी भेटण्यास आले की त्यांचा हाच उपक्रम होता. वेणूताई रात्री जाग आली की आठवणीने सासूबाईंच्या खोलीत जाऊन हळूच त्यांच्या उशाखाली पुन्हा काही चार आण्याची नाणी ठेवत. यशवंतरावांना हे जेव्हा कळले तेव्हा त्यांनाही हसू आले व वेणूताईंचे कौतुक वाटले. वेणूताईंच्या पाठिंब्यामुळेच आपल्या राजकीय कामाला यशवंतरावांनी अक्षरश: वाहून घेतले होते.

१९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले. वेणूताईंना विचारून हा निर्णय घेतल्याचे सर्वांना माहीतच आहे, यशवंतरावांच्या प्रतिष्ठेत मानाचा आणखी एक तुरा खोचला जात असल्याचा त्यांना आनंद होणे स्वाभाविकच होते. संरक्षण मंत्रिपद ही यशवंतरावांच्या कर्तृत्वाची पावती होती. दिल्लीत राहण्याला गेल्यावर यशवंतरावांच्या जबाबदारीत भर तर पडणारच होती; पण, वेणूताईंचीही त्यांच्या जबाबदारीतून सुटका होत नव्हती. ती वाढण्याचीच शक्यता जास्त होती. दिल्लीत गेल्यानंतर यशवंतरावांना उसंत अशी मिळालीच नाही. नवी विटी नवे राज्य अशी संरक्षण मंत्रालयाची अवस्था होती. सैनिकांमध्ये नवीन उत्साह निर्माण करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सतत सीमेवरील आर्मी बेसला (सैनिक तळ) भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौरे करावे लागत. वेणूताईंना एकटेपणा जास्त जाणवू लागला. यशवंतरावांसोबत मुंबईहून गेलेले तिघे सरकारी निवासस्थानी मिळेपर्यंत दोन - तीन महिने त्यांच्याच सोबत बंगल्यावर राहत होते. या वास्तव्यात वेणूताईंच्या अनेक गुणांची ओळख प्रत्यक्ष झाली. त्या केंद्रीय मंत्र्याची पत्नी आहेत, असे कधीच जाणवले नाही. आपलेपणा, जिव्हाळा, नि:स्वार्थीपणा, आदरातिथ्याची आवड या त्यांच्या स्वभावामुळे आमचे दिल्लीत कोणीच नाही, असे त्याचवेळी नाही, तर पुढेही त्या असेपर्यंत आम्हाला कधीच जाणवले नाही.

दिल्लीच्या वातावरणात हळूहळू त्या रमत गेल्या. अनुभव गोळा करीत गेल्या. त्यांच्या लक्षात आले की इथे आणखी एक मोठी जबाबदारी आपणास पार पाडावयाची आहे. ती म्हणजे येथील लोकांपासून यशवंतरावांचे 'संरक्षण'. दिल्लीतील बहुतेक लोकांची स्वार्थी प्रवृत्ती, चिंता करण्यासारखी संस्कृती, साखर पेरणी, मूंह में राम बगल में छुरी अशी वागणूक यापासून आपणा उभयतांना सावध राहण्याची गरज आहे, हे फारसे पुस्तकी ज्ञान नसलेल्या वेणूताईंच्या लक्षात आले. यशवंतरावांना त्या पदोपदी ''राजा सावध रहा, रात्र वैऱ्याची आहे'' याची आठवण करून देत. सतत कामाचा ताण, चिंता, थंड प्रदेशातील दौरे यामुळे नकळत यशवंतरावांना सिगरेटचे व्यसन लागले. ती पिण्यापेक्षा हातात तशीच जळत राहायाची.. कारण, यशवंतराव विचारांच्या तंद्रीतच असायचे, यामुळे बोटे जळायची तर कधी सिगरेट हातातून खाली पडायची. ही व्यसनाची सुरुवात ठरू नये म्हणून वेणूताईंनी त्यांचे हे व्यसन सोडविण्याचे ठरविले; आणि आश्चर्य म्हणजे सहा - सात महिन्यांतच त्या यात यशस्वी झाल्या. हे दिव्य करताना वेणूताईंना किती बोलणी खावी लागली याची गणतीच नव्हती. पण, यानंतर मात्र यशवंतरावांना कोणतेच व्यसन लागले नाही. स्त्रियांचे अनेक स्वभावधर्म असतात, तसेच त्यांच्यात अनेक गुण असतात. यापैकी एक सुप्त गुण असतो कणखरपणा, जिद्द. संसारात याचा उपयोग क्वचितच-विशिष्ट प्रसंगी केला पाहिजे. वेणूताईंनी तो केल्यामुळे देशाला चारित्र्यवान नेता मिळाला.

दिल्लीत आल्यानंतर यशवंतराव व वेणूताई यांच्यात एक लक्ष्मणरेषा कळत नकळत आखली गेली आणि ती शेवटपर्यंत 'दगडावरची रेष' राहिली. वेणूताईंनी कधीही यशवंतरावांच्या राजकीय व सरकारी कामात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हस्तक्षेप केला नाही. यशवंतराव घरी असताना त्या कधीही ड्राईंग रूममध्ये आल्या नाहीत. त्यांनी कधी सरकारी यंत्रणेचा वा सरकारी गाडीचा उपयोग केला नाही. थोडक्यात, त्यांचे विश्व केवळ बंगलाच होता. ध्येय यशवंतरावांचा संसार. तसेच यशवंतरावांनी कधीही संसारात दखल दिली नाही. सूचना केल्या नाहीत. तसा त्यांना वेळही नव्हता. याबाबतीत वेणूताईही आपल्या कर्तव्यास चुकल्या नाहीत. दैनंदिन बाबी सोडल्या तर त्या कोणतीही गोष्ट यशवंतरावांना विचारल्याशिवाय करीत नसत. घरातील मंगल कार्यात यशवंतरावांचा सहभाग फक्त बोलणी करण्यापुरताच असे. नंतरची सर्व कामे वेणूताईंवर पडत. देण्या-घेण्याबाबत कधीही कोणीही नाराजी व्यक्त केली नाही. वेणूताईंचा हात नेहमी सढळ होता. यशवंतरावांना दिल्लीत एकटे सोडून त्या कधीही दिल्लीबाहेर गेल्या नाहीत, म्हणून मंगल कार्याची तयारी बहुतेक दिल्लीत बसूनच करीत. वेणूताई सदैव आपल्यामुळे यशवंतरावांच्या कार्यात बाधा येऊ नये म्हणून प्रयत्नशील होत्या. प्रकृती तोळा-मासा असल्यामुळे त्या कधीही त्यांच्याबरोबर परदेशात गेल्या नाहीत.

वेणूताईंची अनेक रूपे होती, त्यांचे अन्नपूर्णेचे रूप दिल्लीत प्रसिद्ध होते. यशवंतराव गरिबीतून वर आल्यामुळे त्यांना गरिबीची जाणीव होती. यशवंतरावांचा एक अलिखित नियम होता.



बंगल्यावर काम करायला येणाऱ्यास जेवण दिलेच पाहिजे आणि तेही जे सर्वांसाठी तयार होते तेच. वेणूताई नोकरांवर अवलंबून न राहता याकडे जातीने लक्ष देत होत्या. प्रत्येकाच्या आवडी-निवडीकडे पाहत होत्या. दिल्लीकरांसाठी हे एक आश्चर्य होते. प्रत्येक क्षेत्रात यशवंतरावांना मानाचे स्थान होते त्यामुळे त्यांच्याकडे राहण्यास येणाऱ्यांचे प्रमाण बरेच होते. त्यांचे आदरातिथ्य करण्याची जबाबदारी वेणूताईंवर असे. वर्षभरात गाण्याच्या तीन-चार बैठका होतच असत. मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायकराव पाटील यशवंतरावांकडेच उतरत. प्रत्येकाच्या गरजा लक्षात घेऊन पाहुण्यांची रूम सजवलेली असे. पाहुण्यांची रूम कशी तयार केली आहे हे यशवंतरावांनी कधीही अगोदर जाऊन पाहिले नाही. त्याचीही जबाबदारी वेणूताईच पार पाडीत.सिनेमा पाहण्यास जाण्यासाठी आणि स्वत:च्या गरजेच्या वस्तू घेण्यासाठी बाजारात जाण्यास यशवंतरावांना कधीच वेळ मिळाला नाही. दाढीच्या ब्लेडपासून सर्व सामान, कपडे वगैरे वेणूताईच आणीत. यशवंतरावांना सर्वांत जास्त आवड होती ती पुस्तकांची. दर महिन्यात ते पुस्तकांची नावे, (त्यांचे लेखक) लिहून वेणूताईंस देत. ती आणण्याची जबाबदारी वेणूताईंची होती. दिल्लीच्या काना-कोपऱ्यात हिंडून तर कधी मुंबईहून ती पुस्तके त्या आणीत. यशवंतरावांचे पुस्तकांवर इतके प्रेम होते की पुस्तक वाचताना किंवा वाचल्यानंतरही ते नवीनच दिसले पाहिजे, असा दंडक असे. ही पुस्तके व्यवस्थित ठेवण्याचे कामही वेणूताईंचे होते. दर महिन्यात (पावसाळा सोडून) यशवंतराव नसताना एक दिवस चपराश्यांकडून स्वत:च्या देखरेखीखाली सर्व पुस्तके उन्हात टाकीत. सायंकाळी सर्व पुस्तके स्वच्छ पुसून त्याच जागेवर ठेवून घेत. याबाबत कडक नियम असा होता की यातील एकही पुस्तक कोणाला द्यावयाचे नाही. बाजारात कधी न गेल्यामुळे बाजारभावाची अंधुकशी कल्पना यशवंतरावांना नव्हती. एवढेच नव्हे, तर कुठे काय मिळते याची माहितीही त्यांना नव्हती. याच्या उलट वेणूताईच हा व्यवहार करीत असल्यामुळे त्यांना सर्वच गोष्टींची साद्यंत माहिती होती. याचा परिणाम वेणूताईंच्या निधनांतर काही दिवसांतच यशवंतरावांच्या अनुभवास आला. अस्थी विसर्जनानंतर १०-१५ दिवसांनी सर्व नातेवाईक आपल्या संसारात रममाण होण्यासाठी परत गेले. यशवंतराव एकटे राहिले. दुसऱ्या दिवशी स्वयंपाक्याने भाजीसाठी यशवंतरावांकडे पैसे मागितले. भाजीचे भाव अजिबात माहीत नसल्यामुळे यशवंतरावांनी १० रुपये दिले. जुलै हा पावसाचा महिना. भाज्यांचे भाव तसेच जास्त असतात. स्वयंपाकी १० रुपये घेऊन उभाच राहिला. त्याची काही बोलण्याची हिंमत झाली नाही. काही कामानिमित्त मी बंगल्यावरच होतो. स्वयंपाकी माझ्याकडे आला व घडलेली घटना सांगितली. मी त्याला १०० रुपये दिले. जवळपास २ महिने असे चालले. यशवंतराव दु:खातून थोडे सावरले तेव्हा मी त्यांना परिस्थितीची कल्पना दिली.

दोघांमध्ये काही बाबतीत मतभेद असणे स्वाभाविक आहे. पण, छोट्या गोष्टीवरून झालेले मतभेद एका ठिणगीप्रमाणे असतात, जे पुढे आगीचे रूप धारण करतात. मंत्रिपद म्हणजे टेंशन आलेच. अनेक गोष्टी मनासारख्या घडत नाहीत. चीड किंवा राग आला की तो कोणावर तरी साहजिकच काढला जातो. यासाठी मिळते ती पत्नी व पर्सनल स्टाफ. तू तू मै मै न करता गरज असते संयमाची. वेणूताई यात सदैव उत्तीर्ण होत गेल्या. कधीही त्यांच्यात वादावादी झाल्याचे मी पाहिले नाही.

यशवंतराव सकाळी ऑफिसला जाईपर्यंत त्यांचा वेळ यशवंतरावांची तयारी करण्यात जाई. त्यांचा दिवस सुरू होत असे पहाटे ५.३०ला. रात्री यशवंतरावांनी नजरेखालून घातलेली वर्तमानपत्रे नीट लावणे. ऑफिसला घालून जाण्याचे कपडे काढून ठेवणे. पेन, पैसे, रुमाल ठेवणे. दौऱ्यावर मग तो बाहेरदेशीचा का असेना कार्यक्रमानुसार कपडे बॅगमध्ये भरून त्या तयार करणे ही सर्व कामे वेणूताईच करीत. यशवंतरावांच्या खाण्या-पिण्याकडे पण त्या स्वत: लक्ष देत असत. कधी कधी भाज्या वगैरे स्वत:च करीत. खाण्यात गरजेपुरते व आवश्यक तेवढेच पोटात व वेळेवर गेले पाहिजे याची त्या काळजी घेत. थोडक्यात, गृहमंत्र्यांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली आणि यशवंतरावांना त्यांच्या कर्तृत्वासाठी पूर्ण मोकळा वेळ दिला. हेच यशवंतरावांच्या यशाचे मर्म आहे.

वेणूताईंच्या वैवाहिक जीवनात दसरा-दिवाळीपेक्षा तीन सण महत्त्वाचे होते आणि तिन्ही यशवंतरावांशीच संबंधित होते. वर्षाच्या सुरुवातीला पहिला सण संक्रांतीचा. यशवंतराव संक्रांतीच्या दिवशी कधीही दौऱ्यावर राहत नव्हते. सकाळीच वेणूताई नित्यकर्म आटोपल्यावर देवाची पूजा करीत. नंतर अंगावर सवाष्णीचे गरजेपुरते दागिने घालीत. काठापदराची माहेश्वरी वा इरकली नऊवारी नेसत. नाकात नथ घालून सुगडाची पूजा करीत व बंगल्यावरच्या चपराश्यांच्या बायकांना वाण, तिळगूळ, हळदीकुंकू देत. या वेळात यशवंतराव तयार होऊन येत. वेणूताई त्यांना तिळगूळ देत, नमस्कार करीत. त्या दिवशी वेणूताई खरंच साक्षात लक्ष्मीसारख्या दिसत. तसं पाहिले तर वेणूताईंच्या चेहऱ्यावर चिंता कधीच दिसली नाही. माझ्या आठवणीप्रमाणे यशवंतराव या सणाला जास्त महत्त्व यासाठी द्यायचे की वेणूताईंची पहिली संक्रांत जेलमध्ये गेली होती.

दुसरा सण म्हणजे यशवंतरावांचा वाढदिवस १२ मार्च. त्या दिवशी उभयता ७.३० पूर्वीच तयार होत. संक्रांतीसारख्याच वेणूताई सजलेल्या असायच्या. यशवंतरावांना ओवाळीत. या दिवशी दागिने मात्र फारसे घालीत नसत. तसे पाहिले तर वेणूताईंना दागिन्यांची वा दागिने घालून मिरविण्याची आवड नव्हती. त्यांना आवड होती ती सौभाग्याची खूण असलेल्या मंगळसूत्राची. दोन वाट्यांचे नवीन डिझाईनचे मंगळसूत्र दिसले की ते वेणूताईंनी आणलेच. यशवंतराव व मंगळसूत्र हेच त्यांचे दोन दागिने होते. मंगळसूत्राला त्या किती महत्त्व देत यासंबंधीची सत्य घटना सांगावीशी वाटते.

एकदा मी, माझी पत्नी सौ. स्नेहलतासह, दिल्लीत करोळबाग क्षेत्रात गेलो होतो. त्याच दिवशी वेणूताईपण खरेदीसाठी त्या भागात आल्या होत्या. त्या गाडीतच बसून होत्या. आमची दृष्टिभेट झाली म्हणून आम्ही गाडीपाशी गेलो. काय खरेदी केले वगैरे गप्पा पाच-सहा मिनिटांत झाल्या. आम्ही घरी परत आलो. ७.३०च्या सुमारास फोन आला साहेबांनी बोलाविले. तयार होऊन बंगल्यावर गेलो. डिक्टेशनची वही घेऊन साहेबांकडे गेलो. तिथेच वेणूताई बसल्या होत्या. त्यांनी दोन-तीन मिनिटे इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या आणि त्या मूळ मुद्द्यावर आल्या. मुद्दा कसला गुद्दाच होता. त्यांनी सुरुवात केली. मिसेस खांडेकरांच्या गळ्यात आज मंगळसूत्र नव्हते. मंत्र्याची पत्नी ५ मिनिटांच्या भेटीत एवढे निरीक्षण करून प्रश्न विचारू शकते, असे कधीतरी कोणाला वाटेल का? मंगळसूत्र एक दिवस अगोदरच खंडित झाल्याचे सौ. खांडेकरांनी मला सांगितले होते. पण, ऑफिसच्या कामामुळे सोनाराकडे जाणे शक्य झाले नव्हते हे स्पष्टीकरण वेणूताईंना पटले नाही. रागाने मला खडसावणे सुरू केले, ''याचा अर्थ आज रात्रीपण मिसेस खांडेकर



मंगळसूत्राशिवाय झोपणार? तुमच्यात असे चालते का? मंगळसूत्र खंडण्याची शक्यता असते, तरी आणखी एखादे घरी असावे हे तुम्हाला समजत नाही का? जवळपास १०-१२ मिनिटे त्या रागाने बोलत होत्या. मी घामाघूम होऊन ऐकत होतो. ४८ वर्षांच्या कारकिर्दीत मंत्र्यांनी पण इतके दटावले नसेल, त्या आत गेल्या, मी बाहेर आलो, शरीरात त्राण नव्हता. १०-१५ मिनिटे आत बसलो, जाण्यास निघालो तो पुन्हा बोलावले म्हणून निरोप. शिल्लक काहीच राहिले नव्हते. आत गेल्यावर वेणूताईंनी एक लांब डबी दिली आणि म्हणाल्या, हे घेऊन जा. मिसेस खांडेकरांकरिता. आश्चर्य म्हणजे हा सर्व प्रकार यशवंतराव पुस्तक वाचण्यात मग्न असूनही पाहत होते. ऐकत होते. कदाचित, माझी कीव करीत असतील; पण, वेणूताईंबद्दल अभिमान वाटत असेल. घरी जाऊन डबी उघडली तर त्यात दोन वाट्यांचे पोळ असलेले सोन्याचे नवीन मंगळसूत्र.

वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासून गर्दी. या दिवशी मात्र वेणूताई दिवाणखान्यात बसून प्रत्येकाचे स्वागत करीत असत. दुपारी १पर्यंत व नंतर दुपारी ४.३०नंतर हा कार्यक्रम चालू असे. वाढदिवसानिमित्त बरेच नातेवाईक कराड, मुंबईहून आलेले असत. त्यांच्यासाठी जेवणाचा बेत वेणूताईंच्या निरीक्षणाखाली तयार होत असे. यशवंतराव-वेणूताई साजरा करीत असल्यामुळे तो एक 'विरंगुळा' होता. सोनेरी दिवस म्हणूनच तो गणला जाई. सातारा मुंबईहून आलेल्या नातेवाइकांच्या सान्निध्यात साजरा केला जात असे.

''एकमेकांच्या भावनांचा आदर करण्याची आणि एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती एकमेकांना आयुष्यभर बांधून ठेवते, तसेच वैवाहिक आयुष्य त्याग आणि विश्वासाच्या पायावर टिकून असते'' हे यशवंतराव-वेणूताईंच्या सुखी संसाराचे मर्म होते. दोघांनीही एकमेकांपासून काही लपवून ठेवले नाही. दुपारी जेवणानंतर जवळपास अर्धा तास वेणूताई घरातील-नातेवाइकांशी संबंधित वृत्तांत यशवंतरावांना माहितीसाठी सांगत. यात टीका-टिप्पणी कधी नसे. रात्री जेवणानंतर अर्धा पाऊण तास यशवंतराव दिवसभराच्या घटना, अतिशय गोपनीय असल्या तरी, वेणूताईंना सांगत असत. यातील एक शब्दही वेणूताईंच्या तोंडून कधी बाहेर पडणार नाही याची त्यांना खात्री होती. बाहेरदेशी दौऱ्यावर असताना हा रोज झोपण्यापूर्वी पोस्ट कार्ड, अन्तर्देशीय पत्रे वा लेटरहेडवर लिहित व ती पोस्टात न टाकता दिल्लीत परत आल्यानंतर वेणूताईंच्या स्वाधीन करीत. संसारात साधारणतः संकटाच्यावेळी पती पत्नीला धीर देतो. पण, इथे वेणूताई यशवंतरावांना संकटाशी सामना करण्यासाठी हिंमत देत. कारण, यशवंतरावांचे हृदय नाजूक, भावुक होते. यासंबंधी महत्त्वाच्या दोन प्रसंगांचा उल्लेख आपणास करता येईल. १९६९ साली अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीत सर्व संमतीने एक उमेदवार ठरविण्यात आला. पण, नंतर पंतप्रधानांनी दुसऱ्याच उमेदवारास पाठिंबा देण्याचे ठरवून तशा सूचना दिल्या. श्री. मोरारजी देसाई, यशवंतराव वगैरे वरिष्ठ नेत्यांनी यास विरोध केला. प्रश्न तत्त्वांचा नाही शिस्तीचा होता. पंतप्रधानांचा उमेदवार पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला पाडून निवडून आला. यानंतर काही दिवसांतच पंतप्रधानांनी उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांचे अर्थ खाते काढून घेतले. त्यांनी हा अपमान सहन न होऊन उपपंतप्रधान पदाचा राजीनामा दिला. आपल्यावरील भावी संकटाची चाहूल असल्याचे चिंताग्रस्त यशवंतरावांनी वेणूताईंना सांगितले. वेणूताईंनी यशवंतरावांना धीर दिला. काळजी कशाची करता? मुंबईचा फ्लॅट व कराडचे घर आहे ना. आपण जमीन सोडून कधीच राहिलो नाही. पुन्हा पूर्वीच्या पद्धतीने सर्वांसोबत पुढील आयुष्य जगू. हे ऐकून यशवंतरावांना किती हायसे वाटले असेल.

दुसरी घटना होती डॉक्टर झालेल्या पुतण्याच्या अपघाती निधनाची. हा सर्वांत लहान व त्या पिढीतील एकमेव इतके उच्च शिक्षण घेतलेला पुतण्या. डॉक्टरी शिक्षणासाठी तो अलिगडला होता. त्यामुळे दिल्लीत त्याचे वास्तव्य जास्त म्हणून बातमी समजताच यशवंतरावांनी हातपायच गाळले. मग, वेणूताईंची स्थिती काय झाली असेल याची कल्पना केलेली बरी. यशवंतरावांची अवस्था पाहून वेणूताई उठल्या आणि धीर देऊन दोन गोष्टी सांगून त्यांना पण उभे केले. यशवंतरावांच्या शेवटच्या आजारपणात त्यांना सोबत म्हणून त्यांच्याकडे राहण्यास गेलो होतो. दहा - सव्वा दहा वाजले की यशवंतरावांना झोपेची गोळी घेतल्यामुळे झोपण्यास जाण्याचा त्या आग्रह करीत व मला बोलावून घेत. साडे बारा - एकला त्यांना झोप येऊ लागली की मला जाण्यास सांगत. यशवंतराव वेळेवर झोपण्यास गेले नाहीत, तर रात्रभर त्यांना झोप येणार नाही ही चिंता त्यांना होती.

१ जून १९८३ रोजी डॉक्टरांच्या सल्ल्याने वेणूताईंना दवाखान्यात भरती करण्याचे ठरले. वेणूताई यशवंतरावांना सोडून दवाखान्यात जाणार नाहीत याची सर्वांना खात्री होती, म्हणून त्यांना न विचारता हा निर्णय घेण्यात आला. अशी काहीतरी तयारी होत आहे याचा अंदाज वेणूताईंना आला. दुसऱ्या दिवशी लग्नाचा वाढदिवस म्हणून त्या अंथरुणावरूनच तयारीच्या सूचना देत होत्या. नंतर त्यांनी यशवंतरावांना अगदी जवळ बोलावून म्हणाल्या, ''खरं सांगा, तुम्ही मला दवाखान्यात भरती करणार आहात का?'' यशवंतरावांनी हो म्हणून स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली तोच वेणूताईंनी काही सेकंदांतच त्यांच्या मांडीवर प्राण सोडला. यशवंतरावांचा टाहो ऐकून सर्व नातेवाईक धावले. वेणूताई गेल्याचे खरेच वाटेना. अशी जोडी कधी दिसेल का? सायंकाळच्या विमानाने त्यांचा देह मुंबईला आणला. हिरवी वस्त्रे, हिरव्या बांगड्या घालून वेणूताई अंतीम प्रवासास निघाल्या.

यशवंतरावांच्या आयुष्याच्या भरभराटीत वेणूताईंची किती महत्त्वाची भूमिका होती याची प्रचिती जवळपास १५ महिने यशवंतरावांसारख्या धीरोदत्त पुरुषाला झालेल्या दु:खावरून येऊ शकेल. त्यांचे दु:ख, डोळ्यांतून सतत वाहणारे अश्रू पाहण्याचे दुर्भाग्य माझ्या वाट्याला आले होते. कारण, मी आठवड्यातून दोन-तीन वेळा मराठी पत्रलेखन वा त्यांच्या इतर कामासाठी व महिन्यातून चार-पाच दिवस आम्ही उभयता त्यांचा एकटेपणा काही प्रमाणात कमी करण्याच्या हेतूने त्यांच्याकडे जात होतो. पत्नीच्या वियोगाच्या दु:खाचा इतका धक्का घेतलेला मंत्री मी तरी पाहिला नाही.

यशवंतराव-वेणूताई यांच्यामधील परस्पर विचारांची देवाण-घेवाण पाहून चाणक्यांची आठवण होते. ते म्हणत, ''जेव्हा दोन आत्म्यांच्या तारा जुळतात तेव्हा त्या व्यक्तीच्या अस्तित्वाचीच नाही, तर विचारांची चाहूल दुसऱ्याला लागते. यशवंतराव वेणूताईंचे वैवाहिक आयुष्य, संसार याचे प्रतीक होते. कर्तबगार, कर्तृत्ववान, देशनिष्ठा, दूरदृष्टी ठेवून कीर्तिमान झालेल्या यशवंतरावांची यशोगाथा वेणूताईंच्या सहकार्य, त्याग, निष्ठेने उभ्या राहिलेल्या सुखी संसाराची झालर लावल्याशिवाय निश्चितच सुशोभित होणार नाही.

**संपर्क :** ९८६००२२०४१



# तुझे आशीर्वाद दिवे लावून गेले...

**नादारीचे दिस कष्ट केले जीवापाड**
**निंदणी खुरपणी काय सांगाव पवाड**
**शेती काटे कुटे तरी भरली ग ओटी**
**घामाची कमाई माज्या लेकरांच्यासाठी**
**दुबळ्यापणाला नभ बाळांनो उगमगू**
**चांदसूर्यावरची बाई जात्यालीग ढगू**
**शिका रे बाळांनो धीट व्हावा दुनियेत**
**जड माझं जातं आसू सांडती पिठात**

दोन दगडी जात्यांच्या पाळुंमध्ये भरडल्या आयुष्याचं गाणं- ओवी गाणारी आई. विठाई. या विठाईनं जन्मासोबतच दु:ख दारिद्र्याचं भरडल्या आयुष्यांची कविता - कवितेचा शब्द दिला. जगाचं शहाणपण सगळं काही ठाव असलेलं हे आईचं विद्यापीठ. हेच यशवंतराव चव्हाणांचं पहिलं विद्यापीठ. आई गेली तेंव्हाची भरभरून दु:खानं ओथंबलेली त्यांची वाक्यं दोनच वाक्यं म्हंजे कारुण्य कवितेचं महावाक्य. या आईवडिलांच्या दु:खाचा यातनांचा कष्टांचा आणि त्यातूनच गिळाव्या लागलेल्या अपमानांचा कधीच विसर पडला नाही, त्याचा बभ्राही कधी केला नाही. कुठल्याही गावाच्या मध्यावरचा उंच हायल्या पाड्यांवर चढताना आपण त्या गावात शिरतानाच्या वेशीवरल्या झोपडी धाखलीतल्या माणसांचा- आपल्या माणसांचा यांचा आठव सतत त्यांनी ठेवला. खेडं, शेतीबाडीतल्या कष्टातलं कुणबीपण, सोसाव्या लागणाऱ्या कळा हे यशवंतरावांनी आयुष्यभर ठायी ठायी आठवणी ठेवून ते ऐरणीवरच ठेवलं. महाराष्ट्रात, देशात, विदेशात सर्वत्र उच्चपदी राहूनही त्यांचा पाय व मन आयुष्यभर या सामान्यांसाठी भक्कमपणानं होतं. अशा या विद्यापीठातला विठाईचा यशवंता. महाराष्ट्राचा, देशाचा एक असामान्य कर्तृत्वाचा महापुरुष- राजकर्ता झाला. दीर्घकाळ नव्हे, तर कायमस्वरूपी त्यांचं चरित्र, धडपड - विचार आणि जगणं आपल्याला ऊर्जा देत राहील असाच हा माणूस आहे. अडाणी खेड्यांचा, विचारवंतांचा, सक्रिय चांगल्या राज्यकर्त्यांच्या साहित्यकला संस्कृतीतल्या प्रतिभावंतांचा- आणखी सकलांचा हा यशवंतराव. महाराष्ट्राच्या नव्हे, तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडलेले असे यशवंतराव. असामान्य असे हे यशवंतराव. बहुजन समाजातून वर आलेला आणि अनेक अतुलनीय अभिजात गुणांनी स्वत:च्या व्यक्तिमत्त्वात जाणीवपूर्वक जोपासना केलेला हा धुरंधर मुत्सद्दी नेता होता. स्वकर्तृत्वावर प्रतिकूल परिस्थितीशी यशस्वी झुंज देत पायरी पायरीने मोठे होणारे पण पाय मातीतच असलेले असे यशवंतराव. लहानपणापासून त्यांनी केलेल्या तपश्चर्यचे सामर्थ्य होते. विटेवर वीट ठेवून त्यांनी आपल्या पुढारीपणाची पायाभरणी केलेली होती. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सवंग लोकप्रियतेचा हव्यास किंवा नेतृत्वाचे लघुरस्ते शोधण्याचा आटापिटा यशवंतरावांनी कधीच केला नाही. त्यापेक्षा परिस्थिती दरवेळी पारखून, नीट पारखून आणि परिस्थितीशी कधी जुळते घेऊन, तर कधी माफक संघर्ष करून नेतृत्वाची एकेक पायरी चढण्याचे तंत्र त्यांनी अवगत केले होते. त्यांचं नेतृत्व

**ना. धों. महानोर**

महाराष्ट्राला फार खोलवर जाऊन कार्यकर्त्यांनी शब्दा शब्दांचं अर्थ लावून गांभीर्यानं घेतलं पाहिजे असं ते आहे.

आजकाल नेतृत्व याचा अर्थ फारच मर्यादितपणे केला जातो. राजकारणात एखादे पद प्राप्त झाले की त्याला नेता म्हणायची ही सवय जितक्या लवकर दूर होईल तितकी त्याची गरज आहे. नेतृत्व हा शब्द व्यापक अर्थाचा आहे. सामूहिक परिणाम घडविणारे त्या त्या सभेतील जे कोणी आदर्श असतील, तेच खरे नेते. नव्या आदर्शाचा संपूर्ण समाज जीवनावर परिणाम करण्यासाठी त्याचा वापर करणारी जी काही माणसे असतात त्यांच्या ठिकाणीही नेतृत्व असतेच. विचारांची माणसांच्या मनाची मशागत करणे आणि त्याचे आदर्श परिणाम घडवून आणणे या नेतृत्वाच्या कसोट्या असतात.

यशवंतरावांचे साहित्य, महाराष्ट्रातील सभागृह, जनसामान्याचं सभागृह-दिल्ली परदेश भाषणं, पुस्तकं वाचावी. अतिशय संपन्न पुरोगामी विचारांचा साहित्य कर्तृत्वानं भरगच्च भरलेला दिशादर्शक- चारित्र्यसंपन्न असा हा थोर नेता होता. द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री म्हणून करावी लागणारी कसरत, दमछाक त्यांनी स्वीकारली. मार्ग काढला. संयुक्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले व त्यांच्या अनेकविध क्षेत्रातल्या गाढ अशा विचारांचं दर्शन होत गेलं. हा देश शेतीप्रधान आहे आणि महाराष्ट्र तर अनेकदा दुष्काळग्रस्त असतो. अधिक उत्पन्नाची हरितक्रांतीची शेती- नुस्ता नवा विचार नाही, तर गतिशील अशा योजना घडवून आणल्या. कृषी विद्यापीठांच्या मार्फत माझ्या शेतकऱ्यांचा मुलगा जगाच्या शेतीशी स्पर्धा करीत असा प्रतिभावान संशोधक शेती क्षेत्रात व्हावा व मगरळलेली शेती, खेडी संपन्न व्हावी याचा ध्यास घेऊन राज्यकर्त्यांना व समाजाला प्रत्यक्ष कामाला लावलं. हरितक्रांतीपेक्षाही पाणी वापर, धरणं, पाटबंधारे योजना किमान दुबार पाण्याची शेती व्हावी म्हणून महत्त्वपूर्ण निर्णय कृषी खात्यात, पाटबंधारे विभागात त्याच्या संशोधनात अन्नधान्य प्रक्रियेत घेतले. 'सह्याद्रीचे वारे' वाचा म्हणजे लक्षात येईल. परभणी कृषी विद्यापीठातलं भाषण आणि उजनीच्या धरणाचं भूमिपूजनाचं पाण्यासंबंधीचं भाषण. पाणी उद्या संपणार. संपणार नाही अशा योजना मोठ्या छोट्या कराव्यात. त्याशिवाय तरणोपाय नाही. त्यासाठी त्याचवेळी त्यांनी 'बर्वे कमिशन' पाणी आयोग उभा केला आणि त्या गंभीर प्रश्नांना गतिमान करून त्या कालबद्ध व्हाव्यात म्हणून आग्रह धरला. नाहीतर वाळवंटाला - दुष्काळाला सामोरं जावं लागेल. ते होऊ नये म्हणून विठोबाला प्रार्थना. शेतीचं नुस्तं एकरी उत्पादन, चांगले वाण करून चालणार नाही त्यावर प्रक्रिया - कृषी उद्योग कृषी क्रांतीची अत्यंत महत्त्वपूर्ण अशी योजना व विचार रुजविणे. देशात आज अर्थवत्ता व समाजाला सुद्धा अर्थवत्ता देणारी उसाची कारखानदारीच नव्हे, तर कापूस प्रक्रिया सूतगिरण्या व कापडाशी संबंधित जगत निर्माण करीत शेतकऱ्यांना उभं करणारं असावं असे निर्णय घेतले ते पुष्कळच फलद्रूप झाले. दूरदृष्टीचे, अनेकविध देशांचे व देशांतर्गत प्रश्नांचे, योजनांच्या वाचनानं प्रत्यक्ष जाऊन अभ्यासानं ते आत्मसात करणारे नेते होते. अंगभूत त्या त्या प्रश्नांची जाण व चौफेर ज्ञान आत्मसात करून- विस्ताराचं काम अशा अनेकविध गुणांनी ते दिल्लीनं बोलविलं म्हणून गेले. महत्त्वाच्या चार-पाच खात्यांचं काम करताना खोलवर त्यात स्वत:ला गाडून घेऊन देशाला उभा करू शकतील- सकलांचं भलं होईल असे निर्णय स्वत: घेतले, केंद्राला घ्यायला लावले. हे तिथली भाषणं व निर्णय



बघितले म्हणून लक्षात येतं. त्यासंबंधी पुस्तकांत ते जरूर बघावं, तिथे यशवंतरावांची उंची आपणास दिसते. राजकारणात ऊन-सावलीचे दिवस असतात. नव्हे असतातच. शेवटच्या काही काळात त्यांच्या नशिबी आलं पण ते त्यांनी सोसलं, सहज, अबोलपणानं. कारण, ते समृद्ध वाचनानं इतिहास नीट वाचून आत्मसात केल्यानं पचविण्याची ताकद माहीत असल्यानं. शांत पण जमेल तेवढं कार्यच करीत राहिले.

साहित्याचं त्यांना फार वेड होतं. अनेकविध क्षेत्रातील, भाषेतली पुस्तकं, ग्रंथ एवढं ते कसे कुठे वाचीत होते मला प्रश्न पडत असे. पण, त्यावर आत जाऊन चर्चा करताना ऐकताना मला शक्ती मिळायची. प्रवासात विशेषत: रात्री ९ ते ११ असं नित्य वाचन असायचं आणि त्या क्षेत्रातल्या मंडळीसोबत त्यांना चर्चा आवडत असे. बहुविध वाचन, अभिजात रसिकता व स्वत: लेखक अशी त्यांची ओळख मला आयुष्यात खूप देऊन गेली. 'यशवंतराव' या माझ्या लहानशा पुस्तकात खूप काही मी लिहिलंय म्हणून इथे पुनरावृत्ती नको. आमच्यासारख्या प्रतिकूल परिस्थितीतून झगड देऊन आलेल्यांसंबंधी त्यांना खूप आत्मीय प्रेम होतं. त्यांनी तो ऋणानुबंध आयुष्यभर जपला. नवं आयुष्य दिलं. यशवंतराव गेले त्यावेळी दोन ओळी मी लिहिल्या होत्या..

**"तुझी साथ तुझे आशीर्वाद प्राणांचे दुवे मेळवीत गेले.**
**तुझी साथ तुझे आशीर्वाद घरभर दिवे लावून गेले."**

**संपर्क :०२५७- २२६००४३**

## यशवंतरावांचे कवीवर्य ना.धों महानोर यांना पत्र

यशवंतराव चव्हाण,
१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली - ११०११.
दि. : १९ सप्टेंबर १९८१

**प्रिय नामदेवराव,**

तुमचे पत्र येऊन बरेच दिवस झाले, सोबत आलेले पुस्तक वाचल्याशिवाय उत्तर द्यायचे नाही असे ठरविले होते. तुमच्या गद्यलेखनापैकी 'गांधारी' मी पूर्ण वाचले होते. गावाकडल्या गोष्टी मी सर्व वाचून काढल्या. पहिल्या चार कथा व शेवटच्या चार कथा यात मौलिक फरक आहे. शेवटच्या चार कथांत वर्तमान परिस्थितीतील तळागाळातला अनुभव परखडपणानं मांडलेला आहे. त्याची गरज होती. या पुस्तकातील पहिल्या चार कथा याचे कथा म्हणून महत्त्व मला विशेष आहे. पहिल्या कथा वाचून मला श्री. जी.ए. कुलकर्णी यांची आठवण झाली. व्यंकटेश माडगूळकरांची नाही. मी कुणी समीक्षक नाही. एक रसिक वाचक आहे. तुमच्या या पहिल्या चार कथा तंत्रदृष्ट्याही अतिशय उत्कृष्ट आहेत. वाचून झाल्यानंतर त्या कथांचा विषय डोळ्यांपुढे तरंगत राहतो. 'सवंगडी' ही कथा वाचून ग्रामीण जीवनात काढलेल्या माझ्या लहानपणची आठवण झाली आणि डोळे भरून आले. इतकेच तूर्त पुस्तकासंबंधी.

**कळावे.**

आपला,
यशवंतराव चव्हाण



कवितांची रंगलेली मैफल - कोट आणि टोपी घातलेले महानोर.



# माणूसवेडा नेता

**डॉ. सुदाम जाधव**

यशवंतराव चव्हाण यांच्याबाबत बऱ्याच कार्यकर्त्यांकडून ऐकलं होतं. वर्तमानपत्रातून त्यांची भाषणे, त्यांनी मांडलेली विविध विचार वाचत होतो. म्हणूनच की काय त्यांच्याबद्दलची एक ओढ माझ्या मनात सारखी वाटत होती. एकदा तरी आपला, आपणा सर्वांचा नेता डोळा भरून पाहावा, त्यांचं जवळून दर्शन घ्यावं असं वाटत होतं.

नुकतीच आणीबाणी उठविली होती. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या होत्या. सारा भारत देश निवडणुकांमुळे घुसळून निघाला होता. महाराष्ट्राचे लोकनेते आणि देशाचे परराष्ट्र मंत्री यशवंतराव चव्हाण यांची त्या दिवशी शहागंज (औरंगाबाद) येथे जाहीर प्रचारसभा होती. त्यामुळे यशवंतरावांना जवळून पाहण्याची संधी मिळेल या विचाराने त्या सभेला हजर होतो. अपेक्षेप्रमाणे सभा यशस्वी झाली. सभेमध्ये विराट जनसमुदाय जमलेला होता. यशवंतराव चव्हाण ऊर्फ 'साहेब' यांना जवळून पाहायचे व दुसरे त्यांचे प्रत्यक्ष विचार ऐकायचे.

या सभेमध्ये माझे समाधान झाले असले तरी एक प्रश्न मनामध्ये निर्माण झाला होता. तो म्हणजे लोक या सुसंस्कृत नेत्याला, 'साहेब' का म्हणत असावेत? 'साहेब' म्हटले की, गोऱ्या कातडीचा, घाऱ्या डोळ्यांचा, सूटबुटातला इंग्रज 'साहेब' माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. आणि यशवंतराव चव्हाण तर या साहेबी कल्पनेत कुठेच बसणारे नव्हते. मग, त्यांना लोक 'साहेब' का म्हणत असावेत. साहेबापेक्षाही मला यशवंतराव चव्हाणांच्या मध्ये एक प्रेमळ माणूस, सुसंस्कृत माणूसच अधिक प्रमाणात दिसत होता. ज्या-ज्यावेळी त्यांना जवळून भेटण्याची व बोलण्याची संधी मला मिळाली त्या-त्यावेळी मला त्यांचे साहेबापेक्षा माणूसपणच अधिक जाणवले. म्हणूनच या लाडक्या नेत्यावर अख्खा मराठी माणूस जिवापाड प्रेम करीत होता.

१९७४ साली सुवर्ण महोत्सवी मराठी साहित्य संमेलन इचलकरंजी येथे झाले. त्यावेळी पु.ल. देशपांडे हे संमेलनाचे अध्यक्ष होते. रणजीत देसाई हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. या संमेलनालाही आपल्या राजकीय घडामोडी बाजूला ठेवून यशवंतराव चव्हाण मुद्दाम हजर राहिले. इचलकरंजीत आणि संमेलनाच्या समारंभात जेव्हा यशवंतरावजींचे आगमन झाले त्यावेळी कोल्हापूरकरांनी त्यांच्या विरोधी घोषणा दिल्या. या घोषणांमुळे यशवंतराव थोडेसेही विचलित झाले नाहीत. याउलट त्यांनी थोडेसे भाषणही केले आणि रसिक साहित्यिकांच्या मेळाव्यात आपला काही वेळ त्यांनी दिलखुलासपणे घालवला.

त्यानंतरचे साहित्य संमेलन खुद्द यशवंतराव चव्हाणांच्या कऱ्हाड या गावीच झाले. त्याचे स्वागताध्यक्ष यशवंतराव चव्हाण स्वत: होते. संमेलनाच्या अध्यक्षा होत्या दुर्गा भागवत. काळ आणीबाणीचा. त्यामुळे संमेलन वेगळ्या अर्थाने गाजणार असे सर्वांना वाटत होते आणि झालेही तसेच. दुर्गाबाई भागवत यांनी त्या वेळेसच्या भारत सरकारवर ताशेरे ओढले. आणीबाणीचा अस्वीकार केला तरीही यशवंतराव चव्हाण सरकारचे प्रतिनिधी या नात्याने चिडले नाहीत, तर कऱ्हाडकर यजमान म्हणून त्यांनी ते प्रसन्न मनाने स्वीकारले. तीन दिवसांच्या सहवासात संमेलन यशस्वी केले. असा हा एक दर्दी राजकारणी माणूस होता.

यशवंतराव चव्हाण यांना भेटण्याची, जवळून पाहण्याची एक संधी मला मिळाली. मी मराठवाडा विद्यापीठात मराठी विभागात एम.ए.चा विद्यार्थी होतो. त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाची पन्नास मुला-मुलींची एक ट्रीप आग्रा, दिल्ली येथे गेली होती. आग्र्याला काही दिवसांचा मुक्काम झाल्यावर आम्ही दिल्ली गाठली. त्यावेळी यशवंतराव चव्हाण बहुधा भारताचे गृहमंत्री असावेत. आमचा दिल्लीमध्ये खा. माणिकराव पालोदकर आणि खा. सयाजीराव पंडित यांचेकडे मुक्काम होता. दिल्ली मुक्कामात संसदेचे कामकाज पाहिले. पण, यशवंतराव चव्हाण यांना जाऊन घरी भेटावे अशी सर्व विद्यार्थ्यांचीच इच्छा होती.

चार-पाच दिवसांच्या दिल्ली मुक्कामात आम्ही एक-दोनच नेत्यांना भेटलो. एक भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि दुसरे यशवंतराव चव्हाण. दिल्ली सोडताना तत्कालीन राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी यांचीही भेट घेतली. सर्वांत अगोदर म्हणजे सकाळी आठ वाजता पंतप्रधानांच्या भेटेची वेळ ठरली होती म्हणून दिल्लीच्या त्या गुलाबी थंडीच्या दिवसांत आम्ही पंतप्रधानांना भेटण्यासाठी निघालो. आमच्या सोबत इतर राज्यांतील मंडळीही भेटण्यास आली होती. अत्यंत कडेकोट बंदोबस्तात आम्हाला पंतप्रधानांच्या भेटीसाठी प्रवेश दिला. एवढ्यात सुरक्षा सैनिकांच्या सोबत पंतप्रधान इंदिरा गांधी आल्या. आम्ही सर्वांनी उठून व नमस्कार करून त्यांचे स्वागत केले. त्यांनी विचारपूस केली. आणि आमची ही क्षणिक भेट संपली. या भेटीनंतर घाईघाईने आम्ही सर्व जण यशवंतराव चव्हाण यांच्या भेटीला त्यांच्या रेसकोर्सवरील निवासस्थानी गेलो. तेथेही बंगल्याच्या प्रवेशद्वारात आमची तपासणी झाली. पण, बंगल्यात गेल्यावर मात्र आम्ही आमच्या घरी आला आहोत अशी जाणीव झाली. यशवंतराव चव्हाणांनी आमचे सर्वांचे मनापासून स्वागत केले. आत सौ. वेणुताई चव्हाण होत्या. त्यांना बोलावून घेतले. आमच्याशी परिचय करून दिला. परिचयाच्या कार्यक्रमानंतर चहा-फराळ झाला. चहा-फराळांच्या वेळी साहेबांनी महाराष्ट्रातल्या विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. त्याचवेळी त्यांचे स्वत:चे ग्रंथालयही पाहता आले. त्यानंतर त्यांच्या सोबत फोटो काढला. या भेटीत त्यांच्याबद्दलचे माणूसपण अधिकच जाणवले. ती एक कृत्रिम भेट न राहता जीवनात अविस्मरणीय अशी जिव्हाळ्याची भेट ठरली. त्यानंतर आम्ही सर्वांनी त्यांचा निरोप घेतला.

### यशवंतरावांचे अखेरचे दर्शन


जेव्हा चव्हाण साहेब महाराष्ट्रात दौऱ्यावर आले त्यावेळी मराठवाड्यात अंबेजोगाई येथे संगीत संमेलनाच्या कार्यक्रमाला हजर राहण्यासाठी ते मुद्दाम दिल्लीहून आले. औरंगाबादहून बीडला जाताना वाटेत आमच्या पेंडगावी त्यांचा स्वागताचा कार्यक्रम आम्ही ठेवला होता. आमच्या गावांना सभोवतालची मंडळीही या कार्यक्रमाला हजर होती. या अगोदरही आमच्या या छोट्याशा गावी या नेत्याचे स्वागत कार्यक्रम अनेकदा झाले होते. पण, आजचा कार्यक्रम सर्वस्वी वेगळा होता. साहेब आयुष्याच्या बऱ्याच राजकीय हालचालीनंतर येत



होते. तसेच यावेळी ते कुठल्याच सत्तेवरही नव्हते. फक्त सत्ताधारी पक्षाचे खासदार होते. तरी देखील माणसांची गर्दी कमी नव्हती.आम्ही सर्व ग्रामस्थ हारतुरे घेऊन रस्त्यावर उभे होतो. रस्त्यावरील गर्दी पाहून यशवंतरावजींनी आपल्या ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितली. पांढऱ्या रंगाची ॲम्बेसिडर कार होती. चव्हाण साहेबांसोबत राज्याचे माजी मंत्री ना. माणिकरावजी दादा पालोदकर होते. (कै.) खा. रामरावजी होते. गाडी थांबताच रामरावजी गाडीखाली प्रथम आले. नंतर साहेब जागचे उठू लागले. पण, त्यांना जागचे उठणे कठीण जाऊ लागले. उठताना सर्वांग थरथरत होते. तरीसुद्धा उत्साह मात्र कायम होता. मी हे जवळून पाहत होतो. या उदंड उत्साहामुळे व माणुसकीच्या प्रेमामुळे ते थरथरत का होईना गाडीबाहेर आले. लोकांचे स्वागत स्वीकारले आणि सर्वांना प्रेमाशीर्वाद देऊन गाडीत बसले. ते गाडीत बसल्यावर गाडी निघून गेली. आम्ही सर्व जण आमच्या लाडक्या नेत्याचे अखेरचे दर्शन घेत आहोत हे कोणालाच वाटत नव्हते. काळ इतक्या लवकर त्यांना आमच्यामधून नेईल असे वाटले नव्हते. पण, शेवटी घडले ते अघटितच आणि २६ नोव्हेंबर १९८४ रोजी आमचा लाडका नेता आमच्यामधून निघून गेला.

**संपर्क : ९४२२७३८१७४**





Y. B. Chavan

1, RACE COURSE ROAD,
NEW DELHI-110011.

November 18, 1983

Dear Mrs. Chandrakala,

I was delighted to see the portrait of late Shri B.V. alias Mama Varerkar, a noted play-write made by you,during my short visit to Bombay. Indeed, you seem to have a fine grasp of human anatomy and ability to go deep beyond the surface.

I am sure, you will continue to develop this fine art more and more so that one day we will have found a matchless artist in you.

With all my good wishes,

Yours sincerely,

(Y.B. Chavan)

Smt. Chandrakala,
C/O Kumar Kadam,
22, New Javeri Bldg.,
Jagannath Bhatankar Marg,
Parel, Bombay-12

## या अंकाचे मुखपृष्ठ आणि आतील तैलचित्रांची निर्मिती करून देणाऱ्या चित्रकर्तीची आठवण

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे कुशल राजकारणी म्हणून जसे ख्यातकीर्त होते, तसेच एक जाणते साहित्य आणि कलारसिक म्हणूनही त्यांची आपल्या देशाला ओळख आहे. एक कलाकार म्हणून त्यांच्याशी संवाद करण्याचे भाग्य मला लाभले, त्याबद्दल मी स्वत:ला धन्य मानते.

१९८३ साली थोर साहित्यिक आणि नाटककार स्वर्गीय मामा वरेरकर यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. त्या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मंत्री या नात्याने चव्हाणसाहेब उपस्थित होते. या समारंभाकरिता स्व. मामांचे मुख्य तैलचित्र काढण्याचे काम मामांच्या कन्या (स्व.) श्रीमती माया ऊर्फ माई चिटणीस यांनी माझ्याकडे सोपविले होते. व्यावसायिक चित्रकार म्हणून एका प्रतिष्ठित समारंभासाठी तयार केलेले माझे ते पहिलेच भव्य तैलचित्र होते. (हे तैलचित्र लोकराज्याच्या मामा वरेरकर जन्मशताब्दी विशेषांकाच्या मुखपृष्ठावर नंतर छापण्यात आले होते.)

समारंभाचा उद्‌घाटन सोहळा संपताच माई चिटणीस यांनी चव्हाणसाहेबांना तैलचित्राच्या जवळ नेऊन ते दाखविले. तेव्हा त्यांच्याकडून उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया उमटली. ते म्हणाले, ‘‘हे तैलचित्र जर आज पाहिलं नसतं तर मी माझ्या जीवनातील एक मोठ्या आनंदाला मुकलो असतो.’’ त्यांनी त्यावेळी चित्रकार म्हणून माझी पाठ थोपटली. माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरणारा पहिलाच आणि माझ्या कलेच्या पुढील वाटचालीचा मानबिंदू ठरणारा तो क्षण होता.

त्यानंतर काही दिवसांनी मुंबईत आल्यानंतर चव्हाणसाहेबांनी ‘रिव्हेरा’ येथील त्यांच्या मुक्कामी मला बोलावून घेतले आणि माझ्याकडून स्व. वेणूताईंचे तैलचित्र काढून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. ते तैलचित्र काढण्यासाठी त्यांना पसंत असलेले स्व. वेणूताईंचे मूळ छायाचित्र त्यावेळी त्यांच्या हाती लागले नाही. मात्र, आपण दिल्लीला गेल्यानंतर ते पाठवून देऊ, असे ते त्यावेळी म्हणाले. परंतु, अखेरपर्यंत तो योग आला नाही. स्वत: चव्हाणसाहेबच हे जग सोडून गेले.

दरम्यान, त्यांनी मला पाठविलेले स्व. मामा वरेरकर यांच्या तैलचित्राबद्दलचे कौतुकाचे पत्र आजही मला प्रेरणा देत असते.

**– सौ. चंद्रकला कुमार कदम**
**संपर्क : ९८६९४००५६८**





# चित्ररूप दर्शन



मातोश्री - विठाई ( वर्ष १९६०)



महाराष्ट्रराज्य स्थापनेच्या मंगलकलशाचे स्वागत.. (१ मे १९६०)




महाविद्यालयीन युवक यशवंतराव चव्हाण ( वर्ष १९३४)



यशवंतराव - एक उभरते व्यक्तिमत्त्व



बालगोपाळ मंडळीत कौटुंबिक आनंदात ( वर्ष १९८२)




यशवंतराव - भावमुद्रा २



सौ. वेणुताई चव्हाण



विहंगम दृष्यावलोकन



गृहस्थाश्रमी, पत्नी व मातेसह



सेनापती बापट यांचे बरोबरच्या क्षणी



शिवछत्रपती पुतळ्याचे अनावरण, आचार्य अत्रे यांचे सोबत २६-१-१९६१,मुंबई



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सोबत..



सह्याद्रीच्या वाऱ्यांना आव्हान....



पत्नी वेणुताई आणि पंडीतजीं समवेत



चंद्रशेखर यांचे समवेत.... (वर्ष १९७९)



दलाई लामां समवेत



स.का.पाटील यांचे समवेत



बाबु जगजीवनराम यांचे सोबत...



सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांचे सोबत



वरदहस्त...



संरक्षणमंत्री सलामी स्वीकारताना.... (१९६४)




रशियातील दौऱ्यावर स्वागत स्वीकारताना...(१९६४)



प्रत्यक्ष शिक्षण देतानाची पहाणी (१९६४)



परदेशी अधिकाऱ्या समवेत चर्चा... (१९६४)



परदेश दौऱ्यावर सलामी स्वीकारताना.. (१९६४)



इजिप्तमधील पिरॅमिडच्या पार्श्वभूमीवर.. (१९७५)



विक्रांत नौकेचे जलावतरण - सोबत सौ. वेणुताई (१९६४)



मुद्रा सलामीच्या....




संरक्षणमंत्री नात्याने नागपूर येथे उद्घाटन प्रसंगी....(१९६४)



लडाख येथील ग्रामस्थांसमवेत लोकसंगीताच्या तालावर.. (१९६१)



एका विरंगुळ्याच्या क्षणी वेणूताई आणि लाडका कुत्रा मोती.



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि नेहरूंसमवेत



मराठवाडा विद्यापीठातील पदवीदान प्रसंगी



मोहन धारिया मित्राच्या भेटीला....



१४ एप्रिल १९४६ पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड



२७ नोव्हेंबर १९८४ अंत्ययात्रा-कराड



# सभ्यता आणि नम्रता

**आयुष्यात एक गोष्ट माझ्या कायम लक्षात राहील, की आजपर्यंत माझी जी काही वाटचाल झाली, त्याचा भक्कम पाया हा चव्हाणसाहेबांनीच घातला होता. 'राजकारणात लोक जोडले पाहिजे, समाजाच्या विविध घटकांशी सुसंवाद ठेवला पाहिजे; साहित्य, संगीत, नाट्य, कला-क्रीडा यांच्याशी जवळीक ठेवली पाहिजे. कितीही मोठ्या पदावर गेलो, तरी सभ्यता, सुसंस्कृतपण व नम्रता यांचं विस्मरण होता कामा नये... अशा शब्दांत केंद्रीय कृषिमंत्री *शरद पवार* यांनी यशवंतराव चव्हाणांच्या आठवणींवर टाकलेला दृष्टिक्षेप.**

सार्वजनिक जीवनात काम करण्याची आवड मला लहानपणापासून होती. शालेय जीवन ते महाविद्यालय असा कालखंड असो, त्यातील क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन अथवा कुठलाही मोठा समारंभ असो, साऱ्या जबाबदाऱ्या माझ्याकडे असायच्या. अभ्यास सोडून अन्य गोष्टीत माझा बराच वेळ जायचा. त्यातील व्यस्तता वाढत गेली. माझं घर, माझे कुटुंबीय यांच्यावर सत्यशोधक चळवळ आणि शेकापच्या कामकाजातून डावी विचारसरणी यांचा पगडा होता. १९६८ साली मॅट्रिकची परीक्षा देऊन पुण्याच्या बृहन् महाराष्ट्र कॉलेजमध्ये आलो आणि वसतिगृहात राहायला लागलो. बाहेर राहण्यामुळे बाकी साऱ्या गोष्टी करण्यास मुभा मिळाली. त्यात पहिल्या वर्षी कॉलेजमधील निवडणूक लढविली व विजयी झालो. मग, महाविद्यालयातील अनेक उपक्रमांत माझा सहभाग वाढला.

१९५८-६० या काळात, महाराष्ट्रात आज जशी प्रत्येक तालुक्यात महाविद्यालये आहेत, तशी नव्हती. बारामतीला महाविद्यालय नव्हतं. आज ती डझनावारी पाहावयास मिळतात. त्या काळात पुणं शैक्षणिक केंद्र होतं. तिथं मुलामुलींना शिक्षणासाठी पाठविण्याचा कल होता. बाहेरून ते यायचे. माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात, व्याप्ती व कार्यकक्षा पुण्यात वाढायला लागली व त्याचा विस्तार होत गेला, याचं महत्त्वाचं कारण या विद्यार्थ्यांना मदत करण्यात मी घातलेलं लक्ष. अहमदनगर, खानदेश, मराठवाडा, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आदी जिल्हावार मित्रमंडळं आम्ही संघटित केली. पुणे महाविद्यालयातील निवडणुकात मी व माझ्या सहकाऱ्यांचा पुढाकार होता. परिस्थिति अशी, की आमचंच पॅनल निवडून यायचं, ज्यानं विद्यार्थ्यांत ही भावना वाढली, की यशाचं श्रेय आमच्या गटाकडे गेलं पाहिजे. १९५६-५८ या कालखंडात संयुक्त महाराष्ट्र चळवळीनं महाराष्ट्रात वेगळं वातावरण निर्माण केलं. आचार्य अत्रे, एस.एम. जोशी, ना.ग. गोरे, उद्धवराव पाटील, नाना पाटील, शाहीर अमर शेख अशी अनेकांची नावं घेता येतील. या सर्वांनी संयुक्त महाराष्ट्रात वेगळं वातावरण निर्माण केलं. त्यावेळी महाराष्ट्र द्विभाषिक राज्य होणं, याची मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांची होती. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांची, ''द्विभाषिक मोडावं व संयुक्त महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये स्वतंत्र व्हावीत,'' ही भूमिका जनमानसात रुजली होती. १९५७च्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. परंतु, संयुक्त महाराष्ट्र समितीला बहुमत मिळालं नाही व प्रतिकूल परिस्थितीत राज्य चालविण्याची जबाबदारी चव्हाण यांच्यावर आली. आम्हा तरुण पिढीचा पाठिंबा संयुक्त महाराष्ट्र समितीसाठी होता. त्यावेळच्या लोकांच्या प्रक्षोभाला अत्यंत सामंजस्याने सामोरे जाण्याची यशवंतरावजींची भूमिका होती. मात्र, तत्पूर्वीचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांची भूमिका उद्दामपणाची असायची, म्हणून या पार्श्वभूमीवर यशवंतरावजींचं व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत दिसत होतं. संयुक्त महाराष्ट्र व्हावा, असं त्यांना वाटत होतं, तरी पंडित जवाहरलाल नेहरू यांना दुखविण्याची त्यांची तयारी नव्हती. ''महाराष्ट्रापेक्षा नेहरू मला मोठे वाटतात,'' हे चव्हाणसाहेबांचं एक वाक्य प्रसिद्ध झालं व संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांनी त्यांच्यावर प्रचंड हल्ले केले. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी जनतेची असलेली प्रचंड आग्रही भूमिका चव्हाणसाहेब जाणून होते. एका बाजूनं द्विभाषी राज्य चालवायचं व दुसऱ्या बाजूनं काँग्रेसश्रेष्ठींचं मन महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी वळवायचं, असा कार्यक्रम चव्हाणसाहेबांनी हाती घेतला होता. त्यावेळच्या काँग्रेस अध्यक्ष इंदिरा गांधी यांची साथ मिळाली व द्विभाषिक मोडायला मोरारजींचा सक्त विरोध असला, तरी नेहरूंचं मन महाराष्ट्राच्या बाजूला वळवायला यशवंतरावजी यशस्वी झाले. १९६०मध्ये नेहरूंच्या हस्ते राज्यनिर्मितीचा सोहळा मुंबईच्या राजभवनावर पार पडला.

महाराष्ट्राची निर्मिती होणार हे लोकांच्या ध्यानात आल्यावर राज्यातील वातावरण सपशेल बदललं व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी घेतलेली चव्हाणांची भूमिका जनतेच्या ध्यानात आली आणि यशवंतरावांबद्दलचे गैरसमज दूर होऊ लागले. त्या काळात मी व माझ्या सहकाऱ्यांनी युवक काँग्रेसच्या माध्यमातून पक्षीय कामाची सुरुवात केली होती. यामध्ये चव्हाणसाहेबांबाबतचं आकर्षण व उद्याच्या महाराष्ट्राबाबत त्यांची वैचारिक मांडणी, ही आम्हा सर्वांना आकर्षित करावयास कारणीभूत होती.

६२च्या निवडणुका झाल्या व चव्हाणांच्या काँग्रेसमधील नेतृत्वासाठी लोकांनी प्रचंड पाठिंबा दिला. त्यानंतर, देशाला चीनच्या आक्रमणाला सामोरं जावं लागलं. चिनी सैन्यानं भारतीय हद्दीत केलेला प्रवेश, भारतीय सेनेची झालेली दारुण अवस्था, यांचा भारतीय जनतेच्या मनावर विपरीत परिणाम झाला. संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी असलेले कृष्णमेनन यांच्यावर संसदेत चहूबाजूंनी प्रचंड हल्ले होऊ लागले आणि ते हल्ले नेहरू यांच्यापर्यंत जाऊ लागले. ही परिस्थिती सावरण्यासाठी नेहरूंनी मेनन यांना पदावरून दूर करून चव्हाण यांना दिल्लीत पाचारण केलं व संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सुपूर्द केली. समाधानाची बाब म्हणजे, त्यांनी सूत्रं हाती घेतली व चीननं युद्ध विरामाची घोषणा केली. चीनच्या या निर्णयानं देशात सर्वत्र चव्हाणसाहेबांबद्दल आस्था व विश्वासाची भावना वाढू लागली.

मानसिकदृष्ट्या खचलेल्या भारतीय सेनेला उभारी देण्यासाठी सर्व सीमांवर फिरून चव्हाणसाहेबांनी त्यांचा आत्मविश्वास वाढवायला



सुरुवात केली. संरक्षणात्मक आयुधांची उभारणी करण्याबाबत पूर्वी झालेल्या दुर्लक्षाचे परिणाम त्यांनी पाहिले व त्यावर लष्करी साधनसामग्री उपलब्ध करून सेनेचा आत्मविश्वास वाढविण्यात यशवंतरावजी यशस्वी झाले. माझ्यासारखे लक्षावधी तरुण त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले.

अधिक जोमानं त्यांच्या विचारांची काँग्रेसची नवी पिढी उभी करण्याच्या कामाला आम्ही लोकांनी सुरुवात केली. मला आठवतंय, की पुण्याच्या मी शिकत असलेल्या महाविद्यालयात आम्ही त्यांना आमंत्रित केलं होतं. त्या प्रसंगी स्वागताची जबाबदारी माझ्यावर होती. कार्यक्रम संपल्यावर त्यांनी अगत्यानं माझी विचारपूस केली. महाराष्ट्राचं संपूर्ण चित्र जाणून घेण्याची त्यांची इच्छा असायची. माझं नाव, गाव विचारून घेतल्यावर माझी कौटुंबिक पार्श्वभूमी लगेच त्यांच्या लक्षात आली व तरुणांमध्ये काम करण्याच्या माझ्या भूमिकेबाबत त्यांनी मला बरंच प्रोत्साहित केलं. नंतरच्या काळात त्यांची कुठेही सभा, कार्यक्रम असला, की आम्ही लोक मोठ्या आनंदानं तिथं उपस्थित असायचो.

दिल्लीमध्ये त्यांचं स्थान व प्रतिष्ठा वाढती राहिली. भुवनेश्वरच्या काँग्रेस अधिवेशनात नेहरूजींची प्रकृती अचानक बिघडली व त्यानंतर २७ मे १९६४ रोजी त्यांचं निधन झालं. नेहरूजींच्या पदावर लालबहादूर शास्त्री यांची नियुक्ती झाली. त्याही मंत्रिमंडळात संरक्षणपदाची जबाबदारी चव्हाणसाहेबांवर आली. यशवंतरावजींनी त्या मर्यादित कालखंडात सैन्याचा आत्मविश्वास वाढविल्याने ते यशस्वी झाले होते. आधुनिक हत्यारांची असलेली कमतरता त्यांनी दूर केली होती. त्याची प्रचिती, त्याच काळात पाकिस्तानने भारताविरुद्ध केलेली आगळीक व त्यास सेनेने भक्कमपणे शिकविलेला धडा, यातून आली. संपूर्ण भारतीय जनतेचा आत्मविश्वास वाढला व यशवंतरावजींबद्दल गौरवाची व अभिमानाची भावना जनमानसात निर्माण झाली. भारत-पाक युद्धात पाकिस्तानची झालेली स्थिती लक्षात घेऊन हा संघर्ष वाढू नये, या भावनेनं भारताचा मित्र सोव्हिएत रशियानं दोन्ही देशांच्या प्रमुखांना समन्वयासाठी ताश्कंद येथे आमंत्रित केलं. तिथं करार-मदार झाले. त्या करारात पाकिस्तानची घेतलेली भूमी व पकडलेलं सैन्य सोडण्याचा निर्णय घेतल्यानं त्याची प्रतिक्रिया भारतात उमटायला लागली. त्याचवेळी शास्त्रीजींच्या निधनाची बातमी वज्राघातासारखी भारतात पसरली. त्यांच्याबरोबर असलेले यशवंतराव दिल्लीस परतले, ते शास्त्रींचा मृतदेह घेऊन.



शरद पवार यांचे समवेत ( वर्ष १९७८)

पुन्हा पंतप्रधानपद रिकामं झाल्यावर त्या पदासाठी नेतृत्वात चर्चा सुरू झाली. काँग्रेस कार्यकारिणी व संसदीय मंडळात नेतृत्वाचा मोठा वर्ग चव्हाण यांनी ती जबाबदारी घ्यावी, या मताचा होता. तसं त्यांना सुचविलं गेलं. परंतु, याबाबत स्वतः निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी काँग्रेस अध्यक्ष इंदिराजींच्या मदतीचं स्मरण त्यांनी ठेवलं व इंदिराजींशी चर्चा केली. इंदिराजींची स्वतः पंतप्रधान बनण्याची इच्छा असेल, तर त्याला सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली असावी. त्यानंतर इंदिराजींचं नाव पक्षानं सुचविलं व त्या पंतप्रधान झाल्या.

या सर्व काळात तरुणांमध्ये काम करण्यास मला चव्हाणसाहेबांकडून सतत प्रोत्साहन मिळत होतं. संपूर्ण राज्यातील युवकांची जबाबदारी त्यांनी माझ्याकडे सुपूर्द केली. यशवंतरावजींचं मार्गदर्शन मिळू लागलं. त्यांच्याशी जवळून सुसंवाद साधण्याची संधी मला मिळाली. माझ्या मते, माझ्या व्यक्तित्वात, राजकीय प्रगतीमध्ये चव्हाणसाहेबांचा सहवास, प्रोत्साहन हे अत्यंत उपयुक्त ठरलं.

महाराष्ट्रात संघटनेच्या वाढीसाठी युवक काँग्रेसच्या मोठ्या कार्यक्रमात चव्हाणसाहेबांची उपस्थिती प्रकर्षानं असायची. माझा मुक्कामही मुंबईतील प्रदेश काँग्रेसच्या टिळक भवनात असायचा. तिथला काही वर्षांचा निवारा, हा राज्यातल्या काँग्रेसजनांशी व विविध घटकांशी सुसंवाद साधण्यास अतिशय उपयुक्त ठरला.

१९६६च्या अखेरीस महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका आल्या. मी अर्ज करावा, असं माझ्या सहकाऱ्यांनी सुचविलं. माझीही इच्छा होती. पण, पुणे जिल्ह्यातील ज्येष्ठ काँग्रेसजनांचं मला मुळीच समर्थन नव्हतं. मी अर्ज केलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडीची चर्चा झाली, त्यावेळी सर्व ज्येष्ठ काँग्रेसजनांनी, 'माझ्यात निवडून येण्याची क्षमता नाही,' असं अत्यंत आग्रहानं मांडलं. या बैठकीस उपस्थित असलेल्या चव्हाणसाहेबांनी विरोध करणाऱ्या ज्येष्ठ काँग्रेसजनांना सहजच प्रश्न विचारले, की निवडणुकीत काँग्रेसला किती जागा मिळतील, निवडणुकीनंतर राज्यात काय चित्र असेल? कुणी २८८पैकी २०० जागा मिळतील, तर कुणी त्यापेक्षा कमी-जास्त मिळतील, अशी उत्तरे दिली. त्यावेळी चव्हाणसाहेबांनी त्यांना सांगून टाकलं, ''याचा अर्थ साठ, सत्तर मतदारसंघात आपला पराभव होणार अशी स्थिती दिसते, असा तुमचा अंदाज आहे. त्यामध्ये पराभवासाठी आणखी एका जागेची भर घालू व शरदला संधी देऊ.'' चव्हाणसाहेब प्रचारासाठी माझ्या मतदारसंघात देखील आले.



मतदारसंघातील सर्व तरुणांनी निवडणुकीची सूत्रं हाती घेतली होती. त्यावेळी पुणे जिल्ह्यात सर्वांत जास्त मतांनी माझा विजय झाला. दुसऱ्या दिवसापासून मी मतदारसंघ व राज्यातल्या संघटनेच्या कामात अधिक कष्ट घेण्यास सुरुवात केली.

हल्ली निर्वाचित झाल्यावर अनेकांना लगेचच मंत्रीपदाची स्वप्न पडतात, तो विचार माझ्या मनातही आला नाही. युवक काँग्रेसच्या प्रमुखापासून ते संघटनेतील ज्येष्ठांमध्ये काम करण्याची मला संधी मिळाली व महाराष्ट्र काँग्रेसच्या सरचिटणीसपदी माझी निवड झाली. त्या पाच वर्षांत मी विधिमंडळ व संघटनेत अतिशय कार्यप्रवण राहिलो. ७२ची निवडणूक झाली व मुख्यमंत्री असलेल्या वसंतराव नाईकांनी मंत्रिमंडळाची यादी करून ती काँग्रेस अध्यक्षांना सादर करून तिला मान्यता घेतली. माझं नाव त्यात नव्हतं व मी तशी अपेक्षाही केली नव्हती. पण, मला नंतर समजलं, की नाईकसाहेबांनी इंदिराजींकडून मान्यता करून घेतलेली यादी चव्हाणसाहेबांना दाखविली. ती पाहून माझं नाव न दिसता, चव्हाणसाहेबांनी इंदिराजींशी दूरध्वनीवर संपर्क साधला व ''नव्या पिढीला संधी देण्यासाठी माझं नाव त्यात असलं पाहिजे,'' असं सांगितलं. त्या सूचनेला इंदिराजींनी मान्यता दिली व माझी राज्यमंत्रीपदी नियुक्ती झाली. मला गृह व सामान्य प्रशासन या मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या खात्यात काम करण्याची संधी देण्यात आली.

ही संधी चव्हाणसाहेबांनीच दिली होती. नंतर ते मला सतत प्रोत्साहित करीत होते व संघटनेत नवी पिढी आणली पाहिजे, याकडे लक्ष देत होते. पक्षाच्या बैठकीत एकदा त्यांनी सुचविले होते, की भाकरी फिरविली पाहिजे, ती फिरविली नाही तर करपते. महाराष्ट्राच्या राजकारणात भाकरी करपून द्यायची नाही. आयुष्यात एक गोष्ट माझ्या कायम लक्षात राहील, की आजपर्यंत माझी जी काही वाटचाल झाली, त्याचा भक्कम पाया हा चव्हाणसाहेबांनीच घातला होता. 'राजकारणात लोक जोडले पाहिजेत, समाजाच्या विविध घटकांशी सुसंवाद ठेवला पाहिजे, साहित्य, संगीत, नाट्य, कला-क्रीडा यांच्याशी जवळीक ठेवली पाहिजे. कितीही मोठ्या पदावर गेलो, तरी सभ्यता, सुसंस्कृतपण व नम्रता यांचं विस्मरण होता कामा नये. आपल्यापेक्षा अनुभव असलेल्या व्यक्तींपेक्षा आपली राजकीय प्रतिष्ठा अधिक असली, तरी जाणकारांच्या समोर आपण विनम्रच राहिले पाहिजे व अशा व्यक्तींपासून शिकण्याचा प्रयत्न नेहमीच केला पाहिजे,' ही भूमिका चव्हाणसाहेबांनी आमच्या समोर सतत मांडली. विविध क्षेत्रातील माणसं जोडण्याचं काम यशवंतरावजींनी केलं, तसंच, ग्रंथांशी सुसंवाद ठेवून वाचन संस्कृतीचं महत्त्व त्यांनी नव्या पिढीसमोर ठेवलं.

मी व माझ्यासारखे अनेक लोक भाग्यवान आहोत, की ज्यांना चव्हाणसाहेबांसारख्या व्यक्तिमत्त्वाचा ठेवा प्राप्त झाला. प्रशासनामध्ये काम करण्याची संधी मिळाली, तरी प्रशासनाला एक मानवी चेहरा असलाच पाहिजे व प्रशासकीय यंत्रणेला विश्वास देऊन, तिचा विश्वास संपादन केला पाहिजे. समाजात काम करण्याची जी संधी मिळेल, ती प्रशासनात असो, की अन्य क्षेत्रात, त्यापाठी सामान्य जनांचं समर्थन आहे. त्यांच्या हिताच्या जपणुकीचे विचार कायम ध्यानात ठेवले पाहिजेत, हा आदर्श चव्हाणसाहेबांनीच आम्हापुढे ठेवला.

## कर्तबगार कोकण !

**कोकणचे पहिले महत्त्वाचे साधन म्हणजे कोकणची माणसे असे मी मानतो. कोकणमध्ये कर्तबगार, बुद्धिमान असे मनुष्यबळ आहे; पण, त्याला आपल्या बुद्धिमत्तेचे व कर्तृत्वाचे पाणी दाखविण्याकरिता कोकणची सरहद्द ओलांडावी ही गोष्ट काहीशी खरी आहे. परंतु, विकासाच्या कुठल्याही योजनेमध्ये माणूस हा अतिशय महत्त्वाचा भाग आपण मानला पाहिजे. कारण, विकास हा जरी विकासाची साधने निर्माण करण्यामुळे मुख्यत: होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा जो मनुष्य आहे त्याचा विकास हीच योजनेतील शेवटी फार महत्त्वाची गोष्ट असते.**

**(कोकण विकास परिषदेचे उद्घाटन, मुंबई, दि. १७ फेब्रुवारी १९५९)**

१९८०च्या निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये विभाजन झालं. इंदिराजींनी 'काँग्रेस (आय)' हा पक्ष स्थापन केला. दुसरीकडे स्वर्णसिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसमध्ये आम्ही सारे सामील झालो. त्यावेळी मी राज्याचा मुख्यमंत्री होतो. काँग्रेस (स्वरणसिंग)ला यश मिळविण्यासाठी राज्यात कष्टही घेतले होते. पण, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर साताऱ्यातून केवळ यशवंतराव विजयी झाले. निवडणुकीच्या निकालानंतर, ''लोकांनी इंदिराजींच्या काँग्रेसला स्वीकारलं. हा जनतेचा कौल आपण स्वीकारावा,'' अशी मन:स्थिती चव्हाणसाहेब मांडू लागले. मला आठवतं, की ९ मे ला सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व आजचे माजी खासदार लक्ष्मणराव पाटील यांच्या घरी चव्हाणसाहेबांसमवेत आम्ही सारे जमलो होतो. तिथं 'काँग्रेस आय'मध्ये जाण्याची भूमिका चव्हाणसाहेबांनी मांडली. बहुतेकांनी तिचा पुरस्कारही केला. काहींना ती पसंत पडली नाही. तरी ''चव्हाणांबरोबर आम्ही जाणार,'' असं मत अनेकांनी मांडलं. मी मात्र वेगळं मत मांडलं. काँग्रेस आयमध्ये चव्हाणसाहेबांसारख्या एका कर्तृत्ववान ज्येष्ठ नेत्याला सन्मानाची वागणूक मिळणार नाही, याबाबतची अस्वस्थता माझ्या मनात होती, म्हणून तिथं जायला माझ्या मनाची अजिबात तयारी नव्हती. आयुष्यात चव्हाणसाहेबांच्या विचारापेक्षा मी वेगळी भूमिका घेतली. याचा मला प्रचंड यातना झाल्या. तशा माझ्यावर सर्वाधिक प्रेम करणाऱ्या यशवंतरावजींनाही झाल्या. राज्यामध्ये 'काँग्रेस एस'चं काम वाढविण्यात आम्ही लोक कष्ट घेऊ लागलो. त्यास जरा कुठं चांगला प्रतिसाद मिळाला, की त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान लपायचं नाही. दिल्लीत गेल्यावर माझं त्यांच्याकडे आवर्जून जाणं असायचं. त्याच काळात वेणूताईंचं निधन झालं, आणि हिमालयाच्या उंचीचा व निर्णय घेण्यासाठी सह्याद्रीसारखा भक्कम काळजाचा हा नेता स्वत:ला सावरू शकला नाही. राजकारणातल्या चढउतारांचा सामना त्यांनी नेहमीच केला; पण, जन्मभर सर्व परिस्थितीत साथ देणाऱ्या वेणूताईंची गैरहजरी ते कधीच सहन करू शकले नाहीत. घरी गेल्यावर ताईंचा विषय निघायचाच अवकाश, की त्यांचे डोळे डबडबून जायचे.

**शब्दांकन : विजय नाईक,**
ज्येष्ठ पत्रकार, नवी दिल्ली
**संपर्क :०९८१००४१०८२**



# माणसे जोडणारा 'माणूस'

**महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री कसा असावा, हा आदर्श कै. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिला. केवळ काँग्रेस नव्हे, तर विरोधी पक्षाच्या सदस्यांनाही ते सन्मानाची वागणूक देत असत. ते राज्याचे दिलदार राजाच होते, शेकापक्षाचे ज्येष्ठ नेते भाई *डॉ. केशवराव धोंडगे* यांनी आठवणींना दिलेला उजाळा.**

मी १९५७च्या मुंबई विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा निवडून आलो, तेव्हा त्यांची आणि माझी ओळख झाली. ती ओळख त्यांनी मोठ्या पदावर जाऊनही कायम ठेवली. आमदार झालो तेव्हा मतदारसंघात मनार नदीवर धरण उभारण्याच्या संदर्भात आम्ही सत्याग्रह सुरू केला होता. या धरणाच्या निमित्ताने माझी आणि त्यांची चर्चा झाली होती. तत्कालीन मुख्य अभियंता श्रीधरराव जोशी यांच्या मदतीमुळे मी या धरणाचा चांगला अभ्यास केला होता. हे धरण वरच्या बाजूला शिवाजी धरण या नावाने आणि खालच्या बाजूला संभाजी धरण या नावाने अशी दोन धरणे करावीत, अशी आमची मागणी होती. परंतु, पाटबंधारे विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेंच मार्क वेगळ्या होत्या. तेव्हा नदी बदलण्याची ताकद कोणात नाही, असे आम्ही विधानसभेत सुनावले होते; परंतु, आमची सूचना मान्य झाली नाही आणि अट्टहासाने मनार धरणाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण आले होते. परंतु, आम्ही विरोधात आंदोलन करू, अशी भीती वाटल्याने माझ्यासह भाई गुरुनाथराव कुरुडे, माणिकराव कळवे, संभाजी पेटकर, गणेशराव पाटील लुंगारे आदी कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. सरकारच्या विरोधात आम्ही आंदोलन करीत असताना त्यांनी कधीही कटुता आणली नाही. तो जनतेचा, समाजाचा प्रश्न आहे या उदात्त हेतूने त्यांनी हा प्रश्न हाताळला होता. मनार धरण झाले; परंतु, आम्ही केलेली सूचना मान्य झाली नाही.

२८ ऑक्टोबर १९५८ रोजी कंधार तालुक्यात श्री शिवाजी मोफत विद्यालय सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला आणि या शाळेच्या उद्घाटनासाठी यशवंतरावांनी यावे यासाठी त्यांच्याकडे प्रस्ताव ठेवला. मी विरोधी पक्षाचा सदस्य असताना त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता येण्याचे मान्य केले. धोंडगे यांच्या शाळेच्या उद्घाटनाला यशवंतराव चव्हाण येणार असल्याने काँग्रस नेत्यांच्या पोटात गोळा उठला. काही जणांनी तर वातावरण बरे नसल्यामुळे या कार्यक्रमाला येऊ नये असा त्यांना सल्ला दिला होता. यशवंतराव कार्यक्रमाला येऊ नयेत, असे बरेच प्रयत्न झाले; परंतु, ते कोणालाही न जुमानता कार्यक्रमाला आले. ही आमची ऐतिहासिक भेट राजकारणाच्या इतिहासाच्या पानात आठवणीने कायमची कोरली गेली आहे. त्यांचा हा उदारपणा यानिमित्ताने आम्हाला पाहायला मिळाला. याच भेटीत मी गोरगरीब आणि वाडी-तांड्यावरच्या मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी शिवाजी महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. आधी लग्न करेन ते शिवाजी महाविद्यालयाचे अन् नंतर माझे. ही प्रतिज्ञा त्यांच्यासमक्ष केली. तेव्हा हे ऐकून यशवंतराव स्तब्ध झाले. त्यावेळी ते म्हणाले, ''केशवराव तुमच्या महाविद्यालयासाठी मी पण हातात झोळी घेऊन फिरेन.' मनाची एवढी उदारता त्यांनी दाखविली. याच काळात सीमा भागात आंदोलन चालू होते. १ नोव्हेंबर रोजी काळा दिवस पाळला जात होता. त्यादरम्यान, यशवंतराव नांदेड येथे आले आणि त्यांनी, 'केशवराव तुम्ही नांदेडला या.' असा निरोप धाडला. तेव्हा नांदेडच्या विश्रामगृहावर गेलो. तत्कालीन जिल्हाधिकारी एम.एन. देसाई, पोलिस अधीक्षक कासार यांच्यासमक्ष माझ्यात आणि त्यांच्यात चर्चा झाली. तेव्हा ते म्हणाले, ''केशवरावांच्या कॉलेजचे लग्न करायचे आहे.' केवळ ते असे म्हणाले नाहीत, तर तो शब्द पूर्ण करून दाखविला. राजकारणात दिलेला शब्द पाळावा लागतो. त्यांनी दिलेल्या शब्दानंतर कॉलेजला मंजुरी मिळाली आणि दि. १६ जून १९५९ रोजी शिवाजी कॉलेज सुरू केले व १५ ऑगस्ट १९६३ रोजी मी लग्न केले. हा दिवस अजूनही माझ्या स्मरणात आहे. गरीब मुलांसाठी काम करण्याची प्रेरणा त्यांच्यापासून मिळाली. माझी माय मुक्ताईने घरातच मुलांसाठी वसतिगृह सुरू केले. ती स्वत: भाकरी करून मुलांना जेवू घालत असे. तिला महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची नावेही माहीत नव्हती; परंतु, गरिबांबद्दल कणव होती. काही वर्षांत आमची माय मुक्ताईचे निधन झाले. काही दिवसांत यशवंतराव माझे सांत्वन करण्यासाठी रात्री १ वाजता कंधार येथे आले. त्यांनी मनाचा दिलदारपणा दाखविला. महाराष्ट्राचा दिलदार राजा कसा असावा हे मला तर कळालेच; पण, महाराष्ट्रालाही कळाले. ते उदारमतवादी, पुरोगामी विचारवंत होते. विरोधक म्हणून त्यांच्याकडे सूडबुद्धीची वागणूक नव्हती. पुढे ते देशाचे संरक्षणमंत्री झाले, तेव्हा कोयना प्रकल्पाच्या जलाशयाला शिवसागर हे नाव त्यांनी कंधारच्या धरणावरून दिले. संरक्षणमंत्री झाल्यानंतर त्यांचा महाराष्ट्र विधानसभेत सत्कार करण्यात आला. तेव्हा यशवंतरावांनी चौकशी करून केशवराव ठीक आहे ना, अलीकडे या, पुढच्या रांगेत बसा अशी सन्मानाची वागणूक दिली. शेषराव वानखेडे तेव्हा सभापती होते. विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. तेव्हा वानखेडे यांनी केशवराव काय विचारायचे ते विचारा असे म्हटल्यानंतर पाकिस्तानने भारताचा काही भाग गिळंकृत केला आहे तो परत आणा, अशी सूचना मी केली. हा प्रश्न त्यांच्यासाठी अडचणीचा होता. तरीही त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले. प्रत्येकाची ओळख ठेवण्याची ताकद, वक्तृत्वाची जादूगिरी, निष्कलंक चारित्र्य ही त्यांच्या जीवनाची वैशिष्ट्ये होती. आज राजकारणात औषधालाही अशी माणसे सापडत नाहीत. १९७८मध्ये मी लोकसभेत गेलो. तेव्हा शपथ घेतल्यानंतर हस्तांदोलन केले जाते. मी जयक्रांती म्हटलो. तेव्हा पंतप्रधान मोरारजीभाई देसाई आणि काँग्रेस नेते यशवंतराव चव्हाण यांची उपस्थिती होती. याच दरम्यान यशवंतराव भारताचे उपपंतप्रधान झाले, परंतु ते मला कधीही विसरलेले नाहीत. मोठ्या पदावर गेल्यानंतर माणसाला विसर पडतो, परंतु त्यांचा माणसे जोडण्याचा स्वभाव होता. लोकसभेत त्यांनी माझी चौकशी केली. विठामाईचा यशवंत सह्याद्रीच्या नव्हे, तर मनाचा मोठेपणा दाखवून बालाघाटचा आणि मन्याडचा ताईत बनला. या थोर नेत्याला माझी मानाची जयक्रांती!

**शब्दांकन : कमलाकर जोशी**
**संपर्क : ९४२२१७०८५०**



# विकेंद्रित सत्तेचा प्रणेता

**यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात नवयुवकांचे नेतृत्व उभे केले. नुसते एका समाजाचे, जातीचे नव्हे, तर त्यांनी बहुजन समाजाला वर उचललेच, पण त्याचबरोबर समाजातील सर्व जाती व धर्माच्या लोकांना राजकारणात आणले, तसेच सांस्कृतिक क्षेत्रातही आणले. स.गो. बर्वे यांच्यासारखा प्रशासक राजकारणात आणण्याचे श्रेय यशवंतरावांचेच होते. डॉ. रफिक झकेरिया या विद्वान व्यक्तीलाही त्यांनीच राजकारणात आणले. केंद्रीय ऊर्जामंत्री *सुशीलकुमार शिंदे* यांचे मनोगत...**

निरनिराळे विचार, धर्म व जातींच्या लोकांना राजकारणाच्या प्रवाहात आणून त्यांना सामाजिक दिशा देण्याचे फार मोलाचे कार्य यशवंतरावांनी केले. महाराष्ट्र हा प्रगत व संपन्न झाला पाहिजे. त्याचा नावलौकिक वाढला पाहिजे, ही त्यांची दृढ इच्छा होती; म्हणूनच त्यांनी प्रामुख्याने सामाजिक समता, शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य वाढविण्याचे काम केले व ही दृष्टी त्यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना दिली. यशवंतरावांनी उद्याच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आर्थिक संपन्नतेचा पाया घातला. बाराशे रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाच्या लोकांना त्यांनी शिक्षण मोफत केले होते. सत्तेचे विकेंद्रीकरणही त्यांनी केले आणि राज्यात पंचायत राज व्यवस्था आणली. यामुळे ग्रामीण भागातील नवी पिढी राजकारणात यायला सुरुवात झाली. मुंबईच्या वातावरणात यशवंतरावांनी कामगार चळवळी, सामाजिक लढ्यांची अनेक आंदोलने पाहिली व त्यांना कसे तोंड द्यावे, ते कसे हाताळावे याचे कसब त्यांनी आत्मसात केले. त्यांच्या नेतृत्वाचे गुण व कसब ओळखून तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना संरक्षणमंत्रीपद देऊन देशाच्या संरक्षणासाठी बोलावून घेतले आणि महाराष्ट्राचा हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला.

मी राजकरणात नवीन आलेलो होतो. श्री. शरद पवार यांच्याबरोबर काँग्रेस फोरम फॉर सोशालिस्ट ॲक्शनचा महासचिव म्हणून मी काम पाहत होतो. यशवंतराव हे शरदरावांचे राजकीय गुरू. शरदरावांनी माझी यशवंतरावांबरोबर ओळख करून दिली. मी नाईट हायस्कूलमध्ये शिकलो. निरनिराळ्या क्षेत्रात माझा सहभाग असतो इत्यादी माहिती शरदरावांनी त्यांना दिली. मी कोर्टामध्ये 'बॉय प्यून'चे काम करतो, हे कळल्यावर यशवंतरावांना आश्चर्य वाटले होते. यशवंतरावांचे वडील हे एकेकाळी कोर्टात 'बेलीफ' होते. मी कोर्टात प्यून होतो, कदाचित यामुळेही त्यांना माझ्याबद्दल अधिक प्रेम वाटत असावे. त्यावेळी यशवंतरावांचा डावा विचार, रॉयीस्ट विचार, सामाजिक समता, समाजवाद हे जवळून अनुभवण्याचा मला योग आला. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व वसंतराव नाईक या तिघा नेत्यांचे मी अतिशय जवळून निरीक्षण करीत असे. हे नेते कोणतेही प्रश्न कसे हाताळतात आणि सोडवतात याकडे कुतूहलाने, अभ्यासपूर्वक मी पाहत असे. यातून माझे नेतृत्व फुलले. मात्र, यात यशवंतराव यांचा विचार हा मूलभूत किंवा मुख्य विचार आहे.

यशवंतराव चव्हाण यांना वाङ्मय व कवितेची आवड होती. सत्तेवर नसताना देखील एकदा सोलापूरच्या डाकबंगल्यामध्ये रात्रीचे जेवण झाल्यानंतर, या डाक बंगल्याच्याच प्रांगणात सोलापूरमधील कवींच्या मैफलीत ते रमले होते. रात्री साडेनऊला सुरू झालेली ही मैफल पहाटे अडीच वाजता संपली.

यशवंतरावांनी लिहिलेल्या 'कृष्णाकाठ' या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे भाग्य मला लाभले, तेही कराडमध्ये! प्रकाशन समारंभाचा रिपोर्ट कुणीतरी यशवंतरावांना दूरध्वनीवर कळवला. त्यावर त्यांचा लगेच मला दूरध्वनी आला. सुशील तुझे भाषण फार चांगले झाले असे ऐकले, हे यशवंतरावांनी दिलेले सर्टिफिकेट माझ्या दृष्टीने फार मोलाचे होते. साहित्यिक, कलाकार, चित्रपट व्यावसायिक नाट्यकलावंत, दिग्दर्शक, नाटककार, लोकशाहीर व लोकनाट्य क्षेत्रातील कलाकारांबरोबर यशवंतरावांचे जवळचे, मित्रत्वाचे संबंध होते. म्हणूनच शासनात त्यांच्याकरिता काय केले पाहिजे, हे यशवंतरावांच्या कानावर यायचे; आणि त्याबाबत त्यांनी पावले उचलली देखील. नाटकावरील कर त्यांनी माफ केला. साहित्य संस्कृती मंडळाच्या स्थापनेचे श्रेय देखील यशवंतराव यांचे होते. कै. यशवंतरावांनी केलेले हे दिग्दर्शन हा विचार आम्हा लोकांच्या मनावर कायम ठसला, बिंबला आहे. मला वाटते की यशवंतरावांचा विचार घेऊन जर आम्ही पुढे गेलो तर कुठल्याही दृष्टीने महाराष्ट्र हे देशातील नंबर १चे राज्य होईल, याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

यशवंतराव चव्हाण यांचा mind set (मानसिक बैठक) हा बेरजेचे राजकारण करण्याचा होता. आजचे राजकारण हे तोडाफोडीचे आहे. ''खोटे बोल, पण रेटून बोल,'' अशा राजकारणात यशवंतराव किती टिकले असते याबद्दल मला शंका वाटते. He was a political philosopher like Pleto, but not Machiavelli (मॅकियाव्हली). मॅकियाव्हली म्हणतो, "a ruler should be brave like a lion & cunning like a fore" (''शासनकर्ता हा सिंहासारखा शूर आणि कोल्ह्यासारखा कावेबाज असला पाहिजे.'' परंतु, सर्वांना बरोबर घेऊन जावे व समतेचे राज्य करावे, असे प्लेटोचे तत्त्वज्ञान सांगते.

**शब्दांकन : सुरेखा टाकसाळ**
**संपर्क :०९८१८७२३७३३**

**आम्ही मागासलेले का ?**

आजपर्यंत परंपरेने आम्ही मानले की शेती ही काही शिकण्यासारखी गोष्ट नाही. दोन बैल घ्यायचे, गाडी-घोडा घ्यायचा आणि घरामध्ये जे बी-बियाणे असेल ते जमिनीत नेऊन टाकायचे, परमेश्वराने टाकले पावसाचे पाणी तर उगवले, नाहीतर नशीब आपले असे समजून गप्प बसायचे. असा हा शेतीचा व्यवसाय आम्ही केला आहे. यामुळे आम्ही मुळातच इतरांपेक्षा मागासलेले आहोत. शिवाय, निव्वळ शेतीवर जे राष्ट्र अवलंबून राहते ते मुळातच अडाणी राहते, मी सांस्कृतिकदृष्ट्या नाही म्हणत – मागासलेल्या शेतीचा देश हा अतिशय मागासलेला राहतो हे स्वीकृत तत्त्व आहे, स्वीकृत सत्य आहे.

(कृषी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा शिलान्यास, परभणी, दि. १५ फेब्रुवारी १९६०)



# आम्ही पाहिलेले यशवंतराव

**यशवंतराव चव्हाणांचे अनेकांशी ऋणानुबंध होते. माणसातील गुण हेरताच त्यांचे त्या व्यक्तीशी असलेले नाते अधिक घट्ट होत जाई. यातूनच त्यांनी खूप मोठा गोतावळा जमविला. यांपैकी ज्येष्ठ समाजसेवक *मोहन धारिया*, विधान परिषद सदस्य *उल्हास पवार* व माजी खासदार *श्रीनिवास पाटील* यांच्याशी ज्येष्ठ पत्रकार *अरुण खोरे* यांनी केलेली बातचित.**

शाळेत असताना जो विद्यार्थी ''मी यशवंतराव चव्हाण होणार!'' असे स्पष्टपणे लिहीत होता, तो खरोखर त्याप्रमाणे घडला. हे महाराष्ट्राने, देशाने बघितले आहे. यशवंतरावजी गरीब कुटुंबात जन्माला आले. त्यांच्या आई विठाबाई मोठ्या जिद्दीच्या. त्यांनी काबाडकष्ट करून त्यांना वाढवले, शिकवले, मोठे केले. स्वत: यशवंतराव जिद्दी, कष्टाळू होते आणि वाचनाची त्यांना खूप आवड होती. स्वातंत्र्यपूर्व काळात तुरुंगवासात असलेल्या तरुण कार्यकर्त्यांवर राजकीय संस्कार करायचे. यशवंतरावांचेही तसेच झाले. मानवतावादी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. भूमिगत पत्री सरकार स्थापन करणाऱ्या नाना पाटील यांना स्वातंत्र्यचळवळीत यशवंतरावांनी साथ दिली. अत्यंत कुशल संघटक असलेला हा नेता होता. काँग्रेस पक्षाच्या बांधणीचे मोठे काम महाराष्ट्रात त्यांनी उभे केले. काँग्रेसचे पार्लमेंटचे सेक्रेटरी म्हणून ते १९४६ साली निवडून आले, तेथपासून ते २५ नोव्हेंबर १९८४ साली अखेरचा श्वास घेईपर्यंत ते काँग्रेस विचारांशी, पक्षाशी एकनिष्ठ राहिले. एक मोठी क्षमता असलेला महाराष्ट्राचा हा नेता पंतप्रधान होऊ शकला असता, तेवढी योग्यता त्यांची होतीच, यात मला स्वत:ला शंका नव्हती. मात्र, ते भावनाप्रधान होते. नीतिमूल्ये, निष्ठा यांना त्यांच्या जीवनात स्थान होते आणि म्हणूनच सत्तेच्या राजकारणासाठी यातले काहीही बाजूला ठेवण्याची त्यांची तयारी नव्हती.

पंडित नेहरूंच्या निधनानंतर लालबहादूर शास्त्रीजी पंतप्रधानपदी आले. पंडित नेहरूंना चिनी आक्रमणानंतर जो धक्का बसला, त्यातून पंडितजी सावरले नाहीत. त्याच काळात जगातील अनेक राजकीय तज्ज्ञ आणि पत्रकार यांनी नेहरूंनंतर कोण ही चर्चा सुरू केली होती आणि यशवंतरावांचे नाव त्यात घेतले जात होते. शास्त्रीजी पंतप्रधानपदी आल्यावरही ही चर्चा सुरू होती. साधारणत: १९६५च्या ऑगस्ट महिन्यात शास्त्रीजींना हृदयविकाराचा झटका आला. काँग्रेस पक्षातील दादा मंडळींचा एक गट होता – त्यात अतुल घोष, निजलिंगप्पा, चंद्रभान गुप्ता, स.का. पाटील – हे ज्येष्ठ नेते होते. 'यंग टर्क' म्हणून तरुण तुर्क म्हटल्या जाणाऱ्या आम्हा खासदारांचाही एक गट होता, त्यात मी होतो, कृष्णकांत, उन्नीकृष्णन, चंद्रशेखर हे नेते होते. या तरुण तुर्कांच्या वतीने यशवंतरावांना भेटायला मी गेलो. वेळ अतिशय कसोटीची होती. नव्या दिल्लीतील १ रेसकोर्स या त्यांच्या निवासस्थानी मी आणि ओम मेहता त्यांच्याशी बोलायला गेलो. जवळपास अडीच तास ही चर्चा चालली होती. आता या कसोटीच्या काळात तुम्ही देशाचे नेतृत्व केले पाहिजे. हे आम्ही या सर्वांच्या वतीने त्यांना पटवून सांगत होतो. पक्षाला जे योग्य वाटते, ते करण्यावर आणि राजकारणासाठी सार्वजनिक जीवनातील नीतिमूल्ये सांभाळण्यावर भर देणारे ते नेते होते हे मला जाणवले. आम्ही दोघेही नाराजीने बाहेर आलो. त्यांना ते मान्य होणे शक्यच नव्हते. मी देखील त्यांना यामागच्या काळात जे बघितले, त्यावरून ते पक्षाशी, पक्षनेतृत्वाशी किती एकनिष्ठ होते, हे अनुभवले होते. जनता पक्ष स्थापन झाल्यावर १९७९ साली लोकसभेत या पक्षाची सत्ता जात असताना चरणसिंग काळजीवाहू पंतप्रधान झाले होते. त्यावेळीही माझ्यासारख्या अनेकांनी यशवंतरावांना पंतप्रधानपद स्वीकारण्याचा आग्रह केला होता. पण, त्याही परिस्थितीत त्यांनी तो मानला नाही. माझ्यासारखे उमदे नेते त्यांच्याकडून कसोटीच्या प्रसंगात कणखरपणाची, असीम धैर्याची अपेक्षा करीत असत. असाच एक प्रसंग आणीबाणीच्या संदर्भातला. त्याचा अध्यादेश केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी पंतप्रधान इंदिराजींनी राष्ट्रपतींकडून सही करून लागू केला होता. त्यावेळचे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाबाबत त्यांना विचारल्यावर 'दॅट, आय वुईल मॅनेज', असे उत्तर देऊन राष्ट्रपतींची सही मिळवली. (२५ जून, १९७५च्या रात्री) – दुसऱ्या दिवशी सकाळीच मंत्रिमंडळ बैठक झाली. त्यावेळी यशवंतराव आणीबाणीच्या निर्णयाला विरोध करतील, असे वाटले होते. पण, त्यांनी मौन स्वीकारून त्याला संमती दिली. 'पंतप्रधान महोदया, आपला हा निर्णय मला मान्य नाही,' असे सांगण्याचे धारिष्ट्य त्यांनी या बैठकीत दाखवले असते तर इतिहासाला निश्चितच वेगळे वळण मिळाले असते, असे मला वाटते.

यशवंतराव द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना मी त्यांना पुण्यातील एका रांगोळी प्रदर्शनाला भेट देण्याची विनंती केली. लक्ष्मी रस्त्यावरील गोखले हॉलमध्ये हे प्रदर्शन भरलेले होते. 'पंचवार्षिक योजना' हा त्या प्रदर्शनाचा विषय होता आणि १९५७ साल उलटून गेल्यामुळे दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली होती. उद्योगधंदे, धरणे बांधावयाच्या योजना, पशुधन, शेती, खादी उद्योग असे पंचवार्षिक योजनेशी जोडलेले अनेक विषय त्यात होते. शेतीच्या संदर्भात एका बैलाचे चित्रही रांगोळीतून रेखाटलेले होते. ते प्रदर्शन पाहायला १५ मिनिटांसाठी आले होते. प्रत्यक्षात तासभर ते रमले. कलाकारांना, संयोजकांना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यावेळी ते म्हणाले, ''रांगोळी प्रदर्शनासाठी आपण बोलावले, ते मला आवडले नव्हते. मात्र, हे प्रदर्शन पाहताना मलाच खूप नवी माहिती मिळाली, ज्ञान मिळाले. त्याचा उपयोग मला पंचवार्षिक योजनांच्या चर्चेच्या वेळी होईल.'' जाताना त्यांनी चित्रकारांसह एक ग्रुप फोटोही काढला.

जी स्त्री पतिनिष्ठ असते, तिच्यासाठी आपण 'पतिव्रता' असा शब्दप्रयोग वापरतो. यशवंतराव आणि वेणूताईंचे जे सहजीवन आम्ही बघितले, ते पाहिल्यावर आदराने माथा झुकतो. वेणूताईंशी असलेली त्यांची निष्ठा, प्रेम यांना शब्दच नाहीत. या दोघांच्या अतूट नात्याचा विषय महाकाव्याचाच आहे, असे मी मानतो. त्या काळी टीबी यासारख्या असाध्य रोगाने वेणूताईंना ग्रासले होते. ज्येष्ठ स्नेही किसन वीर यांनी आणि खुद्द वेणूताईंनी यशवंतरावांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह धरला. त्याकाळी द्विभार्या प्रतिबंधक कायदा नसतानाही यशवंतरावांनी हा सल्ला मानला नाही आणि वेणूताईंना कधीही अंतर दिले नाही. म्हणून मी ते 'पत्नीव्रती' होते, असे म्हणतो. आमच्या भेटीत जेव्हा वेणूताईंचा विषय निघाला त्या प्रत्येक वेळी यशवंतरावांचे डोळे अश्रूंनी भरले नाहीत, असे घडले नाही! वेणूताईंच्या निधनाने त्यांना जो धक्का बसला, त्यातून ते बाहेर आलेच नाहीत आणि त्यांनीही मग हे जग सोडले!

**– डॉ. मोहन धारिया**



# निवडून आल्यावर तुम्ही सर्वांचे...

युवक काँग्रेसची जबाबदारी सांभाळत असताना ऐन उमेदीच्या काळात चव्हाणसाहेबांचे मार्गदर्शन माझ्या पिढीला – व्यक्तिश: मला – मिळाले आणि प्रेमही! दादासाहेब चव्हाण त्यांचे पुतणे, पुण्यात त्यांच्याकडे आम्ही जात असू. साहेब त्यांच्याकडे येत असत. चिनी आक्रमणानंतर १९६२ साली पुण्याला बाबा पोकर्णा यांच्या भवानी पेठेतील घरी साहेब आले होते. त्यांच्याकडे बैठक होती. बॅ. गाडगीळही त्यावेळी होते. १९७१ साली मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. साधारणत: १९७२ साली ते पुण्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी येणार होते. त्यावेळेस साहेबांना पत्र लिहिले होते की, आपण कार्यक्रमासाठी माझ्या घराजवळच्या जागेत येत आहात. घरी आलात तर आनंद होईल. विमानतळावर त्यांचे स्वागत करायला अनेक ज्येष्ठ नेत्यांसह मीही गेलो होतो.

पुण्याच्या काँग्रेसचे नेते शिवाजीराव ढेरे, नामदेवराव मते, भाऊसाहेब शिरोळे हे तिथे होते. प्रत्येक जण आपल्या परीने घरी किंवा जवळच्या कार्यक्रमाला येण्याचा आग्रह करीत होता. ते नाकारत साहेब त्यांचे स्वीय साहाय्यक डोंगरे यांना म्हणाले, ''आपल्याला कार्यक्रमानंतर उल्हासच्या घरी जायचे आहे.'' त्याबरोबर सगळे नेते चमकले. काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला बळ देण्याची साहेबांची ही पद्धत होती. कबीर चौकाजवळच्या गंजीच्या मारुतीजवळच्या किराड वाड्यात ते कार्यक्रम संपल्यावर आले. मी २ खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहात होतो. घरापर्यंत साहेबांची गाडी जाऊ शकत नव्हती. ती लांब ठेवून ते चालत घरापर्यंत आले आणि समोरच्या ओट्यावर बसले. चहा घेतला व म्हणाले, ''अरे कराडला आमचे घर असेच होते.'' सर्व काँग्रेस पक्षात त्यावेळी साहेबांच्या शैलीचे वेगळेपण कौतुकाने सांगितले जात होते. त्यांचे माझ्यावर प्रेम होते, म्हणूनच १९७७ साली काँग्रेसतर्फे उमेदवारी मिळण्याची शक्यता असतानाही त्यांनी मला ''परिस्थिती बरी नाही, तू उभा राहू नकोस.'' असा सल्ला दिला होता.

लोकशाहीवर त्यांची प्रचंड निष्ठा होती. ते म्हणायचे, ''मतभेदाला मनभेदाचे, मनभेदाला व्यक्तिभेदाचे, व्यक्तिभेदाला व्यक्तिद्वेषाचे स्वरूप आले तर लोकशाहीचे मांगल्य संपून जाईल.'' लोकप्रतिनिधी कसा असावा, याबाबतही साहेब नेहमी आम्हाला सांगायचे, ''निवडून आल्यावर तुम्ही सर्वांचे असता. ज्यांनी मते दिली त्यांचे आणि ज्यांनी दिली नाहीत, त्यांचेही प्रतिनिधी म्हणून काम केले पाहिजे. जे करताना मला कराडचा फकीर आठवतो, तो कटोरा पुढे करायचा व म्हणायचा, 'जो देगा उसका भी भला, न देगा उसका भी भला,' ही भूमिका सच्च्या लोकप्रतिनिधीची असली पाहिजे.''

गांधी-नेहरूंच्या संस्कारात ते घडले असल्याने लोकशाहीवर निष्ठा तर होतीच; पण, लोकांच्या प्रश्नाप्रती असलेली बांधिलकी तितकीच मोठी होती. द्विभाषिक राज्य आणि नंतर संयुक्त महाराष्ट्र या दोन्ही वेळी मुख्यमंत्री पदावर ते होते. त्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग त्यांनी पंचायत राज व्यवस्थेतून राबवायला सुरुवात केली.

प्रगल्भ, निकोप नेतृत्व पंचायत राजमधून उदयाला यावे आणि त्याच्या प्रयोगशाळा व कार्यशाळा म्हणून पंचायत व्यवस्था राबवली जावी, ही यशवंतरावांची कल्पना होती. पंचायत राज व्यवस्था राबवणारे महाराष्ट्र हे अग्रणी राज्य होते, ते त्यांच्यामुळे हेही येथे नमूद केले पाहिजे. विधानसभेत, संसदेत जाणारे प्रतिनिधी या प्रयोगशाळेतून यशस्वीपणे काम करून गेले पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती. साऱ्या महाराष्ट्रात जाती-धर्माच्या पलीकडे काम करणाऱ्यांच्या हाती कारभार आला पाहिजे, या भावनेने त्यांनी काँग्रेस पक्षाच्या संघटनेतही लक्ष घातले होते. म्हणूनच त्यांनी बेरजेच्या राजकारणाची सुरुवात केली. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते दादासाहेब गायकवाड यांना त्यांनी काँग्रेससमवेत आणले. ही युती सामाजिक अभिसरणासाठी केली असल्याचे साहेब सांगत असत. दोन समाजामधला दुरावा दूर केला पाहिजे, असे ते तळमळीने मांडत असत. गावगाडा एकत्र चालला पाहिजे, यावरही यशवंतरावांचा भर असायचा. जात, धर्म, घराणेशाही, पैसा या गोष्टींना त्यांनी कधीही प्रोत्साहन दिले नाही. रामोशी समाजाचे बंडलकर यांना त्यांनी विधान परिषदेचे सदस्यत्व दिले. त्यावेळच्या कुलाबा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी दादासाहेब लिमये यांच्या नावाचा आग्रह त्यांनी धरला. आज यशवंतराव असते तर त्यांना आजच्या निवडणुकांना जे जातिनिष्ठ, पैसा-प्रभावी स्वरूप आले आहे, त्यामुळे यातनाच झाल्या असत्या, हे तीव्रतेने जाणवते, त्यांचेच नाव घेऊन त्यांच्या विचारांविरोधात राजकारण करणारे नेते त्यांच्या आत्म्याशी प्रतारणा करणारे आहेत.

आपल्या कार्यकर्त्यांवर आईसारखे प्रेम करणारा हा नेता होता. औरंगाबादच्या काँग्रेसच्या सभेत माझे भाषण त्यांना आवडले. सभेनंतर मी काँग्रेसच्या उपाध्यक्षांच्या घरी जेवणाला गेलो होतो. साहेब सुभेदारी विश्रामगृहात जेवायला गेले. ताटे वाढल्यावर त्यांनी माझी चौकशी केली. थोडा वेळ थांबले, नंतर ते भेटल्यावर त्यांनी काळजीने चौकशी केली. ते मातृभक्त आणि पत्नीनिष्ठ होते. त्यांच्या कौटुंबिक आपलेपणाचा लाभ आम्ही कार्यकर्ते असताना अनेकदा घेतला आहे. वेणूताईंना आम्ही काकी म्हणायचो.

पूर्वी काँग्रेसच्या अधिवेशनात आणि चिंतन शिबिराला उपस्थित राहणे हा कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाचा भाग असायचा. ही अभ्यासाची सवय आणि सरकारी धोरणांना दिशा देणारी भूमिका यशवंतरावांच्या प्रभावी नेतृत्वामुळे पक्षाला स्वीकारावी लागली. देशाचे आर्थिक धोरण पक्षाच्या अधिवेशनात मांडल्यानंतर शिबिरात त्यावर मंथन व्हावे, हा त्यामागचा व्यापक हेतू होता. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शिबिरात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने – (१) संस्थानिकांचे तनखे रद्द करणे आणि (२) बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे हे दोन ठराव संमत केले होते. ते नंतर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीला पाठविण्यात आले आणि त्याची परिणती सरकारने बदललेल्या धोरणात झाली. हे येथे सांगायला हवे. याचे श्रेय अर्थातच यशवंतरावांकडे जाते. यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी घेतलेला एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे तमाशा या लोककलेला त्यांनी दिलेले संरक्षण, प्रोत्साहन. त्यांनीच सुचवले की, तमाशा म्हणू नका, त्याऐवजी 'लोकनाट्य', 'लोककला' असे शब्दप्रयोग वापरा. कुस्तीसारख्या मैदानी कलेलाही त्यांनी प्रोत्साहन दिले. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने या दोन्ही विषयांच्या बाबतीत सकारात्मक धोरणाची भूमिका घेतली. आज पक्ष पुढे जायचा असेल तर या स्वरूपाच्या मंथनाची, चिंतनाची अपेक्षा आहे.

**उल्हास पवार**

(विधान परिषद सदस्य आणि काँग्रेसचे प्रवक्ते)

**संपर्क : ९८२०४२५०००**

++



# पालक आणि काका

कराडमधून लोकसभा निवडणूक जिंकल्यावर पहिल्यांदा संसद भवनाकडे निघालो होतो. थोरल्या भावासारखे असलेले शरदराव पवार बरोबर होते. लोकसभागृहाकडे जाताना पहिले जे मुख्य प्रवेशद्वार लागते, तेथून आत जाताना यशवंतरावांचा पुतळा दिसतो. तो मला शरदरावांनी दाखवला. आम्ही पुतळ्यास अभिवादन केले आणि पुढे निघालो. तो पुतळा शरदराव मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांनी लोकसभेजवळ बसवून घेतला होता. माझ्या वैयक्तिक जीवनात चव्हाणसाहेब आले नसते तर मी येथपर्यंत मजल मारू शकलो असतो का, असा विचार मनात आला. त्यांच्या स्मृतींनी हृदय उचंबळून आले. अगदी चार वर्षांचा असल्यापासून मी त्यांना बघितले, त्यांच्या सहवासात राहिलो आणि मोठा झालो.

सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यातील मासल-हवेली हे आमचे गाव. माझा जन्म १९४१ साली तिथे झाला. दहा-अकरा महिन्यांचा असताना सगळे बिऱ्हाड बांधून वडिलांनी कराडला संसार हलवला. शनिवारातील तळभागात एक दत्तमंदिर आहे, त्याला लागून काही इमारती आहेत. त्यातल्याच एका बोराटे बिल्डिंगमध्ये वडिलांनी ३ खोल्या घेतल्या. आमच्या वरच्या दोन्ही मजल्यांवर आत्माराम नारायण जाधव नावाचे गृहस्थ राहात होते. आम्ही त्यांना आप्पा म्हणायचो. त्यांची पत्नी अतिशय कर्तबगार होती, तिला आम्ही 'बडी' म्हणायचो. आम्ही वरच्या मजल्यावरच्या पत्र्यावर उड्या मारत खेळायचो. कधीतरी बडी म्हणायच्या, ''अरे, साहेब झोपलेत, उड्या मारू नका.'' आम्ही बघायचो, शुभ्र कपडे घातलेले साहेब शर्ट खुंटीला टांगून ठेवायचे, मग झोपायचे, त्यांच्याबरोबर दोन-तीन सहकारी असायचे. पहाटे कधीतरी येऊन ते झोपायचे. त्यांच्या आपसात चर्चा चालायच्या. हे कोणीतरी विषय मांडून चर्चा घडविणारे मोठे गृहस्थ म्हणजे आमचे साहेब - यशवंतराव चव्हाण - होते. अगदी चार-पाच वर्षांचा असताना मी त्यांना बघितले; आणि मग त्यांचे प्रेमही मिळाले.

साहेब बंडी-कोपरी घालायचे. त्यांच्या हातात इंग्रजी पेपर असायचे. नाना पाटलांच्या सभेचा निरोप आला की, साहेब धावत-पळत निघायचे. देश स्वतंत्र झाल्यावर कराडमध्ये मोठी मिरवणूक निघाली. तीत मी सहभागी झालो होतो. कराडात आमच्या घरासमोरच्या लोकल बोर्डाच्या शाळेत मी सातवीमध्ये शिकायला होतो. सातवीत शाळेत पहिला आलो. तेथून शिवाजी हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. ही शाळा यशवंतराव साहेबांनी स्थापन केली होती. शंकरराव करंबेळकर, पंडित सप्रे ही मान्यवर मंडळी ज्या शाळेत शिकवायला, त्याच शाळेत मी १९५७ साली अकरावीला (एस.एस.सी.) परीक्षेत पहिला आलो. रयतचे कर्मवीर अण्णांचे विद्यार्थी असलेल्या माझ्या वडिलांना - दादासाहेब पाटलांना - त्यांनी घरी येऊन सांगितले की, तुझ्या मुलाला माझ्याच कॉलेजात घाल. याच दरम्यान करंबेळकरांनी वडिलांना काकांचा (साहेबांचा) निरोप दिला की, श्रीनिवासला पुण्यात एस.पी.त प्रवेश घ्यायला सांगा. त्याप्रमाणे मी एस.पी.त प्रवेश घेतला आणि तिथल्या हॉस्टेलवर राहायला गेलो.

साहेब तेव्हा द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते. मी पुण्यात संयुक्त सातारा विद्यार्थी संघटना सुरू केली होती. त्याचे उद्घाटन साहेबांनी करावे अशी विनंती केली. त्यांनी येण्याचे मान्य केले. मला विचारले, ''राहतोस कोठे?'' मी त्यांना ''एस.पीच्या हॉस्टेलवर राहतो'' असे सांगितले. कार्यक्रमाच्या दिवशी ते थेट हॉस्टेलवर आले. त्यांची डॉज गाडी, बीएमसी ९००१ या क्रमांकाची. त्यांच्या गाडीत त्यांनी बसवले व आम्ही फर्ग्युसन कॉलेजच्या ॲम्फी थिएटरकडे कार्यक्रमासाठी निघालो. आपल्या गावच्या विद्यार्थ्याला गाडीत बसण्याचा मान देणारा, आपुलकीने वागणारा हा महान मुख्यमंत्री मी जवळून बघत होतो. माझे प्रास्ताविक भाषण त्यांना आवडल्याचे दिसत होते. त्यानंतर मी बी.ए. झालो. गोखले इन्स्टिट्यूटमधून एम.ए. केले. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ शिकवायला विद्यापीठात येत असत. मुंबईच्या गव्हर्नमेंट कॉलेजातून एलएलबी केले. प्राचार्य टी.के. टोपे होते. ते नंतर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. यानंतर एमपीएससीच्या परीक्षेत डेप्युटी कलेक्टर श्रेणीत मुलाखतीत पहिला, तर गुणवत्ता यादीत सहावा आलो होतो. मी पेढे घेऊन साहेबांना भेटायला मोठ्या उत्सुकतेने, आनंदाने रिव्हिएरावर गेलो.

मी पेढे देत असताना साहेब म्हणाले, ''हे पेढे एलएलबीचे की उपजिल्हाधिकारी परीक्षेतील यशाचे? एलएलबीचे असतील तर मला डायबेटिस आहे. श्रीनिवास लक्षात घे, १९३९ साली आपल्याकडचे शंकरराव मोहिते डेप्युटी कलेक्टर झाले आणि नंतर कमिशनरही झाले. त्यानंतर २६ वर्षांनी डेप्युटी कलेक्टर झालेला आपल्या परिसरातला तू आहेस. शासकीय सेवेत जाण्यासाठी तुझा होकार असेल तर मी पेढा खाईन.''

वेणूताईंना - त्यांना आम्ही काकी म्हणायचो - साहेब म्हणाले, ''वेणूताई, तबक तयार करा. श्रीनिवासचे औक्षण करा.'' काकींनी चांदीच्या तबकात दोन चांदीची निरांजने लावली, पेढे होते. त्यांनी माझे औक्षण केले; आणि मग साहेबांनी पुण्याचे कमिशनर एस.व्ही. चव्हाण यांना मला नेमणूक देण्याबाबत फोन केला. मुंबईत तेव्हा साहेब 'रिव्हिएरा'त राहात होते. तेथे १९६५ साली घडलेला हा प्रसंग आजही विसरता येत नाही. खूप मोकळेपणाने साहेब बोलत होते, सांगत होते, नवी वाट दाखवत होते.

साहेब सांगत होते, ''श्रीनिवास लक्षात ठेव, ही सरकारी नोकरी आहे. इथे सकाळी जॉईन झालेला माणूस दुपारी जॉईन झालेल्या माणसाला सिनीअर असतो. तानाजीने सिंहगड कसा जिंकला माहीत आहे ना! कोंडाणा किल्ल्याच्या दरवाजाला असलेला अडणा तानाजीबरोबर दोरखंडाने चढून गेलेल्या एका मर्द मावळ्याने काढल्यावर तिथे आत जाणे शक्य झाले आणि दरवाजा उघडला, म्हणून तो जिंकता आला. शासकीय व्यवस्थेतला सामाजिक अडणा काढण्याची जबाबदारी आता तुझी. बहुजन समाजाचे, दलितांचे, शोषितांचे काम करण्याची संधी तुला आता मिळाली आहे. तिचा उपयोग कर, पुढे जा.'' साहेबांच्या या आशीर्वचनपर शब्दांनी माझे प्रशासकीय जीवन सुरू झाले आणि त्यात मी खूप चांगले काम करण्याचा प्रयत्न केला.

प्रोबेशन काळात पहिले पोस्टिंग करवीरला मिळाले, तेथून संगमनेरला गेलो. साहेब तेथे दौऱ्यावर आले होते. ''माझा मुलगा आहे हा,'' या शब्दांनी त्यांनी तिथे असलेल्या नेत्यांना, वरिष्ठांना



कौतुकाने सांगितले. त्यांच्या या प्रेमाने, आपुलकीच्या ओलाव्याने माझी सतत पाठराखण केली.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. वि.म. दांडेकर यांच्या सूचनेप्रमाणे पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाची स्थापना यशवंतरावांनी केली, त्याचा पहिला अध्यक्ष मी होतो. जिल्हाधिकारी म्हणून बीडला कारभार केला. ती त्या पदावरची माझी पहिली नियुक्ती होती. पुढे पुण्यात जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवडला आयुक्त व प्राधिकरणाचा अध्यक्ष, नागपूरला एनटीआयचा चेअरमन म्हणून गेलो. तेव्हा कराडचा मी आहे, असे म्हटले की, अनेक जण यशवंतरावांची आठवण काढायचे. त्यांचा स्मृतीचा हा धागा सतत हृदयाशी मी बांधून ठेवलेला आहे. शासकीय सेवेत असताना समारंभात, कौटुंबिक कार्यक्रमात कराडमध्ये माझी साहेबांची भेट होत असे. त्यांची प्रेमाची थाप माझ्या पाठीवर सतत पडत असे.

त्यांचेच मानसपुत्र असलेले आणि माझ्या थोरल्या भावासारखे असलेले शरदराव पवार यांनी मला प्रशासकीय सेवेतून लोकप्रतिनिधित्वाच्या प्रांगणात आणले आणि तेथेही चव्हाणसाहेबांचा विचार मनात ठेवूनच पुढच्या कामाला मी वाहून घेतले.

**श्रीनिवास पाटील** (आय.ए.एस.)
(माजी खासदार आणि निवृत्त सनदी अधिकारी)
**संपर्क : अरुण खोरे : ९६०४००१८००**

# यशवंतराव आणि आनंदराव

**मोहनराव कृष्णाजी डकरे**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे वडील स्वर्गीय आनंदराव चव्हाण यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांचे महाविद्यालयीन जीवनातील सहाध्यायी होते. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणामुळे डाव्या विचारसरणीचे शेतकरी कामगार पक्षाचे अत्यंत मुत्सद्दी नेते राष्ट्रीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले. स्व. आनंदरावजी चव्हाण काँग्रेसचे राष्ट्रीय स्तरावरील नेते खासदार आणि काँग्रेस मंत्री म्हणून नावारूपास आले. अभ्यासाच्या साहचर्यामुळे यशवंतरावजी व स्व. आनंदरावजी यांच्यामध्ये वैयक्तिक स्नेहसंबंध निर्माण झाले. पुढच्या काही काळात आनंदराव चव्हाण आणि यशवंतरावजी चव्हाण यांच्यात राजकीय मतभेद झाले तरी विद्यार्थी दशेतल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या साहचर्यामुळे आनंदरावाच्या यशवंतरावजींच्या मनात शेवटपर्यंत आपुलकी होती.



आनंदरावजी चव्हाण अतिशय बुद्धिमान आणि परिश्रमी विद्यार्थी होते. त्यांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण होऊन नावलौकीक मिळविला होता. (कृष्णाकाठ- यशवंतराव चव्हाण)


स्व. आनंदराव चव्हाणांनी त्यांचे जन्मग्राम कुंभारगाव- ता. पाटण येथे स्व. यशवंतरावजीचा सत्कारही केला होता. यशवंतरावजींनी राजकारणात यशस्वी वाटचाल केल्यानंतर त्यांच्या बेरजेच्या राजकारणामुळे आनंदरावजींसारखा मुत्सद्दी बुद्धिमान नेता काँग्रेसला मिळाला. स्वत:चा कराड लोकसभा मतदारसंघ यशवंतरावांनी आनंदरावांना दिला व स्वत: सातारा मतदारसंघात गेले. स्व. आनंदराव चव्हाणांच्या नंतर प्रेमलताताई खासदार झाल्या त्यानीही आनंदरावांचा वारसा पुढे चालविला.

मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाणांना कै. आनंदराव चव्हाण आणि कै. प्रेमलताबाईचा कणखर वारसा मिळाला आहे. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची आनंदराव चव्हाणांप्रमाणे मुत्सद्दी म्हणून गणना केली जाते.

**संपर्क : ९३२६९४०८३३**



# संवेदनशील आणि सुसंस्कृत



**साहेबांच्या बाबतीत मला एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे व्यक्ती आणि नेते म्हणून त्यांच्या भूमिकांचे तुकडे करता येत नाहीत. व्यक्ती म्हणून ते संवेदनशील आणि सुसंस्कृत होते. त्याचीच छाप त्यांच्यातील नेत्यावर होती आणि त्यांचा राजकीय व्यवहारही तसाच पारदर्शक आणि निर्मळ असायचा. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस *शरद काळे* यांचे मनोगत.**

यशवंतरावजी चव्हाण साहेबांसोबत मी १९४७ ते ७७ आणि नंतर १९७९मध्ये काही काळ काम केले. मी दिल्लीत गेलो तेव्हा ते मला ओळखत नव्हते. माझ्या आधी शरद उपासनी दिल्लीत होते, त्यांनी माझे नाव सुचवले असल्यामुळे मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. साहेब अर्थमंत्री असताना मी गेलो. थोड्या काळातच त्यांचे खाते बदलले आणि ते परराष्ट्रमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी मला परराष्ट्रमंत्रालयात येणार की, इथेच थांबणार असे विचारले. त्याचे कारण असे होते की अन्य मंत्रालयात आयएएस अधिकारी असले तरी परराष्ट्र मंत्रालयात मात्र इंडियन फॉरेन सर्व्हिसचे अधिकारी असायचे. मी म्हणालो की, तुमच्या बरोबर काम करण्यासाठी मी दिल्लीत आलो आहे, खाते कोणते आहे, हे महत्त्वाचे नाही. माझे म्हणणे ऐकल्यानंतर ते मला सोबत परराष्ट्रमंत्रालयात घेऊन गेले.

ग्रंथप्रेम, अभ्यासू वृत्ती, रसिकता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातले महत्त्वाचे पैलू होते. मराठी साहित्याचे ते जाणकार वाचक होतेच; परंतु, त्या काळात चर्चेत आलेल्या दलित साहित्याबाबत त्यांना कमालीचे कुतूहल आणि आस्था होती. वृत्ती अभ्यासू असल्यामुळे मंत्रिपद सांभाळतानाही त्याचे प्रत्यंतर यायचे. कोणताही प्रस्ताव बारकाईने वाचायचे. निर्णय घेण्यापूर्वी विचार करणे हे अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य असते आणि साहेबांच्या ठायी ते प्रकर्षाने जाणवायचे. परराष्ट्रमंत्री असताना त्यांना भाषणे खूप करायला लागायची. विदेशी पाहुण्यांची वर्दळ असायची. मंत्री स्तरावर अनेकदा थेट त्यांच्याशी चर्चा व्हायच्या. अशा भेटीपूर्वी ते त्या देशाची, त्यासंदर्भातील भूमिकेची माहिती घ्यायचे. अशा भेटीची पूर्वतयारी परराष्ट्रमंत्रालयात होत असते, अधिकारीच ती करीत असतात. परंतु, साहेबांचे तेवढ्या माहितीवर समाधान होत नसे, ते अधिकची माहिती घेत असत. परदेश दौऱ्यावर जाण्यापूर्वी संबंधित देशाचा अभ्यास करायचे. अधिकाऱ्यांकडून ब्रिफिंग असले तरी त्यापलीकडे जाऊन स्वत: अधिक माहिती मिळवायचे. कुठे जायचे, कुणाला भेटायचे याचे नियोजन करायचे. लंडनला गेल्यावर नवे नाटक पाहणे हा त्यांचा नियमित व्यवहार होता. तेथील रंगभूमीबाबत अद्ययावत राहण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. अमेरिकेला गेल्यावर तिथल्या पुस्तकांच्या दुकानांत दोन-चार तास रमत. इतिहास, तत्त्वज्ञान, वाङ्मय अशा विविध क्षेत्रात नवीन काय घडतेय याची माहिती घेत. त्यासंदर्भातील नवीन पुस्तकांची खरेदी करीत. त्यांचे पैसे माझ्याजवळ असत. त्यामुळे पुस्तके खरेदी केल्यावर बिल चुकते करण्याची जबाबदारी माझ्यावर असायची. ठिकठिकाणच्या वस्तुसंग्रहालयांना ते आवर्जून भेटी देत. संग्रहालयामुळे त्या-त्या देशाची संस्कृती समजते, असे त्यांचे म्हणणे असायचे. सजगपणे सर्व गोष्टींकडे पाहण्याची दृष्टी त्यांच्याकडे होती.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबरोबर १९७६मध्ये रशियाचा दौरा होता. दोन देशांमध्ये काही विषय असे असतात की, ज्यावर उच्चस्तरीय निर्णय होणे आवश्यक असते. बारकाईने माहिती घ्यावी लागते. किरकोळ गफलतही देशाला महाग ठरू शकते. तिथे दुरुस्तीला वाव नसतो. माहिती काटेकोर लागते. देशहिताचा मुद्दा असल्याने कोणती भाषा वापरायची याचेही संकेत असतात. त्यावेळी भारत आणि रशियामध्ये रूपी-रुबलचा व्यवहार होता. म्हणजे अन्य देशांची व्यवहार आंतरराष्ट्रीय चलनाच्या स्वरूपात असायचा; परंतु, इथे मात्र आपण रशियाला रुपये द्यायचो आणि रशिया आपल्याला रुबल द्यायचा. अनेक वर्षे याबाबत चर्चा सुरू होती. ग्रूमिको नावाचे रशियाचे परराष्ट्रमंत्री होते. आंतरराष्ट्रीय राजकारणातले मुत्सद्दी म्हणून त्यांची ख्याती होती, त्यांच्याशी चर्चा करायची जबाबदारी इंदिराजींनी साहेबांवर सोपवली. प्रश्न अर्थमंत्रालयाशी संबंधित होता आणि साहेब परराष्ट्रमंत्री होते, तरीही त्यांनी याप्रश्नी उत्कृष्ट भूमिका बजावली. ग्रूमिको यांच्यासारख्या मातब्बर नेत्याबरोबर एक महत्त्वाचा विषय उत्तमपणे हाताळला. साहेब परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर पंधरा दिवसांतच हेन्सी किसिंजर भारतात आले होते. अमेरिकेकडून पाकिस्तानला होणारी शस्त्रास्त्रांची मदत हा त्यावेळी ज्वलंत विषय होता. त्याबाबत ठाम भूमिका मांडून देशाची चिंता तीव्रतेने व्यक्त करणे महत्त्वाचे होते. साहेबांनी त्यावेळीही उत्तमपणे भूमिका पार पाडली. कोणतीही जबाबदारी आली तरी आस्थेने आणि देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन ती कशी पार पाडायची, याचे उत्तम उदाहरण म्हणजे साहेब होते. कधी कधी अधिकाऱ्यांचे मत वेगळे असते. त्यांच्याशी बोलून ती ते समजून घ्यायचे आणि आपली भूमिका वेगळी असेल तर ती पटवून द्यायचे. यामधूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सुसंस्कृतपणाच दिसायचा. मंत्री आहे म्हणून अधिकार गाजवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. १९६२नंतर भारत-चीन राजनैतिक संबंध तोडले नव्हते; परंतु, ते राजदूताच्या स्तरावर नव्हते. दुय्यम स्तरावर होते. ते पुन्हा राजदूत स्तरावर प्रस्थापित करणे आवश्यक असल्याचे साहेबांचे मत होते. परराष्ट्र व्यवहारात राजशिष्टाचार महत्त्वाचे असतात आणि तुम्ही कोणत्या स्तरावर बोलता यालाही खूप महत्त्व असते. साहेब आधी संरक्षणमंत्री असल्याने त्यांना दोन्ही देशांमधील परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव होती. तरीही एवढा मोठा देश आणि तोही शेजारी देश, त्याच्याशी कायमचे वितुष्ट घेणे देशहिताचे नसल्याचे त्यांचे मत होते. चीनशी संबंध अधिक चांगले करायचे तर आधी ते राजदूताच्या स्तरावर प्रस्थापित करायला हवेत. आपली भूमिका चीनच्या सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचवणे आणि चीनच्या नेतृत्वाच्या मनात काय आहे, हे समजून घेण्यासाठी राजदूत हा महत्त्वाचा दुवा ठरणार होता. या सगळ्या प्रक्रियेत साहेबांनी आपली **(पान ६० वर)**

**(पान ५९ वरून) संवेदनशील आणि सुसंस्कृत**

भूमिका प्रभावीपणे मांडली. साहेबांच्या या प्रयत्नानंतर के.आर. नारायणन यांची चीनमध्ये



# माणसे घडविणारा माणूस

## रामभाऊ जोशी

पत्रकार म्हणून त्यांची व माझी अशी साधी ओळख होती. १९५८-५९ सालाच्या दरम्यान संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन बेळगाव, कारवार, निपाणी सीमा भागात खूपच पेटले होते, अशातच बेळगावचे तत्कालीन जिल्हा पोलीस प्रमुख श्री. लुईस यांनी आंदोलकांवर केलेल्या बेछूट गोळीबारात नऊ आंदोलकांचा बळी गेला. या घटनेमुळे साऱ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. जनभावना अत्यंत क्षुब्ध झाल्या होत्या. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी या घटनेचा अहवाल सादर करण्याची सूचना तत्कालीन महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजारामबापू पाटील यांना केली. श्री. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्वसमावेशक अशा शिष्टमंडळाने बेळगावला भेट देऊन अत्याचार पीडित नागरिकांच्या वेदना ऐकून घेतल्या. पोलिसांनी केलेल्या अत्याचाराची माहिती नागरिकांनी शिष्टमंडळास दिली. मीही या शिष्टमंडळात गेलो होतो. त्यामुळे पत्रकार म्हणून या सर्व घटनांचे मी टिपण ठेवले होते.

या घटनेबद्दल शिष्टमंडळातील एका व्यक्तीने अहवाल तयार केला. परंतु, तो अहवाल बातमीसारखा होता. त्यामध्ये तपशील नव्हता. राजारामबापू पाटील यांना लिहिलेला अहवाल मान्य होण्यासारखा नव्हता; याचे कारण प्रदेश काँग्रेसचा हा अहवाल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि त्यानंतर दिल्लीत पंतप्रधानांकडे पाठवावयाचा होता. त्यामुळे या अहवालात वस्तुनिष्ठ अशा घटनांची नोंद होणे आवश्यक होते. राजारामबापू पाटलांनी तशा नोंदीसह अहवाल तयार करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली. मी तो अहवाल सविस्तरपणे लिहिला. तथापि, प्रदेश काँग्रेसला या संदर्भात केंद्राकडून कोणता न्याय मिळावा, याची नोंद करणे आवश्यक होते. राजारामबापूंनी याबाबत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे दूरध्वनीवरून विचारणा केली, तेव्हा लिहिलेला अहवाल घेऊन मुंबईला यावे, येथे चर्चा करू, असे त्यांनी सांगितले. त्यानुसार राजारामबापू यांच्यासह मुंबईस जाऊन यशवंतरावांशी चर्चा केली.

प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीने तो अहवाल किंवा निवेदन एकमताने मंजूर करून पतंप्रधानांकडे रवाना केले. त्याचा इष्ट असा परिणाम झाला. श्री. लुईस यांच्या अमानुष गोळीबाराची आणि नऊ तरुणांचे बळी गेले, याची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली. परिणामी, श्री. लुईस यांची कर्नाटकातून उचलबांगडी करून आसाम राज्यात रवानगी केली. अहवालाच्या चर्चेच्या संदर्भात यशवंतरावांशी जी जवळीक झाली, ती पुढे वर्षानुवर्षे वाढत राहिली. ही जवळीक पत्रकार आणि नेते अशा संबंधाची नव्हती, तर ती मित्रत्वाची होती. १९५३ ते ६० सालापर्यंतची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा एक इतिहास आहे. केंद्रस्थानी त्या काळात जे नेते होते त्यांची संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस अनुकूलता नव्हती. तथापि, १९५६मध्ये यशवंतराव द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी केंद्रीय नेत्यांचे मत परिवर्तन घडावे, यासाठी भेटीगाठी, चर्चा आणि महाराष्ट्रातील जनतेच्या तीव्र भावना यासंबंधी पंतप्रधान आणि अन्य नेत्यांना वस्तुनिष्ठ माहिती पुरविली आणि मतपरिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. त्यात ते यशस्वी ठरले आणि केंद्रीय नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस मान्यता दर्शविली. असे असले तरी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा मंगलकलश मिळविण्याचे श्रेय यशवंतरावांनी स्वत:कडे न घेता जाहीरपणे महाराष्ट्रातील जनतेला दिले.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतरावांनी आपली सर्व शक्ती, बुद्धी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साध्य करण्यावर केंद्रित केली. महाराष्ट्रासमोर कृषी, शिक्षण, उद्योग, विद्युत, शेतीसाठी पाणीपुरवठा, रस्ते-दळणवळण असे अनेक प्रश्न निर्माण झालेले होते. यशवंतरावांनी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी जनतेमध्ये जागृती निर्माण करून विकासाच्या विधायक कामासाठी जनतेची मने आणि मनगटे तयार करण्यावर भर दिला. सरकारने धोरणात्मक निर्णय घेतले आणि विकासासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची तयारी केली. जनतेच्या सहभागाशिवाय आवश्यक असा विकास साध्य होणार नाही, अशी त्यांची धारणा होती. जनतेच्या सहकाऱ्यांबरोबरच प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या सकारात्मक मदतीचा वाटा तेवढाच महत्त्वाचा असल्याने यशवंतरावांनी प्रशासनाचे परंपरागत स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला. मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ते जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांपर्यंत विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांचे विकासासाठी आवश्यक ते सहकार्य जनतेला मिळावे, यासाठी त्यांनी स्वतंत्र यंत्रणा उभी केली. नव्या धोरणाच्या सूत्रानुसार त्यांनी महाराष्ट्राचा कायापालट घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महाराष्ट्राचा कायापालट करण्यासाठी मुख्यत: त्यांनी माणसं घडविली. त्यामुळे यशवंतराव हे महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत, असा त्यांचा गौरव झाला.

अभ्यासू संसदपटू म्हणून संसदेमध्ये त्यांनी आपली आगळीवेगळी प्रतिमा निर्माण केली. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळातील सहकारी या सर्वांचे ते विश्वासू मार्गदर्शक होते. देशात कोणत्याही राज्यात कसलाही कठीण प्रसंग निर्माण झाला तर त्यातून बाहेर पडण्यासाठी यशवंतरावांचे मार्गदर्शन आणि सल्ला हा महत्त्वाचा मानला गेला.

**रामभाऊ जोशी:०२०-२५६५२५०६**

**शब्दांकन :मोहन राठोड**

**संपर्क : ९४२३८४८५४५**

---

राजदूत म्हणून नियुक्ती झाली. परराष्ट्र मंत्री असल्यामुळे त्यांच्या खात्याचा तसा सामान्य माणसांच्या व्यवहाराशी संबंध नसायचा. मात्र, मतदारसंघातून त्यांना लोकांची पत्रे येत. गावाकडच्या माणसांनी आपल्या वडीलधाऱ्याला जिव्हाळ्याने लिहावे, तशा प्रकारची ती पत्रे असायची. यावरून मतदारसंघातील लोकांशी त्याचे संबंध कसे होते, हे लक्षात यायचे. साहेबांच्या व्यक्तिमत्त्वात मराठी साधेपणा होता. आपल्या खात्यातील सर्व अधिकाऱ्यांशी त्यांचे चांगले संबंध असायचे. सगळ्यांना नावाने ओळखत. वेळेच्या बाबतीत अत्यंत काटेकोर होते. त्या दिवसाचे काम त्या दिवशी संपले पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असायचा आणि कधीही आजचे काम ते उद्यावर टाकायचे नाहीत.

**शरद काळे : ०२२- २२०२८५९८**

**शब्दांकन : विजय चोरमारे**

**संपर्क : ९५९४९९९४५६**



# सीईओ आणि ड्रायव्हर...

**साहेबांचे व्यक्तिमत्त्व मोठे पण ते लोकांत मिसळत. त्यांच्याच भाषेत संवाद साधत. दिवसभर दौरा केला की, रात्री १०नंतर ते वेगवेगळ्या अधिकाऱ्यांशी बैठक घेत. कामाबाबत आढावा घेत. नव्या योजना सुरू करण्यासंदर्भात किंवा एखाद्या अर्धवट राहिलेल्या योजनेवर चर्चा करीत. गावकऱ्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आणि अधिकारी खरे सांगतोय की नाही हे ते तपासून बघत. त्यामुळे बैठकीस येताना अधिकारी होमवर्क करून येत. माजी सनदी अधिकारी *एस. राजगोपाल* यांनी जागवलेल्या आठवणी.**



यशवंतराव चव्हाण साहेब आणि माझा परिचय १९६० सालचा. त्यावेळी मुंबई राज्यात गुजरात, कर्नाटक, आंध्रचा मोठा भाग होता. विभाजनाची प्रक्रिया १९५७-५८पासूनच सुरू होती. या काळात मी सौराष्ट्रचा सहायक जिल्हाधिकारी होतो. माझ्या आजोबांचे भाऊ सर व्ही.टी. कृष्णामाचारी हे नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते. ते चव्हाण साहेबांचे मित्र होते. त्यांनीच महाराष्ट्रात मला जायला सांगितले. १९६१मध्ये माझी आणि साहेबांची ओळख झाली. मी महाड, पनवेल, जळगाव आदी ठिकाणी वेगवेगळ्या पदावर काम केले. मला आज सांगायला आनंद वाटतो की, आपल्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या पहिल्यांदा आमदार म्हणून जळगावातून निवडून आल्या, त्यावेळी मी निर्वाचन अधिकारी होतो. दरम्यान, बलवंतराय मेहता आणि अन्य मान्यवर पंचायतराज बाबतचा अहवाल तयार करीत होते. आबासाहेब खेडकर, नरेंद्र तिडके आणि चव्हाण साहेब हे सारे जण मसुदा निर्मितीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. पंचायतराज विधेयक लवकरच तयार झाले आणि पुढे राज्यात जिल्हा परिषदांची निर्मिती झाली. त्या काळात साहेब मुख्यमंत्री होते. त्यांनी माझी नियुक्ती साताऱ्याच्या मुख्यकार्यकारी अधिकारी म्हणून केली. मी त्यावेळी फक्त २७ वर्षांचा होतो.

साहेबांची आठवड्याला सातारा जिल्ह्याला भेट असायची. शनिवार-रविवार नेहमी दौरा असे. त्यांच्या सोबत आयुक्त (पुणे) शंकरराव मोहिते असायचे. सर्किट हाऊसवर त्यांचा मुक्काम असे. त्याकाळात लेफ्टहॅण्ड ड्राइव्हिंगच्या जीप असत. साहेबांचा खेड्यापाड्यात दौरा असला की, मीच ड्रायव्हरचे काम करायचो. साहेब बाजूलाच बसायचे. मला संपूर्ण भाग माहीत असल्याने साहेब मलाच सोबत नेत. दिवसभरात ५-६ खेड्यांचा दौरा असे. हजारो कार्यकर्ते भेटत. निवेदन देत. आपले गाऱ्हाणे मांडत. साहेब स्वत: अधिकाऱ्यांशी बोलून कामाबाबत आदेश देत. साहेब खरोखरच दूरदृष्टी असलेले नेते होते. साहेबांचे व्यक्तिमत्त्व मोठे पण ते लोकांत मिसळत. त्यांच्याच भाषेत संवाद साधत. दिवसभर दौरा केला की, रात्री १०नंतर ते वेगवेगळ्या अधिकाऱ्यांशी बैठक घेत. कामाबाबत आढावा घेत. नव्या योजना सुरू करण्यासंदर्भात किंवा एखाद्या अर्धवट राहिलेल्या योजनेवर चर्चा करीत. गावकऱ्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आणि अधिकारी खरे सांगतोय की नाही हे ते तपासून बघत. त्यामुळे बैठकीस येताना अधिकारी होमवर्क करून येत. साहेबांचा ज्या ४-५ खेड्यांत दौरा असे त्या प्रत्येक ठिकाणी ग्रामस्थ मांसाहारी जेवणाचा बेत आखत. एका खेड्यातला कार्यक्रम आटोपला की शेवटी जेवण असे. साहेब प्रत्येक गावात जेवत. एके दिवशी मी त्यांना प्रत्येक ठिकाणी जेवू नका, प्रकृतीच्या दृष्टीने हे योग्य नाही, असे सांगितले. त्यावर ते म्हणाले की, ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेस जेवलं की खूप बरं वाटतं. आपल्याविषयी आपुलकी, आत्मीयता म्हणून जेवलं पाहिजे. मी मात्र शाकाहारी असल्याने साहेब स्वत: मी जेवल्याची खात्री करीत. सोबतचे सर्व अधिकारी, पोलीस जेवले की नाहीत हे स्वत: बघत. सर्व जेवल्यानंतरच साहेब पुढच्या कार्यक्रमास जात. मी मराठी शिकलो साताऱ्यातच. संपूर्ण सातारा जिल्हा मी पायाखाली घातल्याने जिल्ह्यातील कोणतीही माहिती मी बिनचूक सांगत असे. त्यामुळे साहेबांचा माझ्यावर विश्वास होता. ते माझ्याशी मराठी भाषेतच बोलत. एकदा एका खेड्यात साहेबांचा कार्यक्रम होता. साहेब तयार होते. मात्र, त्या गावचे कार्यकर्ते आले नव्हते. मी जीप घेऊन तयार होतो. साहेब माझ्या बाजूला बसले. कुणाची वाट बघता? चला! साहेब म्हणाले. कार्यकर्त्यांची वाट बघतोय- मी म्हणालो, त्यावर साहेब म्हणाले, चला निघू या. ज्यांचा कार्यक्रम आहे त्यांनी अगोदर यायला नको का? आता थांबायला नको. लोक वाट पाहत असतील.

अशा प्रकारे ते कामाच्या आणि वेळेच्या बाबतीत काटेकोर होते. चीनबरोबर युद्ध झाल्याने देशभर खर्चावर बंदी आली. काटकसरीचे धोरण स्वीकारण्याच्या सूचना राज्यांना आल्या. त्यामुळे साताऱ्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाचे काम अर्धवटच राहिले. असेच एकदा साहेब साताऱ्याला आले. तेव्हा स्थानिक कार्यकर्त्यांनी ही बाब निदर्शनास आणली. साहेबांनी स्वत: अर्धवट काम पाहिले आणि निवासस्थान पूर्ण बांधून देण्याच्या सूचना दिल्या. डिफेन्स मिनिस्ट्रीच्या सूचना फक्त नव्याने बांधकाम करायचे नाही अशा होत्या. अर्धवट काम सोडायच्या सूचना दिलेल्या नाहीत, अशी भूमिका त्यांची होती. पुढे साहेब दिल्लीत असतानाच मला त्यांनी बोलावले. उपसचिव म्हणून दिल्लीत गेलो. त्यावेळी साहेबांकडून खूप काही शिकायला मिळाले. ते अतिशय व्यावहारिक होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. आपल्या राज्यातील आलेल्या कार्यकर्त्यावर त्यांचे फार प्रेम होते. त्यांच्या पत्नी वेणूताई या अतिशय प्रेमळ स्वभावाच्या होत्या. दोघेही पती-पत्नी एक आदर्श जोडपे होते. सी वॉज अे डिसेंट लेडी! साहेबांच्या अनुपस्थितीत वेणूताईच येणाऱ्या-जाणाऱ्या नातेवाइकांची, कार्यकर्त्यांची देखभाल करीत. आज साऱ्या आठवणी नजरेसमोर आहेत. साहेबांसारख्या दूरदृष्टीच्या नेत्याचा सहवास मला लाभला, हे माझे भाग्यच!


**एस. राजगोपाल : ०२२-२२०२०४०६**

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट**

**संपर्क : ९४२२५९५७८८**



# नात्याच्या पल्याड...

**सारं कुटुंब एका धाग्यात गुंफण्याचं आदर्शवत काम 'काकां'नी केलं. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि स्वकर्तृत्वाच्या शिकवणीतून आमचं सारं कुटुंब तावून, सुलाखून निघालंय. कुटुंबप्रमुख कसा असावा याचं आदर्श उदाहरण म्हणून स्व. यशवंतराव चव्हाणांकडून आम्हा भावंडांना लाभलेली संस्कारमय शिदोरी लाखमोलाची आहे. म्हणूनच असे 'काका' होणे नाही, यशवंतराव चव्हाण यांचे पुतणे *अशोकराव चव्हाण* (कराड, जि. सातारा) यांनी सांगितलेल्या काकांच्या आठवणी...**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांना सर्व जण 'साहेब' म्हणून ओळखत. पण, घरामध्ये आम्ही सर्व जण साहेबांना 'काका' म्हणूनच बोलवायचो. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर आम्हा भावंडांचा काकांनीच सांभाळ करून शिक्षणातून संस्काराची शिदोरी दिली. त्यामुळेच कष्ट आणि प्रामाणिकपणावर निष्ठा ठेवून जीवनाचा मार्ग शोधण्याचं काम आम्हा सर्व भावंडांकडून घडत गेले. राज्य शासनाने 'काकां'चे जन्मशताब्दीवर्ष राज्यभर विविध कार्यक्रमांनी साजरे करण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याबद्दल आम्हा कुटुंबीयांना अतिशय आनंद होत आहे. काकांच्या कार्याचा होत असलेला हा गौरव पाहून आमची छाती अभिमानाने फुगत आहे.

माझे वडील गणतपराव चव्हाण हे काकांचे वडीलबंधू! काकांचे शिक्षण माझ्या वडिलांनी केले; मात्र, माझ्या वडिलांचा १९४६ला आणि आईचा १९५१ला मृत्यू झाला आणि आम्हा सर्व भावंडांच्या शिक्षणाची व पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी काका व ताईवर पडली. त्याकाळी साहेब पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. त्यामुळे मुंबई-दिल्लीत अधिक वास्तव्य करावे लागत असे. देशपातळीवरील मोठ्या जबाबदारीतून घराची आणि घरातील प्रत्येकाची काका काळजी घेत. पण, कार्यबाहुल्यामुळे कराडला वारंवार येणं काकांना जमत नसे. आम्हा भावंडांच्या शिक्षणावर काकांची करडी नजर होती. शिक्षणाबाबतीत काका अतिशय संवेदनशील असायचे! माझे आठवीपर्यंत शिक्षण कराड येथेच झाले. आईवडिलांच्या निधनामुळे माझे शिक्षणातील लक्ष उडत असल्याचे काकांच्या लक्षात यायला फारसा उशीर लागला नाही. त्यामुळेच त्यांनी मला बोर्डी (जि. ठाणे) येथील शारदाश्रम हॉस्टेलमध्ये शिक्षणासाठी ठेवले. आम्हा भावंडांची शिक्षणात आबाळ होऊ नये म्हणूनच, काकांनी शिक्षणासाठी अन्यत्र ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मी बोर्डीला तर अन्य दोन भावंडांना पुण्यात शिक्षणासाठी ठेवले.

माझे शिक्षण पूर्ण व्हावे ही काकांची धडपड व इच्छा मी पूर्ण करू शकलो नाही; आणि मी मॅट्रिकला नापास झालो. त्यावेळी काका महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मी नापास झाल्याचे ऐकून ते फार निराश झाले. तो प्रसंग आजही माझ्या अंगावर रोमांच आणणारा आहे. मी मॅट्रिक नापास झाल्याने फार खचून गेलो होतो. काकांना तोंड कसं दाखवायचं या चिंतेत असतानाच त्यांनी मला बोलावून पाठीवरून हात फिरवत म्हणाले, अशोक झालं ते आता सारं विसरून जा. पण, खचून जाऊन नकोस, मन लावून अभ्यास कर आणि तुला जर अभ्यासात रस नसेलच तर तुझ्या मर्जीनुसार अन्य मार्ग स्वीकार, याबरोबर मी घाबरत घाबरत त्यांना म्हणालो, काका मी शिक्षणात फार काही करू शकेन, असं मला वाटत नाही. मला कुठं तरी नोकरी अथवा व्यवसायात गुंतवा. यावर त्यांनी पुन्हा शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. पण, शेवटी माझ्या मनाची होत असलेली घालमेल पाहून त्यांनी व्यवसाय प्रशिक्षणाच्या दृष्टीने मला पुण्यामध्ये नोकरी लावली. कुपरच्या फौंड्रीत मी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलो आणि कराड येथे २ लेथमशिन टाकून व्यवसायास प्रांरभ केला.

### ट्रक थांबवून जेवणडबा दिला

काकांच्या कुटुंबवत्सलेबाबत बोलताना अशोक चव्हाण म्हणाले की, काही काळ मी ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करीत होतो. या व्यवसायामुळे मला बऱ्याच ठिकाणी जावे लागत असे, एकदा मी माझ्या ट्रकमधून मुंबईवरून कराडकडे चाललो होतो या दरम्यान माझा ट्रक लोणावळा घाटाच्या दरम्यान चालला होता. मागून काका व ताईची गाडी येत होती. वाहनांच्या भाऊगर्दीतही त्यांनी माझ्या ट्रकचा नंबर लक्षात ठेवून ट्रक थांबविला आणि बाजूला घेऊन माझ्या जेवणाची व घरातल्यांची चौकशी केली. त्यावेळी मी जेवायचो आहे ते त्यांच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही; त्यांनी चटकन त्यांच्या गाडीतील जेवणाचा डबा मला दिला आणि मला म्हणाले, वेळेत जेवत जा. जरा प्रकृतीकडे लक्ष ठेव. हा प्रसंग मी कधीही विसरू शकणार नाही. १९६१पासून मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. राजकारण, समाजकरणाची जाण मला त्यांच्यामुळेच आली. समाजात तसेच चारचौघांत कसं वागायचं याची गुरुकिल्लीच मला त्यांच्याकडून मिळाली.

काका मुख्यमंत्री असताना त्यांचे मेहुणे बाबासाहेब मोरे यांच्या समवेत मला काम करण्याची संधी मिळाली. समाजातील सर्वसामान्य माणसापासून ते देशपातळीवरील नेत्यांची काकांकडे रीघ लागलेली असायची. पण, या सर्वांशी आपुलकीने बोलून सामान्य माणसाचं काम ते मार्गी लावत. प्रशासनाचा गाडा यशस्वीपणे सांभाळण्याची त्यांची खासियत वेगळीच असल्याचे क्षणाक्षणाला अनुभवायला मिळायचे. रूढ अर्थाने काकांकडे लाल फितीचा कारभार पाहायलाच मिळाला नाही, त्यांच्याकडे आलेला कोणताही कागद अगर फाईल ते एका दिवसात संबंधितांकडे कार्यवाहीसाठी पाठवून देत असत, आलेल्या प्रत्येक पत्राला उत्तर देणे ही त्यांची खासियत. स्मित हास्य, कामाची झलक, कार्यकर्त्यांचा गराडा या साऱ्यामधून काकांच्या कामाची वेगळी झलक माझ्या डोळ्यांसमोर आजही उभी राहत आहे.



काका स्वभावाने स्पष्टवक्ते होते. यासंदर्भात मलाच एक प्रसंग अनुभवास आला आहे, त्याचे असे झाले, काका मुख्यमंत्री असताना मी त्यांच्या मुंबईतील बंगल्यात राहात होतो, काकांचे साऱ्या महाराष्ट्रावर जसे लक्ष होते, तसेच जवळच्या आणि कुटुंबातील मंडळीकडेही त्यांचे लक्ष होते, मला त्यांनी एकदा स्पष्टपणे सुनावले की, अशोक माझ्या बंगल्यात राहतोस, कोणाकडून कामासाठी पैसे घेतल्याचे मला समजले तर बंगल्यात राहण्याचा अधिकार गमावलास हे लक्षात ठेव; आणि पुन्हा या बंगल्याचे दार तुला सदैव बंद असेल, हेही लक्षात ठेव. त्यांचा हा आदेश मला हयातभर आठवत आहे आणि तोच आदेश मी आजही पाळतो आहे.

**कुटुंब एका धाग्यात गुंफलं**

काकांचा स्वभाव मृदू, मायाळू आणि संवेदनशील असल्याने संपूर्ण चव्हाण कुटुंबच त्यांनी एका धाग्यात प्रेमानं व आपुलकीनं गुंफलं होतं. त्यामुळे सुखदु:खात सारं कुटुंब एका धाग्यात बांधलं गेलं. त्यांना घरातील सर्वांचेच स्वभाव माहीत असत, घरातील प्रत्येकाचं म्हणणं ते शांतपणं ऐकून घेत, कोणाचं म्हणणं पटलं नाही तरी ते पोटात घालत आणि पटलं तर सर्वांना खुलेआम ते सांगत असत. त्यामुळे सर्वांनाच ते आपले वाटत होते. कार्यकर्त्यांच्या अथवा अधिकाऱ्यांच्या बाबतीतही काही वेगळं नसायचं. हे साहेबांचं वैशिष्ट्य होतं.

काका निश्चयाशी आणि विचाराशी पक्के होते. १९६२मध्ये ते मुख्यमंत्री असताना सह्याद्री बंगल्यावर राहात. त्याच दरम्यान केंद्रात संरक्षणमंत्री पदाचा त्यांना बहुमान मिळाला. श्रेष्ठींच्या सूचनेनुसार त्यांनी मुख्यमंत्रीपद सोडून संरक्षणमंत्रीपद स्वीकारले, मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर त्यांनी मुंबईत जीव अडकून ठेवला नाही. केवळ आठ दिवसांतच ते मुख्यमंत्र्यांचा शासकीय निवासस्थान असलेला सह्याद्री बंगला सोडून खाजगी ठिकाणी राहण्यास गेले. हे त्यांच्या कार्यपद्धतीचे आदर्श उदाहरण म्हणावे लागेल. याबरोबरच ते वेळेला व वचनाला पक्के होते. एखाद्याला वेळ दिली तर काहीही किंमत पडली तरी वेळ पाळण्याचा त्यांचा अट्टहास असायचा.त्यांनी सारं जीवन समाजासाठी आणि समाजातील सर्वसामान्य माणसांसाठी वाहिलं. जीवनभर निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सचोटी जोपासली. सामान्य माणसाला त्यांच्याकडून नेहमीच न्याय मिळत असे. कोण माणूस समोर आहे याच्यापेक्षा त्याने दिलेला कागद काय म्हणतोय, यावरच त्यांचे लक्ष असे; आणि ते कागदातील मजकूर वाचून समोरच माणूस आहे हे जाणून ते न्याय्य भूमिका घेत असत! म्हणूनच सारे जण म्हणत साहेब कागदातील माणूस वाचतात. त्यांना पैशाचा – श्रीमंतीचा हव्यास नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळात ते देशासाठी इंग्रजांविरुद्ध लढले; आणि स्वातंत्र्योत्तर काळात ते सामान्य माणसांच्या न्यायासाठी झटले.


स्वच्छ चारित्र्य, प्रामाणिकपणा, निष्ठापूर्वक काम, कार्यकर्त्यांबद्दल अतीव आपुलकी या गुणांमुळे काका देशभर सामान्यांचे नेते बनूनच राहिले. सामान्यांचा आधार म्हणून राहिले. आमच्या काकांना त्यांचे सर्व सहकारी आदराने साहेब म्हणत, परंतु, ते कधीच साहेबासारखे वागले नाहीत, हा त्यांचा गुण खरोखरच आदर्शवत आहे. काकांच्या शिकवणीतील निष्ठा, प्रामाणिकपणा आणि स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवण्याचे त्यांचे गुण आम्ही जोपासल्यामुळेच आजही चव्हाण कुटुंबाची समाजात एक वेगळी प्रतिष्ठा आहे.

**अशोकराव चव्हाण :९८१९०९५९०३**
**शब्दांकन – एस.आर. माने**
**संपर्क : ९४२२६१४५४५**

## सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय


**नव्या राज्यामधले काही प्रदेश आर्थिकदृष्ट्या अविकसित व मागासलेले आहेत. स्वाभाविकपणेच त्यांचा विकास ही महाराष्ट्र सरकारच्या दृष्टीने खास विचाराची बाब आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांव्यतिरिक्त, राज्यातील काही वर्गही मागासलेले आहेत; त्यांच्या प्रगतीसाठी सुद्धा आपणास विशेष प्रयत्न केले पाहिजेत. या मागासलेल्या वर्गात केवळ सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांचाही मी समावेश करतो. समान संधी ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेतील महत्त्वाची बाब आहे. आणि म्हणून बुद्धी असूनही केवळ पैशाच्या अभावामुळे तिला वाव मिळत नाही असे होता कामा नये. महाराष्ट्रात अशा प्रकारे सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळेल अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी आपण झटले पाहिजे.**

**('साधना' साप्ताहिकातर्फे भरविण्यात आलेल्या परिसंवादाचे उद्‌घाटन, पुणे, दि. १३ मे १९६०)**





# सामाजिक न्यायाचा कैवारी



**माणसे हेरणे हे यशवंतरावांचे मोठे वैशिष्ट्य. ना.धों. महानोर असोत की लक्ष्मण माने... अशी हजारो माणसे हेरून यशवंतरावांनी त्यांना प्रेम दिले, प्रोत्साहित केले. ज्येष्ठ लेखक आणि समाजसेवक *लक्ष्मण माने* सांगत आहेत यशवंतरावांबद्दल...**

**प्रश्न : यशवंतरावांच्या कर्तृत्वाकडे तुम्ही कसे बघता?**

**माने :** महाराष्ट्राचा कणखर नेता, राजकीय धुरंधर नेतृत्व आणि देशाच्या विकासाचे स्वप्न पाहणारा एक जबरदस्त ध्येयवेडा कर्ता पुरुष म्हणजे यशवंतराव चव्हाण! अतिशय मृदू, कोमल आणि हळव्या स्वभावाचे अनेकविध पैलू या व्यक्तिमत्त्वाला जोडलेले आहेत. यशवंतरावांना जाऊन आता अनेक वर्षे झाली. हे वर्ष त्यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. यशवंतराव हे महाराष्ट्राचे आदर्श आणि प्रेरणादायी असे व्यक्तिमत्त्व होय. यशवंतरावांच्या बद्दल प्रचंड निष्ठा आणि आदर आहे. समाजवादी लोकशाही मूल्ये जोपासणारा, जपणारा असा द्रष्टा राजकारणी म्हणून यशवंतराव होते. संविधानाला अभिप्रेत असणाऱ्या नैतिक विचार प्रणालीचा पुरस्कार यशवंतराव करत असल्यामुळे आमचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. वैचारिक असा स्नेह होता.

**प्रश्न : आपली यशवंतराव चव्हाणांशी भेट केव्हा झाली?**

**माने :** माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेचे प्रचंड चटके आणि दारिद्र्याच्या विराट वेदना सहन करत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची तेजस्वी वाट धुंडाळत होतो. समाजवादाचा प्रभावही मनावर होता. अशा परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांची भेट झाली. त्याला आता ३५-४० वर्षे झाली. त्यांची ही पहिली भेट आमच्यात कायमचे ऋणानुबंध निर्माण करून गेली. मी लहान असताना यशवंतरावांबद्दल इतरांकडून अनेकदा ऐकत असे. मी ज्या भागात राहायचो तो फलटण भाग हा तर चव्हाण साहेबांची सासुरवाडी. त्यामुळे स्वाभाविकच हा भाग राजकीयदृष्ट्या जागरूक होता. अगदी ११वीपर्यंतचे माझे शिक्षण हे यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने सुरू असलेल्या माध्यमिक शाळेतच झाले. प्रत्यक्ष १९५७च्या निवडणुकीत मी चव्हाणसाहेबांना पाहिले. पुढे १९७३ला त्यांची आणि माझी साताऱ्यात भेट झाली. समाजवादी युवक दलात तेव्हा मी नरेंद्र दाभोळकरांच्या सोबत काम करीत होतो. यशवंतरावांच्या विरोधात ७७-७८पर्यंत आम्ही अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने आंदोलने केली. मात्र, चव्हाण साहेबांनी आमच्या भूमिकेचा अनादर करून इतर राज्यकर्त्यांसारखी प्रश्नांना बगल दिली नाही. उलट त्या प्रश्नांशी ते भिडत असत, त्यामुळे यशवंतराव चव्हाण हे आज आपल्यात नसले तरी त्यांचे स्मरण होत नाही असा एकही दिवस उजाडत नाही.

**प्रश्न : भटक्या विमुक्तांच्या विराट वेदनांची कैफियत आपण 'उपरा' या आत्मकथनात मांडून विद्रोही आक्रोश पुकारला तेव्हा खऱ्या अर्थाने यशवंतरावांचे लक्ष 'लक्ष्मण'कडे वळले असे म्हटले जाते ते खरे आहे काय ?**

**माने :** होय, ही गोष्ट खरी आहे. १९८० साली मी 'उपरा' लिहिले. ते चव्हाण साहेबांनी वाचल्यानंतर ते माझ्या विलक्षण प्रेमात पडले, तेव्हापासून त्यांचे आणि माझे नाते अधिक दृढ झाले. उपरा वाचून ते थेट साताऱ्याच्या ४४४ मंगळवारातील झोपडपट्टीतल्या माझ्या घरी आले. तेव्हापासून इथून पुढच्या काळात ते माझ्या कुटुंबातले आणि मी त्यांच्या कुटुंबातला सदस्यच झालो. शशीला (पद्मश्री लक्ष्मण माने यांच्या पत्नी) ते आपली मुलगी मानत असत. खरेतर, 'उपरा'नेच यशवंतरावांचा सहवास घडवला आणि अखेरपर्यंत टिकवला असे म्हणायला हरकत नाही.

**प्रश्न : यशवंतराव चव्हाण हे आपणाला का भावतात?**

**माने :** यशवंतराव चव्हाण यांना गरीब माणसाबद्दल पराकोटीची आस्था होती. यशवंतराव आधुनिक महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होतेच होते; परंतु, ते खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगीण विकासाचे स्वप्न पाहणारे द्रष्टा नेता होते. सर्वसामान्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचा संघर्ष होता. हा संघर्ष कोणी जाणला नाही. सर्वसामान्य माणसाबद्दल असणारा अतीव जिव्हाळा, तळमळ हे त्यांच्या कार्यकर्तृत्वातून दिसून येते. उच्चवर्गाला बाजूला सारून सर्वसामान्य तळागाळातील, खेडोपाड्यातील गरिबातल्या गरीब कार्यकर्त्याला प्रतिष्ठा देण्याचे कार्य यशवंतरावांनी केले. चव्हाण साहेब जेव्हा संरक्षणमंत्री झाले तेव्हा त्यांनी विदर्भातील बेलदार समाजाचे मारुतराव कन्नमवार या एकेकाळी आंध्र प्रदेशातून आलेल्या भटक्या समाजातील नेत्याला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री केले. त्यानंतर विमुक्त समाजातील वसंतराव नाईक यांना तब्बल १२ वर्षे मुख्यमंत्री पदी विराजमान केले. गरीब माणसाला हात देण्याची, त्याला त्याच्या 'माणूस'पणाची प्रतिष्ठा देण्याची जी कार्यपद्धत यशवंतराव चव्हाणांच्या अंगी होती, ती खरोखरच वाखाणण्याजोगी व भावणारी अशीच होती.

**प्रश्न : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने सतत आपण कार्यरत राहिला. यशवंतरावांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील प्रश्नांना सोडवण्याचा प्रयत्न केला का?**

**माने :** खरेतर, यशवंतराव चव्हाण यांनी शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित माणसांना बरोबर घेऊनच त्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला.



कुळकायदा, शेत जमिनीवरच्या मर्यादेचा (सिलींग) कायदा राबवण्याबाबत चव्हाण साहेब सतत आग्रही राहिले. महार वतने जमिनी विरुद्ध 'असेंब्लि'त अनेक वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संघर्ष करावा लागला. 'महार वतनाचा कायदा' ही पद्धत नष्ट करण्याचा कायदा करून चव्हाण साहेबांनी डॉ. आंबेडकरांच्या स्वप्नांची पूर्तता केली; म्हणून तर शेकडो वर्षांची गुलामगिरी या कायद्याबरोबर संपवण्यात यश आले आहे. खरेतर, दादासाहेब गायकवाड, आर.डी. भंडारे, रा.सू. गवई, दादासाहेब रूपवते यांचे सहकार्य या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे ठरले. वस्तुत: असे क्रांतिकारक कायदे करीत असताना अस्पृश्यांना ही व्यवस्था पुन्हा गुलाम करणार नाही याकडे यशवंतरावांनी कटाक्षाने पाहीले. पंडित नेहरूंचा प्रभाव यशवंतरावांवर जरूर होता; मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीतून ते आपली ध्येयधोरणे, उद्दिष्टे यशस्वी करीत असत. ते जसे समाजवादी होते, तसे ते समतावादी आणि लोकशाहीवादी होते. प्रतिगामी विचारांची कास त्यांनी कधीच धरली नाही. गरिबातल्या गरीब माणसाकडे सत्ता गेली पाहिजे हा संविधानाला अभिप्रेत असणारा यशवंतरावांचा विचार हा त्यांची भूमिका अधिक स्पष्ट आणि अधोरेखित करून जातो. त्यामुळे यशवंतरावांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील प्रश्नांची सोडवणूक केली की नाही हा मुद्दा इथे महत्त्वाचा ठरत नाही.

**प्रश्न : यशवंतराव चव्हाण यांची सामाजिक परिवर्तनाबद्दलची नेमकी काय भूमिका होती?**

**माने :** संविधान हे सामाजिक परिवर्तनाला गती आणि दिशा देऊ शकते हे ठाऊक असल्यामुळे यशवंतराव चव्हाण भारतीय संविधानाबद्दल अत्यंत संवेदनशील होते. संविधानाच्या माध्यमातूनच भारतीय लोकशाही अधिक समृद्ध होते आणि निकोप राहू शकते असा त्यांचा विश्वास होता. त्यांची आणि माझी जेव्हा जेव्हा संविधानाच्या अनुषंगाने चर्चा होत असे तेव्हा तेव्हा त्यांची विचारप्रणाली संविधानाचा रस्ता सोडून भरकटली नाही. संविधानाने माणूस केंद्रबिंदू मानला. माणसाला आणि त्याच्या सर्वांगीण उत्कर्षाला महत्त्व दिले. यशवंतराव चव्हाण यांनीही गरीब माणूस महत्त्वाचा मानत त्याच्या उन्नयनाची भूमिका घेतली. जाती, धर्म यांच्या परिघाच्या बाहेर जाऊन त्यांनी खऱ्या अर्थाने फुले, शाहू, आंबेडकर आणि नेहरूंच्या विचारातील सामाजिक न्यायाचे धोरण अखंडपणे अवलंबले. सरंजामशाही, घराणेशाही यांच्या विरोधात यशवंतराव सतत उभे होते. सरंजामशाही, घराणेशाही उद्ध्वस्त झाल्याशिवाय समाज परिवर्तनाला आणि सत्तेच्या तसेच राजकारणाच्या विविध अंगांना चालना मिळू शकत नाही हे ते ओळखून होते. सत्ता ही माणसाळली पाहिजे. म्हणजेच सत्ता माणसाकडे गेली पाहिजे. तिचे केंद्रीकरण न होता विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. या भूमिकेतूनच चव्हाण साहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीचा पाया घातला. सत्ता ही जर सामान्य माणसापर्यंत 'परक्युलेट' होत गेली तर सामाजिक परिवर्तनही वेगाने होईल अशी त्यांची धारणा होती.

**प्रश्न : आपण साहित्यिक आहात. यशवंतराव चव्हाण यांनाही साहित्याचे मजबूत अंग होते. याबद्दल काय सांगू शकाल?**

**माने :** यशवंतरावांच्या साहित्यकृती वाचल्यानंतर त्यांच्यातील दर्जेदार, कसदार साहित्यिकाची ओळख पटते. यशवंतराव चव्हाण यांचा अभ्यास आणि व्यासंग प्रचंड होता. वाचन आणि निरीक्षणशक्ती जबरदस्त असल्याने त्यांच्या लेखनीत कसदार साहित्यिकाची ऊर्जा उतरली होती. खरे पाहता ते जेवढे मुरब्बी राजकारणी होते, त्याही पलीकडे ते एक मोठे साहित्यिकही होते. ते जीवनवादी साहित्यिक होते, कलावादी नव्हते. त्यांच्या विचारात माणूस हा जगण्याचा केंद्रबिंदू असल्याने त्यांची सर्व साहित्यिक मूल्ये ही जीवनवादी होती. कृष्णाकाठ, भूमिका, सह्याद्रीचे वारे अशी त्यांची सर्व ग्रंथसंपदा जीवनवादी साहित्याचा आविष्कार आहे. समाजाला पुढे घेऊन जाण्याची त्यात धमक आहे. यशवंतरावांना दलित साहित्याबद्दल कमालीची उत्सुकता आणि आकर्षण होते. त्यांनी सातत्याने दलित साहित्याचे स्वागतच केले आहे. ना.धों. महानोर असोत किंवा भालचंद्र नेमाडे असोत, नामदेव ढसाळ असोत किंवा पार्थ पोळके असोत यांच्याशी यशवंतरावांचा चांगला साहित्यिक स्नेह होता. त्यांचे परिवर्तनवादी साहित्यिकांवर मनापासून प्रेम होते.

**प्रश्न : देशाच्या राजकरणासदर्भात आणि लोकशाही संदर्भात यशवंतराव चव्हाणांची काय संकल्पना होती?**

**माने :** खरेतर, यशवंतरावांची काँग्रेस ही प्रजेची काँग्रेस होती. समाजवादी लोकशाही विचार या काँग्रेसने अनुसरला होता. भारताच्या संसदेमार्फत जे काही परिवर्तन होईल त्यावर यशवंतरावांची अढळ श्रद्धा होती. यशवंतरावांची राजकीय जडणघडणच लोकशाही मूल्यांवर अधारित झाली असल्याने संविधान आणि लोकशाहीच्या माध्यमातून राजकारण झाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. समाजवादाचा पहिला पाळणा महाराष्ट्रात हालेल असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे जोपर्यंत यशंवतराव चव्हाण राजकारणात, सत्तेत सक्रिय होते तोपर्यंत या देशातील सर्वसामान्य माणसाला सुरक्षेचा आणि परिवर्तनाचा विश्वास मिळत होता.

**प्रश्न : आजच्या राज्यकर्त्यांनी यशवंतरावांच्या विचारांना चालना दिली असे आपणाला वाटते का?**

**माने :** अजिबात नाही. उलट प्रस्थापित व्यवस्था ही यशवंतरावांच्या विचारांपासून दूर गेली आहे. यशवंतराव चव्हाण होते, तेव्हा राजकारणात जातदांडगे, धनदांडगे, गुंडगिरी अशांचा शिरकाव होऊन लोकशाहीचा पराभव होत नव्हता. आता मात्र लोकशाहीचा पावलापावलावर पराभव होताना दिसतो आहे. हा देश शेतीप्रधान देश असल्याने कृषी औद्यागिकीकरणाचे धोरण यशवंतरावांनी अवलंबले आणि सहकारी तत्त्वावर कारखानदारीला चालना दिली. आज मात्र भांडवली अर्थव्यवस्थेने सारे काही उद्ध्वस्त करून टाकले आहे. भांडवली अर्थव्यवस्था ही आजच्या राज्यकर्त्या व्यवस्थेने देशात आणली. त्याचे परिणाम सर्वसामान्य माणसासह देशाला भोगावे लागताना दिसत आहेत. याचा यशवंतराव चव्हाणांचे नाव घेणाऱ्या राज्यकर्त्यांनी साहेबांच्या जन्मशताब्दी निमित्ताने शोध घेतला पाहिजे, असे मला वाटते.

**लक्ष्मण माने : ९८२२०१३२३६**
**मुलाखत : अरुण जावळे**
**संपर्क : ९८२२४१५४७२**



# सुसंस्कृत नेता

यशवंतराव गडाख

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ भारावलेला होता. धकाधकीचा होता. स्वराज्य मिळाले. त्याचे सुराज्यात रूपांतर करायचे कसे? हा राज्यकर्त्यांपुढे त्या काळात प्रश्न होता. त्यात महाराष्ट्रात द्विभाषिक राज्य. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोमात होती. प्रचंड जनक्षोभ होता. केंद्र व राज्यातील भाषिक जनता, असाच तो संघर्ष होता. या संघर्षात राज्यातील काँग्रेसचे नेतृत्व यशवंतराव चव्हाणांसारख्या धुरिणांकडे होते. यात त्यांना किती यातना सहन कराव्या लागल्या. यशवंतरावांनी कुशलतेने ही चळवळ हाताळली. त्यातून तावूनसुलाखून त्यांचे नेतृत्व पुढे आले. १९६२च्या चीन युद्धानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना केंद्रात बोलावून घेतले. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' असा वाक्प्रचार तेव्हा रूढ झाला. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वाला झळाळीच येत गेली. मागे वळून कधी पाहिलेच नाही. महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचवावी असेच नेतृत्व स्वातंत्र्यानंतर देशाला त्यांनी दिले होते. लोकमान्य टिळकांनंतर नेतृत्वाची पोकळी त्यांनी भरून काढली.

माझ्यासारखी नवी पिढी त्या काळात महाविद्यालयीन शिक्षण घेत होती. राजकरणात, समाजकरणात रस असल्याने या गोष्टी जवळून पाहात होतो. साठ-सत्तरच्या दशकात तरुण त्यांच्याकडे आकर्षित झाले. त्यातूनच पुढे राज्यात नवनिर्माण झाल्याचे दिसते. यशवंतरावांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल बरेच काही लिहून आले आहे. अनेक ग्रंथही प्रकाशित झाले आहेत. प्रस्तुत ठिकाणी त्यांच्या चारित्र्याचे सिंहावलोकन करण्यापेक्षा त्यांच्या सहवासात आल्यावर त्यांचे मोठेपण, त्यांची सहिष्णुता, विजिगीषू वृत्ती, सहृदयता सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. त्यांच्या जपलेल्या आठवणींतून या गोष्टी उलगडत जातील.

अहमदनगरमधील प्रसिद्ध कुस्तीगीर पैलवान छबुराव लांडगे यांच्या संबंधातील एक मजेशीर आठवण आहे. यातून यशवंतरावांचे मोठेपणच सिद्ध होते. लहानातल्या लहान उपकारकर्त्याला विसरायचे नाही ही साधी शिकवण त्यांनी दिली. त्याचे काय झाले, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा तो काळ होता. नगरच्या गांधी मैदानात कॉ. श्री.अ. डांगे, बाळासाहेब भारदे, यशवंतराव चव्हाण अशा नेत्यांची भाषणे व्हायची. लोक खूप गर्दी करायचे. विचारांची ती मेजवाणीच वाटायची. भविष्याची स्वप्ने त्यात दिसायची. चव्हाणांसारख्या राज्यकर्त्याचे विचार ऐकण्यासही लोक उत्सुक असायचे. आंदोलनाच्या काळात त्यांची सभा नगरला होऊ द्यायची नाही, असा आंदोलकांनी पवित्रा घेतला. त्यांना विरोध समजल्यावर साहेबही म्हणाले, 'नगरमध्ये मी येणार, सभा घेणार, त्यात विचारही मांडणार.' ते इरेस पडल्यावर काँग्रेसजनांना हुरूप आला. नगरमध्ये सभा घेण्यास चव्हाणसाहेब आल्यावर जुन्या बस स्थानकापासून मैदानापर्यंत त्यांची उघड्या जीपमधून मिरवणूक काढण्यात आली. या जीपच्या बोनेटवर प्रसिद्ध पैलवान छबुराव लांडगे मांडी घालून बसले.



त्या काळात त्यांचा दबदबाच तसा होता. सभा निर्विघ्नपणे पार पडली. त्यानंतर केंद्रात मंत्री असताना चव्हाणसाहेब एकदा नगरला आले. विश्रामगृहात कार्यकर्त्यांशी गप्पा मारत बसले होते. तेथे छबुराव लांडगे आले आणि त्यांनी साहेबांना चहाला घरी चला, असा आग्रह धरला. काँग्रेस अंतर्गत विरोधी गट साहेबांनी छबुरावांकडे जाऊ नये, यास्तव विरोध करीत होता. त्यांनी सगळ्यांचे ऐकून घेतले, काही बोलले नाहीत. जिल्हाधिकाऱ्यांना म्हणाले, गाडी काढा, आपल्याला छबुरावकडे जायचं आहे. गाडी पैलवानांच्या घराकडे वळाली. गाडीत साहेबांसमवेत मी आणि आबासाहेब निंबाळकर असे दोघे होतो. ते म्हणाले, 'काय हे मनाचे कोतेपण, त्यांच्या घरी जायला विरोध. नगरमध्ये माझी सभा होत नव्हती तेव्हा छबुराव जीपच्या बोनेटवर जाऊन बसले. सभास्थानी त्यांनी नेलं. सभा झाली. हे मी आयुष्यभर विसरणार नाही. कार्यकर्त्याच्या भावनेचा विचार 'त्याने पक्षासाठी खाल्लेल्या खस्ता' त्याच्या त्यागाचा कुणी विचारच करीत नाही. आजच्या राज्यकर्त्यात हे प्रकर्षाने जाणवते. मागची पिढी अपवाद असू शकेल. छबुरावसारख्या सामान्य कार्यकर्त्याने मदतच केली होती. त्यातून उतराई म्हणण्यापेक्षा त्याचा सन्मान कसा वाढेल, हेच साहेबांनी पाहिले. या साध्या घटनेतून त्यांचे मोठेपण, कार्यकर्त्यांना जपण्याची कलाच सिद्ध होते. आताचा विचार न केलेलाच बरा!

दुसरे असे की, मुळा सहकारी साखर कारखान्याचा पहिलाच गळीत हंगाम होता. १४ जानेवारी १९७९ हा तो मकरसंक्रांतीचा दिवस. गव्हाणीत मोळी टाकण्यासाठी यशवंतराव चव्हाण, शरद पवार व अण्णासाहेब शिंदे आदी नेते आले होते. या कार्यक्रमानंतर मळ्यात भोजनानंतर जिल्ह्यातील पुढाऱ्यांची बैठक झाली. विधानसभा निवडणुका जवळ आल्या होत्या. बैठकीस आबासाहेब निंबाळकर, मारुतराव घुले, कि.बा. म्हस्के आदी उपस्थित होते. मतदारसंघाच्या निवडीबाबत चर्चा चालू होती. निंबाळकर यांचा कर्जत विधानसभा मतदारसंघ राखीव झाला होता. आबासाहेब साहेबांचे विश्वासू सहकारी. चर्चा झाल्यावर चव्हाणसाहेब एकच वाक्य बोलले,



''आबासाहेबांशिवाय तुमची टीम राज्यात कशी दिसेल.'' जिवाला जीव देणारा हा नेता, संघटना उभी करणाऱ्याला वाऱ्यावर सोडत नसे.

हे झालं आबासाहेबांबद्दल. आजचे राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्याबद्दलही असाच गमतीशीर प्रकार सांगावासा वाटतो. चव्हाणसाहेब आबासाहेबांचे खूपच सख्य! आबासाहेब काटेवाडीला पवार यांच्या घरी गेले असताना त्यांच्या मातोश्रींना आमच्या पक्ष कार्यासाठी आपला पुत्र देण्याबाबतची विनंती केली. त्याचवेळी १९६७च्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. प्रत्येक जिल्ह्याच्या संसदीय मंडळाच्या बैठका मुंबईत येथे होत होत्या. पुण्याच्या बैठकीत तेथील पक्षश्रेष्ठीत विधानसभेच्या संभाव्य उमेदवाराबाबत चर्चा झाली. शरद पवार यांचे नाव यावेळी बारामतीतून सुचविण्यात आले. पुण्यातील पक्षाच्या ज्येष्ठ मंडळीनी त्यास विरोध केला. ते निवडून येतील का, इथूनच शंका उपस्थित केली. या चर्चेत मध्येच चव्हाणसाहेबांनी भाग घेत सांगितले, ''पक्ष राज्यातील सर्व २८८ जागा लढवितो. त्या सर्वच जागी विजयी होत नाही. त्यातील काही जागा जातात. मग, पवार यांना तिकीट दिल्यावर आणखी एखादी जागा गेली तर काय बिघडेल. युवा कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन बघायला काय हरकत आहे?'' मग, मंडळीचा विरोध मावळला व पवार यांची उमेदवारी निश्चित झाली. चव्हाणसाहेबांनी आग्रह धरल्याने शक्य झाले. पण, युवा कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, उत्तेजन दिले पाहिजे, हाच त्यांचा दृष्टिकोन त्यामागे होता. त्यानंतर पवार यांनी मागे पाहिलेच नाही. निवड सार्थच होती ना?

पंचायत राज व्यवस्थेचे जे नेटवर्क आज राज्यात उभे आहे. त्यामागे चव्हाणसाहेबांचीच दूरदृष्टी होती. कार्यकर्त्यांना प्रशासकीय अनुभव मिळण्याचा ग्रामीण भागातील या राजकीय शाळाच आहेत, असे त्यांना वाटे. या व्यवस्थेतून कार्यकर्ते पुढे सभापती, संस्थेचे अध्यक्ष, मंत्री झालेले दिसतात. एखाद-दुसरं राज्य सोडलं तर महाराष्ट्राला त्यांची ही मोठी देण आहे. जिल्हा परिषदा स्थापन झाल्यावर ग्रामीण भागातून फार मोठे बळ निर्माण झाले. यात पुढे थोडासा अहंचा प्रश्न निर्माण झाला. तोही साहेबांनी खुबीने सोडविला. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांत श्रेष्ठ कोण? कुणी कुणाच्या दालनात जायचे? प्रश्न साधा होता. मुंबईला अधिकारी व पदाधिकाऱ्यांची परिषद भरली होती. चव्हाणसाहेब या परिषदेला मार्गदर्शन करीत होते. तेथे हा मुद्दा उपस्थित झाला. साहेब म्हणाले, ''मला या तक्रारीत अर्थ वाटत नाही. विकासाच्या प्रश्नांवर दोघांनी आपली कार्यक्षमता गुंतवावी. हा प्रयोग राबविताना अडचणी येतीलच. दोघेही खुर्चीत किती तास बसतात. शेवटी अधिकारी हाही माणूसच असतो. कार्यालयात अपमान वाटत असेल तर अध्यक्षांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आजारी पडल्यावर त्यांच्या घरी भेटायला जावे. अध्यक्ष आजारी पडला तर अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरी जावे. एवढ्या पातळीपर्यंत दोघे येऊ शकतात. प्रश्न सुटायलाही मदत होईल.'' मग, हे प्रश्न कमी झाले. राज्यकर्ता असूनही त्यांची पाहण्याची दृष्टी किती सखोल होती. माणुसकी व सुसंस्कृतपणा हा गुण त्यांच्यात मुळातच होता. तो ठायीठायी दिसायचा.

सार्वजनिक कार्यक्रमात कार्यकर्त्यांना ते सन्मानाने वागवायचे. नवीन कार्यकर्त्यांतील गुण हेरून ते कसे विकसित करता येतील, याची काळजी घेत. सार्वजनिक कार्यक्रमासाठी राज्यभर ते दौरे करायचे. या दौऱ्यात कार्यकर्त्यांप्रती असणारा त्यांचा भाव लक्षात येई. ते त्यांना फार जपत असत. त्यांचा अनुभव मी बऱ्याचदा घेतला आहे. यातूनच आम्ही पुढे आलो. व्यासपीठावर युवक काँग्रेसची मंडळी भाषण करायला लागली की ते एकाग्र चित्ताने भाषण ऐकत. लोकांनी दिलेल्या निवेदनाचे कागद घेत. त्यांचे बारकाईने निरीक्षण करीत. कार्यक्रम चालू असताना शेजारी बसलेल्या पुढाऱ्यांशी बोलत नसत. हात बांधून कोण काय बोलतो हे काळजीपूर्वक मनन करीत. आजची स्थिती उलट आहे. मोठे पुढारी लहान कार्यकर्त्यांकडे पाहात नाहीत. प्रश्न काय मांडले, याकडे लक्ष देत नाहीत. व्यासपीठावर दुसऱ्यांचे भाषण चालू असताना आपसात गप्पा मारतात, हास्यविनोद करतात. घेतलेली निवेदने कुठे तरी टाकून देतात. या लहान लहान गोष्टी राज्यकर्त्यांनी पाळायच्या असतात. तरुण पिढीचा आत्मविश्वास वाढवायचा असतो. विचारपूर्वक बोलले पाहिजे ही भावना कार्यकर्त्यात तयार व्हायची, ही त्यांची शिकवण आजचे राज्यकर्ते विसरले आहेत.

चव्हाणसाहेबांनी खऱ्या अर्थाने या राज्यातील लोकांच्या मनावर राज्य केले. त्यांनी उच्चारलेल्या शब्दास केवढी किंमत होती. १९६७ची घटना आहे. मी सभापती असताना नेवाशात महाविद्यालय काढायचे ठरले. यासंदर्भात नेवाशाला ज्ञानेश्वर मंदिरातच बैठक होती. बैठकीला साहेब, अण्णासाहेब शिंदे आदी उपस्थित होते. ''कुणीही कितीही पैसे दिले तरी इथेच ज्ञानेश्वरांच्या नावाने कॉलेज निघाले पाहिजे,'' असे साहेबांनी जाहीर करून व्यक्तिगत एक हजाराची देणगीही महाविद्यालयासाठी दिली. या घटनेने जिल्ह्यातील पुढारी काय समजायचे ते समजले. चव्हाणसाहेबांचा नंतरचा कार्यक्रम श्रीरामपूरला होता. तेथे अण्णासाहेब शिंदे यांनी डाकले यांना महाविद्यालयास एक लाख रुपयांची देणगी देण्याची गळ घातली. नाव देता येणार नाही, हेही स्पष्ट केले. नेवाशातील बैठकीचा वृत्तांतही दिला. डाकले यांनी लाखाचा निधी दिला. तेव्हा कुठे आमचे नेवाशाचे कॉलेज निघाले आहे. यामागे साहेबांचीच प्रेरणा होती. हे निश्चित.

जीवनातील सर्व क्षेत्रांत त्यांना रस होता. राज्यकर्ता कसा असावा हे त्यांच्याकडे पाहिल्यावरच कळते. साहित्य, संस्कृती या क्षेत्रातही त्यांना गती होती. केवळ बहुजन समाजातील पुढाऱ्यांशी त्यांचे हितसंबंध होते असे नाही. सर्वच समाजात त्यांची ऊठबस होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वि.स. पागे, दादासाहेब गायकवाड आदी काही ठळक नावे सांगता येतील. सर्व समाजातील उच्चपदस्थांचा सहभाग घेऊनच त्यांनी महाराष्ट्र घडविला. पुरोगामी राज्य म्हणून पुढे त्यास नावलौकिक प्राप्त झाला तो त्यांच्या अपार कष्टाने. समाजाचे दीर्घकाळ नेतृत्व करायचे तर त्या राज्यकर्त्याच्या अंगी हे सर्व गुण असले पाहिजेत. राज्य आज प्रगत गणले जाते. विकास झाला म्हटले जाते. उद्योगधंदेही वाढले. पण, महाराष्ट्राची एक शोकांतिका आहे. चव्हाणसाहेबांनी जी उंची त्या काळात सर्व क्षेत्रात गाठली ती उंची नंतरच्या राज्यकर्त्यांना गाठता आली नाही. उलट हा ग्राफ कमी कमी होत गेला. राज्यकर्ता बहुजन समाज विकास प्रक्रियेत लागला. दुसऱ्या बाजूकडे तो जाऊच शकला नाही. क्षमता नव्हती की, ती समजली नाही. काही कळत नाही. एका पातळीपर्यंत ते राजकारण एके राजकारण करीत बसले. सातत्याने निवडणुका... खरेदी-विक्री संघ, बाजार समिती, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद , विधानसभा, लोकसभा, कुठली ना कुठली निवडणूक चालूच. या चक्रातून तो डोकं वर काढतच नाही. सारी एनर्जी त्यातच खर्च होते. त्यात घरातली भाऊबंदकी, गावातली भांडणं, गटतट या पलीकडे काही आहे हे त्याला उमगलेच नाही. यात दोन-तीन पिढ्या बिघडल्या, इतर क्षेत्रात त्या जाऊच शकल्या नाहीत. राजकारणाव्यतिरिक्त अनेक क्षेत्र



अशी आहेत. ती पादाक्रांत केलीच नाहीत. ही समाजाच्या दृष्टीने हानीच झाली. याला आम्ही राज्यकर्तेच जबाबदार आहोत. इतर समाजाला काही क्षेत्र बंद झाली तर त्याने शिक्षण, संरक्षण, व्यापार, उद्योग या क्षेत्रात पदार्पण केले. तसा बहुजन समाज गेला नाही.

चव्हाणसाहेबांची आणखी एक आठवण आवर्जून सांगाविशी वाटते. साहित्यिक रणजीत देसाई त्यांच्या कोवाड या गावी आम्ही मुक्कामाला होतो. त्यांच्या पत्नीच्या पुस्तकाचे प्रकाशन त्या दिवशी होते. वाड्यात साहेब, मी, शिवाजी सावंत, आनंद यादव, अरुण शेवते बसलो होतो. साहेब खुर्चीवर, आम्ही सतरंजीवर बसून गप्पा रंगल्या होत्या. दोन-तीन तास साहित्याच्या वेगवेगळ्या प्रवाहावर मनमुराद गप्पा झाल्या. ती एक बौद्धिक मेजवाणीच होती. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर चव्हाणसाहेब रणजीत देसाई यांना म्हणाले, ''तुम्ही 'स्वामी' कांदबरी जेथे बसून लिहिली ती जागा दाखवा.'' देसाईंनी त्यांना जिना चढून वरच्या खोलीत नेले. ज्या खुर्चीत बसून त्यांनी लिहिले त्या खुर्चीत साहेबांनी बसून पाहिले. साहित्याची त्यांना आवड होती. साहित्यिकांत ते रमत. स्वत:ही त्यांनी भरपूर लिखाण केले आहे.

चव्हाणसाहेब उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचले; पण, पंतप्राधानपदाची संधी चालून आली असताही ती त्यांनी नाकारली, याची खंत मराठी माणसाच्या मनात आहे. याबाबत त्यांचे अंतर्मन कुणी जाणून घेत नाही. हल्लीच्या भाषेत त्यांचा आतला आवाज वेगळाच होता. एकतर ते भावनिक होते. सुसंस्कृत होते. त्यांना पदाची, सत्तेची हाव अशी नव्हती. पद मिळण्यासाठी त्यांना धडपड करावी लागली नाही. ती त्यांच्या स्वकर्तृत्वाने आपोआप मिळत गेली, ते इतरांसारखे राजकारणी नव्हते. पंतप्रधानपदाबाबत विचारणा झाल्यावर त्यांनी मला इंदिराजींना भेटावे लागेल, असा निरोप दिला; आणि ते भेटलेही. शेवटी जे व्हायचे तेच झाले.

त्यांच्या काळात विरोधक मजबूत होते. राजकारण तसं सोपं नव्हतं. पण, गावपातळीपर्यंत कार्यकर्त्यांची फळी त्यांनी निर्माण केली, त्यांना एक वैचारिक बैठक दिली. ते अनेकांना कौटुंबिक आधार वाटायचे, आपली या माणसाकडून फसवणूक होणार नाही, योग्य मार्गदर्शन होईल. आत एक बाहेर एक, असं काही नाही. नेत्याच्या अंगी जी विश्वासार्हता असावी लागते, ती त्यांच्या ठायी होती. त्यामुळे

## शेतजमिनीच्या विकासाचा प्रश्न

**आपल्या देशांतील शेतीच्या प्रश्नाशी निगडित असणारा अतिशय महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शेतीच्या विकासाचा प्रश्न आहे. गेली शेकडो वर्षे, कदाचित हजारो वर्षे शेतजमिनीच्या विकासाचा हा प्रश्न तसाच राहिलेला आहे. आम्ही आजपर्यंत ज्याकडे फार दुर्लक्ष केले असा हा प्रश्न आहे. आजही आपल्या देशात कोट्यवधी एकर जमीन-आज मला निश्चित आकडा माहीत नाही - तशीच विकास न होता राहिली आहे. विशाल मुंबई राज्य होते त्यावेळी हिशेब करून मी पाहिले की, जिचे बंडिंग करावे लागेल, जिच्याबाबत भूसंरक्षणाची उपाययोजना करावी लागेल अशी चार कोटी एकर जमीन मुंबई राज्यात होती. वसंतराव नाईकांनी आताच सांगितल्याप्रमाणे आजही साडेतीन कोटी एकर जमीन महाराष्ट्रात अशी आहे की, जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि घरी येऊन पाहतो तो आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्ये पाणी नाही; तसेच आपल्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये आपल्या डोक्यावर भांडे घेऊन जाते बिचारी आमची शेती पण त्यात शेवटी काही शिल्लक राहत नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झालेला आहे. आणि आज एक वर्ष नाही, दोन वर्षे नाही, तर गेली कित्येक शतके हे असेच चालले आहे.**

**(काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर, महाबळेश्वर, दि. ७ ऑक्टोबर १९६०)**

लोक कुठलाही प्रश्न त्यांच्याकडे बिनधास्त नेत. येणाऱ्या माणसाची तक्रार, प्रश्न समजून घेऊन त्यांचे समाधान ते करीत असत. ऐंशी टक्के समाजकारण, वीस टक्के राजकारण अशा फुकटच्या गप्पा नव्हत्या, समाजमनाची नाडी त्यांनी ओळखली होती.

सहकार क्षेत्रात कार्यक्रमांना गेल्यावर साहेब त्या क्षेत्रातील चुकांवर भाष्य करायचे. आजच्या इतके अवमूल्यन त्या काळात सहकाराचे झाले नव्हते. प्रवरा इंग्लिश मिडियम स्कूलच्या उद्घाटनास आले. ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमांची शाळा निघते म्हटल्यावर मातृभाषेतील शिक्षणच चांगले, असा विचार तेथे मांडला. चुका दिसल्या तर कुणाचा मुलाहिजा ठेवत नसत. या स्पर्धेच्या युगात सहकारी संस्था कशा टिकवता येतील हाच प्रश्न आहे. खासगीकरणाचे पीक आले आहे. सहकाराचे केडर राहिले नाही. परिणामी, पुढच्या दहा-वीस वर्षांत सहकार क्षेत्र आकुंचित होत जाईल. वास्तविक, रशियातील साम्यवाद कसा मोडकळीस आला व युरोपात भांडवलशाहीचे काय चालले आहे हे पाहिल्यावर सहकार हाच मधला मार्ग तरणोपाय होता, त्याकडे लक्ष द्यायला कोणी तयार नाही. कृषी औद्योगिक क्रांतीचा पाया चव्हाणसाहेबांनी घातला, तोच ठिसूळ झाल्यासारखे वाटत आहे.

चव्हाणसाहेबांसारखा आदर्श सुसंस्कृत राज्यकर्ता होणे नाही. त्यांचे पर्वताएवढे उतुंग काम लक्षात घेऊन अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहास 'यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह' असे नाव दिले. मुळा एज्युकेशनच्या डेंटल कॉलेजलाही त्यांचे नाव दिले. त्यांनी खूप काही आदर्श या राज्यास घालून दिले. पण, या राज्याची शोकांतिका आहे, एकीकडे प्रगती होत असताना दुसरीकडे राज्यकर्त्यांमधील संवेदनशीलता संपत चालली आहे. सामाजिक प्रगतीचा डोलाराही दिसतो. कायदा-सुव्यवस्थेचे काय? ती कुठे आहे? शहरात, गावात गावठी कट्टे मिळू लागले आहेत. शाळेत मुलींचे अपहरण होते. गरीब, मध्यम वर्गीयांना जीवन सुरक्षित वाटत नाही. मग, या प्रगतीला अर्थ काय? संवेदनशीलता जपली असती तर अशी वेळ राज्यावर आली नसती.

**यशवंतराव गडाख :९८२२०६४२१२**

**शब्दांकन : महादेव कुलकर्णी**

**संपर्क : ९४२०३४३८१२**



# महाराष्ट्रधर्माचे प्रणेते

**न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी**

यशवंतरावांना 'माणसे' ओळखण्याची कला साधली होती व कुणाचे ऐकावे व कुणाचे ऐकू नये, याची जाणही होती. ते राजकारणात होते, त्यापेक्षा राष्ट्रकारणात व समाजकारणात अधिक होते. आचार्य विनोबा म्हणत त्याप्रमाणे हल्लीच्या राजकारणाला डिबेटिंग क्लबचे स्वरूप येऊ लागले आहे. आधीच आपल्यात हिंदू, मुसलमान इत्यादी धर्मभेद, त्यातही हिंदूंत पुन्हा स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर हे वाद आहेतच. राजकीय पक्षभेद व गटभेद आहेतच. त्यात नसत्या भेदांची भर घालण्यापेक्षा काही विधायक तत्त्वांवर भर देणे आवश्यक आहे. 'महाराष्ट्र धर्म' हा प्रथमदर्शनी वामनासारखा दिसला तर वस्तुत: तो दोन्ही पावलांतच विराट विश्व व्यापून टाकणाऱ्या त्रिविक्रमासारखा आहे. त्या त्रिविक्रमाचे एक पाऊल महाराष्ट्रीय, दुसरे राष्ट्रीय आणि तिसरे अतिराष्ट्रीय म्हणजे वैश्विक आहे. आणि हाच महाराष्ट्र धर्म यशवंतरावांना मान्य होता.

मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना मी जवळून ओळखत होतो. त्याहूनही दुरून अधिक ओळखत होतो. त्यांचे घनिष्ठ संबंध होते असे मी म्हणणार नाही. परंतु, घनिष्ठता नसली की माणसाची पारख अधिक नि:पक्षपणे करता येते, असे मी मानतो. मी कॉलेज जीवनात विद्यार्थी काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता होतो. त्यानंतर १९४८ साली एक विचार पुढे आला की विद्यार्थी चळवळ ही पक्षनिरपेक्ष असावी. म्हणून १९४८ साली बंगलोर येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या सभेत तसा निर्णय घेण्यात आला व व त्यानंतर नॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स ही विद्यार्थ्यांची पक्षनिरपेक्ष संस्था अस्तित्वात आली. ह्या संस्थेतही मी पदाधिकारी होतो. त्यानंतर मी मजूर चळवळीत जवळपास १० वर्षे म्हणजे १९६५पर्यंत सक्रिय होतो. नागपूरच्या राष्ट्रीय मिल मजूर संघाचा अध्यक्षही होतो. त्यानंतर भाषावार प्रांतरचना या तत्त्वावर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. विदर्भाची वेगळी संस्कृती आहे असे मी म्हणणार नाही. पण, विदर्भाचा वेगळा स्वभाव मात्र आहे. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्याची विदर्भाची मानसिकता नव्हती व त्यास विरोध होता. अर्थात, त्यातही राजकारणाचा व नेतृत्वाचा भाग अधिक होता. महाराष्ट्रात सामील झालो तर आपली अस्मिता संपेल, नागपूरला 'उपराजधानी' म्हणजे 'उपपत्नी'चे स्थान मिळेल, असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. एका ज्येष्ठ वैदर्भीय नेत्याच्या मते, ''स्वातंत्र्य आंदोलन व महात्मा गांधींनी चालविलेल्या सर्व चळवळीत विदर्भाचे आगळेवेगळे स्थान होते. तो देशभक्तांचा प्रदेश होता. इंग्रजांची चाकरी करणाऱ्यांचा प्रदेश नव्हता.''

पुण्यातच शिक्षण झालेले एक ज्येष्ठ साहित्यिक म्हणाले होते की, ''पुण्याच्या चहुबाजूंनी गगनचुंबी भिंत बांधली, तर बाकीचा सारा महाराष्ट्र एकच आहे.'' त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची चळवळ मूळ धरीत होती. मीही त्यात सामील होतो. आम्हाला वेगळा विदर्भ न मिळाला तरी चालणार होते; पण, आंदोलन हवे होते. कारण, ज्याला 'न्युसन्स व्हॅल्यू' म्हणजे उपद्रवी मूल्य नसते त्यांना काही किंमतच नसते अशी धारणा होती. राज्यकर्त्यांना फक्त बंदुकीच्या गोळ्यांचेच आवाज ऐकू येतात असा सार्वत्रिक समज होता. प्रादेशिक अगर विभागीय अस्मिता राष्ट्रीयत्वाच्या भावनात्मक ऐक्याच्या दृष्टीने 'नॉन कंडक्टर' व बाधक आहे, हे कळत होते. पण, अविश्वास मूळ धरून होता. १९४७मध्ये अकोला करार व १९५३मध्ये नागपूर करार असे दोन करार झाले. त्यानंतरही अविश्वास कायम होता. परंतु, विधानसभेत यशवंतराव चव्हाणांनी आश्वासन दिले की, ''नागपूर करार हा पवित्र करार आहे आणि नागपूर करारात आहे त्यापेक्षाही अधिक विदर्भाच्या वाट्याला येईल.'' या आश्वासनानंतर वातावरण बदलले व विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. विदर्भाच्या लोकांचा लेख कराराच्या कागदापेक्षा चव्हाणांच्या आश्वासनावर अधिक विश्वास होता. करारात ठरले की, लोकसंख्येच्या प्रमाणात निरनिराळ्या घटकांवर करावयाच्या खर्चाचे नियमित वाटप करण्यात येईल. नोकरभरतीच्या वेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाईल. नागपूर महाराष्ट्राची दुसरी राजधानी राहील व अनेक सरकारी दफ्तरे नागपूरला हलविली जातील. ही आश्वासने पाळली जात नाहीत व अनेक बाबतीत अनुशेष वाढतो आहे, अशी जी तक्रार विदर्भातील मंडळी करीत आहेत, ती यशवंतराव असते तर उद्‌भवली नसती, अशी माझी खात्री आहे. कारण, शब्द पाळण्याची दानत व क्षमता दोन्हीही त्यांच्याजवळ होती. यामुळे वैदर्भीय लोकांना त्यांची अनुपस्थिती आज प्रकर्षाने जाणवत आहे. कारण, ती उणीव अजूनही भरून निघालेली नाही. आता फक्त निर्जीव औपचारिकताच उरली आहे.

मी राष्ट्रीय मिल मजूर संघाचा अध्यक्ष असतानाच माझ्या कारकिर्दीत मजूर संघाच्या मालकीची आलिशान इमारत 'कामगार भवन' या नावाने बांधण्यात आली. हे भवन संपूर्णत: कामगारांच्याच पैशाने बांधण्यात आले. यासाठी मालक व इतर दाते पैसे द्यायला तयार होते; परंतु, ते स्वीकारण्यास आम्ही नकार दिला. या अशा कामगारांच्या श्रमाच्या रामकमाईने बांधलेल्या भवनाचे उद्‌घाटन मा. यशवंतरावजींच्या हस्ते झाले. त्यावेळी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. औद्योगिक कलहाला किंवा विवादाला मालक-मजूर या दोनच बाजू असतात, असे आम्ही कधीच मानले नाही. या संघर्षाला तिसरी बाजू असते, ती म्हणजे उपभोक्ता ग्राहकाची! जिला आम्ही 'सुप्त सरस्वती' म्हणत असू. संप, बंद, लॉकआऊट यांचे परिणाम त्यांनाच भोगावे लागतात. नफा झाला तर मजुरांना बोनस व पगारवाढ मिळते. शेअर होल्डर्सना वाढीत डिव्हिडंट मिळतो. पण, यात ग्राहकाला काहीही मिळत नाही. मजूर चळवळ ही मालकांविरुद्धचीच चळवळ न राहता शोषकाविरुद्ध शोषित असे त्याचे स्वरूप राहावे व ती समाजपरिवर्तनाची चळवळ असावी अशी आमची भूमिका होती. त्याचे फार चांगले विश्लेषण यशवंतरावांनी त्यांच्या भाषणात केले होते. महात्मा गांधी म्हणत असत की, ''मालक त्याच्या संपत्तीचा जसा विश्वस्त आहे, तसेच मजूर त्याच्या श्रमशक्तीचे विश्वस्त आहेत समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी.'' ही भूमिका भांडवलशाहीविरुद्ध बंद करून आर्थिक समता प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या व समाजवादी



समाजरचना प्रस्थापित व्हावी असे मानणाऱ्या यशवंतरावांचीही होती. शासनही विश्वस्त आहे, 'मालक' नाही. अंतिमत: खरे मालक आहेत 'लोक' अर्थात जनता. राजकीय पदे उपभोगाची साधने नाहीत. सत्ताधिकारी हा सत्ताकांक्षी नसावा, तर विश्वस्त भावनेने जगणारा असावा हे भारतीय संविधानास अभिप्रेत असलेले तत्त्व आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत (प्रीॲम्बल) स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, 'सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्राप्त करून देण्याचा भारतीय लोकांचा संकल्प आहे.' या तत्त्वावर यशवंतरावांचा दृढ विश्वास होता व ते तसे वागत होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी अशी भीती व्यक्त करण्यात आली होती की, ते 'मराठी' राज्य न होता 'मराठा' राज्य होईल. कारण, भाषावर प्रांतरचनेनंतर सर्वच भाषिक-राज्यांत 'रुलिंग रेस' उदयास आली. भाषा हे केवळ निवेदनाचे साधन नसून तो सांस्कृतिक एकांक असतो. आपल्या संस्कृतीचा व जीवनाचा मुक्त आविष्कार करण्याची संधी सामान्य माणसाला त्यामुळे मिळेल व भाषिक सहयोगात्मक व भावनात्मक ऐक्य निर्माण होईल, अशी रास्त अपेक्षा होती. विदर्भातील 'हिंदी-मराठी' वाद संपून एकसंध मराठी प्रदेश सामार्थ्याने उभा राहील, असे वाटत होते. परंतु, सर्वांसाठी समान असलेला 'शत्रू' गेला की आपसांत शत्रुत्व निर्माण होत असते, तसे झाले. जातिवाद वा उपजातिवाद फोफावला व एकजनता वृत्ती निर्माण होऊ शकली नाही. विदर्भाचे जे पुढारी मुंबईला आले ते मुंबईवासीच झाले, ते स्वगृही परतलेच नाहीत. आज मुंबई व इतर महानगरांतील मराठी भाषक सुविद्य व संपन्न लोकांच्या घरी मराठी ही मातृभाषाच राहिलेली नाही. मराठी भाषा ही भाषांतराची भाषा झाली. महाराष्ट्राच्या शासनातही इंग्रजीचाच वरचष्मा आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हा घोष होता, त्याऐवजी संयुक्त महाराष्ट्रासह विशाल मुंबई राज्य प्रस्थापित झाले. महाराष्ट्राच्या एका शिक्षण मंत्र्यांने खेड्यापाड्यांतील प्राथमिक शाळेतही प्रथम वर्गापासून इंग्रजी शिकविण्याचा फतवा काढला. त्यामुळे माय किंवा आई-बाबा ऐवजी मम्मी-डॅडी किंवा पप्पा यांचे प्रस्थ वाढले. मराठी भाषा दुय्यम भाषा झाली व 'मायमराठी'ची प्रतिष्ठा संपुष्टात येत आहे. यशवंतराव असते तर असे झाले नसते. मराठी मातीशी इमान राखणारा तो जाणता शासनकर्ता होता. लोकांच्या आकांक्षा जाणणारा व त्यांना सोबत घेऊन जाणारा तो खरा नेता होता. खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या बिरादरीतला. आता तर नावही वाहून जात आहे. अशा वेळी मराठीपणा व मराठी अस्मिता नसलेला 'मराठी प्रदेश' कसा अस्तित्वात राहू शकतो, हाच खरा प्रश्न आहे. आजवर ज्यांनी विचार दिला त्यांनीच जगाला अगर प्रदेशाला आकार दिला. प्रत्येक क्रांतीच्या मुळाशी विचार देणारे विचारवंत ऋषी किंवा शासनकर्ते होते त्यांची वैचारिक मूलतत्त्वे होती. हाच यशवंतरावांचा वसा होता. संयुक्त हृदय असल्याखेरीज काहीही संयुक्त राहू शकत नाही. असे मन व भावना जोडणारे आंदोलनच संपले. उरला महाराष्ट्रातील उपप्रादेशिकवाद व जाती-उपजातिवाद लोकांच्या भावनांसोबत जगणारे, त्यांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्वच उरले नाही. त्यामुळे भावनात्मक ऐक्य निर्माण होऊ शकले नाही. उलट प्रादेशिक वितुष्टच वाढत आहे. कारण, आता यशवंतरावांची वृत्तीच उरली नाही. आजवर महाराष्ट्राचे जे थोर नेते मानले गेलेत ते 'भारतीय नेते'ही होते. 'महाराष्ट्र' या शब्दात 'महा' व 'राष्ट्र' हे जे दोन सांकेतिक शब्द आहेत, ते इतर प्रांतांच्या नावातही नाहीत. ते शब्दच औपचारिक होत आहेत.

यशवंतराव संरक्षण मंत्री म्हणून केंद्रात गेले, तरी सुद्धा नागपुरात विधान सभेच्या सत्राच्या वेळी ते नागपूरला येऊन विदर्भाचे प्रश्न व लोकांच्या भावना समजावून घेत असत. हे सत्र सुरू होण्यापूर्वी फक्त राजकीयच नव्हे, तर आमच्यासारख्या सामाजिक क्षेत्रातील लोकांशी ते मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत चर्चा करीत असत आणि तीही अगदी वैयक्तिक व स्वतंत्रपणे. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना, ते व यशवंतराव यांच्यासोबत मी स्वत: अशा चर्चेला उपस्थित राहत असे. निर्वैर, निरपेक्ष व निर्भयपणे प्रश्न मांडू शकणाऱ्या लोकांची त्यावेळी आगळीवेगळी प्रतिष्ठा होती. वृत्ती प्रश्न समजावून घेण्याची व ते सोडविण्याची असे आणि या खुल्लमखुल्ला व मोकळ्या चर्चेतून जनतेच्या भावना जाणून घेतल्या जात असत. सामाजिक व वैचारिक विचार करू शकणाऱ्या व्यक्तींचे मूल्य यशवंतरावांना कळत असे. मला माहीत आहे की माझे वडील आचार्य दादा धर्माधिकारी यांनी थोर क्रांतिकारक श्री. खानखोजे यांच्या हलाखीच्या परिस्थितीबद्दल यशवंतरावांना, ते मुख्यमंत्री असताना पत्र लिहिले होते व उलटटपाली श्री. खानखोजे यांच्याकरिता मदतीचा हात पुढे करण्यात आला होता. अशा गोष्टी लालफितीत अडकत नसत. कारण, यशवंतरावांना 'माणसे' ओळखण्याची कला साधली होती व कुणाचे ऐकावे व कुणाचे ऐकू नये याची जाणही होती. ते राजकारणात होते, त्यापेक्षा राष्ट्रकारणात व समाजकारणात अधिक होते. आचार्य विनोबा म्हणत त्याप्रमाणे हल्लीच्या राजकारणाला डिबेटिंग क्लबचे स्वरूप येऊ लागले आहे. कधीच आपल्यात हिंदू, मुसलमान इत्यादी धर्मभेद, त्यातही हिंदूंत पुन्हा स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर हे वाद आहेतच. राजकीय पक्षभेद व गटभेद आहेतच. त्यात नसत्या भेदांची भर घालण्यापेक्षा काही विधायक तत्त्वांवर भर देणे आवश्यक आहे. 'महाराष्ट्र धर्म' हा प्रथमदर्शनी वामनासारखा दिसला तरी वस्तुत: तो दोन्ही पावलांतच विराट विश्व व्यापून टाकणाऱ्या त्रिविक्रमासारखा आहे. त्या त्रिविक्रमाचे एक पाऊल महाराष्ट्रीय, दुसरे राष्ट्रीय आणि तिसरे अतिराष्ट्रीय म्हणजे वैश्विक आहे. आणि हाच महाराष्ट्र धर्म यशवंतरावांना मान्य होता.

यशवंतरावांची यशस्वी वाटचाल आपण सर्वांनीच पाहिली आहे. त्यांचे जीवन 'मैदानी' होते; पण, नंतरच्या काळात त्यांना जे अपमानित करण्यात आले, ती वेदना आमच्यासारख्या त्यांच्या चाहत्यांसाठी फार दु:खद होती. त्यावेळी आपण त्यांच्या फार जवळ आहोत असे म्हणणारे त्यांचे तथाकथित 'स्नेही' कुठे गेले होते, हे कधीही न सुटणारे कोडेच आहे. ते त्यांचे मित्र नव्हतेच, तर ते त्यांच्या पदांचे मित्र होते. हायकमांडकडे दृष्टी ठेवून राजकारण करणारे ते राजकारणी होते. त्यामुळे वेणूताई गेल्यानंतर स्वजनांच्या गर्दीतही ते एकटेच होते. त्यांना घर होते, पण त्यात 'घरपण' उरले नव्हते. उरली होती फक्त दरबारी कारस्थाने. अमीर, उमराव व नेतृत्व यांना सामान्य माणसापासून सतत वेगळे करण्याचा डाव होता. दरबारी कारस्थाने बुद्धीच्या आवाक्याबाहेरची असतात. त्यात स्नेह व कौटुंबिक भावना यांना स्थान नसते. मग, गगनचुंबी इमारती उभ्या राहतात, पण मने व माणसे ठेंगणीच राहतात. रस्ते रूंद होतात, पण मने अरूंदच राहातात. वैभवाकांक्षा वाढते पण अद्वैत, समन्वय, राजकारणनिरपेक्ष स्नेहभाव संपुष्टात येतो. पुण्याच्या दैनिक प्रभातने त्याच्या कुठल्याशा जयंतीनिमित्त



भव्य कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळचे यशवंतरावांचे वर्तमानपत्रांच्या दायित्वाबद्दलचे चिंतन माझ्या आजही स्मरणात आहे. मी त्यावेळी न्यायमूर्ती होतो, तर यशवंतराव कुठल्याही पदावर नव्हते. ते सर्वार्थाने भारताचे स्वतंत्र नागरिक होते. समारंभ संपल्यानंतर पुण्यातील एका हॉटेलच्या गच्चीवर भोजनप्रसंगी आम्ही सोबत होतो. आमच्यात निवांतपणे खूप हृदयस्पर्शी संवाद झाला. मी वकील असताना यशवंतरावांच्या निवडणूक संदर्भात जी केस हरलेल्या उमेदवाराने केली होती, त्यावेळी इतर दोघा ज्येष्ठ वकिलांसोबत मी त्यांचा वकील होतो. न्यायमूर्ती झाल्यावर गाठीभेटी थांबल्या होत्या. त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा दिला गेला. अगदी जिव्हाळ्याच्या प्रश्नावर हृदयस्पर्शी बोलणे झाले. त्यावेळी यशवंतरावांचे अस्वस्थ करणारे एकाकीपण प्रकर्षाने जाणवले. भोजनानंतर यशवंतराव लिफ्टमधून खाली गेले. मोटारपर्यंत पोचले. परंतु, त्यानंतर आपण काहीतरी विसरलो असे त्यांना वाटले व पुन्हा गच्चीवर आले. माझ्याशी हस्तांदोलन करीत स्नेहभावाने म्हणाले, ''तुमचा व न्यायमूर्तींचा निरोप घ्यायला विसरलो होतो म्हणून पुनश्च वर आलो.'' न्यायालयीन पदावर असलेल्या व्यक्तीची व पर्यायाने न्यायालयाची प्रतिष्ठा जोपासणारे असे सज्जनशील व्यक्तिमत्त्व फार विरळच आहे. यशवंतरावांच्या राजकारणाला व व्यक्तित्त्वाला सुसंस्कृतपणाची झालर लागलेली होती. त्यांचे जीवनदर्शन एका वैचारिक भूमिकेवर आधारलेले होते. ते सदैव गर्दीतच जगले, परंतु त्यांची जीवाभावाची सोबतीण गेल्यानंतर ते राजकारणात कुठल्याही पदावर नव्हते. म्हणून त्यांचे एकाकीपण दूर करण्यास त्यांच्या समवयस्कांपैकी कुणीच त्यांची सोबत केली नाही. त्यांच्या मरणानंतर स्मारके उभी राहिलीत. त्यांचे नाव चलनी नाणे झाले. त्यांचेही राजकारण व अर्थकारण झाले. संगमावर सुरेख समाधी उभी राहिली. पण, शेवटच्या दिवसात ते एकटेच होते, ही आमच्यासारख्यांची व्यथा आजही कायम आहे. म्हणूनच निग्रो कवयित्री फ्रान्सेस एलन बॅटकिन्स हिच्या कवितेची आठवण येते. त्या गीताचा भावार्थ असा आहे,

खिळून राहतील बघणाऱ्यांच्या नजरा,
सारे स्तंभित होतील,
अशी गर्वोन्नत अन्
भव्य स्मारके नकोत माझी मरणानंतर,
एकच इच्छा, एकच तळमळ,
हृदयी आता दाटून येते
कुशीत यावे मरण भूमीच्या,
गुलाम कोणी नसतील तेथे!
यापरते दुसरे मागणे नाही.

सर्व प्रकारच्या म्हणजे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, गुलामगिरीपासून मुक्त असा महाराष्ट्र, भारत व समाज यशवंतरावांना अभिप्रेत होता. ते स्वप्न पूर्ण करण्याची शक्ती महाराष्ट्रात नसेल, तर कमीत कमी ते पायदळी तुडवले जाणार नाही याची शाश्वती तरी आपण देऊ शकू का? तसा संकल्प करण्याची शक्ती यशवंतरावजी यांचे चरित्र व चारित्र्य तसेच 'जीवन दर्शन' यातून आपणा सर्वांना लाभो हीच परमेश्वरचरणी धर्माधिकाऱ्यांची प्रार्थना आहे.

'शेषम् स्नेहेन पूरयेत'

**('शोध माणसांचा' या पुस्तकातून साभार.)**


## पत्रोत्तराचा आनंद

ना. यशवंतरावांच्या पुष्कळदा भेटी होत. त्यांना असलेल्या मोकळ्या वेळात त्यांच्याकडे जाता येई. नवी पुस्तके, वाङ्मय - कलाक्षेत्रातल्या घडामोडी यांत त्यांना विलक्षण स्वारस्य असे. कित्येक नवे संदर्भ त्यांना ज्ञात असत.

मी क्वचित त्यांना पत्र लिही. पण, ते पत्र त्यांनी अवधानपूर्वक वाचलेले असे. त्यांचे आत्मीयतेने लिहिलेले उत्तर येई. त्यांना लिहिलेले कुठलेही पत्र अनुत्तरित राहत नसे. एवढा वेळ त्यांना कसा मिळे कळत नसे. त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड ऊर्जेची जाणीव होई. त्यांच्याशी झालेल्या भेटीचा, त्यांच्या आलेल्या पत्रोत्तराचा, मोठा आनंद असे. तो मी मनात जपून ठेवी. सोबत त्यांतलेच एक पत्र :

**- श्रीनिवास विनायक कुलकर्णी**

- संपर्क : ९८९०९१८४३८


यशवंतराव चव्हाण

१, रेस कोर्स रोड,
नवी दिल्ली.
११० ०११

दिनांक-12 मे 1983

श्री श्रीनिवास कुलकर्णी यांसी
स.न.वि.वि.

आपले दिनांक 18 एप्रिलचे पत्र माझ्या हाती यापूर्वीच आले होते. त्यासंबंधी मी काय लिहावे याचा विचार करीत होतो. तुम्ही सुचविलेले नांव पहिल्या प्रतीचे आहे. परंतु शासनामध्ये [illegible] गोष्टी घडतात याची तुम्हांला कल्पना आहे. तुम्ही [illegible] त्या संबंधी पुनर्विचार होणार आहे की नाही याची कल्पना नाही. परंतु मी माझा शब्द टाकून पाहीन. अधून मधून लिहित जा. मनात आलेले विचार कळवित राहिल्यास मला त्याचा उपयोग होईल.

कळावे

आपला
[signature]

श्री श्रीनिवास कुलकर्णी
28 शुक्रवार, मंगल निकेतन
कराड



# नेहरू परम्परा के प्रहरी नेता

**डा. राममनोहर त्रिपाठी**

आजादी मिलने के बाद महाराष्ट्र में कई नेताओं का अभ्युदय हुआ, जिसमें सत्तारुढ दल के अलावा विरोधी दलों में भी महत्त्वपूर्ण नेता अपनी अपनी अच्छी खासी ऊँचाईयां प्राप्त कर चुके थे. विरोधी दलों में तो ऐसे नेता हुए जो अपने अपने दलों का राष्ट्रीय नेतृत्व कर रहे थे! ऐसे वातावरण में किसी नये राष्ट्रीय नेतृत्व को उभारने में अनेक प्रकार की कठिनाइयां होती हैं. सत्तारुढ दल में नये सिरे से सक्षम नेतृत्व का उभारना असंभव होता है. एक तो अपने ही दल में ऐसे प्रस्थापित लोग होते हैं जो टांगे खींचने में कभी पीछे नहीं रहते. वे ऐसे वातावरण बनाते रहते हैं कि नया नेतृत्व उभर न सके. दूसरी ओर विरोधी दलों के नेता अपनी आलोचनाओं से और विरोधक वातावरण बनाये रखकर कभी नये नेतृत्व को संवरने नहीं देते. यशवंतराव चव्हाण का अभ्युदय ऐसेही वातावरण में हुआ. एक ओर डांगे, उद्धवराव पाटील, नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी जैसे दिग्गज विरोधी दलों का नेतृत्व कर रहे थे. महाराष्ट्र की काँग्रेस के सामने यह कसौटी थी कि वह कैसे सुरक्षित रहे. दूसरी ओर काँग्रेस का जो प्रस्थापित नेतृत्व था वह यशवंतरावजी को हर निश्चित परिधि से आगे बढते हुए देखना नहीं चाहता था.

महाराष्ट्र का राजनैतिक क्षितिज अनेक चमचमाते नक्षत्रों से भरा हुआ था. यह वह कालखंड था जब सारे महाराष्ट्र में ''संयुक्त महाराष्ट्र''का भावनात्मक आन्दोलन पूरे जोर शोर से चला रहा था. इस आन्दोलन को दबाने के लिए तत्कालीन मुख्य मंत्री मोरारजी देसाई ने कोई कसर नहीं रखी थी. उनके अत्यावहारिक दमन चक्र से आन्दोलन बढता ही गया. विदर्भ को छोडकर सारे महाराष्ट्र में विरोध दलों का वर्चस्व बढ रहा था. गुजरात भी तब बम्बई प्रांत में शामिल था. मोरारजी देसाई ने जब बम्बई राज्य के मुख्य मंत्री पद का आसन खाली किया, वह समय काँग्रेस पार्टी के लिए कतई अनुकूल नहीं था. इस प्रतिकूल समय में यशवंतराव चव्हाण मुख्य मंत्री बने. मुख्य मंत्री बनने के बाद का परीक्षाकाल चव्हाण साहेब ने बडे संयम और विरक्ति से पार किया जो किसी और के वश की बात नहीं थी.

१९५८ पूर्व के आसपास यशवंतरावजी की प्रतिभा आम जनता के नेता के रुप में एक स्वच्छ चारित्र्यसम्पन नेता के रुप मे संवरने लगी. जन मानस में उनकी छबि निखरने लगी. महाराष्ट्र राज्य की पुनर्रचना के बाद उन्होंने प्रशासन को चुस्त और लोकोन्मुख बनाने के प्रयत्न शुरु किए, जिसमें उन्हें सीढी-दर-सीढी सफलता मिलती गयी. चीनी आक्रमण के बाद पंडित जवाहरलाल नेहरू ने उन्हें देश का रक्षा मंत्री बनाया. दूसरा यह जाहिर हुआ कि देश के अनेक मुख्य मंत्रियों में चव्हाण साहेब पंडित जवाहरलाल नेहरू के सबसे ज्यादा भरोसे के आदमी हैं. यही भरोसा उनके आगे के राजनैतिक जीवन के लिए ऐसा प्रमाणपत्र था जो आजीवन उनके साथ जुडा रहा. एक यशस्वी केन्द्रीय मंत्री के रूप में उन्हें ख्याति मिली. अनेक केन्द्रीय विभागों का उन्होने बखूबी काम देखा, हर जगह उन्होंने सरहना प्राप्त की. संसद में और संसद के बाहर भी उन्हें संभाव्य रूप से आदर मिला. लोकशाही में लगातार राजनैतिक आकाश में चमकने वाले बहुत थोडे नक्षत्र होते है. यशवंतरावजी ऐसे देदीप्यमान नक्षत्र थे जो चौथाई शताब्दी तक एक जैसी चमक दिखाते रहे. दिल्ली में जहाँ भी पता नहीं कितनों का उत्थान हुआ पतन हुआ. फिर उठे, बढे और ऐसे माहौल में यशवंतराव चव्हाण का व्यक्तिमत्व अकेला है जो सम्मानपूर्वक किसी न किसी आसन पर सुशोभित रहे, अधिष्ठित रहे और लोगों की अगुवाई करते रहे. यह कहना अत्युक्ति नहीं होगी दिल्ली में महाराष्ट्र का झंडा सबसे पहले उन्होंने ऊँचा उठाया, फडकाया और महाराष्ट्र की राजनैतिक प्रतिमा से पूरे देश को परिचित कराया. इस चौथाई शताब्दी में कई अन्य नेता दिल्ली में महत्त्वपूर्ण हुए मगर अपने गृहराज्य से धीरेधीरे या तो कटते गये या अपने अपने प्रान्त की राजनैतिक डोर खोते गए. अपवाद सिर्फ यशवंतरावजी चव्हाण है, जिन्होंने दिल्ली में रहते हुए महाराष्ट्र की राजनीति की पकड कभी ढीली नहीं होने दी. महाराष्ट्र के छोटे छोटे कार्यकर्ताओं से उनका परिचय था. उनके कामों के प्रति उनकी दिलचस्पी थी.

मेरा उनका परिचय जब हुआ तब वे महाराष्ट्र के मुख्य मंत्री थे. उन्होंने भूषण के काव्य के बारे में जानकारी चाही. एक दिन बैठक हुई तो उन्होंने सबसे पहले स्व. दुर्गाप्रसाद आशाराम तिवारी का नाम लिया. जिनकी पुस्तक ''मराठ्यांची संग्राम गीते'' बहुत प्रसिद्ध हुई. बम्बई में बसे उत्तर भारतीयों के बारे में भी उनकी दिलचस्पी रहती थी. जब जब मैं दिल्ली जाता तो उनसे मिलता जरूर था. मराठी और अंग्रेजी साहित्य के वे गहन अध्येता थे. दिल्ली जाने के बाद उनकी अभिरूची हिन्दी के बारे में भी बढ गयी थी. दिनकरजी उनके मित्र थे. अनेक हिन्दी लेखक और पत्रकार उनके निकट थे. मैं उनके नेतृत्व के प्रति इसलिए ज्यादा आकर्षित था कि वे केवल केन्द्रीय मंत्री शीर्षस्थ राज नेता या मार्गदर्शक करनेवाले मंच के नेता ही नहीं थे विचारक भी थे. उनके भाषणों में प्रखर साहित्यिक अभिव्यक्ति होती थी. उनके कितने ही वाक्य अमर साहित्य की धरोहर बन चुके है.

'१९७८ में जब मैंने कहा कि मैं पक्ष का काम करुंगा! चुनाव नहीं लडूंगा 'तो वे पहले व्यक्ति थे', जिन्होंने मेरी सराहना की थी. दो तीन महीने पहले जब मैं दिल्ली गया तो उन्होंने मराठी, ''नवी कविता'' और हिन्दी ''नयी कविता'' के बारे में भी चर्चा की. नाटक उन्हें अच्छे लगते थे. कविताओं के वे सजग सुरुचि संपन्न श्रोता थे. ललित साहित्य के वे रसिक पाठक थे. 'कृष्णाकाठ' उनकी, पुस्तक छपी. मैंने उसपर एक टिपण्णी लिखी. वेणूताई के निधन पर मैंने ''रोजनामा''में लिखा, दोनों अवसरों पर उनके संवेदनशील पत्र मुझे मिले.

पिछले साल यशवंतराव चव्हाण का आत्मचरित्र 'कृष्णाकाठ' प्रकाशित हुआ था. इसमें उन्होंने अपने प्रारंभिक जीवन के बारे में लिखा था. महाराष्ट्र में कृष्णा नदी के किनारे बसे हुए गांवों तक ही उनका प्रारंभिक कार्य क्षेत्र था. इसीलिए इस खंड का नाम उन्होंने 'कृष्णाकाठ' रखा था. मराठी साहित्यजगत में इस कृति की सराहना इसलिए अर्थवान है कि इसके प्रकाशन के समय वे सत्ता में नहीं थे. पुणे के 'मराठी केसरी' संस्था ने इस आत्मचरित्र को पुरस्कार भी दिया. अनेक मराठी समीक्षकों ने इस पुस्तक की प्रशंसा में लेख भी लिखे. मराठी साहित्यिकारों के बीच जैसे यशवंतरावजी का सम्मान था, वैसा सम्मान महाराष्ट्र में दूसरे नेताओं को नहीं मिला. मराठी



साहित्य-सम्मेलन जो हमेशा मंत्रियों या नेताओं से परहेज करता रहा, उसके मंच पर केवल यशवंतराव को आदरपूर्वक तालियों की गडगडाहट के साथ सुना गया, सराहा गया.

आत्मचरित्र का एक खंड प्रकाशित हो चुका था. दूसरा खंड वे लिख रहे थे. यह खंड महाराष्ट्र की राजधानी से संबंधित था. इसीलिए इसका नाम वे ‘सागरतटी‘ यानी ‘सागरतीरे‘ रखना चाहते थे. तीसरा खंड, जिसमें वे दिल्ली की जिन्दगी का चित्रण करना चाहते थे. उसका नाम ‘यमुना-तीरे‘ रखना चाहते थे, पंडित द्वारकाप्रसाद मिश्र ने ‘लिविंग इन ए एरा‘ लिखा, जिसमें उन्होने अपने समकालीन राजनैतिक उतार-चढाव को चित्रित किया. आत्मचरित्र लिखना बडा मुश्किल और जोखिम का काम होता है, पर राजनैतिक नेता का आत्मचरित्र लिखना तो और ज्यादा चुनौती भरा होता है, क्योंकि उस पर उठने वाली उंगलियो की संख्या बढती जाती है. यशवंतराव का आत्मचरित्र अधूरा ही रह गया. काश, तीनों खंड वे लिख पाते तो साहित्य को एक अमूल्य धरोहर वे दे जाते. ‘कृष्णाकाठ‘ ने जो उत्सुकता जगाई थी, हजारों-लाखों साहित्य-रसिक -राज नैतिक नेता का आत्मचरित्र पढना चाहते थे. ‘‘बडे शौक से सुन रहा था जमाना, तुम ही सो गए दास्तां कहते कहते.‘‘

**(महाराष्ट्र मानस, १० मार्च १९८५ च्या अंकातून)**

## शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन

शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहत नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ति निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या धनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यात बिजल नेउुन पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापीक



पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे त्यात शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वत:चा हा असा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचे औद्योगीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रातच महत्त्वाचा आहे. मग हे शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे हा विचार ओघानेच येतो. हे शिक्षण म्हणजे निव्वळ आपल्या शाळा उघडल्या आहेत आणि मुले शाळेत जात आहेत, परंतु मुले शाळेत काय करतात हे आपल्याला माहीत नाही, अशी परिस्थिती नव्हे. तर या देशांतील किंवा या राजयातील समाजोपयोगी साधनांचा वापर करण्याइतकी शक्ति मुलामध्ये येईल अशा तऱ्हेने मुलगा शिक्षण घेतो की नाही हे पाहण्याचे काम आता तुम्हाआम्हाला केले पाहिजे. मी या प्रश्नाला फक्त येथे स्पर्श करतो आणि तो सोडून देतो. परंतु शिक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या आताच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारक प्रश्न आहे असे मी म्हणतो.

(काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर, महाबळेश्वर, दि. ७ ऑक्टोबर १९६०)

## समतोल विकासाचे धोरण

ज्याप्रमाणे एखाद्या जहाजाच्या तांड्याची गती सर्वांत कमी वेग असणाऱ्या जहाजाने नियंत्रित होते, अथवा साखळीचा बळकटपणा हा जसा त्यातील सर्वांत कमजोर अशा दुव्यावरच अवलंबून असतो, त्याप्रमाणे सबंध देशाच्या दृष्टीने विचार केल्यास देशाचे सामर्थ्य हेही त्यांतील सर्वांत दुबळ्या घटकानेच नियंत्रित होत असते असे दिसून येईल. म्हणून, अविकसित विभागांचा व प्रदेशांचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. ज्या विभागात विकासाची आवश्यकता आहे, जे विभाग विकासक्षम आहेत, जे विभाग स्वत:च्या विकासासाठी प्रयत्न करण्यास तयार आहेत, अशा विभागांचे भौगालिक स्थान, त्यांची भाषा, त्यांची संस्कृती अथवा इतर बाबी ह्यांचा विचार न करता आपण त्यांचा विकास घडवून आणला पाहिजे. दुष्काळी व अविकसित विभागांकडे विशेष लक्ष पुरवून आणि या विभागांना अधिक प्रगत झालेल्या विभागांच्या बरोबर आणून संपूर्ण देशाचा समतोल विकास घडवून आणणे हे महाराष्ट्र राज्याचे धोरण आहे.

(महाराष्ट्र व्यापार व औद्योगिक परिषदेचे उद्घाटन, मुंबई, दि. २१ जून १९६०)



# काबिल आदमी

कविवर्य ग.दि. माडगूळकर

विटे, कराड, कृष्णा-कोयना संगम, सातारा, सांगली, कुंडल यापैकी कशाशीही काही कारणाने संदर्भ आला की, मला हटकून यशवंतरावांची आठवण होते. आम्ही दोघे एका परिसरात जन्मलो, एका परिसरात वाढलो, हेच कदाचित त्यांच्या माझ्यातील अकृत्रिम स्नेहाचे प्रथम कारण असेल.

यशवंतराव वयाने माझ्यापेक्षा वडील आहेत. बालपणात त्यांच्या माझ्या भेटीचा योग आला नाही. यशवंतरावांचे शिक्षण कोल्हापूरला झाले. ते ग्रॅज्युएट होऊन पुढच्या शिक्षणासाठी पुण्याकडे गेले, आणि नंतर मी कोल्हापुरात आलो. तिथेही ओळखदेख झाली नाही.

बेचाळीस सालचा लढा सुरू झाला आणि 'यशवंतायन' हा अध्याय सुरू झाला. मी कोल्हापुरातच होतो. माझ्या दोन खोल्यांच्या टाचक्या बिऱ्हाडात साताऱ्याकडेच भूमिगत कार्यकर्ते हमखास आसऱ्यासाठी जमत. त्यांच्या तोंडून मी यशवंतरावांविषयी ऐकले. खूप ऐकले.

शाहीर निकम हा चळवळ्या मुलगा आम्हा दोघांतला स्नेह दुवा. एका रात्री त्याने मला यशवंतरावांनी रचलेली एक राष्ट्रीय 'कव्वाली' साभिनय म्हणून दाखवली. तिचे शब्द आता मुळीच आठवत नाहीत. मुखड्याची ओळ तेवढी स्मरणात आहे...

''पर्वा न आम्हाला कैदखान्याची..''

त्या तीन-चार वर्षांत मी कितीदा निकमाला म्हटले असेल, निक्क्या, लेका आमची एकदा ओळख तरी करून दे तुझ्या या यशवंतरावांशी!''

निकम हज्जारदा ''हो'' म्हणाला; पण, माझ्या आणि यशवंतरावांच्या भेटीचा योग आला नाही तो नाहीच. ऐन धरपकडीच्या दिवसांत मी निकमच्या लग्नासाठी कुंडलला गेलो.

प्रतिसरकाचे सारे वैभव पाहिले. नाना पाटलांना उराउरी भेटलो. पण, यशवंतराव दृष्टीसदेखील पडले नाहीत. स्वातंत्र्य मिळाले. लढा संपला. भूमिगत प्रकट झाले. मंतरलेले दिवस संपून गेले. मी पोटाच्या उद्योगाला लागलो. खादीच्या कपड्यापुरतीही देशभक्तीची खूण अंगावर राहिली नाही. यशवंतराव राज्यकर्ते होण्याच्या रस्त्याने निघाले.

पोटासाठी भटकता-भटकता मी पुण्याला आलो. सुरुवातीला पंताच्या गोटात राहात होतो. एके दिवशी तिथे अचानकपणे एक असामी उपटला. दलसंघटक राघुअण्णा लिमये भारी रसाळ माणूस. ते मसूरचे. यशवंतरावांचे दोस्त.

'आमचा यशवंता' या विषयावर त्यांनी मला किती ऐकवले असेल?.. निकम नुसती मधाची बोटे चाटवीत होता. राघुअण्णांनी मधाचे द्रोणच्या द्रोण पाजले. त्या घडीपर्यंत यशवंतरावांचे चरित्र मला पूर्ण ज्ञात झाले.

गावात दोन आकण्याचे घर आणि रानात दोन बिघे शेती ही छोट्या यशवंतरावांच्या घरची आर्थिक स्थिती. वडील विट्याला बेलिफ होते. यशवंतराव नकळते होते तोवरच ते हे जग सोडून चालते झाले. आई खंबीर. एका विटकरीवर अठ्ठावीस युगे उभी राहील अशी. तिचे नावच विठाबाई. थोरले दोन भाऊ. दोघांनी तिसऱ्याला शहाणा करायचा विडा उचलला. यशवंतराव जात्याच बुद्धिमान, अभ्यासू. ते बी.ए. झाले. एलएल.बी. झाले. यशस्वी वकील ठरले. पण, त्यांचे मन मात्र वकिलीत रमले नाही. त्यांनी राजकारणात उडी घेतली. देश स्वतंत्र झाला पाहिजे, यासाठी ते निकराचे प्रयत्न करू लागले. शिणेचे सौंगडी त्यांच्याभोवती जमा झाले.

बेचाळीसच्या युद्धात साताऱ्याने अजब उठाव केला. त्या लढ्याच्या वेळी यशवंतराव आपोआपच आघाडीवर आले.

त्यांचा तो लढा स्वयंभू होता. त्यांचे नेतृत्वही तसेच 'स्वयंभू' स्वरूपाचे उत्पन्न झाले.

राघुअण्णा त्या सर्व सातारकरांबरोबर वावरलेले होते. त्यांना उत्तम कथनशैली अवगत होती. ''चले जाव'' चळवळीतले अनेक प्रसंग त्यांनी माझ्या डोळ्यांसमोर उभे केले. त्यातल्या अनेक प्रसगांचे नायक होते श्री. यशवंतराव चव्हाण.

यशवंतराव म्हणजे एक समर्थ नेतृत्व, अशी राघुअण्णांची बालंबाल खात्री होती. एखादा मावळा शिवाजीराजाबद्दल बोलला असेल तसे ते यशवंतरावांबद्दल बोलत. मला गुंगवून टाकत. शाहीर निकम आणि राघुअण्णा लिमये यांनी यशवंतरावांविषयी माझ्या मनात एक आगळा आदरभाव निर्माण करून ठेवला. यशवंतरावांची एकदा प्रत्यक्ष भेट व्हावी, असे मला सारखे वाटत राहिले. मी वावरत होतो चित्रपटात, साहित्यात; पण, मनाचे धागेदोरे राजकारणापासून सर्वस्वी तुटू शकत नव्हते. तुरुंगवास भोगलेले पण राज्यकर्ते झालेले पाहण्याची तहान डोळ्यांना होतीच.

भेटीचा योग आला तेव्हा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झालेले होते. त्यांचा फार मोठा सत्कारसमारंभ साजरा होत होता. मुंबई महानगरातील शेकडो संस्था त्यांना पुष्पहार अर्पण करायला उत्सुक होत्या. त्या सर्व संस्थांचे प्रतिनिधी हातात पुष्पमाला घेऊन उभे होते. सर्वांत शेवटी माझा क्रमांक होता. मराठी चित्रपट व्यवसायाचा प्रतिनिधी एवढाच माझा अधिकार होता. मोजता येणार नाही इतका जनसमुदाय लोटला होता. त्या अगणित डोळ्यांच्या साक्षीने हा सत्कार चालला होता. माझ्या डोळ्यांच्या कडा पाणावत होत्या.

माझी पाळी आली. आम्ही दोघे एकमेकांसमोर आलो. मीच काय, अवघा भारत आता यशवंतरावांना ओळखत होता. माझी ओळख, सत्कार करणाऱ्यांची नावे पुकारणाऱ्या गृहस्थाकडून आपोआपच झाली. ध्वनिक्षेपकातून आवाज आला..

''श्री. ग.दि. माडगूळकर... मराठी चित्रपटव्यवसायाच्या वतीने !''

मी पुढे सरलो. माझ्या जिल्ह्यातला, शिवघडी खेळलेला, गरिबीत वाढलेला, एक सामान्य शेतकऱ्याचा मुलगा माझ्यासमोर, उभ्या महाराष्ट्राचा लोकनियुक्त मुख्यमंत्री म्हणून आपादमस्तक उभा होता. नखशिखान्त शुभ्र खादीचा पेहराव. आर्जवी-आनंदी मुद्रा. सह्याद्रीच्या शिलाखंडासारखा देह. विलक्षण बोलके डोळे. त्या डोळ्यांनी ओळख दिली. मी हार घातला. तेवढ्यानं समाधान झालं नाही. आलिंगन दिले. मी आणि यशवंतराव एकमेकांना कडकडून भेटलो. शब्द उमटलेच नाहीत!

मुंबईच्या नागर संस्कृतीला कदाचित ते



चमत्कारिक वाटले असेल, रुचले नसेल. मुख्यमंत्र्यांचे सचिव, अंगरक्षक, जागच्या जागी चुळबुळले असतील. आम्ही एकमेकांना भेटलो. कडकडून भेटलो. बस्स! ही माझी आणि यशवंतरावांची पहिली प्रत्यक्ष भेट.

संघर्षापेक्षा सामंजस्याकडे यशवंतरावांचा अधिक कल आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरून त्यांनी केलेली काही कार्ये बोलकी आहेत. गांधीहत्येच्या गदारोळात कैक ब्राह्मण कुटुंबांचा आसरा गेला होता. हुल्लडीच्या भरात मुळीच होऊ नये ते होऊन गेले होते. नामशेष होत आलेला एक द्वेष पुन्हा उसळण्याच्या बेतात होता. घरे पुन्हा उभी करण्यासाठी ब्राह्मणांना दिलेली कर्जे यशवंतरावांनी माफ करून टाकली. ब्राह्मण आणि बहुजन यांच्यातील द्वेषाची कीड दृष्टोत्पत्तीस येताच एका फवाऱ्याने ती मारून टाकली. धर्मांतर केलेल्या पूर्वास्पृश्यांना ते स्वत:ला 'बौद्ध' म्हणवू लागले तरी हरिजनत्वाच्या साऱ्या सवलती त्यांनी देऊ केल्या. बाराशे रुपयांच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण मोफत दिले. मराठी रंगभूमी करमणूककरातून मुक्त केली. साहित्यिक, कलाकार, गायक, नट-तमासगीर, कुस्तीगीर, शाहीर या सर्वांसाठी त्यांनी अनुदाने सुरू केली.



उभ्या महाराष्ट्रात त्यांनी एक चैतन्य भरले. 'कृष्योद्योगिक समाज' ही शब्दसंहिता यशवंतरावांचीच. शेती सुधारावी, उद्योग वाढावे, विज्ञानाचे वरदान समाजाला लाभावे, शिक्षण जीवनोपयोगी व्हावे, यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

दिल्लीचे बोलावणे आले तेव्हा इथले काम इथल्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन करून यशवंतराव दिल्लीला गेले. मला आठवतं यशवंतराव दिल्लीला जायला निघाले, त्या वेळी मी विधान परिषदेचा सदस्य होतो. त्यांना निरोप देणारी अतिशय उत्तम भाषणे अनेक माननीय सदस्यांनी केली. माझ्यावर पाळी आली. भारावल्यासारखा मीही काही बोललो. म्हणालो, यशवंतरावांनी राजकारण काय केलं, ते सांगण्याचा माझा अधिकार नाही. या महाराष्ट्रदेशात कलासाहित्याला शासनाकडून जी प्रतिष्ठा मिळाली ती यशवंतरावांमुळे. यशवंतराव मनानं रसिक आहेत, साहित्यिक आहेत.''

यशवंतराव सभागृहात उपस्थित होते. शेवटी त्यांना उद्देशून मी दोन काव्यपंक्ती उच्चारल्या- अगदी उत्स्फूर्त. राजकीय भाषणात कविताबिविता आणणे व्यक्तिश: मला मुळीच आवडत नाही. पण, त्या दिवशी त्या दोन ओळी आल्या. अंतरीचे ते स्वभावे बाहेरी प्रकटले. मी म्हणालो,

''यशवंतराव, जा सुखचैन जा.
उभा देश आहे तुझा पाठीराखा.
तुझी कीर्त वाढो जशी चंद्ररेखा.''

या उत्स्फूर्त पंक्तीच्या रचनेवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेची उघड छाप आहे. ''प्रतिपच्चंद्ररेखव वर्धिष्णु'चाच अनुवाद तिच्यात उमटला आहे. पण, ते साहजिकच नव्हे का? शिवाजीनंतर, शिवाजीच्या लोकसंग्रहकवृत्तीचा आणि दूरदृष्टी सुजाणपणाचा साक्षात्कार यशवंतराव याच राज्यकर्त्याच्या ठिकाणी जाणवला. स्वत: यशवंतरावांना कुणी शिवाजीची- लोकमान्यांची पदवी दिलेली आवडत नाही. नम्रता हाही एक दुर्मीळ सद्गुण त्यांच्या ठायी आहे.

एका जन्मात यशवंतरावांनी खूप कमाई केली. इकडची दुनिया करून टाकली.

दादा कन्नमवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्या काळातील घटना. मी माझ्या खेड्याकडे निघालो होतो. एस.टी. बसने निघालो होतो. गाडी विटे गावातून जाणार होती. गावाबाहेर गर्दी दिसली. तोरणे उभारलेली दिसली. गाड्या लागलेल्या दिसल्या.

''काय आहे?'' मी चौकशी केली.

''समारंभ.''

''कसला?''

''कॉलेजचं उद्‌घाटन आहे.''

कॉलेज- आणि आमच्या विट्याला? माझा आनंद उरी मावेना. गर्दीमुळे थांबलेल्या एस.टी. गाडीतून मी माझी बॅग घेऊन उतरलो. निमंत्रणावाचूनच त्या समारंभात सामील होण्यात मला संतोष होता. प्रथमदर्शनीच सोनेरी रंगात लिहिलेले कॉलेजचे अभिधान वाचले- ''बळवंतराव चव्हाण कॉलेज.''

वा:! पुत्र व्हावा ऐसा गुंडा !
ज्याचा तिन्ही लोकी झेंडा !

बिचाऱ्या बळवंतरावांच्या पदरी पाच-सात बुके तरी पडली होती की नाही, कुणास ठाऊक. आपल्या मुलांना कसे शिकवावे या चिंतेने त्यांना भाकर गोड लागली नसेल. आज एका महाविद्यालयाला त्यांचे नाव दिले जात होते. मुलाच्या कर्तृत्वामुळे कुणा कोट्यधीशांच्या नावांनी महाविद्यालये ओळखली जात असतील; पण, गरीब शेतकऱ्याचे नाव मिरवणारे हे पहिलेच कॉलेज असेल.

यशवंतरावांच्या मातुश्रींच्या नावानेही काही संस्था ओळखल्या जातात. ही केवढी कमाई? मी याला कमाई म्हणतो. ही मंत्रीपदे आणि अधिकाराच्या जागा लाभलेल्या महाभागांनी आणखी काही कमावले, धन मिळवले, दौलत मिळवली. यशवंतरावांनी मिळविले ते फार थोड्यांना मिळवता आले. व्यक्तिगत चारित्र्याचा बडिवार आजकाल बड्याबड्यांना राहिलेला नाही. तळे राखणारा पाणी चाखणारच, हा लोकोक्तीतील सिद्धान्त आता सर्वसामान्य झाला आहे. यशवंतराव मात्र या वाटांना



वळले नाहीत. आज साऱ्या देशाची संपत्ती हाताळणाऱ्या या माणसाचे कराड येथील निवासस्थान कुणी आवर्जून जाऊन पाहावे. इंग्रजांच्या जमान्यातील मामलेदारदेखील याहून चांगली बंगली बांधेल!

राजकारणाच्या धकाधकीत त्यांचा वाचनाचा व्यासंग सुटलेला नाही. ते केव्हा वाचतात, देव जाणे. गावभेटीत संदर्भ निघतात तेव्हा नवल वाटते ते त्यांच्या वाचनाचे आणि स्मरणशक्तीचे.

आपल्या सहकाऱ्यांविषयी तर त्यांच्या मनी प्रेम आहेच; पण, माझ्यासारख्या अनेक साहित्यिकांचा सहवास त्यांना फार प्रिय वाटतो. उत्तम चित्र, उत्तम कविता, उत्तम नाटक यांचा रसास्वाद घेताना अजूनही त्यांना वेळेचा विसर पडतो.

गेली अकरा वर्षे मी महाराष्ट्राच्या विधान परिषदेचा सभासद आहे. पण, माझी त्यांची भेट झाली की, ते पहिला प्रश्न विचारतील, ''नवीन काय लिहिताय?''

मी माझ्या मनातल्या कल्पना, योजना सांगतो. ते लवकर लवकर लिहिण्याचा आग्रह करतात. मग, आम्हा दोघांचेही मित्र असे काही साहित्यिक आहेत, त्यांची चौकशी सुरू होते. मराठीतल्या कुण्या लेखकाचे आपण काय वाचले त्याचा ऊहापोह होतो. अन्य भाषेतला कुठला ग्रंथ नव्याने वाचला, त्याचे नवनीत मला आवर्जून दिले जाते. केवळ साहित्य आणि कला यांच्यासंबंधीची आमची बोलणी इतकी रंगत जातात की, त्यांच्या कुणीतरी सचिवाला येऊन आठवण करावी लागते. ''साहेब, वेळ झाला. आपल्याला कार्यक्रम आहे!'' मग, यशवंतराव उठतात. फार प्रसन्नपणाने हसतात. अगदी मनापासून म्हणतात, ''अण्णा, दिल्लीला या.''

''जरूर!'' मी उत्तर देतो.

त्यांनी म्हणावे, आपण होकार द्यावा. ठीक आहे. पण, एकदा खरंच योग आला. मुलीला 'स्थळ' शोधण्यासाठी मी सहकुटुंब दिल्लीला गेलो. त्याचवेळी मला 'पद्मश्री' पदकही घ्यायचे होते. पदकग्रहणाचा समारंभ झाला. दुसऱ्या दिवशी यशवंतरावांचे आमंत्रण. साऱ्या महाराष्ट्रीय पारितोषिकाचे विजेत्यांचा त्यांनी सत्कार केला. या समारंभाला माझी पत्नी आणि मुलगी याही हजर होत्या. यशवंतरावांशी त्यांची ओळख झाली. सौ. वेणूताईंशी परिचय झाला. आम्हाला तिघांनाच मग त्यांनी भोजनासाठी बोलावले. अगदी साधा बेत. भारताच्या कोणा श्रेष्ठ नेत्यासमोर बसलो आहोत असे आम्हाला वाटलेच नाही. यशवंतराव आणि वेणूताई दोघांच्याही वागण्यातील जिव्हाळा खरोखरीच अविस्मरणीय होता. त्या दिवशी पोटभर जेवलो. पोटभर बोललो.

यशवंतराव शूर आहेत, तितकेच हळवे आहेत. आई आणि पत्नी यांच्याविषयी त्यांच्या मनात कमालीचा प्रेमभाव आहे. आईला तर ते फार मानीत असत. एका लोक-साहित्यविषयक परिसंवादात त्यांनी आपल्या आईने रचलेल्या दोन ओव्या म्हणून दाखवल्या. त्यांचा साद गहिवरलेला वाटला. मुंबईला 'सह्याद्री' बंगल्यात त्यांच्या मातोश्री आजारी होत्या. थोर-थोर मंडळी मुद्दाम त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी येत-जात होती. यशवंतराव एकटेच गॅलरीत एका वेताच्या खुर्चीवर बसले होते. मी गेलो.

''या अण्णा. बसा,'' यशवंतराव म्हणाले.

''कसं आहे आईचं?'' मी.

''बरं आहे; पण, तो वेडा कुंभार करील ते खरं.'' ते खिन्न उद्गारले.

माझ्या त्वरित लक्षातच आले नाही, पण 'वेडा कुंभार' हा शब्द त्यांनी 'परमेश्वर' या अर्थाने वापरला होता. त्या शब्दाचा अर्थ माझ्याच एका गीताशी होता. ते गीत त्यांच्या लक्षात राहिलेले होते. यशवंतराव देवभोळे नाहीत, पण नास्तिक निश्चित नाही. विज्ञानाइतकाच त्यांना अध्यात्माविषयी आदर आहे. मात्र, ज्योतिषा-बितिषाचे थोतांड त्यांना मुळीच आवडत नसावे. एकदा असेच आम्ही काही साहित्यिक मध्यरात्रीनंतरही त्यांच्याशी चर्चा करण्यात रमून गेलो. एक वाजला तसे सर्वांचे भान जागे झाले.

''चलू या आता,'' कुणीतरी म्हणाले.

''जाणार कसे अण्णा?'' यशवंतरावांनी मला विचारले.

मी म्हणालो, ''सवालच आहे. माझी मोटार नाही. आमच्या कुंडलीत वाहनयोग नाही.''

''तुम्ही असं करा,'' यशवंतराव गंभीरपणे म्हणाले, ''एक वाहन घ्या आणि कुंडली त्यात लावून ठेवा. कुंडलीत वाहन नाही, तर वाहनात कुंडली!'' आम्ही सर्व जण खळाळून हसलो.

माझा आणि त्यांचा स्नेह ही एक भाग्याची गोष्ट आहे. १९४२च्या काळात त्यांनी माझे पोवाडे ऐकले असतील. निकमाच्या तोंडूनही काही ऐकले असतील. आपल्या शेजारचा लेखक म्हणून त्यांना माझ्याबद्दल कुतूहल असेल.

सत्कार समारंभातल्या त्या भेटीने आम्ही एकमेकांच्या फार जवळ आलो. मग, भेटीवर भेटी झाल्या. त्यांनी मला आग्रहाने कविता वाचायला लावल्या, कथा सांगायला लावल्या. आम्ही खूप खूप बोललो. १९६२ साली त्यांनी सांगितले म्हणून मी निवडणूक प्रचाराची गाणी लिहिली. थोडी कुचेष्टा झाली. ती होतच असते. ती निवडणूक अत्यंत यशस्वी झाल्यावर माझ्या कामाची शाबासकी स्पष्ट शब्दांत व्यक्त करायला यशवंतराव विसरले नाहीत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी वाङ्मय, कला, संस्कृती यांच्यासाठी पुष्कळ काही केले. आज त्यांचा वारसा सांगतच महाराष्ट्राचे राज्य पुढे आहे. मराठी विश्वकोशाच्या महावृक्षाचे बी यशवंतरावांनीच पेरलेले आहे.

कर्तव्यदक्ष प्रशासक, त्यागी देशभक्त, दिग्विजयी नेता, जिव्हाळ्याचा मित्र, मातृभक्त पुत्र आणि नीतिसंपन्न गृहस्थ अशी यशवंतरावांची अनेक रूपे आहेत. माझ्या मते समतोल विचार हे त्यांच्या यशाचे रहस्य आहे. ते कधीही एकान्तिक भूमिका घेत नाहीत.

यशवंतरावांना साठ वर्षे पूर्ण झाली हे खरे वाटत नाही. साऱ्या साऱ्या गोष्टी काल-परवा घडल्यासारख्या वाटतात. बेचाळीसचा लढा.. स्वातंत्र्यलाभ.. संयुक्त महाराष्ट्र दिवस.. प्रतापगड.. शिवनेरी.. चीनशी युद्ध.. बांगला देश.. आमच्या भेटी.. नागपूरमधल्या.. महाबळेश्वराच्या.. खुल्ताबाद.. पुणे.. दिल्ली.. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, तेव्हा यशवंतरावांचा उल्लेख ''सर्वांत तरुण मुख्यमंत्री'' म्हणून केला जात होता. आज त्यांनी साठी ओलांडली!

मार्ग तरुणांनीच चालायचा असतो, पण..

मार्गदर्शन अनुभवसंपन्नांनीच करावे लागते.

लढ्यात सेनानी, प्रांताचा मुख्यमंत्री, देशाचा संरक्षणमंत्री या सर्व भूमिका सारख्याच यशस्वी रीतीने पेलणारी 'काबील' माणसे क्वचित जन्माला येत असतात. भारतासारख्या अर्धाविकसित आणि खंडतुल्य देशात शासन आणि संघटना या दोन्हीही अतिरेकी भूमिका घेऊन निभत नाही. यशवंतरावांनी हे जाणले आहे. म्हणूनच ते विराजमान होतील, ते पद प्रतिष्ठा पावते.

**(मी पाहिलेले यशवंतराव**
**संपादिका-डॉ. सरोजिनी बाबर या ग्रंथातून)**



# कृष्णाकाठचा प्रवास

महाराष्ट्राचे नेते यशवंतराव चव्हाण यांची अनेक छोटी-मोठी चरित्रे अनेकांनी लिहिलेली प्रसिद्ध झाली आहेत. ‘श्री. यशवंतराव : इतिहासाचे एक पान’ हे विस्तृत चरित्र केसरीचे माजी वार्ताहर रामभाऊ जोशी यांनी लिहिलेले अनेक वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले आहे. अन्य व्यक्तींनी लिहिलेल्या चरित्रांपेक्षा वेगळे आणि आपणच लिहिलेले आपले चरित्र म्हणजे आत्मचरित्र. याचा आकृतिबंधच वेगळा असतो. एवढंच नव्हे, तर त्याचा आशयही निराळा असतो. आपण आपल्याला पाहायचे, स्वत:चे सर्वांगीण अवलोकन करायचे, तेव्हा कित्येकदा दार बंदही करून घ्यावे लागते. परंतु, आत्मचरित्रात सगळे काही उघडे करून सांगावे अशी चरित्रांविषयीची अपेक्षा असते. वाचकाची ही अपेक्षा केव्हाही मर्यादित अर्थाने कोणताही आत्मचरित्रकार पुरी करू शकतो. म्हणून आत्मचरित्र लिहिणे ही एक मोठी जबाबदारी म्हणून पार पाडावी लागते. यशवंतराव चव्हाण यांनी हे स्वत:चे चरित्र लिहीत असताना अशा तऱ्हेची जबाबदारी मोठ्या कुशलतेने पार पाडली आहे.

हा आत्मचरित्राचा पहिला खंड आहे. या खंडाचे नावच खूप आकर्षक म्हणजे ‘कृष्णाकाठ’ हे आहे. मलपृष्ठ उघडल्याबरोबर डोळ्यांसमोर जे छायाचित्र येते ते कुठले? हे केवळ आमच्यासारख्या वाईकरांच्याच डोळ्यांत भरते. ते चित्र वाईतील धर्मपुरी समोरील कृष्णेच्या प्रवाहाचे आहे. पुलापलीकडील दाट झाडीचेही दर्शन या चित्रात घडते.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १९१३मध्ये १२ मार्च रोजी झाला. तेव्हापासून १९४६ साली मार्चच्या ३० तारखेला काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची सभा मुंबईला प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात भरली होती त्याला उपस्थित राहण्याकरिता यशवंतराव कऱ्हाडहून आईच्या पायावर डोके ठेवून निघाले तोपर्यंतचा काळ या प्रथम खंडाचा विषय आहे.

यशवंतराव मुंबईच्या विधानसभेवर निवडून आले होते. पार्लमेंटरी पार्टीच्या सभेला उपस्थित राहण्याकरिता मुंबईला निघाले या कालवधीची आत्मकथा म्हणजे ‘कृष्णाकाठ’ होय.

**यशवंतरावांचे ‘कृष्णाकाठ’ हे आत्मचरित्र खूप गाजले. या पुस्तकाचे तर्कतीर्थ *लक्ष्मणशास्त्री जोशी* यांनी ६ ऑक्टोबर १९८४ रोजी पुणे आकाशवाणीवरून परिक्षण केले होते. आकाशवाणी पुणे यांच्या सौजन्याने ते येथे देत आहोत.**

त्यांचा जन्म आजोळी झाला. आजोळ देवराष्ट्र या छोट्याशा गावचे. कृष्णेच्या खोऱ्याच्या परिसरातले हे गाव. या परिसराने सुरेख चित्र मोठ्या भावुकतेने या चरित्रात रेखाटलेले आहे. देवराष्ट्रात जरी जन्म झाला तरी पहिली बालपणीची चार-पाच वर्षे गेल्यानंतर १९४६च्या मार्च महिन्यात मुंबईच्या सागरकिनाऱ्यावरील जीवनाचा वरचा टप्पा गाठेपर्यंत मुख्य केंद्र कराड हेच बनले. ग्रामीण जीवनातील नागर जीवनामध्ये बालपणीच प्रवेश मिळाला. हे अपरिहार्यपणे घडले. यशवंतरावांची ही कृष्णाकाठची विकासभूमी ग्रामीण नव्हे, तर नागर जीवनाची होती. ग्रामीण जीवनाला पांच्य भौतिकीसृष्टी, आकाश, प्रकाश, मोकळा खेळणारा वारा, उघडी मैदाने, वृक्षराजींनी झाकलेली वने वगैरे सगळे समोर जिवाला घेरून राहिलेले असते. परंतु, या अवस्थेत मनुष्य अंतर्मुख होत नाही. म्हणजे अंतरंगात पडलेल्या विश्वाच्या चित्राचा पुन:प्रत्यय घेण्याइतकी भौतिक संस्कृती माणसाला लाभू शकत नाही. हे केवळ नागर संस्कृतीतच शक्य होते. देवराष्ट्र छोटेसे गाव. त्यातील सर्व जातीजमातीची माणसे, एकमेकांच्या शेजारधर्माने एकमेकात मिळून मिसळून, एकमेकांच्या विश्वासाने शांत रीतीने कशी राहात याच्या वर्णनात लेखकाचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला दिसतो. कराडच्या नागरी जीवनाच्या पार्श्वभूमीवरून त्यांनी त्याचा पुन:प्रत्यय घेतला आहे. कराडचे नागरी जीवन, तेथील पांढरपेशा शिक्षित वर्ग, चतुर व्यवहारी व्यापारी वर्ग, तेथे घडणारी सामाजिक आणि राजकीय आंदोलने हे सर्व निसर्गत:च चाणाक्ष असलेल्या व्यक्तीच्या मनावर आणि बुद्धीवर संस्कार करीत असते. या संस्काराचे काय महत्त्व असते याचे चातुर्यपूर्ण वर्णन या चरित्रकाराने केलेले आहे.

कराडच्या नागरी संस्कृतीचा पाया आधुनिक शिक्षण हा होता. वडील यशवंतरावांच्या बालपणीच वारले. प्रपंचाची सगळी जबाबदारी त्यांच्या मातोश्री विठाबाई यांनीच घेतली. त्यांच्या मातोश्रींचा निर्णय कराडलाच राहायचे हा. दोन्ही मुलांचे शिक्षण कराडला राहूनच पुरे करायचे हा आईचा ध्यास यशवंतरावांच्या विद्याभ्यासाचा मुख्य आधार बनला. ‘मातृदेवोभव’ हा श्रुतीचा आदेश मानवी इतिहासात ज्या ज्या पुत्रांनी यथातथ्याने आचरला ते पुत्र भाग्यशाली झाले. अशा सत्पुत्रांपैकी असलेल्या एका पुत्राने लिहिलेले हे जीवनाचे कथानक आहे.

यशवंतराव हे मातेचा संदर्भ जेथे जेथे आला तेथे तेथे मातृभक्तीने सद्गदित होतात हे मातृनिर्देशाचे सगळेच प्रसंग वाचकांच्याही हृदयाला भिडल्याशिवाय राहात नाही. तत्कालीन सामाजिक जीवनाचे सर्वांगीण प्रत्यंतर देणारा नमुना होय. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये जे जे प्रवाह समांतर रेषेत किंवा विरुद्ध दिशेने वाहात होते, एकमेकांच्या स्पर्धेने आदळत, उसळत, मिसळत होते; ज्या ज्या नव्या शक्तींचा संघर्ष घडत होता, वाढत होता त्यांचे प्रतिबिंब कराडच्या सामाजिक जीवनामध्ये अपरिहार्यपणे उठावाने दृग्गोचर होत होते. त्या प्रवाहामध्ये यशवंतराव मोठ्या कौशल्याने विहार करीत होते. त्यांना इतर प्रकारचे व्यायाम किंवा खेळांचे प्रकार फारसे मनावले नाहीत, परंतु पोहणे मात्र जमले असं ते म्हणतात. ही गोष्ट याही संदर्भामध्ये यथार्थ ठरते.

त्यांच्या वैचारिक जीवनावर पहिली छाप पडली ती भाऊसाहेब कळंब्याच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांनी स्थापन केलेल्या विजयाश्रमाची. विजयाश्रम बहुजन समाजातील तरुण पिढीला सत्यशोधकी विचार देण्याच्या हेतूने स्थापन केला होता. विजयाश्रमात महात्मा फुले यांच्या विचाराची शिकवण दिली जात होती. परंतु, हा काळ सत्यशोधक समाजाचे ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतर होण्याचा काळ होता. सामाजिक जीवनाचा आणि एकात्म जीवनाचा एक समरस समाज निर्माण करण्याचा फुले यांचा सत्यशोधकी विचारही ब्राह्मणेतर चळवळीत खंडित झाला? निर्मळ राहिला



नव्हता. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय, शिक्षणापासून वंचित राहिलेला बहुजन समाज आणि स्त्रियांचे पारतंत्र्य इ. खऱ्याखुऱ्या प्रश्नांचा सर्वांगीण शोध आणि बोध घेऊन अर्थ लावण्याची प्रक्रिया एककल्ली झालेली होती. सामाजिक न्यायाची आणि विषम समाजाची जबाबदारी एका ब्राह्मण समाजावर टाकून या चळवळीचे नेते मोकळे होत होते. या ब्राह्मणेतर चळवळीचे हे एकांगी झालेले स्वरूप देशाच्या स्वातंत्र्य चळवळीपासून बहुजन समाजाला कायम दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. ग्रामीण भागातील ब्राह्मणेतर सरंजामी संस्कारांची प्रतिष्ठित घराणी इंग्रजी राज्याशी इमान राखूनच ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करीत होते. सरकारी नोकऱ्यांमध्ये महत्त्वाचा हिस्सा मिळावा, राजकीय क्षेत्रामध्ये जी थोडी फार सत्ता भारतीय नागरिकांना प्राप्त होणे शक्य होती तिच्यात वाटा मिळावा अशा प्रकारची त्या चळवळीची ध्येये होती अशी मीमांसा यशवंतराव आत्मचरित्रात करतात.

महाराष्ट्राने स्वातंत्र्याच्या इतिहासात जो भाग घेतला त्याचा अर्थ समजावून घेण्यासही ही मीमांसा लक्षात ठेवली पाहिजे. माध्यमिक शिक्षण घेत असतानाच यशवंतरावांना महात्मा गांधींनी सुरू केलेल्या १९३०च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाने ओढून घेतले. महात्मा गांधींचा दांडीमार्च सुरू झाला. यशवंतरावांच्याच भाषेत बोलायचे म्हणजे साबरमती नदीच्या तीरावर उठलेल्या या वादळाने 'कृष्णाकाठ' पुरा भारून गेला. या वादळाने भारताची सगळी शहरे आणि खेडी थरारू लागली. काँग्रेसचा झेंडा सगळीकडे फिरत होता. अशा अहिंसक चळवळीमुळे एवढी दूरगामी, शस्त्रास्त्राने समृद्ध असलेली, ब्रिटिश सत्ता कशी पराभूत होणार? आणि स्वराज्य कसे प्राप्त होऊ शकणार? अशा तऱ्हेच्या वस्तुवादी विचाराला तरुण मनात थारा मिळेनासा झाला. या व्यवहारवादी मीमांसेपेक्षा उत्स्फूर्त प्रेरणा तरुण मनाला स्वराज्य मिळणारच, असा अंत:प्रत्यय देत होती. याचे तपशीलवार विवेचन 'वैचारिक आंदोलन' या प्रकरणात सम्यक रीतीने केलेले वाचावयास मिळते.

या स्वातंत्र्य आंदोलनात सामील होत असताना यशवंतराव वयाने लहान होते. तरी त्यांची वैचारिक पातळी सहकाऱ्यांच्या मनावर सतत प्रभाव गाजवीत होती. वाचकांना त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचा परिचय त्यांनी मसूर येथे भरवलेल्या सातारा जिल्हा राजकीय परिषदेच्या वर्णनावरून चांगला होतो. या परिषदेमध्ये कोल्हापूर संस्थानचे राजकीय नेते माधवराव बागल यांनी वैचारिक नेतृत्व केले. ती परिषद संपल्यानंतर उरलेल्या कार्यकर्त्यांमध्ये वादविवाद सुरू झाले; आणि त्या वादामध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्नांना स्पर्श केल्याशिवाय आपली स्वातंत्र्याची चळवळ पुढे जाऊ शकणार नाही, असे आपले मत यशवंतरावांनी व्यक्त केले. या मसूर परिषदेच्या निमित्ताने निरनिराळ्या नव्या कार्यकर्त्यांच्या ओळखी झाल्या.

या चरित्रात राजकीय आंदोलनाचा चित्रपट सारखा उलगडत जातो. त्यामध्ये अनेक सहकारी व्यक्ती मित्र म्हणून कार्यक्षेत्रात कामाचा उठाव करताना दृष्टीसमोर येतात. तात्पर्य, सार्वजनिक जीवनात ज्यांची चिरकाल टिकणारी अशी जी कामगिरी असते त्यांच्या भोवतालच्या व्यक्तींनाही चरित्रामध्ये स्थिर जीवन लाभू शकते.

यशवंतरावांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत कारावासाची एक वर्षाची शिक्षा भोगली. जेलमध्ये काढलेले एक वर्ष म्हणजे माझ्या मताने एक प्रकारचे विद्यापीठीय जीवन होते, असे ते म्हणतात. तेथे भेटलेली माणसे, तेथे वाचलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा, त्यातून आलेली नवी जाण या सर्व जीवनाला शक्ती देणाऱ्या पोषक गोष्टी होत्या, असे ते विद्यापीठीय जीवनाचे रहस्य उलगडून सांगतात.

१९३३च्या मे महिन्यानंतर यशवंतराव जेलमधून बाहेर पडले तेव्हा ते फक्त काँग्रेसमध्येच राहिले नव्हते; त्यांच्या काँग्रेस निष्ठेला समाजवादी निष्ठेची जोड मिळाली. आत्मारामबापू पाटील (बहेबोरगांव), ह.रा. महाजनी, स्वत: मी इत्यादीकांशी कायमचा स्नेह त्यांनी जोडला. त्यामुळे राष्ट्रीय, जागतिक, समाजवादी आंदोलनाचे अनेक अंगांनी वैचारिक मंथन यशवंतरावांच्या बुद्धीत सुरू झाले. समाजवादी व रॉयवादी मित्रांच्या बरोबर सातारा जिल्ह्यात ते काम करीत राहिले. त्यामुळे त्यांच्या वैचारिक परिपक्वतेला अनुकूल असे पोषक वातावरण त्यांच्याभोवती कायम राहिले.

'जडणघडण' हे पहिले प्रकरण वैचारिक आंदोलनाचे प्रवेशद्वार असे म्हटले पाहिजे. 'वैचारिक आंदोलन' हे दुसरे प्रकरण राजकीय अंगाने विस्तार पावले आहे. 'निवड' हे तिसरे प्रकरण दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या संदर्भात विस्तार पावले आहे. त्यात 'भारत छोडो' हे बेचाळीस सालचे आंदोलन येते. त्यात जनसागराच्या भारतभर पसरलेल्या उधाणाचे भव्य रोमांचकारी विराट स्वरूप प्रत्ययास येते. त्यात भूमिगतांची चळवळ कशी वाढत गेली, याचा हुबेहूब चित्रपट मनासामोर उभा राहतो.

लगेच १९४५ साल उजाडले. या संदर्भात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशाचे आंदोलन चालविणाऱ्या काँग्रेसची महायुद्धासंबंधीची भूमिका समजावून सांगितली आहे व त्या भूमिकेवरून छोडो भारत आंदोलनाचे समर्थन यशवंतरावांनी संयुक्तिकपणे केले आहे. या संदर्भात त्या वेळच्या एम.एन. रॉय यांचा दृष्टिकोन समग्ररीतीने मांडावयास पाहिजे होता.

या महायुद्धात ब्रिटन, अमेरिका इ. दोस्त राष्ट्रांचा विजय झाल्यास या जागतिक पश्चिमी साम्राज्यशाह्यांचा ऱ्हास होऊन वसाहतवाद संपेल व जागतिक लोकशाहीला ऊर्जितावस्था प्राप्त होईल, अशी या युद्धाची मीमांसा १९४० सालीच एम.एन. रॉय यांनी केली होती. १९४५ साली दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती होऊन भारतीय स्वातंत्र्याचा उष:काल आणि स्वातंत्र्याची प्रभात मनाला रमवू लागते. याच कालावधीत यशवंतराव वकिलीची पदवी घेतात, वकिली सुरू करतात. १९४२ सालच्या चळवळीमध्ये भूमिगत होऊन प्रति सरकार निर्माण करणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतात. ही भूमिका प्रति सरकारची चळवळ गुन्हेगार प्रवृत्तीच्या फरारी लोकांनी ताब्यात घेतली तर तिची अवनती लुटारू प्रवृत्तीत होण्याचे भय होते. या बाबतीत यशवंतरावांनी कार्यकर्त्यांना वारंवार सावध केले. परंतु, त्या चळवळीची नैतिक शक्ती क्षीण होऊन गेली. त्या प्रतिसरकार चळवळीला 'पत्री सरकार' असे हिंसक अत्याचारी रूप प्राप्त झाले, हे मात्र यशवंतरावांनी स्पष्ट रीतीने सांगितलेले नाही.

या काळामध्ये यशवंतरावांवर अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या त्यांची सौजन्यमूर्ती असलेली पत्नी खूप आजारी झाली. क्षयाचा विकार जडला. परंतु, त्या मोठ्या धीराच्या महिला होत्या. १९४६ची मार्च महिन्यातील निवडणूक यशवंतरावांनी जिंकली. काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीचे नेते म्हणून बाळासाहेब खेर निवडले गेले होते. त्यांनी यशवंतरावांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड केली. अशा रीतीने कृष्णाकाठावरून अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील भारताच्या आर्थिक राजधानीमध्ये म्हणजे मुंबईत पुढील जीवनाची भव्य यात्रा यशस्वी रीतीने डौलात पुढे जाऊ लागली.

**शब्दांकन : राम देशपांडे**
**संपर्क : ८६००१४५३५३**



# सुसंस्कारित मराठी नेता

गोविंद तळवलकर

यशवंतरावांनी राजकारणात प्रवेश केला तो विशिष्ट संस्कार घेऊन, त्यांनी व्यासंगाने आपल्या मनाची मशागत केली. मॅट्रिक होण्यापूर्वी स्वातंत्र्य चळवळीने व सामाजिक जीवनाने ते आकर्षित झाले होते. म्हणून जतीनदासांनी उपोषण करून मृत्यू कवटाळला तेव्हा दु:खी होऊन ज्यांनी त्या वेळी उत्स्फूर्तपणे उपवास केला त्यात यशवंतराव होते. मॅट्रिकला असतानाच कराडात हरिजनांसाठी रात्रीची शाळा सुरू करण्यात पुढाकार घेणाऱ्या यशवंतरावांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना उद्‌घाटनासाठी आमंत्रण देण्याचे सुचले. पुढे अनेक दशकांनंतर त्यांनी पुणे विद्यापीठात विठ्ठल रामजींवर मार्मिक भाषणही केले ते त्यांच्या वाचनाची फलश्रुती म्हणून, कारावासात मार्क्सवाद, इतिहास याबरोबरच टागोर आणि कालिदास यांच्या वाङ्‌मयाचे वाचन झाले. या कामी ह.रा. महाजनी, आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन इत्यादींचे साहाय्य त्यांना मिळाले होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेल्या यशवंतरावांच्या मनावर वास्तविक वडील बंधूंचे सत्यशोधक समाजाच्या राजकारणाचे व सामाजिक विचारांचे परिणाम व्हावयाचे. पण, ते त्यापासून दूर राहून राष्ट्रीय चळवळीत सामील झाले. तेथेही गांधींचा प्रभाव मान्य करूनसुद्धा त्यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा पगडा बसला. तुरुंगातून बाहेर पडल्यावर ते जवळपास कम्युनिस्ट पक्षात जाणार होते! आणि तसे नसते तर रॉयिस्ट पंथ त्यांनी स्वीकारला असता; पण, राष्ट्रीय चळवळीला अग्रक्रम असून ती महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच करू शकते ही यशवंतरावांची पक्की समजूत होती. आधुनिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांचा मागोवा घेतल्यामुळे गांधीवादी कर्मकांडात यशवंतराव सापडले नाहीत आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतिकार्याचे महत्त्व त्यांना कमी वाटले नाही. म्हणून रत्नागिरीला जाऊन त्यांनी सावकरांची भेट घेतली. पक्षाच्या व पंथाच्या भिंती स्वत:भोवती उभ्या न केल्याने पुढे सत्तेवर असताना व नसताना यशवंतराव अनेकविध पक्षांच्या, मतपंथाच्या लोकांत सहजपणे मिसळत. कारावासात असताना जशी वाचन व चर्चा याद्वारे यशवंतरावांनी आपल्या मनाची मशागत केली होती त्याचप्रमाणे महाविद्यालयातल्याप्रमाणेच अखेरपर्यंत त्यांचे ग्रंथप्रेम कमी झाले नाही. म्हणून मराठी व इंग्रजी पुस्तके ते आवडीने घेत व चोखंदळपणे वाचीत. परदेशात जात तेव्हाही पुस्तकाच्या दुकानात वेळ घालवून खरेदी केल्याशिवाय ते परत येत नसत.

तरुणपणी कराडहून कोल्हापूरला जाऊन पिटात बसून त्यांनी नाटके पाहिली. म्हैसूरकर महाराज, भागवतबुवा, बाबा आळतेकर यांची संगीत भजने व औंधच्या दाजी गुरवाचा पखवाज ऐकण्यात अनेक रात्री घालविल्या. गडकऱ्यांच्या नाटकातले संवाद त्यांनी पाठ केले होते आणि 'राजसंन्यास' हे तर त्यांचे आवडते नाटक होते. रशियाला गेल्यावर मॉस्कोपासून काही अंतरावर असलेल्या टॉलस्टॉय यांच्या यस्नापलाना या निवासस्थानाला भेट देण्यास यशवंतराव विसरले नव्हते. तेथील शांतता व घनदाट वृक्षराजी पाहिल्यावर सोन्याच्या पिंपळाखाली तानदेवांची तानसाधनेस बसावे असे ते ठिकाण असल्याची यशवंतरावांची भावना झाली. रॉय जेकिन्स हे एक काळ ब्रिटिश मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. आता ते सोशल डेमोक्रॅटिक पक्षात आहेत. जेकिन्स हे चांगले लेखक. त्यांनी स्क्विथ यांचे सुंदर चरित्र लिहिले आहे. ते यशवंतरावांनी वाचले होते व लंडनला गेल्यावर त्यांनी जेकिन्स यांची मुद्दाम भेट घेतली. स्वत:च्या मनाची मशागत त्यांनी अशी केली होती. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होते त्याचप्रमाणे स्वाभाविक आवडही होती. यामुळे त्यांचे लेखन व भाषण मोजके व अनेकदा मार्मिक असे.

स्वातंत्र्याबरोबर यशवंतरावांचा प्रवास दीर्घकाळ सत्ताधारी या नात्याने झाला. पूर्वीच्या मुंबई राज्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी या पदापासून ते दिल्लीत निरनिराळ्या खात्यांचे मंत्री झाले. द्विभाषिकाचे मुख्यमंत्रिपद, दिल्लीत संरक्षण व नंतर गृहमंत्रिपद ही पदे यशवंतरावांना मिळाली तेव्हा अगोदर त्या स्थानांवर असलेल्या व्यक्तींनी निर्माण केलेल्या परिस्थितीची पार्श्वभूमी मिळाली होती. त्यामुळे यशवंतरावांची कारकीर्द अधिकच उजळून निघाली. ते द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. तत्पूर्वी मोरारजीभाईंच्या एकांगी भूमिकेने लोकांची मने दुखावली होती. यशवंतरावांनी बंदुकीच्या जोरावर द्विभाषिक न राबविण्याचे ठरविले. त्यानंतरही ते चालणे शक्य नाही हे दाखवून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी मांडली. ती मान्य झाली. समितीच्या चळवळीचा रेटा, लोकमताचा दणका यांना यशवंतरावांच्या कारभाराची जोड मिळून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा मराठी मनाला नव्या आशेची पालवी फुटली. यामुळेच कुसुमाग्रजांसारख्या कवीने घोषणा केली---

**नव्या जीवनाचा नाद**
**मला ऐकू येत आहे**
**लक्ष शून्यातून**
**काही श्रेय आकारत आहे**

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर यशवंतरावांनी ग्रामीण व शहर या दोन्ही समाजांच्या मनाची पकड घेतली. सहकारी साखर कारखान्याचा प्रयोग पूर्वीच सुरू झाला होता; पण, तो एकुलता एक होता. यशवंतरावांनी सरकारी धोरण म्हणून अशा साखर कारखान्यांची योजना आखली व ती पार पाडण्यासाठी सरकारी यंत्रणेचे पाठबळ उभे केले. नंतर या क्षेत्रात काही अपप्रवृत्ती निर्माण झाल्या खऱ्या; पण, तसा विचार केला तर त्या अनेक क्षेत्रांत झाल्या व होऊ शकतात. तथापि, सहकारी साखर कारखानदारीने राज्याच्या काही ग्रामीण भागांत मोठा उत्पादक व्यवसाय सुरू झाला. नवे रचनात्मक कार्य झाले. नवे कार्यकर्ते व पुढारी तयार झाले आणि ते काही कोटींचा व्यवहार करू लागले. सहकारी बँका, उपसासिंचन इत्यादींची वाढ हीसुद्धा रचनात्मक होती. यातून शिक्षणाच्या प्रसारास वाव मिळाला. शाळा व महाविद्यालये यांची संख्यावाढ झाली. ज्या भागात व समाजात शिक्षणाचा वारा लागणे शक्य नव्हते तेथे तो पोहोचला. हे एक सामाजिक परिवर्तन होते, त्यास चालना देण्याचे कार्य यशवंतरावांच्या धोरणामुळे झाले. जिल्हा परिषदांमुळे विकेंद्रीकरण झाले. तीही गरज होती. मराठवाडा व शिवाजी या दोन विद्यापीठांच्या स्थापनेच्या मागे यशवंतरावांची प्रेरणा होती. या सर्वांचा गुणात्मक दर्जा वाढावयास हवा हे मान्य असले तरी प्रारंभ होणे अत्यावश्यक होते. हे फार मोठे महत्त्वाचे काम यशवंतरावांमुळे झाले.



साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना, येथे साहित्य व संस्कृतीला वाव मिळावा, नव्या शास्त्रीय विचारांचा प्रसार व्हावा, यासाठी झाली. यशवंतराव मुख्यमंत्री असताना सर्व खात्यांचे सचिव मुख्यमंत्र्यांचे बोलावणे येताच यथायोग्य माहिती पुरविण्यासाठी तत्पर असत. त्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर ठरावीक अंतराने भेटी होत.

यशवंतरावांनी तात्यासाहेब केळकरांच्या संबंधात जे सुंदर भाषण केले होते त्यातील केळकरांच्या मध्यममार्गी धोरणाबद्दलचे विवेचन काही प्रमाणात यशवंतरावांनाही लागू होते. काही प्रमाणात म्हणण्याचे कारण असे की, तात्यासाहेब कधी सत्तास्थानावर होते पण सत्तेच्या राजकारणात त्यांच्या वृत्तीचा कल मध्यममार्गी होता. यशवंतराव तात्यासाहेबांबद्दल लिहितात, ''दुसऱ्यांच्या म्हणण्यातील तथ्य ते मान्य करीत, ते एकांतिक विचाराचे नव्हते, व्यवहारी व मध्यममार्गी होते.'' केळकरांची मध्यममार्गावर जी श्रद्धा होती त्यामागे एकतर त्यांचे त्याला अनुकूल असे सौम्य व बुद्धिवादी व्यक्तिमत्त्व होते आणि दुसरे, अनुभवी व्यवहारवाद होता, केळकरांनी मध्यमक्रमासंबंधी जे विवेचन केले आहे त्यात म्हटले होते की, मध्यमक्रम, म्हणजे निखालस वाईटाशी समेट किंवा तडजोड असा नाही, तर जे सामान्यत: चांगले म्हणून समजले जाते त्याचीच मर्यादा शोधून तारतम्याने जे युक्त वाटेल, त्याचे आचरण म्हणजे मध्यमक्रम होय. ''सद्‌गुणाच्या आचरणातही तारतम्याने सुचविणारे मर्यादादर्शन'' असे त्याचे शास्त्रीय वर्णन केळकरांनी केले आहे. ''भावना जेव्हा उद्दीपित होतात तेव्हा अशा वृत्तीच्या लोकांची उपेक्षा होते, तशीच ती केळकरांची झाली,'' असे यशवंतरावांनी समर्पक रीतीने सांगितले.

शेवटी मनाने व शरीराने यशवंतराव खचले होते. प्रथम डोंगरे, नंतर किसन वीर आणि अखेरीस वेणूताई यांच्या निधनाने, त्यांच्या मनावरील जखम अधिकाधिक खोल होत गेली. आपल्या सार्वजनिक जीवनात इतके सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व असलेला नेता सहजासहजी भेटणार नाही.

**(लोकराज्य १ मार्च १९८५ वरून पुनर्मुद्रित)**



## विदर्भात उद्योगांना संधी

भारताच्या तिसऱ्या योजनेकडे आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, ह्या योजनेमध्ये बेसिक इंडस्ट्रीजवर म्हणजे मूलभूत उद्योगधंद्यांवर अधिक भर देण्यात येत आहे. त्यावर एकंदर योजनेच्या किती टक्के खर्च केला जाणार आहे वगैरे तपशिलात मी शिरत नाही. कारण, त्यात अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. परंतु, एक गोष्ट मात्र खरी की, ज्याला उद्योगप्रधान योजना किंवा इंडस्ट्रियल प्लॅन म्हणतात अशा योजनेची भारताला आवश्यकता आहे. पण, त्याचबरोबर हेही खरे आहे की, भारताची औद्योगिक योजना शेतीकडे दुर्लक्ष करून पुढे जाऊ शकत नाही. किंबहुना शेती हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा किंवा व्यवसाय आहे हे गृहीत धरूनच आपण आपली औद्योगिक योजना आखली पाहिजे. मूलभूत उद्योगधंद्यांच्या दृष्टीने ह्या विभागासाठी आपण काही खास गोष्टी मागितल्या पाहिजेत असे मला वाटते. कारण, हे जे मूलभूत उद्योगधंदे आहेत त्यापैकी काही उद्योगधंद्यांवर महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था साकार होणार आहे. अशा उद्योगधंद्यांना महाराष्ट्राच्या इतर भागांत जितका वाव आहे त्यापेक्षा अधिक वाव विदर्भात आहे. विशेषत: पोलाद किंवा लोखंड यासारखी खनिज साधनसामग्री नागपूरच्या आसपास विपुल प्रमाणात सापडते. म्हणून अशा प्रकारचे उद्योगधंदे विदर्भात उभारावेत असा आग्रह धरण्याची महाराष्ट्र राज्याची इच्छा आहे. परंतु, त्याचा पाठपुरावा करणे, त्यासाठी तयारी करणे, हे काम आपल्याला करावयाचे आहे. विशेषत: कच्च्या लोखंडाचा कारखाना चांद्याच्या जवळपास काढण्याचा महाराष्ट्र सरकारचा मानस आहे.

**(विदर्भ विकास परिषदेचे उद्‌घाटन, नागपूर, दि. ३० जून १९६०)**



# प्रगतीमागील प्रतिभा

भाषिक महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची सूत्रे त्यांनी वयाच्या अवघ्या ४२व्या वर्षी हाती घेतली. एवढ्या तरुण वयात मुख्यमंत्री पदाचा बहुमान मिळालेले ते पहिले मुख्यमंत्री होते. त्यांची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द खूप गाजली. त्यांनी मुख्यमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा गौरव पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर भाषणातून केला, तर सर्वोदयवादी नेते लोकनायक जयप्रकाश नारायण यांनीही त्यांची 'देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री' म्हणून प्रशंसा केली.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या हितासाठी यशवंतरावजींनी १९५७ ते १९६०-६२ काळात जे निर्णय घेतले, जनतेचे सहकार्य मिळविले, प्रशासनाला गती दिली त्यामुळे महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शेती व शिक्षण विषयक चेहरामोहरा पार बदलून गेला. त्यातूनच महाराष्ट्राची देशातील स्थिर, पुरोगामी व सर्व बाबतीत जागृत असे राज्य म्हणून भारतभर प्रतिमा निर्माण झाली व ती आजतागायत कायम आहे.

- जंगलात राहणाऱ्या वन्य पशुपक्षांचे संरक्षण करणाऱ्या दृष्टीने त्यांनी कायदा केला. असा कायदा करणारे मुंबई राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले. या कामाच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी यंत्रणाही उभारली. प्राण्यांच्या शिकारीवर बंदी घातली. वन्य प्राण्यांसाठी अभयारण्यांची तरतूदही कायद्यात केली.
- क्षुल्लक व दैनंदिन कामासाठी लोकांना या टोकापासून त्या टोकापर्यंत राजधानीच्या ठिकाणी जावे लागू नये, त्यांचे काम लवकर व विनासायास व्हावे ह्या उद्देशाने त्याच राज्याची सहा विभागांमध्ये विभागणी केली. विभागांची मुख्य ठाणी राजकोट, अहमदाबाद, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर ही ठेवली.
- सहा विभागांमध्ये विभागणी करताना सचिवालयातील खात्यांच्या कामातही त्यांनी फेरबदल केले. नियोजन व विकास खात्याचे काम बघण्यासाठी विकास आयुक्तांची नेमणूक केली. मुंबई रेव्हेन्यु ट्रायब्युनलची बेंचेस नागपूर व राजकोट हे हायकोर्ट बेंचेस स्थापन करण्याचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्याचा आकार आणि कामाचा बोजा लक्षात घेऊन सचिवालयातील खात्याची व खातेप्रमुखाची कचेऱ्यांची २५ टक्के वाढ करण्याची एक योजनाही त्यांनी आखली.
- राज्याच्या सर्व भागांतील औद्योगिक कंपन्यांच्या उद्योग धंद्याबाबतच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी मुंबई राज्य फायनांशियल कॉर्पोरेशन (आताचे महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ) स्थापन केले.
- नाट्य कलेला उत्तेजन देण्यासाठी २.१६ लाख रुपयांची एक योजना आखली. नाटकाच्या पुस्तकांना बक्षीस, हौसी कलावंतांचा नाट्यमहोत्सव, खुल्या नाट्यगृहांची निर्मिती, विपन्नावस्थेतील कलावंतांना आर्थिक साहाय्य, संगीत, नृत्य आणि नाट्य शाळांना अनुदान, तमाशांना पारितोषिके आदी गोष्टी महाराष्ट्रामध्ये यशवंतरावजींनी सर्वप्रथम सुरू करून प्रशासकीय गुणांबरोबर आपल्या रसिक व कलाप्रेमी वृत्तीचा परिचय त्यांनी जनतेला करून दिला.
- राज्यातील प्रत्येक समाजाला, प्रदेशाला, गटाला, योग्य व न्याय्य वागणूक मिळेल असे धोरण त्यांनी ठरविले. या सर्व गोष्टी राबविणाऱ्या प्रशासनाची कार्यपद्धतीही त्यांनी निश्चित केली.
- शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी पुस्तिका, शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विविधांगी कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केला. मुलोद्योग शिक्षणाला चालना दिली. प्रौढ शिक्षणाची व्याप्ती वाढविली. मोफत शिक्षणाची योजना राज्यात प्रथमच सुरू केली, त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.
- मराठवाड्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शैक्षणिक संस्थांना सढळ हस्ते अनुदाने दिली. मराठवाड्याकरिता स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस करून, २३ ऑगस्ट १९५८ रोजी त्याचे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उद्घाटन केले.
- दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीतच घेतला व या विद्यापीठाची स्थापना १८ नोव्हेंबर १९६२ रोजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाली.
- यशवंतरावजींनी सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना केल्याने नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय या स्कूलमध्ये उपलब्ध झाली. भारतातील अशा प्रकारचे हे पहिले सैनिक स्कूल ठरले.
- आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठीही त्यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. शिक्षणाची गंगा आदिवासींच्या दारी पोहोचविण्याच्या दृष्टीने त्यांनी आश्रम शाळांची योजना आखली.
- राज्यामध्ये औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची एक सर्वंकष योजना त्यावेळी मुंबई राज्य सरकारने आखली. शासनाबरोबरच नगरपालिका, सहकारी संस्था व खाजगी उद्योग यांनीही याकामी पुढाकार घ्यावा अशी यशवंतरावजींची धारणा होती. अशासकीय संस्थांना औद्योगिक वसाहती उभारण्यास अनुमती देणारे मुंबई राज्य हे त्यावेळी देशातील पहिले राज्य असावे.
- सहकारी क्षेत्र विस्तृत करण्यासाठी व त्याचा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडविण्यासाठी सहकाराला त्यांनी चालना दिली.
- ग्रामीण भागातील समाज जीवन सुधारण्यासाठी त्यांना कर्ज पुरवठ्याची सोय त्यांनी सहकारी बँका, भूविकास बँका, प्राथमिक भूविकास बँका यांच्या मार्फत करून दिली.
- मुंबई राज्य नवा कुळ कायदा लागू करून कसेल त्याला जमीन हे तत्त्व स्वीकारले. यामुळे महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात जमीन मालकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. सर्वसामान्य शेतकरी सरकारकडे एका वेगळ्या आपुलकीच्या दृष्टीने पाहू लागला. १ एप्रिल, १९५९ पासून तुक बंदी व तुकडे तोड हा कायदा प्रत्यक्षात लागू केला. शेतीलाही जमिनीचे क्षेत्र सलग होण्याच्या दृष्टीने या कायद्याचा इष्ट असाच परिणाम झाला. खास जमीनधारा पद्धत नष्ट करण्याचा कायदा अंमलात आणून राज्यातील जहागिरदारी पद्धत नष्ट केली.
- शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा (सिलिंग) कायदा करून संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे खऱ्या अर्थाने पुरोगामी असल्याचे या काळात त्यांनी प्रत्ययास आणून दिले. त्यानंतर केंद्र सरकारने १० ते १२ वर्षांनी सिलिंगचा कायदा केला.
- शेती पिकविण्यासाठी पाणीपुरवठ्याची कायमची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने पाटबंधारे पाणीपुरवठा, पाण्याची उपलब्धता व वीज निर्मिती अशा विविध हेतूंनी त्यांनी कामाची आखणी केली.



यासाठी जल, साधनसामग्री व संशोधन विभाग (सर्कल) सुरू केला. राज्यामध्ये इरिगेशन डिव्हीजन व सबडिव्हीजन स्थापन करून उपलब्ध पाणीपुरवठ्याच्या सोयींची व्यापक पाहणी करण्याचे आदेश दिले. मुंबई राज्य इरिगेशन बोर्डाची स्थापना केली. पाटबंधारे आणि जलसंपत्ती याबाबत महाराष्ट्राची पुन्हा एकदा संपूर्ण पाहणी करण्यासाठी स.गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्य पाटबंधारे मंडळ स्थापन केले.

■ महाराष्ट्राचे भाग्य उजळून काढणाऱ्या कोयना जलविद्युत योजनेचा प्रारंभ १ मार्च १९५८ रोजी यशवंतरावांच्या हस्ते झाला. या योजनेतील पहिले जनित्रही १६ मे १९६२ रोजी यशवंतरावांच्या हस्ते सुरू झाले.

■ मराठवाड्याचा कायापालट घडविणाऱ्या पुर्णा प्रकल्पाचाही प्रारंभ यशवंतरावांच्या हस्ते झाला. विदर्भातील पारस थर्मल पॉवर स्टेशन हा भव्य दिव्य प्रकल्प यशवंतरावांनी आपल्याच कारकिर्दीत पूर्ण केला. हा प्रकल्प म्हणजे विदर्भाच्या जीवनाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल होते.

■ सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा कायदा यशवंतरावांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत झाला. सत्तेचे विकेंद्रीकरण करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत राज्याची योजना प्रत्यक्षात मात्र १ मे १९६२ रोजी अंमलात आली. अशा तऱ्हेची योजना अंमलात आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होय.

■ नाट्यकलेला प्रोत्साहन देण्यासाठी नाट्य महोत्सव, नाट्य कलेच्या शिबिरांना त्यांनी प्रोत्साहन दिले. एप्रिल १९५७पासून चित्रपटांना करमणूक करात सूट देण्याची नवी पद्धत लागू केली. प्रादेशिक भाषेतील उत्कृष्ट पुस्तकांना बक्षिसे जाहीर केली. कलावंतांना शासनातर्फे आर्थिक साहाय्य देण्याची प्रथा यशवंतरावांनी सुरू केली. बालगंधर्वांना त्यांच्या विपन्नावस्थेत ३०० रुपये मासिक मानधन सुरू केले. तसेच राजकवी यशवंत यांना 'महाराष्ट्र कवी' म्हणून भूषवून त्यांना तहहयात ४०० रुपये मासिक मानधन देण्याचा निर्णय घेतला.

■ १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर नागपूर शहराचे महत्त्व कायम राहावे या हेतूने यशवंतरावांनी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे भरविण्याचा निर्णय घेतला व त्यांची अंमलबजावणी आजतागायत सुरू आहे. याच अधिवेशनात २१ डिसेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उद्घाटन यशवंतरावांनी केले. या मंडळाची स्थापना म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सांस्कृतिक क्षेत्रात झालेली एक महत्त्वपूर्ण घटना होय. साहित्य व संस्कृती यांच्या वृद्धीसाठी व संवर्धनासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली विद्वानांची एक यंत्रणा उभारली.

■ १७ मे १९६२ रोजी वाई येथे साहित्य व संस्कृती मंडळाने स्थापन केलेल्या विश्वकोष कार्यालयाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते झाले. लोकसाहित्य व लोक संस्कृती संमेलन २३ मे १९६१ रोजी पुणे येथे भरविले.

■ महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचे यशवंतरावजींनी ठरविले. त्यासाठी भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. सरकारी कारभारात मराठी भाषेचा, माध्यम म्हणून उपयोग करण्यासाठी त्वरित उपाय योजण्यात आले. शासकीय कार्यालयातील कारभार मराठी भाषेतून चालविण्याचा निर्णय करून सर्व तालुका कचेऱ्यांतला कारभार, पत्रव्यवहार मराठी भाषेतून करावा असा निर्णय घेण्यात आला.

■ मुंबई शहराला दूधपुरवठा करण्यासाठी वरळी दूध डेअरी योजना तयार केली. आरे डेअरीमधील डेअरी टेक्नॉलॉजी संस्थेत भारतीय दुग्धालय पदविका अभ्यासक्रम यशवंतरावांच्या कारकिर्दीत सुरू झाला. अशा प्रकारचा हा भारतातील पहिला अभ्यासक्रम होय.

■ कोकण भागात दिवा-दासगाव मार्गावर रेल्वे सुरू करून कोकणात रेल्वे आणण्याचे काम यशवंतरावजींचेच. दिवा-पनवेल या रेल्वेमार्गाचे काम त्यांनी भारत सरकारची मान्यता मिळवून आपल्याच कारकिर्दीत सुरू केले.

■ पददलितांना न्याय देण्याचा एक महत्त्वपूर्ण निर्णय यशवंतरावजींनी घेतला. बौद्ध धर्माचा स्वीकार करणाऱ्यांना हरिजनांना मिळणाऱ्या सवलती सरकारने बंद केल्या होत्या. हरिजनांनी बौद्ध धर्म स्वीकारल्याने त्यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा कमी होणार नव्हता. हरिजनांना मिळणाऱ्या सवलती बौद्ध धार्मिकांना मिळाव्यात ही मागणी यशवंतरावांनी मान्य केली. त्यांना सवलती देण्याचे आदेश काढले.

■ नागपूर येथे ज्या भूमीवर डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली त्या दीक्षा भूमीवर डॉ. आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय त्यांनी घेतला. डॉ. आंबेडकरांवरील आदरापोटी १४ एप्रिल रोजी म्हणजे आंबेडकर जयंती दिनी सार्वजनिक रजा जाहीर केली.

■ यशवंतरावांनी ''बाम्बे इन्फिरिअर व्हिलेज वॉन्टस ॲबॉलिशन ॲक्ट १९५८'' हा कायदा करून ह्या महारवतन पद्धतीला प्रतिबंध घातला. तसेच वतनजमिनी या पूर्ण शेतपटीच्या तिप्पट किंमत घेऊन वहिवाटदार मालकांना मालकी हक्काने परत ताब्यात दिल्या. हे एक मोठे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले.

■ महारवतन पद्धत नष्ट झाली तरी त्यांचा व इतर मागासवर्गीयांच्या पोटाचा प्रश्न सुटला नव्हता. हा भूमिहीन वर्ग भुकेला होता. यशवंतरावांनी ही मागणी न्याय व रास्त मानून भूमिहीनांना जमीन वाटपाचे काम सुरू केले. त्यांचा हा निर्णय खरोखरीच क्रांतिकारी स्वरूपाचा आहे.

■ महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर गुढीपाडव्यास सार्वजनिक सुटी देण्याच्या निर्णयाचे सर्व थरांतून स्वागत झाले.

■ महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर या मराठी भाषिक राज्याचे नाव 'मुंबई राज्य', 'मुंबई महाराष्ट्र राज्य', 'महाराष्ट्र राज्य' ठेवावे अशा विविध सूचना आल्या होत्या. यशवंतरावांनी कॉंग्रेस व विरोधी पक्षाच्या सदस्यांना विश्वासात घेऊन 'महाराष्ट्र राज्य' हे नाव मुक्रर केले व विधानसभेत हे नाव एकमताने संमत करून घेतले.

महाराष्ट्र म्हैसूर सीमा प्रश्नासंबंधी चर्चा करताना यशवंतरावांनी आपली मते निर्भयपणे मांडली व या प्रश्नावर तोडगा सुचविण्यासाठी लवाद नेमण्याची सूचना त्यांनी मान्य केली.

✦✦



**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन**

**तक्ता - ४ नियम ८ वा**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन ठिकाण | : | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) | प्रकाशन काल | : | मासिक |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : | होय |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : | होय |
| | पत्ता | : | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |
| ५) | संपादकाचे नाव | : | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : | होय |
| | पत्ता | : | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |

मी प्रमोद त्र्यं. नलावडे असे जाहीर करतो की, माझ्या माहिती प्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुद्रक व प्रकाशक




# यशवंत

हिमालयावर येता घाला
सह्यगिरी हा धावून गेला
मराठमोळ्या पराक्रमाने
दिला दिलासा इतिहासाला

या मातीच्या कणाकणातून
तुझ्या स्फूर्तीची फुलतील सुमने
जोवर भाषा असे मराठी
'यशवंताची' घुमतील कवने

– कवी राजा मंगसुळीकर

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, March 2012.
Date of Publication : 10th of every Month




# लोकराज्य

खप
पाच
लाख

वाचक
पन्नास
लाख

प्रती/To :

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक/From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे